अहवाल क्रमांक : १७२

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या सोलापूर जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

## सव्वीसावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक जून, २०१९ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१९

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या सोलापूर जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

## सव्वीसावा अहवाल

एचबी ४३९—१

## पंचायती राज समिति
## (सन २०१७-२०१८)

**समिति प्रमुख**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
५. ॲड. राहुल कुल, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. डॉ. देवराव होळी, वि.स.स.
८. *** रिक्त
९. डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
१०. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. किशोर पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
१४. श्री. तुकाराम काते, वि.स.स.
१५. श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
१६. श्री. भारत भालके, वि.स.स.
१७. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
१८. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
१९. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
२२. *** रिक्त
२३. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
२४. श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
२५. श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

२६. श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
२७. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
२८. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.
२९. *श्री. किशोर दराडे, वि.प.स.
३०. **श्री. निलय नाईक, वि.प.स.
३१. **श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)
(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.
(५) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

* श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्त केलेली आहे.

** श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च, २०१९ रोजीपासून नामनियुक्त केलेली आहे.

*** डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

# पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.

३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१३. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

१४. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

१६. श्री. अमित झनक, वि.स.स.

१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

२४. **रिक्त

२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठित करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची “ कार्यकारी समिती प्रमुख ” म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

**पंचायती राज समिति**

**(सन २०१५-२०१६)**

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर; वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा ' समिती प्रमुख ' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा सव्वीसावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठित झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर २०१७ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशीलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधिमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारून संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर

समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१२-१३ या वर्षाच्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठीत झालेल्या समितीने सोलापूर जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने सोलापूर जिल्हा परिषदेस दिनांक ७, ८ व ९ फेब्रुवारी, २०१८ रोजी भेट देऊन डॉ. राजेंद्र भारुड, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता गठीत झालेल्या समितीने सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २९ व ३० जानेवारी, २०१९ रोजी जिल्हा परिषद, सोलापूर संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ.प्रदीप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री.असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री.विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, श्री.आर.व्ही.पानसे, सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, श्री.ला.रा.गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री.गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.र.आ.नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.म.रं.शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री.कि.पां.वडते, उप सचिव, महसूल व वन विभाग, श्री.विकास कदम, अवर सचिव, पशुसंवर्धन विभाग, डॉ.विजय कुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, श्री.परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग तसेच श्री.प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या सोलापूर जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक ४ जून २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ४ जून, २०१९.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

**अनुक्रमणिका**


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | जलस्वराज्य प्रकल्पातील येणे रकमा ग्रामपंचायतीस देय अनुदानातून कपात केल्याबाबत (सन २०१२-१३) | ३.२८/३ | १ |
| (२) | दोन | व्यायामशाळा बांधकाम व व्यायामशाळा साहित्य खरेदीबाबत (सन २०१२-१३) | ३.३१/२४ | ५ |
| (३) | तीन | पंचायत समिती, अक्कलकोट प्रशासकीय इमारत बांधकामाबाबत (सन २०१२-१३) | ३.३१०/५ | ९ |
| (४) | चार | विक्रीकराची रक्कम देयकातून कमी कपात केलेबाबत (सन २०१२-१३) | ३.३१२/१४ | १६ |
| (५) | पाच | पशुसंवर्धन विभागाकडील अर्धवेळ परिचरांच्या वेतनाबाबत (सन २०१२-१३) | ३.७३५/२ | २० |
| (६) | सहा | दलित वस्ती सुधार योजना अनुदानाबाबत (सन २०१२-१३) | ३.८७९/२८ | २३ |
| (७) | सात | ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना जिल्हा परिषद सेस फंडातून देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाबाबत (सन २०१२-१३) | ३.९७७/२ ते ३.९८७ (१९) | २७ |
| (८) | आठ | सन २०१२-२०१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (सन २०१२-१३) | ३.१०७२/४ (१७) | ४१ |
| (९) | नऊ | लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणेबाबत (सन २०१२-१३) | | ४७ |
| (१०) | दहा | सर्वसाधारण शिफारशी | | ६२ |

**परिशिष्ट (अ)**

**शासनाचे आदेश, शासन निर्णय व परिपत्रके**

**परिशिष्ट (ब)**

**समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त**

## प्रकरण एक

## जिल्हा परिषद, सोलापूर

## जलस्वराज्य प्रकल्पातील येणे रकमा ग्रामपंचायतीस देय अनुदानातून कपात केल्याबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.२८/३ (सन २०१२-१३)**

जिल्हा परिषद, सोलापूर सन २०१२-१३ (परिच्छेद क्र.३) शासन निर्णय क्रमांक जस्वप्र-२०१०/प्र.क्र.९०/लेखा-०४/पापु-११/दिनांक ३० मार्च, २०११ **(परिशिष्ट १.१)** अन्वये जलस्वराज्य प्रकल्प दिनांक ३० जून, २०११ रोजी बंद करण्यात आला असून प्रकल्पातील शिल्लक रकमा शासन तिजोरीत जमा करणेबाबत सूचित केलेनुसार ९४ ग्रामपंचायतीकडून रक्कम रुपये ७५,५३,४११ शासन अनुदानाची रक्कम वसुलपात्र असल्याने ९४ ग्रामपंचायतीकडून गौण खनिज, मुद्रांक शुल्क स्वामित्वधन व इतर अनुदानातून काही रकमा वसुल करण्यात आल्या आहेत व काही वसूल करण्यात येत आहेत. या बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) जलस्वराज्य योजनेची अंमलबजावणी ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत झाली असून त्याचा निधी स्वतंत्र बँक खात्यामध्ये जमा करण्यात आल्याने येणे रकमांबाबत ग्रामपंचायतीचे दायित्व निश्चित करता येत नाही.

(२) जलस्वराज्य प्रकल्प पूर्णत्व प्रमाणपत्रानुसार ग्रामपंचायत स्तरावर शासन अनुदानाची रक्कम शिल्लक नसल्याचे नमूद केले आहे. तरी ग्रामपंचायत स्तरावर अनुदान शिल्लक नसताना रक्कम वसुलात आणल्याचे दिसून येते.

(३) जलस्वराज्य योजनेची वसुली करणेबाबत संबंधित ग्रामपंचायतींचे संमती पत्र नसतांना ही रक्कम वसूल करण्यात येत आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) जलस्वराज्य योजनेची अंमलबजावणी ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडून करण्यात येत असून सदर अंमलबजावणी ग्रामपंचायतीचे सरपंच हे अध्यक्ष व सदस्य सचिव म्हणून ग्रामसेवक असल्याने ग्रामपंचायतीकडून वसूल करण्यात आलेली आहे.

(२) जलस्वराज्य प्रकल्प पूर्णत्व अहवालामधील तक्ता क्र.५ अ नुसार वसूल करण्यात आलेला आहे.

(३) मा. प्रकल्प व्यवस्थापक यांचेकडील पत्र दिनांक २४ ऑक्टोबर, २०१३ अन्वये जलस्वराज्य प्रकल्प पूर्णत्व अहवालातील तक्ता क्र.५ अन्वये वसूल करण्यात आले असल्याने ग्रामपंचायतीच्या सहमतीची आवश्यकता नाही.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, रुपये ७५.५३ लाख वसूलपात्र करण्याचे प्रयोजन काय, त्यास जबाबदार कोण आहे, त्यांच्याकडून रक्कम वसूल न करण्याची कारणे काय आहेत, संचालकांनी याबाबत थोडक्यात माहिती द्यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जलस्वराज्य योजना पाणी पुरवठा समितीमार्फत राबविली जाते. ही योजना राबविताना ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत अंमलबजावणी केली जाते. तिचा निधी स्वतंत्र बँक खात्यामध्ये जमा करण्यात आल्याने येणे रकमेबाबत ग्रामपंचायतीचे उत्तरदायित्व निश्चित करता येत नाही असा आक्षेप होता. दिनांक २४ ऑक्टोबर, २०१३ रोजी प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य प्रकल्प यांचे असे पत्र आले होते की, ज्या ग्रामपंचायतींनी त्यांना दिलेला निधी खर्च केला नसेल किंवा त्यांच्या निव्वळ वसुली विवरणामध्ये वसुली असेल तर समितीमार्फत वसुली करण्यात काहीही चूक नाही असे शासन निर्णयामध्ये म्हटले आहे. त्या समितीचे अध्यक्ष हे सरपंच आणि सदस्य सचिव हे ग्रामसेवक असतात म्हणून वसुलीची कार्यवाही करण्यात आली आहे. मूळ परिच्छेदात आक्षेप होता की, वसुली का केली, यावर संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय यांनी खुलासा केला की, समितीचा अध्यक्ष हा सरपंच असेलच असे नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शासन परिपत्रक दिनांक २ डिसेंबर, २०११ **(परिशिष्ट १.२)** मधील परिच्छेद क्रमांक ५ मध्ये ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ४९ मधील तरतुदीनुसार ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती अविभाज्य घटक असल्यामुळे पाणी पुरवठा निधी हाताळण्याची संयुक्त जबाबदारी राहील. जबाबदारी निश्चित करून वसुली करणे आवश्यक असल्याने जिल्हा परिषद त्यांच्याकडून वसुली करीत आहे. यावर समितीने विचारणा केली की, चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले, वसुली कशी केली, करारनामा कोणाबरोबर झाला होता, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जलस्वराज्य प्रकल्प सन २००४ मध्ये सुरू झाला त्यावेळी १२४ गावांची निवड केली होती. त्यापैकी २५ गावे वगळण्यात आली. ९९ ग्रामपंचायतींमध्ये योजना सुरू झाली. त्यांना रुपये ३५.९८ लाख वितरित केले होते, त्यातील रुपये १७.९८ लाख वसूलपात्र रक्कम होती, ती वसूल केली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, ९४ ग्रामपंचायतीच्या गौण खनिज, मुद्रांक शुल्क व इतर अनुदानातून रक्कम कपात केली आहे. त्यांच्यावर कोणते ताशेरे होते, योजना अपूर्ण राहिली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, रक्कम अखर्चित होती. यावर समितीने मत व्यक्त केले की, ९४ ग्रामपंचायतींना मिळणारा निधी जिल्हा परिषदेने रोखला. म्हणजेच प्रकल्प बंद होण्यापूर्वी काम झालेले नाही असा अर्थ होतो. हा प्रश्न संपूर्ण राज्याला लागू होतो. सगळीकडे हा विषय चर्चेला येतो. भंडारा जिल्ह्यामध्ये ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती होती, त्यांच्याविरुद्ध प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल झाला. ग्रामपंचायतीकडून वसुली झालेली नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक ३ सप्टेंबर, २००१ रोजी मंजुरी देण्यात आली, त्यावेळी १० टक्के लोकसहभागाची अट होती.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, जलस्वराज्य योजना सुरू झाली त्यावेळेला सरपंच, ग्रामसेवक आणि त्यांनी ठरवून दिलेला अभियंता यांनी काम करायचे, त्यांच्यावर जिल्हा परिषद अधिकाऱ्यांचे नियंत्रण नव्हते. त्यांनीच काम करायचे होते. समितीच्या खात्यामध्ये निधी आला की, ग्रामसेवक व सरपंच यांच्यात साटेलोटे व्हायचे. पैसे वसूल होतात, परंतु फौजदारी गुन्हा दाखल व्हावयास पाहिजे. जत तालुक्यामध्ये फौजदारी गुन्हा दाखल करावयास लावला होता. जिल्हा परिषदेने गुन्हा का दाखल केला नाही हा मुद्दा आहे.

यावर समितीने विचारणा केली की, चूक पाणी पुरवठा समितीने केली आणि ग्रामस्थांना परिणाम भोगावे लागले. या प्रकरणी जिल्हा परिषदेमधील अधिकाऱ्यांची चूक ग्रामपंचायतींना भोगावी लागली आहे. ग्रामपंचायतींकडून पैसे वसूल करण्याबाबतचा आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा होता की शासनाचा होता, मुद्रांक शुल्क हे लोकांच्या हक्काचे पैसे आहेत. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग हे उपस्थित असतील तर त्यांना बैठकीसाठी बोलाविण्यात यावे.

यावर उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, पंढरपूर यांनी खुलासा केला की, जलस्वराज्य योजनेमधून ग्रामीण पाणी पुरवठा समितीला दिलेले पैसे काही ग्रामपंचायतींकडून वसूल करण्यात आलेले आहेत. यावर समितीने सदरहू पैसे ग्रामीण पाणी पुरवठा समितीच्या खात्यावर जमा होते, असा आक्षेप घेतला व हे पैसे चुकीच्या पद्धतीने खर्च करण्यात आले व त्याबाबत ग्रामपंचायतींवर कशी कारवाई करण्यात आली, लेखापरिक्षकांनी काढलेले आक्षेप खोडून काढण्याबाबत शासनाकडून जिल्हा परिषदेस काही आदेश आहेत काय अशी विचारणा केली असता उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, पंढरपूर यांनी खुलासा केला की, ही ग्रामपंचायतीची समिती असल्यामुळे यामध्ये संमती घेतलेली नाही.

यावर समितीने ९४ ग्रामपंचायतींमध्ये नियमानुसार पैसे खर्च न झाल्यामुळे वसुली करण्यात आली आहे. याबाबत चौकशी करताना त्यामध्ये कोण दोषी आढळून आले हे माहिती नाही. याचे मूल्यांकन कोण करते अशी विचारणा केली असता उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, पंढरपूर यांनी खुलासा केला की, टी.एस.पी. द्वारे मुल्यांकन करण्यात येते. त्यावर उप अभियंता व कार्यकारी अभियंता हे असतात.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, ग्रामपंचायतीमध्ये कोणी तांत्रिक माणूस होता का, टी.एस.पी. हे आपण ठरवून दिलेले होते. कार्यकारी अभियंता तसेच उप अभियंता यांची ही जबाबदारी होती. ग्रामीण पाणी पुरवठा समितीने चुकीचे काम केल्यामुळे जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतींवर कारवाई केली आहे. ग्रामीण पाणी पुरवठा समितीमधील कोण दोषी होते तसेच कोणाबरोबर करारनामा करण्यात आला होता हे जिल्हा परिषदेने तपासले असेल. उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, पंढरपूर यांनी खुलासा केला की, शिल्लक राहिलेला निधी खर्च झाल्याने तो ग्रामपंचायतींकडून वसूल करावा असे सांगण्यात आले.

यावर समितीने निदेश दिले की, याबाबतच्या आदेशाची प्रत समितीस सादर करण्यात यावी. सदर परिपत्रक चुकीचे आहे. ग्रामपंचायत, ग्रामसेवक, सरपंच, एखादी एजन्सी किंवा अभियंता यापैकी ज्यांनी अपहार केला असेल त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. याबाबत सन २०१३ चे परिपत्रक दाखविण्यात आले असून त्यानुसार ग्रामपंचायतीकडून वसुली करण्यात आली, हे मान्य आहे. आपण परिपत्रकाच्या आधारे वसुली केली हे खरे आहे, परंतु ज्यांनी यामध्ये अफरातफर केली त्यांच्यावर गुन्हे दाखल करणे अपेक्षित होते. या प्रकरणी ज्यांनी अफरातफर केली त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल होणे आवश्यक होते, परंतु तसे झालेले नाही. त्यामुळे याबाबत सखोल चौकशी करुन तत्कालीन दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे. याबाबत सखोल चौकशी करुन कारवाईच्या अहवालासह सर्व माहिती समितीस तात्काळ सादर करावी.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणी अपहार केल्याचे सिद्ध झालेले नाही. याचे लेखे सादर करण्यात आलेले आहेत. तालुका किंवा ग्रामपंचायत स्तरावर निव्वळ रक्कम वितरीत झाल्यानंतर लेखापरीक्षण करण्यात आले. त्यामध्ये काही रक्कम शिल्लक असल्याचे आढळून आले. तरीही समितीच्या सूचनेनुसार याबाबत कार्यवाही करण्यात येईल. यावर समितीने विचारणा केली की, निव्वळ रकमेची वसुली करण्यात यावी असे पत्र आले असेल तर त्यांच्याकडे पैसे शिल्लक असणे आवश्यक होते. त्यांनी जर बेकायदेशीररित्या खर्च केला असेल तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. जिल्हा परिषदेच्या मते पैसे अखर्चित असतील तर गौण खनिज, मुद्रांक शुल्क किंवा इतर रक्कम कपात करण्याची आवश्यकता नव्हती. सदर प्रकरण अतिशय गंभीर आहे. यामध्ये संदिग्धता आहे. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. या प्रकरणी चौकशी करून तसा अहवाल समितीस सादर करावा. तसेच सदर प्रकरण समितीच्या साक्षीसाठी देखील घेण्यात येईल, याबाबतचे परिपत्रक व इतर बाबींवर समिती त्या दरम्यान चर्चा करेल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

जलस्वराज्य प्रकल्पातील येणे रकमा ग्रामपंचायतीस देय अनुदानातून कपात केल्याबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशी अंती काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सोलापूर येथील जलस्वराज्य प्रकल्प दिनांक ३० नोव्हेंबर, २०११ रोजी बंद करण्यात आलेला होता. सदर प्रकल्पामध्ये ९९ ग्रामपंचायतीने कामे सुरु करून पूर्ण केलेली आहेत. या जलस्वराज्य प्रकल्पाअंतर्गत रुपये ७५.५३ लक्ष इतकी रक्कम वसूलपात्र होती. सदर वसुलीपैकी रुपये १७.९८ लक्ष इतकी रक्कम ग्रामपंचायत गौण खनिज मुद्रांक शुल्क व इतर अनुदानातून ग्रामपंचायतींच्या देय रकमेतून कपात करण्यात आलेली होती. दिनांक २४ ऑक्टोबर, २०१३ रोजी प्रकल्प व्यवस्थापक जलस्वराज्य प्रकल्प यांचे प्राप्त पत्रानुसार ज्या ग्रामपंचायतींनी त्यांना वितरित करण्यात आलेला निधी अद्याप पर्यंत खर्च केलेला नाही अथवा त्यांच्या निव्वळ वसुली विवरणामध्ये वसुली केली असेल तर ती समितीमार्फत वसुली करण्यास काही चूक नाही असे शासन निर्णयामध्ये नमूद केलेले होते. सदर समितीचे अध्यक्ष, सरपंच व सदस्य सचिव, ग्रामसेवक असतात म्हणून वसुलीची कारवाई करण्यात आली आहे. शासन परिपत्रक दिनांक २ डिसेंबर, २०११ मधील परिच्छेद क्रमांक ५ मध्ये ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ४९ मधील तरतुदीनुसार ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती अविभाज्य घटक असल्यामुळे पाणी पुरवठा निधी हाताळण्याची संयुक्त जबाबदारी सदर समितीवर असते. त्याअनुषंगाने ग्रामपंचायतीवर जबाबदारी निश्चित करून सदरची वसुली करणेत आलेचे दिसून येते. यासंबंधाने तत्कालीन संबंधितांवर कोणतीही दंडात्मक अथवा प्रशासकीय कारवाई करण्यात आलेली नाही.

तथापि पंचायती राज समितीने निर्देशित केल्यानुसार तत्कालिन पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांकडील वसुलीसंबंधात, सदर समित्यांच्या अध्यक्ष व सचिव यांचेविरूद्ध गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**(१) मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :-** सदर प्रश्न पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाशी संबंधित आहे असे दिनांक १३ डिसेंबर, २०१८ च्या पत्राने पाणीपुरवठा व स्वच्छता विभागास कळविले असून सदर पत्राची प्रत पृष्ठांकनाने विधानमंडळ सचिवालयास व या विभागास पाठविली आहे.

**(२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** जलस्वराज्य - १ ह्या प्रकल्पातील येणे रकमा ग्रामपंचायतीस देय अनुदानातून कपात केल्याबाबतच्या मुद्द्याबाबत संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी व ग्राम विकास विभागाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे, असे दिनांक २१ जानेवारी, २०१९ च्या पत्राने या विभागास कळविले आहे.

**(३) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) गौण खनिज, मुद्रांक शुल्क या ग्रामपंचायतीस देय अनुदानातुन कपात करण्याचा अधिकार जिल्हा परिषदेस नाही. सदर मुद्याबाबत सखोल चौकशी करून चौकशीअंती संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याबाबत जिल्हा परिषद सोलापूरला निर्देशित करण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सोलापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की सदर प्रकरणी सखोल चौकशी केली आहे काय, असल्यास त्या संदर्भात संबंधितांची जबाबदारी निश्चित करून त्यानंतर कोणती कारवाई करण्यात आली. या संदर्भात लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, " समितीचे अध्यक्ष, सरपंच व सदस्य सचिव म्हणून ग्रामसेवक काम करीत असल्यामुळे त्यांच्याकडून मुद्रांक शुल्काच्या वसुलीची कारवाई करण्यात आली आहे ." परंतु ही चुकीची कारवाई झाली असल्यामुळे सदर उत्तर चुकीचे आहे.

यावर उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, मुद्रांक शुल्क हे ग्रामपंचायतीचे उत्पन्न असल्यामुळे जिल्हा परिषदेला अशाप्रकारे त्याची वसुली करता येणार नाही असे विभागाने लेखी स्पष्टीकरणात नमूद केलेले आहे. ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ४९ मधील तरतुदीनुसार ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन केली जाते. त्या समितीला स्वतःचे अधिकार असतात. त्यामुळे त्या समितीला निधी दिला जातो. गौण खनिज, मुद्रांक शुल्क या ग्रामपंचायतीस देय असलेल्या अनुदानातून कपात करण्याचा जिल्हा परिषदेला अधिकार नसल्याबाबत विभागाने अभिप्राय दिलेले आहेत. त्यानुसार जिल्हा परिषदेला निर्देश देण्यात येत आहेत.

यावर समितीने निदेश दिले की, ही पद्धत राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये सुरु आहे. त्यामुळे ग्रामविकास विभागाने या संदर्भात ताबडतोब सर्व जिल्हा परिषदांना पत्राद्वारे कळवावे. अशा प्रकारे रक्कम कपात करीत असताना ग्रामसभेची परवानगी घेणे आवश्यक होते. परंतु तसे घडलेले नाही. नियोजनासाठी असलेल्या निधीचे ग्रामसभेकडून नियोजन केले जात असते. हा मुद्दा वारंवार उपस्थित होत आहे. त्यामुळे अशा प्रकारे रक्कम कपात करीत असताना ती कशाप्रकारे करावी याबाबतीत विभागाने लेखी पत्राद्वारे सर्व जिल्हा परिषदांना अवगत केले पाहिजे. तसेच अशाप्रकारे रक्कम कपात करण्याकरिता ग्रामसभेची परवानगी घेण्याबाबत त्यात स्पष्टपणे नमूद करण्यात यावे.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ मध्ये जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत जलस्वराज्य प्रकल्पासंदर्भात दिनांक ३० मार्च, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक ३० जून, २०११ रोजी जलस्वराज्य प्रकल्प बंद करण्यात आला असून प्रकल्पातील शिल्लक रकमा शासन तिजोरीत जमा करणेबाबत सुचित केल्यानुसार ९४ ग्रामपंचायतीकडून रक्कम रुपये ७५,५३,४११/- शासन अनुदानाची रक्कम वसुलपात्र असल्याने ९४ ग्रामपंचायतीकडून गौण खजिन, मुद्रांक शुल्क, स्वामित्वधन व इतर अनुदानातून काही रकमा वसूल करण्यात आल्या आहेत. याबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

जलस्वराज्य योजनेची अंमलबजावणी ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत झाली असून त्याचा निधी स्वतंत्र बँक खात्यामध्ये जमा करण्यात आल्याने येणे रकमांबाबत ग्रामपंचायतीचे दायित्व निश्चित करता येत नाही. जलस्वराज्य प्रकल्प पूर्णत्व प्रमाणपत्रानुसार ग्रामपंचायत स्तरावर शासन अनुदानाची रक्कम शिल्लक नसल्याने नमूद केले आहे. तरी ग्रामपंचायत स्तरावर अनुदान शिल्लक नसताना रक्कम वसुलात आणल्याचे दिसून येते. जलस्वराज्य योजनेची वसुली करणेबाबत संबंधित ग्रामपंचायतीचे संमती पत्र नसताना ही रक्कम वसूल करण्यात येत आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशाच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, जिल्हा परिषदेने ९४ ग्रामपंचायतीकडून रुपये ७५.५३ लक्ष एवढी शासन अनुदानाची रक्कम वसुलपात्र करण्याचे प्रयोजन केले आहे. जलस्वराज्य योजना पाणी पुरवठा समितीमार्फत राबविली जाते. सदर योजनेचा निधी स्वतंत्र बँक खात्यामध्ये जमा करण्यात आल्याने येणे रकमेबाबत ग्रामपंचायतीचे उत्तरदायित्व निश्चित करता येत नाही. ज्या ग्रामपंचायतींनी त्यांना दिलेला निधी खर्च केला नसेल किंवा त्यांच्या निव्वळ वसुली विवरणामध्ये वसुली असेल तर पाणीपुरवठा समितीमार्फत वसुलीची कार्यवाही करण्यात आली आहे. समितीच्या मते जलस्वराज्य योजना सुरु झाली त्यावेळेला सरपंच, ग्रामसेवक आणि त्यांनी ठरवून दिलेला अभियंता यांनी काम पूर्ण करणे आवश्यक होते. त्यांच्यावर जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांचे नियंत्रण नव्हते. समितीच्या खात्यामध्ये निधी आल्यानंतर ग्रामसेवक आणि सरपंच यांनी म्हणजेच पाणी पुरवठा समितीने चुकीच्या पद्धतीचे निधी खर्च केला. नियमानुसार पैसे खर्च न झाल्यामुळे ग्रामपंचायतीवर कारवाई करण्यात आली असल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात ग्रामसेवक, सरपंच एखादी एजन्सी किंवा अभियंता यापैकी ज्यांनी अपहार केला असल्यास त्यांचेवर गुन्हे दाखल करुन कारवाई होणे आवश्यक होते.

शासन परिपत्रकानुसार निव्वळ रकमेची वसुली करणे अभिप्रेत असताना संबंधित ग्रामपंचायतीकडे रक्कम शिल्लक असणे आवश्यक होते. जिल्हा परिषदेने गौण खनिज, मुद्रांक शुल्क किंवा इतर रक्कम कपात करण्याची आवश्यकता नव्हती त्यामुळे सदर प्रकरण अतिशय गंभीर व अत्यंत संदिग्ध आहे. याठिकाणी संबंधितांविरुद्ध कारवाई झाल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे याबाबत सखोल चौकशी करुन चौकशीनुसार दोषी आढळून आलेल्या तत्कालिन संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.

**मुद्रांक शुल्क हे ग्रामपंचायतीचे उत्पन्न असल्यामुळे जिल्हा परिषदेला अशाप्रकारे वसुली करता येणार नाही. ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ४९ मधील तरतुदीनुसार ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन केली जाते. सदर समितीला निधी दिला जातो. गौण खनिज, मुद्रांक शुल्क या ग्रामपंचायतीस देय असलेल्या अनुदानातून कपात करण्याचा अधिकार जिल्हा परिषदेला नाही. असे असतानाही ही पद्धत राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये सुरु आहे. त्यामुळे ग्रामविकास विभागाने ग्रामपंचायतींना देय असणाऱ्या गौण खनिज, मुद्रांक शुल्क, स्वामित्वधन व इतर अनुदानाच्या रकमा ग्रामपंचायतीकडून जिल्हा परिषदांनी वसुल न करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना पत्राद्वारे तात्काळ कळविण्यात यावे, अशाप्रकारे रक्कम कपात करीत असताना ग्रामसभेची परवानगी घेणे आवश्यक होते. परंतु याठिकाणी तसे घडलेले नाही. नियोजनासाठी असलेल्या निधीचे ग्रामसभेकडून नियोजन करणे अपेक्षित असते. याबाबतही ग्रामविकास विभागाने सर्व जिल्हा परिषदांना अवगत करण्यात यावे, अशाप्रकारे रक्कम कपात करण्याकरिता ग्रामसभेची परवानगी घेण्याबाबत शासन पत्रात स्पष्टपणे नमूद करण्यात यावे, जेणेकरुन ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाची साधने असलेल्या इतर बाबींवरचा निधी त्याच बाबींवर खर्च होऊ शकेल, अशी समिती शिफारस करीत आहे. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, सोलापूर

### व्यायामशाळा बांधकाम व व्यायामशाळा साहित्य खरेदीबाबत.

**परिच्छेद क्रमांक ३.३१/(२४) (सन २०१२-१३);**

१) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय जिवायो. १०००७/प्र.क्र.३९/का-१४४४, दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ **(परिशिष्ट २.१)** रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे सदर काम १ किंवा २ वित्तीय वर्षामध्ये पूर्ण करणे बंधनकारक असताना सन २०१० ते २०११ मधील योजनेचा खर्च सन २०१२-१३ मध्ये करण्यात आला आहे.

२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय/२०१०/२७५/ प्र.क्र.१७२/पंरा-१९, ऑक्टोबर, २०११ **(परिशिष्ट २.२)** नुसार ज्या वस्तु/साहित्य सेवा पुरवठ्यासाठी शासन दर करार नाहीत अशा रुपये १ लाखापेक्षा जास्त रकमेच्या वस्तुंची खरेदी दिनांक ०१ जानेवारी, २०१२ पासून ई-टेंडरींगद्वारे करणेचे असताना जिल्हा परिषदेने निविदा मागवून साहित्य खरेदी केलेले आहे.

३) व्यायामशाळा पुर्णत्वाचे दाखले सन २०१२-१३ अखेर प्राप्त न झालेमुळे व्यायाम शाळा साहित्य कोणत्या ठिकाणी बसविण्यात आले याची ग्रामपंचायत निहाय माहिती दप्तरी उपलब्ध नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.–**

१) व्यायामशाळा योजना ही जिल्हा नियोजन मंडळाच्या नाविण्यपूर्ण योजनेंतर्गत घेण्यात आली. सदर कामासाठी सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात दिनांक ३० मार्च, २०११ रोजीच्या आदेशानुसार ४३.१९ लक्ष रुपये निधी प्राप्त झाला. तसेच २०११-१२ या आर्थिक वर्षात दिनांक २५ ऑक्टोबर, २०११ च्या निधी वितरण आदेशाद्वारे रक्कम रुपये ३६.८१ लक्ष रुपये निधी प्राप्त झाला. १४ ग्रामपंचायतींना व्यायामशाळेसाठी सदर निधी वेळेवर वितरित करण्यात आला होता. परंतु सुगाव (खु.) ता.पंढरपुर व खंडोबाचीवाडी ता. मोहोळ या ठिकाणी वाळूची टंचाई असल्यामुळे व्यायामशाळेचे बांधकाम वेळेत होऊ शकले नाही. सदरचा निधी हा सन २०१२-१३ मध्ये खर्च झाल्याने त्यानुसार व्यायामशाळा बांधकामाचे पुर्णत्वाचे दाखले घेण्यात आलेले आहे.

२) व्यायाम शाळा बांधकामाचे क्रीडा विभागाने ई निविदा करुन तयार केलेल्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी केलेल्या ई निविदेच्या शासन दर करार नुसार क्रीडा साहित्याचे खरेदी करण्यात आलेली आहे. त्यानुसार व्यायाम शाळेमध्ये साहित्य बसविण्यात आल्याचे छायाचित्रे जोडण्यात आले आहे.

३) व्यायाम शाळा बांधकामाचे पूर्णत्वाचे दाखले घेण्यात आलेले आहेत. सोबत फोटो व पुर्णत्वाचे दाखले आहेत. सदर माहिती ग्रामपंचायतीच्या दफ्तरी उपलब्ध आहेत.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २०१०-११ व २०११-१२ मध्ये मंजूर झालेला निधी खर्च झाला नाही. त्या कालावधी नंतर सदर निधी खर्च करण्यासाठी कोणाची परवानगी घेतली होती, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत जिल्हाधिकारी यांचेकडून ८० लाख रुपये मंजूर झाले होते. त्यांपैकी सन २०१०-११ मध्ये ४३.७९ लाख व सन २०११-१२ मध्ये काही निधी प्राप्त झाला. अनुदान जरी एका वर्षामध्ये मंजूर झाले असले तरी ते दोन टप्प्यांमध्ये देण्यात आले. सन २०१०-११ चा निधी मार्च, २०१२ पर्यंत खर्च केलेला आहे. तसेच सन २०११-१२ चा निधी सन २०१३ पर्यंत खर्च केला आहे. यासाठी जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सदर निधी दोन वर्षांमध्ये खर्च करायचा होता. सन २०१०-११ व २०११-१२ मध्ये तो खर्च झाला नाही. आपण सन २०१२-१३ मध्ये म्हणजे तिसऱ्या वर्षामध्ये खर्च केला आहे. यासाठी कोणाची परवानगी घेतली होती, हा निधी राज्य सरकारच्या व्हाईट बुकमध्ये कधी प्रदर्शित झाला होता, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१०-११ साली हा निधी मंजूर झाला होता. सन २०१०-११ मध्ये ४३.२९ लाख रुपयेएवढा निधी आला होता. यावर समितीने विचारणा केली की, मार्च, २०१२ मध्ये त्याची मुदत संपली. सन २०१३ मध्ये आपण कोणाच्या परवानगीने हा निधी खर्च केला, सन २०१०-११ मध्ये या योजनेस मंजुरी मिळाली आहे. पुढील दोन वर्षांमध्ये हा निधी खर्च करणे आवश्यक होते. परंतु सदर निधी सन २०१२-१३ साली खर्च करताना आपण शासनाची परवानगी घेतली होती का, सदर प्रकरणी सन २०१०-११ चा निधी सन २०१२-१३ मध्ये खर्च केला आहे. परंतु काही व्यायामशाळांमध्ये वेगळाच प्रकार आहे. बार्डी, अनवली या ठिकाणी व्यायामशाळा

न बांधताच पैसे उचलल्याची तक्रार समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केलेली आहे. त्यामध्ये कंत्राटदाराचे नावदेखील दिले आहे. हा निधी जिल्हा व नियोजन समितीमधील क्रीडा क्षेत्रासाठीचा असेल. आपल्याला या प्रकरणाची माहिती नाही का, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी नाही असे समितीस उत्तर दिले.

यावर समितीने निर्देश दिले की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना याबाबत माहिती नसेल तर मुख्य लेखा व वित्त अधिकारी या बैठकीस हजर कशासाठी राहिले आहात, सन २०१०-११ साली प्राप्त झालेला निधी सन २०१२-१३ मध्ये खर्च करण्यासाठी कोणाची परवानगी घेतलेली नाही, असा आक्षेप घेण्यात आलेला आहे. बांधकाम न करताच पैसे घेतल्याच्या मुद्याबाबत चौकशी करण्यात यावी. तसेच जुन्याच व्यायामशाळेला नवीन असल्याचे सांगितले गेले आहे. याबाबत चौकशी करण्यात यावी.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर निधी ग्रामपंचायतींना दिला होता. जिल्हयामध्ये अशा एकूण १४ ग्रामपंचायती होत्या. हे पैसे क्रीडा साहित्य व बांधकामासाठी देण्यात आले होते. यावर समितीने मत व्यक्त केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरावरदेखील समितीचा आक्षेप आहे. आपण दोन वर्षांमध्ये पैसे दिले असते तर लेखापरीक्षणामध्ये आक्षेप आला नसता. आपण व्यायामशाळा साहित्यासाठी प्रत्येकी दोन लाख रुपये दिले असे सांगत आहात. त्यानुसार १४ व्यायामशाळांचे २८ लाख रुपये होतात. उर्वरित निधीमध्ये बांधकाम कसे होऊ शकते, हा एकूण ७० लाख रुपयांचा विषय आहे. त्यांपैकी २८ लाख रुपये साहित्यासाठी दिल्यानंतर उर्वरित ४० लाख रुपयांमध्ये १४ व्यायामशाळा होऊ शकतात काय, त्यामुळे याबाबत संशय येत असून याची सद्यस्थिती समितीस सांगण्यात यावी. तसेच जिल्हा परिषदेने साहित्य खरेदी करुन दिल्याचे अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे. परंतु हे साहित्य कुठे वापरले याची माहितीच नाही.

जिल्हा परिषदेचे कामकाज व्यवस्थित चालते की नाही हे पाहण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त कार्यालयाची आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाने ज्या ७७ बाबी तपासल्या आहेत, त्यामध्ये काम नियमानुसार झाले की नाही, याबाबतीत आयुक्त कार्यालयाने समितीसमोर माहिती द्यावी. यावर सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांनी खुलासा केला की, ही माहिती पुस्तिकेमध्ये बघावी लागेल. यावर समितीने निदेश दिले की, आयुक्त कार्यालयालासुद्धा काहीच माहीत नाही त्यामुळे या अधिकाऱ्यांवर सुद्धा कारवाई केली पाहिजे. आयुक्त कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी पुस्तकच बघितलेले दिसत नाही.

यावर समितीने माहिती दिली की, जिल्हा परिषदेचे लेखापरीक्षण झाल्यानंतर आयुक्त कार्यालयात मुक्तपणे तपासणी केली होती. शासनाच्या धोरणाप्रमाणे आयुक्त कार्यालयाकडून या लेखापरीक्षणाची तपासणी होणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेला पैसे खर्च करण्याची परवानगी होती म्हणून जिल्हा परिषदेने तिसऱ्या दिवशी ग्रामपंचायतीला पैसे वितरीत केले म्हणून हा आक्षेप आला. हा स्थानिक निधी लेखा परीक्षणाचा आक्षेप आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, पुरवठा आदेश दिनांक २१ मार्च, २०१२ रोजीचे आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, पैसे ग्रामपंचायतीला देताना जिल्हा परिषदेची संमती घेतली होती का, हा निधी दोन वर्षांमध्ये खर्च करायचा होता. तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या कार्यकाळातील हे प्रकरण असल्यामुळे तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस माहिती द्यावी. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०११-२०१२ मध्ये निधी आलेला आहे. लगेचच्या वर्षात खर्च करायचा आहे असे ग्राह्य धरून निधी रिलीज केलेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, आपण १२ कामांचे देयक अदा केलेले आहे. व्यायाम शाळेचे काम झालेले नसतानाही आपण त्यांचे देयक अदा कसे काय केले.

यावर तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, दोन वर्षांनंतर खर्च करण्याची परवानगी मी कधीच दिलेली नाही. दिनांक ६ जून, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार ज्या वर्षात निधी प्राप्त झालेला आहे त्याच्या दुसऱ्या वर्षात तो खर्च करण्यात येईल. मी कटाक्षाने याचे पालन केलेले आहे. मुदत असल्याशिवाय निधी खर्च होणार नाही. यावर समितीने विचारणा केली की, सन २०१०-२०११ मधील कामांना मंजुरी मिळाली असताना आपण सन २०१२-२०१३ मध्ये खर्च का केला, नियतव्यय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांत खर्च करायचा असतो. आपण पूर्ण निधीची वाट बघतो का, यावर तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक ३१ मार्चपासून ते जूनपर्यंत आपण निधीचे फायनल वाटप करतो. सन २००९-२०१० ला काही निधी आला तर सन २०११-२०१२ ला काही निधी आलेला आहे. सन २००९-२०१० च्या योजनेतील काही पैसे शिल्लक राहिले होते.

यावर समितीने निदेश दिले की, व्यायाम शाळा बांधकाम व व्यायाम शाळा साहित्य खरेदीबाबत दोन वर्षांत पैसे खर्च करायला हवे होते, परंतु दोन वर्ष संपल्यानंतर पैसे खर्च केलेले आहेत. पुरवठा आदेश दिनांक ३१ मार्च, २०१२ रोजी देणे, विशेष सभेची मान्यता न घेता पूर्ण पैसे खर्च करणे, त्याचा हिशोब निट न ठेवणे, लेखा परीक्षणासाठी दाखले उपलब्ध करुन न देणे यासंदर्भातील आक्षेप लेखा परिक्षणामध्ये आलेले आहेत. विशेष सभेची परवानगी घेतलेली नाही. या प्रकरणी जुनी कामे दाखवून पैसे काढण्यासंदर्भातील शंका समितीने व्यक्त केलेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणाची चौकशी केली पाहिजे. नियमानुसार दोन वर्षांत पैसे खर्च करणे आवश्यक असताना आपण त्यानंतर नियम नसताना पैसे खर्च केलेले आहेत. यासंबंधी जबाबदारी निश्चित करुन नियमानुसार काम केलेले नसेल तर कारवाई करणे अपेक्षित आहे. या कारवाईमध्ये दंडात्मक कारवाई

म्हणून २५ हजार रुपये दंड, त्यांच्या सेवा पुस्तकात नोंद आणि एक वेतनवाढ रोखण्यात यावी. यासंबंधीची सर्व चौकशी करुन कारवाईसह अहवाल एक महिन्याच्या आत समितीला सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :**

व्यायामशाळा बांधकाम व साहित्य खरेदीप्रकरणी नियमानुसार दोन वर्षांत रक्कम खर्च करणे आवश्यक असताना विशेष सभेची परवानगी न घेता जुनी कामे दर्शवून नियमबाहयरीत्या रक्कम खर्च केल्याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

व्यायाम शाळा बांधकाम व व्यायाम शाळा साहित्यबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत चौकशी केली आहे.

सदर योजनेकरीता जिल्हा नियोजन समिती मार्फत नाविन्यपूर्ण योजना अंतर्गत दिनांक ३० मार्च, २०११ व दिनांक २५ ऑक्टोबर, २०११ रोजी अशा दोन टप्प्यांत निधी प्राप्त झाला आहे.

वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण.१०-०२/प्रक्र१२८/अर्थोपाय मंत्रालय, मुंबई दिनांक ६ जून, २००८ **(परिशिष्ट २.३)** नुसार प्राप्त निधी लगतच्या वर्षात खर्च करण्यास मान्यता असल्याने सन २०१०-११ चा निधी सन २०११-१२ मध्ये खर्च करण्यात आलेला आहे व सन २०११-१२ मध्ये प्राप्त निधी सन २०१२-१३ मध्ये खर्च करण्यात आलेला आहे. सोबत शासन निर्णयाची प्रत माहितीस्तव जोडली आहे.

सदर योजनेंतर्गत एकूण १३ कामे मंजूर होती व ती सर्व व्यायाम शाळेची कामे पूर्ण झालेली असून त्याचे पूर्णत्वाचे दाखले व फोटो दप्तरी उपलब्ध आहेत. सबब नियम ७ प्रमाणे कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**(१) नियोजन विभागाचे अभिप्राय .-** पंचायती राज समिती प्रमुखांच्या उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी या प्रकरणी कारवाई करणे अपेक्षित आहे. तसेच शासन निर्णय नियोजन विभाग क्र. जिवायो-१००७/प्र.क्र. ४९/कार्य.१४४४/ दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ अन्वये सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना निधी अर्थसंकल्पित करणे, वितरीत करणे व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत सुधारीत कार्यपद्धती विहीत केली आहे. यात योजनेची अंमलबजावणी, संनियंत्रण, लेखापरीक्षण, व विधिमंडळ कामकाज विषयक बाबी हाताळणे यातील अनु.क्र.६.५ नुसार जिल्हा योजनेतील गैरव्यवहार, लेखाआक्षेप, लोकलेखा समिती, विधीमंडळ कामकाज इ. बाबींसाठी संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकीय विभाग जबाबदार राहील असे स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यानुसार संदर्भ क्र. १ येथील पत्रासोबत पाठविलेल्या प्रस्तावातील अ.क्र. ३ बाबत नियोजन विभागाकडून पंचायती राज समिती प्रमुखांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कोणतीही कार्यवाही अपेक्षित नसून ग्रामविकास विभागाकडूनच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी या प्रकरणी केलेल्या चौकशीप्रमाणे कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

**(२) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय .–** (वित्त-७) जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सोलापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ व ३० जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा की, व्यायामशाळा बांधकाम व साहित्य खरेदी प्रकरणी नियमानुसार २ वर्षांमध्ये रक्कम खर्च करणे आवश्यक असताना विशेष सभेची परवानगी न घेता नियमबाह्य खर्च केल्याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल चौकशी केली आहे का, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली.

व्यायामशाळा बांधकाम किंवा साहित्याकरिता आवश्यक असलेला निधी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याकडे येत असतो. त्याकरिता संबंधित शाळांकडून जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठविले जातात. अशा परिस्थितीत सदर निधी जिल्हा परिषदेकडे कसा आला, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या संदर्भात सन २०१०-११ मध्ये जिल्हा नियोजन समितीमध्ये निर्णय घेऊन नाविन्यपूर्ण योजनेतून कार्यवाही करण्यात आली होती. यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेची नियोजित योजना असल्यामुळे नाविन्यपूर्ण योजनेमधून जिल्हा परिषद अशा प्रकारचा खर्च करु शकत नाही. हा परिच्छेद नियोजन विभागाशी संबंधित आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या परिच्छेदामध्ये असा आक्षेप होता की, दोन वर्षात रक्कम खर्च करणे अपेक्षित होते. ८० लाख रुपयांची रक्कम होती. नावीन्यपूर्ण योजनेचा पैसा होता. दिनांक ३० मार्च, २०१० रोजी ४३ लाख रुपये आले आणि दिनांक २५ ऑक्टोबर, २०११ रोजी ३६ लाख रुपये आले. दोघांची मिळून ८० लाख रुपये मिळालेत. सन २०११-२०१२ मध्ये ५२ लाख रुपये खर्च झाला आणि सन २०१२-२०१३ मध्ये २८ लाख रुपये खर्च झालेला आहे. ३६ लाख रुपये २०११-१२ मध्ये भेटले ते २०१२-२०१३ मध्ये खर्च झालेले आहेत. दोन वर्षाची मर्यादा जिल्हा परिषदेने पाळलेली आहे. जिल्हा परिषदेची नम्र विनंती आहे की, हा मुद्दा वगळण्यात यावा, ३६ लाख रुपये नंतर खर्ची पडले. दोन टप्प्यात पैसे भेटलेले आहेत. यावर समितीने समाधान व्यक्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

सोलापूर जिल्हा परिषदे अंतर्गत सन २०१२-२०१३ या वर्षामध्ये व्यायामशाळा बांधकाम व व्यायामशाळा साहित्य खरेदीबाबत लेखापरीक्षणामध्ये पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. " नियोजन विभागाच्या दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वाप्रमाणे सदर काम एक किंवा दोन वित्तीय वर्षामध्ये पूर्ण करणे बंधनकारक असताना सन २०१० ते २०११ मधील योजनेचा खर्च सन २०१२-२०१३ मध्ये करण्यात आला आहे, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार ज्या वस्तु/साहित्य सेवा पुरवठ्यासाठी शासन दर करार नाहीत अशा रुपये १ लाखापेक्षा जास्त रकमेच्या वस्तुंची खरेदी दिनांक १ जानेवारी, २०१२ पासून ई-निविदेद्वारे न करता जिल्हा परिषदेने निविदा मागवून साहित्य खरेदी केलेले आहे. व्यायामशाळा पूर्णत्वाचे दाखले सन २०१२-२०१३ अखेर प्राप्त न झाल्यामुळे व्यायामशाळा साहित्य कोणत्या ठिकाणी बसविण्यात आले याची ग्रामपंचायत निहाय माहिती दप्तरी उपलब्ध नाही."

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशाच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत जिल्हाधिकारी यांचेकडून रुपये ८० लक्ष मंजूर झाले होते, त्यांपैकी सन २०१०-२०११ मध्ये रुपये ४३.७९ लक्ष व सन २०११-२०१२ मध्ये काही निधी प्राप्त झाला. अशाप्रकारे दोन टप्प्यांमध्ये प्राप्त झालेला निधी सन २०१३ पर्यंत खर्च करण्यात आला आहे. यावरुन असे दिसून येते की, सन २०१०-२०११ या वर्षाचा निधी सन २०१२-२०१३ या वर्षामध्ये खर्च केला आहे. काही व्यायामशाळांमध्ये विशेषतः बार्डी, अनवली याठिकाणी व्यायामशाळा न बांधताच पैसे उचलल्याची तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केलेली आहे. त्यामध्ये संबंधित कंत्राटदाराचे देखील नाव आहे. या प्रकरणाची चौकशी होऊन त्यातील सत्य समितीसमोर येणे आवश्यक होते. परंतू जिल्हा परिषदेच्या संपूर्ण प्रशासनाने याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले असून याबाबत कार्यवाही केलेली नसल्याने या प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

**शासनाच्या नियोजन विभागाच्या दिनांक ६ जून, २००८ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे जिल्हा परिषदेला ज्या वर्षात निधी प्राप्त झाला आहे तो शक्यतो त्याच वर्षी किंवा जास्तीत जास्त लगतच्या पुढील वर्षी खर्च करणे आवश्यक असल्याबाबत नमूद केलेले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेला सन २०१०-२०११ मध्ये प्राप्त झालेला निधी लगतच्या वर्षामध्ये खर्च करणे आवश्यक असताना सन २०१०-२०११ मध्ये प्राप्त झालेला निधी सन २०१३ मध्येदेखील खर्च करण्यात आलेला आहे. व्यायामशाळेचे काम झालेले नसतानादेखील १२ कामांचे देयक अदा करण्यात आलेले आहे. शासनाच्या धोरणाप्रमाणे आयुक्त कार्यालयाकडून या लेखापरीक्षणाची तपासणी होणे आवश्यक होते. तथापि, आयुक्त कार्यालयाने यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली नाही, याबाबत समिती असमाधान व्यक्त करीत आहे.**

**समिती जिल्हा परिषदांना भेटी देताना वारंवार ह्या बाबी समितीला आढळून आल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या प्रशासनावर काटेकोरपणे नियंत्रण ठेवण्यासंदर्भात विभागीय आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत. असे अधिकार आयुक्त वा त्यांनी नेमलेले अधिकारी काटेकोरपणे वापर करताना दिसून येत नाही. त्यामुळे अनेक बेकायदेशीर बाबी एकतर दुर्लक्षित केल्या जातात किंवा त्यावर पांघरुण घातले जाते. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनावर आयुक्त कार्यालयातून नेमून दिलेले अधिकार दुर्लक्षित राहत असल्याने व त्यावर पांघरुन घातले जात असल्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनात अनेक नियमबाह्य बाबी ह्या चालू आहे. लेखा परिक्षणात ह्या बाबी निदर्शनास आल्यानंतरही त्याकडे आयुक्त कार्यालयाकडून दुर्लक्ष केले जाते. परिणामतः अनेक नियमबाह्य बाबी एकतर कार्यवाहीविना पडून असतात किंवा त्यावर कारवाई केलीच जात नाही ह्या बाबी अत्यंत गंभीर आहेत असे समितीचे मत आहे. सबब, यापुढील काळात जिल्हा परिषदेच्या लेखापरीक्षणात नियमबाह्य बाबी आढळल्यास त्यावर विहीत मर्यादीत कारवाई करावी तसेच आयुक्तांना नेमुन दिलेल्या कामाचा आढावा वेळच्या वेळी घेण्यात यावा व त्यादृष्टीने तशा सूचना सर्व संबंधितांना निर्गमित कराव्यात अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावी.**

**विभागीय सचिवांची समितीने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, व्यायामशाळा बांधकाम व व्यायामशाळा साहित्याबाबत सन २०१०-२०११ मध्ये जिल्हा नियोजन समितीमध्ये निर्णय घेऊन नाविन्यपूर्ण योजनेतून कार्यवाही करण्यात आली होती. दिनांक ३० मार्च २०१० रोजी रुपये ४३ लाख, दिनांक २५ ऑक्टोबर २०११ रोजी रुपये ३६ लाख प्राप्त झाले. सन २०११-२०१२ या वर्षामध्ये रुपये ५२ लाख खर्च आला आणि सन २०१२-२०१३ मध्ये २८ लाख रुपये खर्च झालेला आहे. यावर समिती समाधान व्यक्त करीत आहे.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, सोलापूर

## पंचायत समिती, अक्कलकोट प्रशासकीय इमारत बांधकामाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.३१०/(५) (सन २०१२-१३)**

पंचायत समिती, अक्कलकोट प्रशासकीय इमारत बांधकामावर एकूण रक्कम रुपये १,०४,२६,०६४/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) निविदा स्विकृती फॉर्म बी-१ वर निविदेतील अटी व शर्ती मान्य असलेबाबत ठेकेदार व कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

(२) तांत्रिक मंजुरीतील अट क्र.३ (१) अन्वये प्रस्तावित इमारत ज्या भूखंडावर बांधली जाणार आहे तेथील जमिनीच्या प्रस्तावाचे वर्गीकरण सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित करणे आवश्यक होते. तथापि, सदरची कार्यवाही करणेत आलेली नाही.

(३) तांत्रिक मंजुरीतील अट क्र.३ (२) अन्वये सदर इमारतीचे नकाशे व आराखडे मुख्य वास्तुशास्त्रज्ञ सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई तसेच स्थानिक नगररचना प्राधिकरण यांचेकडून प्रमाणित करणे आवश्यक होते. तथापि, अशा प्रकारची कार्यवाही करणेत आलेली नाही.

(४) तांत्रिक मंजुरीतील अट क्र.३ (४) प्रमाणे शारिरीकदृष्ट्या अपंग व्यक्तींसाठी इमारतीमध्ये प्रवेशासाठी रॅम्प व स्वतंत्र प्रसाधनगृहाची तरतूद करणे आवश्यक होते. तरी अपंगांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची तरतूद केलेली नाही.

(५) तांत्रिक मंजुरीतील अट क्र.२ प्रमाणे इमारतीचे बांधकाम करणेपूर्वी पथकिनारवर्ती अटी संदर्भात सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजूरी घेतलेली नाही.

(६) अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र.प्रअ/प्रमग्रासेया/पुणे/५४१/०९, दिनांक १३ ऑगस्ट, २००९ मधील अट क्र.३ नुसार सदर इमारतीचे नकाशे काम सुरु करणेपूर्वी मंजूर करणेत आलेले नाहीत. तसेच काम सुरु करणेपूर्वी नगरपालिका अक्कलकोट यांचेकडून बांधकाम परवाना घेणेत आलेला नाही. म्हणजे सदरचे बांधकाम हे अनधिकृत झालेले आहे.

(७) सदर कामाचे पहिले धावते देयकासोबत सिमेंट, खडी, स्टील व विटा यांचे चाचणी अहवाल घेणेत आलेला नाही. त्यामुळे वापरणेत आलेले साहित्य योग्य दर्जाचे असलेची खात्री करता आलेली नाही.

(८) कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग - १ यांचेकडील पत्र क्र.जिपसो/बाखा-१/३६७, दिनांक १७ जून, २०११ अन्वये दिनांक ८ जून, २०११ ते ३१ मार्च, २०१२ पर्यंत विनादंड मुदतवाढ देणेत आलेली आहे. सदर काम विहित मुदतीत पूर्ण न झाल्याने शासनाचा निधी नाहक गुंतून पडलेला होता. तसेच पर्यवेक्षकीय कामासाठी देखील शासनाचा खर्च वाढत गेलेला आहे. त्यामुळे शासनाचा मुळ उद्देश सफल झालेला नसताना मक्तेदारास विनादंड मुदतवाढ देणे उचित ठरत नाही. तरी झालेल्या विलंबाबाबत दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(९) साहित्याचे दर वाढल्यामुळे मक्तेदारास दर सुचीतील दर व बाजार भावातील फरकाची रक्कम रुपये १४,७२,५४७/- अदा करणेत आलेली आहे. संबंधित मक्तेदाराने विहित मुदतीत काम पूर्ण केलेले नसताना विलंबामुळे बाजार भावात वाढ झालेने फरकाची रक्कम अदा करणे योग्य ठरत नाही.

(१०) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रक मंडळ, पुणे यांचेकडील पत्र क्र.७९८/२०११, दिनांक ३१ मार्च २०११ अन्वये देण्यात आलेल्या तांत्रिक तपासणी अहवालातील बाब क्र. १३ मध्ये सदर कामातील सर्व बांधकाम साहित्याच्या चाचण्या शासनाच्या प्रचलित मानकाप्रमाणे घेतलेले नसलेचे नमूद केलेले आहे. वास्तविक १००% चाचण्या शासकीय प्रयोगशाळेकडून करणे आवश्यक होते. सदर बाबतची कार्यवाही न केलेमुळे अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, पुणे यांनी रक्कम रुपये ६४,५००/- इतका दंड केलेला आहे. त्यामुळे झालेले काम हे दर्जात्मक व गुणात्मक झालेचे दिसून येत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) कामाचे आदेश देताना कार्यकारी अभियंता व मक्तेदार यांचे स्वाक्षरीची निविदा मंजूर नस्ती मध्ये होती. लेखापरीक्षणाच्या वेळी ई-निविदेतील लेखापरीक्षकांकडील संगणकीय प्रत तपासणीसाठी देण्यात आलेली होती त्यावर स्वाक्षऱ्या नव्हत्या तरी निविदा स्वीकृती फॉर्म बी-१ वर निविदेमधील अटी व शर्ती नुसार ठेकेदार व कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या आहेत.

(२) तांत्रिक मंजुरीतील अट क्र.३ (१) अन्वये इमारत ज्या ठिकाणी बांधावयाची होती तेथील जमीन प्रस्तावाचे वर्गीकरण Foundation Passing कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित केले आहे. Foundation Plan पायाखोदकाम झाल्यानंतरच नकाशावरती प्रत्यक्ष कामाचा स्तर नकाशा तयार केलेला आहे. सोबत Foundation Plan, Foundation Structure प्रमाणित कागदपत्रे जोडली आहेत.

(३) उप वास्तुशास्त्रज्ञ, पुणे यांना आराखड्यास मान्यता मिळणेबाबत दिनांक १३ जुलै, २००९ रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. तद्नंतर त्रुटीची पूर्तता करुन दिनांक ४ डिसेंबर, २००९ रोजी फेर प्रस्ताव करणेत आलेला होता. उप वास्तुशास्त्रज्ञ, पुणे यांचेकडून मान्यता प्राप्त झाली नाही. दिनांक १३ जुलै, २००९ पासून ते दिनांक २४ नोव्हेंबर, २०११ पर्यंत संबंधित शाखा अभियंता यांनी पाठपुरवठा केला होता. सदर बांधकामाची प्लींथ लेवल कार्यकारी अभियंता यांनी पाहणी करुन निश्चित केले आहे तसेच कार्यकारी अभियंता यांनी दिनांक २६ जुलै, २०१२ रोजी उप वास्तुशास्त्रज्ञ पुणे येथील कार्यालयास समक्ष भेटी दिल्या आहेत. सद्य:स्थितीत इमारतीचे काम दिनांक १९ एप्रिल, २०१२ रोजी पुर्ण झाले आहे तसेच दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी उप वास्तुशास्त्रज्ञ पुणे यांची उपअभियंता यांनी भेट घेवून आराखड्यास कार्योत्तर मंजुरी मिळावी यासाठी समक्ष फेर पत्र मंजुरीसाठी सादर केले आहे.

(४) तांत्रिक मंजुरीतील अट क्र. (४) प्रमाणे सदरच्या इमारतीमध्ये अपंगांसाठी डाव्या व उजव्या दोन्ही बाजूनी तांत्रिक दृष्ट्या रॅम्प बनवणेची तरतूद अंदाजपत्रकात करणेत आली होती. त्याप्रमाणे डाव्या व उजव्या बाजूस रॅम्प पुर्ण केलेला आहे. तसेच त्यांच्या नोंदी मोजमाप नोंदवही क्रमांक १०२१, पृष्ठ क्र.५५, मोजमाप नोंदवही क्रमांक १०२०, पृष्ठ क्र.६४, ६८, ७० वर केलेल्या आहेत. सोबत वरील कामाची छायाचित्र व मोजमाप नोंदवहीमधील कागदपत्रे सादर केलेली आहेत. अपंगांसाठी प्रसाधनगृह इमारत परिसरात अस्तित्वात असल्याने मूळ नमूना अंदाजपत्रकात तरतुद केलेली नाही.

(५) तांत्रिक मंजुरीतील अट क्र.२ प्रमाणे इमारतीची पथकिनारवर्तीबाबत सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणेसाठी शासन निर्णय १०८१/८७१/ रस्ते/७/मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक ९ मार्च, २००१ **(परिशिष्ट ३.१)** नुसार मुख्याधिकारी नगरपालिका अक्कलकोट यांना दिनांक ८ डिसेंबर, २०१७ रोजी फेर प्रस्ताव सादर केला आहे. सदरचा रस्ता हा नगरपालिका अक्कलकोट यांचेकडे देखभाल दुरुस्तीसाठी आहे. वेळोवेळी पाठपुरावा केलेला असून पथकिनारवर्ती मंजूर प्राप्त झालेली नाही तरी पुनश्च मागणी करुन जा.क्र.जिपअ/बांधकाम/शाआ/३५२/२०१७ दिनांक ८ डिसेंबर, २०१७ या पत्रान्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडून मंजूरी मिळालेली आहे.

(६) पंचायत समिती नविन विस्तारीकरण बांधकाम सुरु करणेपूर्वी नगरपरिषद अक्कलकोट यांना दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ रोजी बांधकाम परवाना मिळणेबाबतचे पत्र दिले होते. परंतु प्रत्यक्षात दिनांक ३ मार्च, २०१० (६ महिने ०३ दिवस) रोजी नवीन बांधकाम सुरु करण्यात आले. तद्नंतर दिनांक २६ एप्रिल, २०११, दिनांक ७ सप्टेंबर, २०१२ व दिनांक ८ डिसेंबर, २०१७ रोजी नगरपालिका अक्कलकोट यांना परवानाबाबत पत्रव्यवहार केला होता. तसेच इमारत दिनांक १९ एप्रिल, २०१२ रोजी पूर्ण झाली. त्या इमारतीचा वापर दिनांक १ जानेवारी, २०१३ पासून सुरु करणेत आला तद्नंतर लगेचच नविन इमारतीस कर (सन २०१२-२०१३ पासून) आकारणी सुरु करणेत आली असून दिनांक ३० मार्च, २०१७ अखेर आकारणी कर भरणा आहे. महाराष्ट्र रिजनल ॲन्ड टाऊनप्लानिंग ॲक्ट, १९६६ मधील अधिनियम ४५ (५) नुसार नगरपालिका क्षेत्रातील कामासाठी बांधकाम परवाना मागणी केल्यानंतर ६० दिवसाच्या आत नगरपरिषदेकडून काहीही उत्तर न आल्यास सदर बांधकामास परवानगी आहे असे समजण्यात यावे अशी तरतुद आहे. त्यामुळे परवानगी मागितल्यानंतर अक्कलकोट नगरपरिषदेने काहीही कळविले नसल्याने सदरच्या बांधकामास परवानगी आहे असे गृहीत धरुन पंचायत समितीच्या इमारतीचे बांधकाम चालू करुन पुर्ण करण्यात आलेले आहे.

(७) प्रथम धावते देयक सादर करताना बाब क्र.५, ६, ७, १०, १५ यांना पार्टरेट देण्यात आलेले होते. प्रथम देयक दिनांक १२ ऑक्टोबर, २०१० रोजी सादर करण्यात आले होते. दिनांक ५ फेब्रुवारी, २०१० रोजी स्टिलरिपोर्ट घेण्यात आला. दिनांक ११ मे, २०१० रोजी कॉंक्रीटक्युब रिपोर्ट प्रथम देयकापूर्वी घेतले होते. बांधकाम चालू करताना बांधकामासाठी लागणारे साहित्याची चाचणी घेणेसाठी दक्षता गुणनियंत्रण कार्यालयात पाठविणेत आले होते. परंतु चाचणी अहवाल निष्कर्ष अप्राप्त होते. ठेकेदारास देयक देण्याचे दृष्टीने चाचणी निष्कर्ष अप्राप्त असल्यामुळे दक्षता व गुणनियंत्रण यांचेकडील परिपत्रक शासन निर्णयानुसारच अन्वये दर कपात करणेत आलेला आहे. तेच साहित्य बांधकामासाठी वापरण्यात आले आहेत. वापरणेत आलेले साहित्य योग्य दर्जाचे आहे याची खातरजमा शाखा अभियंता व उप अभियंता यांनी केलेली आहे, सोबत चाचणी अहवाल कागदपत्रे सादर केलेली आहेत.

(८) कार्यकारी अभियंता यांनी समक्ष इमारतीची पाहणी करुन वस्तुस्थिती पाहूनच विनादंड व मुदतवाढीसाठी शिफारस केली होती. पंचायत समिती इमारतीच्या आवारातील कँटीन व वस्तुविक्री केंद्राच्या जागेसंबंधात महिला बचत गटाने अक्कलकोट न्यायालय दावा नं.रे.मु.नं.४७/१० दिनांक २७ ऑगस्ट, २०१० रोजी दावा दाखल केल्याने इमारतीचा २५% भाग अतिक्रमणामुळे न्यायप्रविष्ठ होता. मक्तेदार यांनी दिनांक १२ मे, २०११ च्या अर्जान्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील नियम १४८ नुसार १५ दिवस अगोदर दिनांक ८ जून, २०११ ते दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत विनादंड मुदतवाढ मागितलेली होती. सदरची विनादंड मुदतही कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी मुदतवाढ १५ दिवस अगोदर दिली आहे. त्यानुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या दिनांक १३ जून, २०११ च्या अन्वये आदेश विनादंड मुदतवाढ देण्यात आली आहे. सोबत विनादंड मंजुरी आदेशाची प्रत सादर केलेली आहे.

(९) सदरच्या इमारतीची लांबी ४५.०० मी. व रुंदी १५.०० मी. इतकी होती. मूळ मुदत ही १८ महिने होती. परंतु काम सुरु झालेनंतर नवीन इमारतीच्या बाजूला एक बचत गटाची अतिक्रमण असलेली इमारत होती. सदर अतिक्रमण इमारतीचा अडथळा दिनांक ८ डिसेंबर, २००९ पासूनच होता. सदर इमारत सुरु करण्याचे आदेश दिनांक ८ डिसेंबर, २००९ पासून देण्यात आले होते. तसेच बचत गट इमारतीही नं.रे.मु.नं.४७/१० ने न्यायप्रविष्ठ होती. त्यांचा निकाल मार्च, २०११ मध्ये जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या बाजूने लागला तद्नंतर बचत गट इमारतीचे अतिक्रमण दिनांक २१ मार्च, २०११ रोजी पोलीस संरक्षणात काढले, म्हणजे ठेकेदारास काम करण्याचा कालावधी १ वर्षे ३ महिने वाढलेला आहे. ठेकेदाराने या कालावधीत बांधकाम मंद गतीने सुरु होते तसेच बांधकामास लागणारी वाळू उपलब्ध होत नव्हती कारण शासनाकडून वाळूचा लिलाव त्यावेळी झालेला नव्हता. त्यामुळे वाळूच्या तुटवड्यामुळे बांधकाम मंदगतीने चालू होते. १ वर्षे ३ महिने काम थांबल्यामुळे त्यांना १ वर्षे ३ महिने मुदतवाढ देवून भाववाढ देण्याची जबाबदारी या कार्यालयाची होती. कारण काम पूर्ण करण्यासाठी कालावधी ठेकेदाराच्या सहभागामुळे वाढलेला नाही. न्यायालयीन प्रकरण अतिक्रमण काढलेला कालावधी वगळता मक्तेदाराने मुळ मुदतीत काम पूर्ण केलेले आहे.

कार्यारंभ आदेश दिनांक ८ डिसेंबर, २००९

काम पुर्ण करण्याची मुळ मुदत :- १८ महिने दिनांक ७ जून, २०११ अखेर

अतिक्रमण कालावधी :- दिनांक २१ मार्च, २०११ अंदाजे ८ महिने

मुदतवाढ कालावधी :- दिनांक ८ जून, २०११ ते दिनांक ३१ मार्च २०१२, ९ महिने

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे मक्तेदाराने विहीत मुदतीत काम केलेले आहे.

१०) सदर इमारतीसाठी लागणारा चाचणी अहवाल हा शासकीय प्रयोग शाळेमधून Mixdesig Steel Test Report घेतलेल्या होत्या. परंतु प्रधानमंत्री ग्रामसडक योजना प्रयोगशाळा जिल्हा परिषद, सोलापूर मधून सुद्धा तिथे तांत्रिकदृष्ट्या काही चाचण्या घेतल्या आहेत. जेणेकरुन जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात आर्थिक वाढ व्हावी हा दृष्टीकोन होता. अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता दक्षता व गुणनियंत्रण कक्ष मंडळ पुणे सदर इमारतीची दिनांक ७ ऑक्टोबर २०१३ रोजी तांत्रिक तपासणीची पूर्तता स्वीकारून तांत्रिक तपासणी अंतिमरित्या बंद करुन दप्तरी दाखवलेली आहे. तसेच वारंवारंता तक्तानुसार शासन निर्णयानुसार बांधकाम साहित्याच्या चाचण्या शासकीय प्रयोगशाळेतून ३०% व क्षेत्रिय प्रयोगशाळेतून ७०% घेणे आवश्यक आहे. ३०% चाचण्या शासकीय प्रयोगशाळेतून घेण्यात आलेल्या आहेत. सोबत चाचण्या निष्कर्ष सोबत जोडला आहे. तथापि, ७०% चाचण्या क्षेत्रीय स्तरावरुन घेणे आवश्यक होते. परंतु त्या प्रमाणात घेतल्या नाहीत त्यामुळे दंडात्मक रक्कम भरणा केलेली आहे. परंतू त्या साहित्याच्या चाचण्या शासकीय प्रयोगशाळेतून समाधानकारक आहेत. गुणनियंत्रण चाचण्या वारंवारता तुलनात्मक तक्ता तयार करुन उर्वरित चाचणी निष्कर्ष न घेतलेल्या कामावर दंडात्मक रक्कम ६४,५००/- रुपये ही ठेकेदाराच्या अनामत रकमेमधून वसुल करुन भरणेत आलेली आहे. तरी सर्व कागदपत्रे सादर केलेली आहेत.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पंचायत समितीच्या इमारत बांधकामासाठी रु.१,०४,२६,०६४ एवढा खर्च झाला आहे. सक्षम प्राधिकरणाकडे जमिनीच्या प्रस्तावासाठी फाऊंडेशन प्लॅन आणि इतर कागदपत्रे द्यायची होती, ती कार्यवाही जिल्हा परिषदेने केलेली आहे. त्या ठिकाणी अतिक्रमण होते, त्याबाबत मा.न्यायालयात प्रकरण दाखल झाले होते.

यावर समितीने विचारणा केली की, जागेवर अतिक्रमण असताना बांधकाम कसे केले, जागेवर अतिक्रमण आहे किंवा नाही हे पहावयास नको का, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ४५x१५ मीटरची जागा होती, तेथे महिला बचत गटाची इमारत होती, ती इमारत पाडणार असे समजून तेथे बांधकामास मंजुरी दिली होती. त्या जागेवर इमारत होती, ते शासनाचेच काम होते व जागा जिल्हा परिषदेच्या

ताब्यात आहे. पंचायत समितीच्या आवारामध्ये बचत गटाला उपाहारगृह चालविण्यास अनुमती दिलेली होती. जिल्हा परिषदेनेच ती परवानगी दिली होती. ज्यावेळी शासनाकडून बांधकामास मंजुरी मिळाली त्यावेळी बांधकाम करण्यास सुरुवात केली होती. परंतु काही भागामध्ये ती इमारत येते, त्यामुळे त्यांनी मा.न्यायालयात दावा दाखल केला. जिल्हा परिषदेने त्यांना जागा देत असताना काही अटी लागू केलेल्या होत्या. त्यानुसार त्यांनी ती जागा रिक्त करणे अपेक्षित होते. जिल्हा परिषदेने जागा रिक्त करुन घेत असताना त्यांनी मा.न्यायालयात प्रकरण दाखल केले ते प्रकरण ९ महिने चालले. मा.न्यायालयाने जिल्हा परिषदेच्या बाजूने निर्णय दिला. त्यानंतर जिल्हा परिषदेने ती इमारत बांधून पूर्ण केली. लेखापरीक्षणामध्ये बांधकामास विलंब झाल्याने गुत्तेदाराला दंड लावावा असा आक्षेप नमूद केला होता.

यावर समितीने मत व्यक्त केले की, लेखापरिक्षणाच्या वेळी चाचणी अहवाल सादर केले नव्हते, म्हणून आक्षेप नोंदविण्यात आला आहे. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१२ मध्ये बांधकाम साहित्याचा वापर केला होता. त्यामध्ये बांधकाम साहित्याचे ३० टक्के जिल्हा पातळीवर व ७० टक्के क्षेत्रीय पातळीवर चाचणी अहवाल घेण्याची तरतूद होती. ३० टक्के शासनाच्या तपासण्या आपण करून घेतल्या, मात्र ७० टक्के क्षेत्रीय स्तरावरील चाचण्या घेतलेल्या नाहीत याबाबत ठेकेदाराकडून दंड वसूल केला आहे.

यावर समितीने विचारणा केली की, जे साहित्य वापरण्यात आले ते चांगल्या दर्जाचे होते ही तपासणी केली आहे का, त्याचे पुरावे आहेत का, ७० टक्के चाचण्या जिल्हा परिषदेने करुन घ्यायच्या होत्या की ठेकेदाराने करुन घ्यायच्या होत्या, लेखापरीक्षणाचा आक्षेप आहे की, १०० टक्के चाचण्या केलेल्या नाहीत. चाचणी केल्याचे पुरावे असतील तर लेखापरीक्षणाच्या वेळी का दाखविले नाहीत, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी देयक अदा कसे केले, त्या शिवाय देयक मंजूर करता येत नाही. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, साहित्याचा नमुना घेऊन पाठविले होते. यावर समितीने निदेशित केले की, चुकीचे रेकॉर्डवर येऊ देऊ नका. जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई होऊ द्या. विना चाचणी अहवाल साहित्य वापर करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, ठेकेदाराकडून दंड कशाकरिता घेतला, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ७० टक्के चाचण्या क्षेत्रीय स्तरावर न करून घेतल्याबद्दल दंड घेतला आहे.

यावर समितीने निदेश दिले की, त्या तपासण्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी करायच्या होत्या. अधिकाऱ्यांना सोडून ठेकेदाराला दंड का लावला, कार्यकारी अभियंता, उप अभियंता, शाखा अभियंता जबाबदार होते. अक्कलकोट पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याकरिता उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनीबाबत मा.न्यायालयात प्रकरण दाखल असताना बांधकाम केले गेले. कामासाठी वापरलेल्या साहित्याचे १०० टक्के चाचणी अहवाल उपलब्ध नसल्यामुळे लेखापरीक्षणात आक्षेप नोंदविण्यात आले. चाचणी अहवाल नसताना उप अभियंता, शाखा अभियंता, कार्यकारी अभियंता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी दर्जेदार साहित्य वापरले की नाही याची शहानिशा केली नाही. या प्रकरणी सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या प्रकरणी सखोल चौकशी करुन जबाबदारी निश्चित करावी व जे अधिकारी दोषी असतील त्यांच्याविरुद्ध कारवाई करुन त्याचा अहवाल समितीला सादर करावा. तसेच ज्या बाबतीत अनियमितता झाली आहे त्या संदर्भात तांत्रिकदृष्ट्या सखोल तपासणी करावी. ठेकेदाराविरुद्ध दंडात्मक कारवाई केली. परंतु साहित्य दर्जेदार वापरले की नाही याची तपासणी झालेली नाही. यापुढील काळात जिल्हा परिषदेमध्ये असा चुकीचा पायंडा पडता कामा नये. याकरिता अधिकाऱ्यांवर समितीच्या माध्यमातून वचक निर्माण झाला पाहिजे. तत्कालिन जे अधिकारी दोषी असतील त्यांच्याविरुद्ध कारवाई करुन समितीला एप्रिल महिन्यात अहवाल सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

अक्कलकोट पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याकरिता उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनीबाबत मा. न्यायालयामध्ये प्रकरण दाखल असताना बांधकाम केल्याप्रकरणी, वापरलेल्या साहित्याचे १००% चाचणी अहवाल उपलब्ध नसल्याचे लेखापरिक्षणात आक्षेप नोंदविण्यात आल्यामुळे याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांविरूद्ध पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) अक्कलकोट पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणेकरीता नवीन इमारतीच्या बाजूला शासकीय जमिनीवर बचत गटाची इमारत होती. सदर इमारतीचा रे.मु.नं. ४७/१० अन्वये मा.न्यायालयामध्ये दावा दाखल होता, त्याचा माहे मार्च, २०११ मध्ये निकाल लागल्यानंतर बचत गट इमारतीचे अतिक्रमण दि. २१ मार्च, २०११ रोजी पोलीस संरक्षणात काढून अक्कलकोट पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे काम चालू करून सदरचे काम दिनांक १९ एप्रिल, २०१२ रोजी पूर्ण करण्यात आलेले आहे.

२) बांधकामासाठी वापरलेल्या साहित्याचे चाचण्या कमी घेतल्यामुळे ठेकेदाराकडून रूपये ६४,५००/- इतकी रक्कम वसूल केली आहे. ती का वसूल केली असा आक्षेप घेतलेला आहे. अधीक्षक अभियंता, दक्षता व मंडळ यांचे सुचनेनुसार तिप्पट दंड आकारण्यात आलेला आहे.

३) याबाबत चौकशी करणेत आली आहे.

४) कामावरील साहित्याच्या वारंवारिता तक्त्यानुसार बांधकाम साहित्याचे उदा. Concrete Cube, Steel, Alluminium Window Material, Vetrified Tiles, G.I. Pipe यांच्या क्षेत्रीय चाचण्या घेतलेल्या नाहीत. याप्रकरणी संबंधित तत्कालिन कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता यांचेकडून खुलासे मागविणेत आलेले आहेत. तत्कालिन कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता हे सदर प्रकरणी संयुक्तिकरित्या जबाबदार आहेत.

५) सदर दोषी अधिकारी वर्ग-१ चे कार्यकारी अभियंता, उप अभियंता यांचे विरूद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार व वर्ग-३ चे शाखा अभियंता यांचे विरूद्ध महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६(२) अन्वये दोषारोपपत्र बजावण्यात आले असून पुढील शिस्तभंगाची कारवाई करणेत येत आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :–** (बांधकाम-४) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने सोलापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ व ३० जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अक्कलकोट पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याकरिता उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनीबाबत माननीय न्यायालयामध्ये प्रकरण दाखल असताना बांधकाम केल्याप्रकरणी, वापरलेल्या साहित्याचे १०० टक्के चाचणी अहवाल उपलब्ध नसल्याचे लेखापरीक्षणात आक्षेप नोंदविण्यात आल्यामुळे या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, १०० टक्के चाचणी अहवाल प्राप्त केले नव्हते असा मुद्दा आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, ३० टक्के साहित्याची चाचणी प्रयोगशाळेमध्ये घेणे अनिवार्य आहे आणि ७० टक्के चाचणी फिल्डवर घेतली जावी असा नियम आहे. प्रयोगशाळेमध्ये साहित्याची ३० टक्के चाचणी घेतलेली आहे. परंतु फिल्डवरील चाचणी कमी घेतल्यामुळे दंड आकारुन पैसे वसूल केलेले आहेत. तसेच तत्कालिन कार्यकारी अभियंता, उप अभियंता आणि शाखा अभियंता यांच्यावर दोषारोप पत्र बजावत आहोत.

यावर समितीने विचारणा केली की, दंड कोणावर आकारलेला आहे, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, कंत्राटदाराला दंड केलेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, कंत्राटदाराचा आणि दंडाचा काय संबंध आहे. यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, फिल्ड चाचणी घेणे ही विभागाच्या अधिकाऱ्यांची आणि कंत्राटदाराची जबाबदारी आहे. यावर समितीने विचारणा केली की, विभागाचे तांत्रिक सल्लागार सल्ला देणार असताना कंत्राटदाराला दंड कसा आकारत आहात, करारनामा लिहून घेणारे विभागाचे अधिकारी आहेत. काम करुन घेणारे आणि त्यावर देखरेख ठेवणारे विभागाचे अधिकारी आहेत.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, या प्रकरणी विभागाच्या अधिकाऱ्यांची चूक आहे. आपल्या काही अटी आहेत. जसे आपण एखादी चाचणी करुन सांगितल्यास ती चाचणी करुन घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची आहे असे कलम टाकलेले आहे. यावर समितीने विचारणा केली की, साहित्याचा वापर करण्यास कोण परवानगी देते, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, कनिष्ठ अभियंता परवानगी देतात. त्यांच्यावर दोषारोप पत्र बजावलेले आहे. आपण तिप्पट दंड वसूल केलेला आहे. साहित्याचा वापर करण्यापूर्वी ते तपासून घेण्याची जबाबदारी विभागाची आहे.

यावर समितीने निदेश दिले की, हा मुद्दा वारंवार उपस्थित होत आहे. यासंबंधी विभागाने वारंवार सूचना सुद्धा केलेल्या आहेत. तसेच चाचणी अहवालाच्या संदर्भात साहित्याची तपासणी केल्यानंतर त्याचा वापर करायचा असतो. परंतु तसे घडत नाही. या संदर्भात संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर ताबडतोब कारवाई झाली पाहिजे. सदर प्रकरणी कंत्राटदाराविरुद्ध कारवाई केली आहे. परंतु अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे का, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, त्यांच्यावरील दोषारोप पत्र आता प्राप्त झालेले आहे. जिल्हा परिषदेकडून सदर माहिती आता सादर केली आहे. कंत्राटदाराकडून ५ वर्षांचा दंड आकारलेला आहे.

यावर समितीने मत व्यक्त केले की, सदर प्रकरणी कंत्राटदाराकडून ५ वर्षांचा दंड आकारला आहे. त्याच बरोबर संबंधित अधिकाऱ्यांवर सुद्धा कारवाई करावयास पाहिजे होती. साहित्य वापरण्याची परवानगी दिली याचा अर्थ सदर साहित्याची तपासणी करुन ते योग्य असल्याबाबत तपासणी केली आहे. अशा परिस्थितीत जिल्हा परिषदेने कंत्राटदाराकडून दंड कसा आकारला, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेच्या तपासणी पद्धतीमध्ये वारंवारता तत्क्यानुसार तपासणी करतो त्याचे दर आपण समाविष्ट केलेले आहेत. त्यामुळे वारंवारता केल्यास त्याकरिता असलेले पैसे अतिरिक्त अदा केलेले आहेत असे गृहीत धरुन ती रक्कम त्यांच्याकडून वसूल करीत असतो. यावर समितीने विचारणा केली की, साहित्याची तपासणी केली नाही म्हणून दंड वसूल करीत आहात की, कामाचा दर्जा खराब झाला आहे म्हणून दंड वसूल करीत आहात.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, साहित्याची तपासणी केली नाही म्हणून त्यांच्याकडून दंड वसूल केला आहे. यावर समितीने विचारणा केली की, साहित्याची तपासणी न करता साहित्याचा वापर कसा करण्यात आला व त्याकरिता परवानगी कशी दिली त्या संदर्भात संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली का, साहित्याची तपासणी करुन त्यानंतर त्याचा वापर करावयास पाहिजे होता. परंतु तसे घडलेले नाही. साहित्याची तपासणी न करता वापर करण्यात आल्यामुळे संपूर्ण प्रक्रिया चुकीची व बेकायदेशीर झाली आहे. या संदर्भात बेकायदेशीररित्या कार्यवाही झाल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली. परंतु विभागाच्या दृष्टीने सदर कार्यवाही नियमानुसार केली आहे.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, समितीने ही बाब निदर्शनास आणून दिली असून त्यानुसार संबंधितांवर कारवाई केली जाईल. सदर प्रकरणी कमी चाचण्या केलेल्या आहेत. त्या संदर्भात शाखा अभियंता, उप अभियंता तसेच कार्यकारी अभियंता यांच्याकडून खुलासा मागविण्यात येईल. यावर समितीने विचारणा केली की, विभागाने अधिकाऱ्यांकडून खुलासा मागविला पाहिजे की, सदर साहित्य वापरण्याची परवानगी त्यांनी नाकारली होती का, अशा परिस्थितीत कंत्राटदार दोषी कसा होऊ शकतो.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, कंत्राटदार दोषी आहे म्हणून प्रक्रिया केलेली नाही. यासंबंधी शासन निर्णय आहे की, वारंवारता तक्त्यानुसार आवश्यक असलेल्या चाचण्यांपैकी जेवढया चाचण्या कमी केलेल्या आहेत त्याचे पैसे तीन पट वसूल करावेत. यावर समितीने विचारणा केली की, चाचण्या कमी झालेल्या आहेत ही बाब कशाच्या आधारावर ठरविण्यात आली, यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, किती चाचण्या करायच्या याकरिता वारंवारता तक्ता असतो. यावर समितीने मत व्यक्त केले की, काम सुरु असताना चांगले काम न झाल्यामुळे शाखा अभियंत्याने काम थांबविण्याचे आदेश दिले असते तर कंत्राटदारावर दंड केला असता तर काही हरकत नव्हती. परंतु अशाप्रकारे कार्यवाही न करता कंत्राटदारावर दंड आकारणी करुन चुकीची कार्यवाही झाली आहे. कंत्राटदाराने साहित्य वापरुन काम पूर्ण केले असल्यामुळे त्याची जबाबदारी पूर्ण होत असते.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, विभागाकडून यासंदर्भात सुचना देण्यात येतील तसेच परिपत्रक सुद्धा निर्गमित करण्यात येईल. तसेच हा विषय वारंवार उपस्थित होत आहे. भविष्यात असे घडू नये याकरिता सर्व जिल्हा परिषदांना पत्राद्वारे कळविण्यात यावे. सदर प्रकरणी विभागाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली. सदर कामामध्ये साहित्याची तपासणी न करता साहित्याचा वापर केल्यामुळे संबंधितांनी आपल्या कर्तव्यात कसूर केली आहे.

यावर सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग) यांनी खुलासा केला की, त्यामुळे त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली आहे. यावर समितीने माहिती विशद केली की, शिस्तभंगाची व्याख्या काय आहे, एखाद्या सरपंचाने ५ हजार रुपयांचा घोटाळा केल्यास तो अपात्र होतो. सदर प्रकरणी कार्यकारी अभियंत्यांने अशा प्रकारे कामामध्ये कसूर केली आहे. त्यांच्यावर कोणती कारवाई केली जाणार आहे, संबंधितांविरुद्ध विभागीय चौकशी केल्यानंतर त्यांनी कामामध्ये कशाप्रकारे कसूर केली आहे हे निदर्शनास येते त्यानुसार त्यांच्यावर शिक्षा प्रस्तावित केली जाते. विभागीय चौकशीमध्ये एखादा अधिकारी दोषी आढळून आला तरी सक्षम प्राधिकाऱ्याकडून त्याला निर्दोष सोडले जाते. तसेच दोषारोप सिद्ध झाले नाही तरी सक्षम प्राधिकारी त्यांच्यावर कारवाई करु शकतो. अशाप्रकारे आपल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना वाचविण्यासाठी आपण कायदे केलेले आहेत.

समितीने केलेले आरोप सिद्ध होत नसल्यास त्या संदर्भात कोणतीही चौकशी करण्याची गरज नाही. आपल्याकडे आतापर्यंत अनेक अधिकारी/ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसेस दिल्या असतील, त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली असेल तसेच काही जणांना निलंबित सुद्धा करण्यात आले असेल. अशाप्रकारे केलेल्या कारवाईमध्ये आतापर्यंत किती अधिकारी/कर्मचारी बडतर्फ झालेले आहेत, अशाप्रकारे कोणालाही सेवेतून बडतर्फ करण्यात आले नसल्यामुळे त्यांच्यावरील आरोप सिद्ध झालेले नाहीत, त्यामुळे अधिकाऱ्यांवरील कारवाईचा केवळ बडगा उगारला जातो. प्रत्यक्षात कारवाई करताना एकतर त्यांना निर्दोष ठरविले जाते किंवा त्यांचेविरुद्ध किरकोळ शिक्षा प्रस्तावित केली जाते असे समितीच्या निदर्शनास आले आहे.

या संदर्भात शासन निर्णय व नियमावली आहे. परंतु त्यांची योग्यप्रकारे अंमलबजावणी झालेली नाही. भविष्यात पुन्हा असे घडू नये याकरिता संबंधितांविरुद्ध तातडीने कारवाई करावी अन्यथा गतीमानतेने विकास होऊ शकणार नाही. तसेच अशाप्रकारे पुन्हा लेखा परीक्षणामध्ये आक्षेप येऊ नयेत याकरिता आपण ठोस उपाययोजना केली पाहिजे. सदर प्रकरणी अधिकाऱ्यांवर कारवाई न करता कंत्राटदारावर झालेली कारवाई तांत्रिकदृष्या बरोबर नाही.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत पंचायत समिती, अक्कलकोट प्रशासकीय इमारत बांधकामावर एकूण रक्कम रुपये १,०४,२६,०६४/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. निविदा स्वीकृती फॉर्ममधील अटी व शर्ती मान्य असलेबाबत ठेकेदार व कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. प्रस्तावित इमारत ज्या भूखंडावर बांधली जाणार आहे, तेथील जमिनीच्या प्रस्तावाचे वर्गीकरण सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित करणे आवश्यक होते. इमारतीचे नकाशे व आराखडे मुख्य वास्तुशास्त्रज्ञ सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच स्थानिक नगररचना प्राधिकरण यांचेकडून प्रमाणित केलेले नाहीत. इमारतीमध्ये अपंगांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची तरतुद केलेली नाही. इमारत बांधकामापूर्वी पथकिनारवर्ती अटी संदर्भात सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी घेतलेली नाही. नगरपालिका अक्कलकोट यांचेकडून बांधकाम परवाना घेण्यात आलेला नाही, धावते देयकासोबत सिमेंट, खडी, स्टील व विटा यांचे चाचणी अहवाल घेण्यात आले नाही. सदर काम विहित मुदतीत पूर्ण न झाल्याने शासनाचा निधी नाहक गुंतून पडलेला होता तसेच पर्यवेक्षकीय कामासाठी देखील शासनाचा खर्च वाढत गेलेला आहे. त्यामुळे मक्तेदारास विनादंड मुदतवाढ देणे उचित ठरत नाही त्यामुळे विलंबाबाबत दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे. संबंधित मक्तेदाराने विहित मुदतीत काम पूर्ण न केल्यामुळे विलंब झाला आहे त्यामुळे दरसुचितील झालेल्या फरकाची रक्कम अदा करणे योग्य नाही. सर्व बांधकाम साहित्याच्या चाचण्या शासनाच्या प्रचलित मानकाप्रमाणे घेतल्याचे नमूद केलेले नाही. शासकीय प्रयोगशाळेकडून चाचण्या न केल्यामुळे अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, पुणे यांनी रक्कम रुपये ६४,५००/- इतकी केलेली आहे. त्यामुळे झालेले काम हे दर्जात्मक व गुणात्मक झाल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशाच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, पंचायत समिती, अक्कलकोट प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरु करण्यापूर्वी इमारतीच्या जागेवर महिला बचत गटाचे उपाहारगृह असताना बांधकामास मंजुरी दिलेली होती. त्यामुळे मा.न्यायालयात दावा दाखल करण्यात आलेला होता. सदर प्रकरण मा.न्यायालयामध्ये ९ महिने चालले होते. मा.न्यायालयाने जिल्हा परिषदेच्या बाजूने निर्णय दिल्यानंतर इमारत बांधून पूर्ण करण्यात आली. लेखापरिक्षणाच्या वेळी चाचणी अहवाल सादर केले नव्हते. सन २०१२ मध्ये बांधकाम साहित्याचा वापर केला होता. त्यामध्ये बांधकाम साहित्याचे ३० टक्के जिल्हा पातळीवर व ७० टक्के क्षेत्रीय पातळीवर चाचणी अहवाल घेण्याची तरतूद होती. जिल्हा परिषदेने ३० टक्के शासनाच्या तपासण्या करुन घेतल्या मात्र ७० टक्के क्षेत्रीय स्तरावरील चाचण्या न घेतल्याप्रकरणी संबंधित ठेकेदाराकडून दंड वसूल केला आहे. वास्तविक पहाता क्षेत्रीय स्तरावरील तपासण्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी करायच्या होत्या, यासाठी कार्यकारी अभियंता, उप अभियंता आणि शाखा अभियंता हे अधिकारी जबाबदार होते. अक्कलकोट पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याकरिता उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनीबाबत मा.न्यायालयात प्रकरण दाखल असतानादेखील इमारतीचे बांधकाम केले गेले. कामासाठी वापरलेल्या साहित्याचे १०० टक्के चाचणी अहवाल उपलब्ध नसल्यामुळे लेखापरिक्षणात आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. चाचणी अहवाल नसताना शाखा अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी दर्जेदार साहित्य प्रशासकीय इमारतीसाठी वापरले की नाही याची शहानिशा केली नाही. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यात यावी व दोषी असतील त्यांच्याविरुद्ध कारवाई करुन त्याचा अहवाल समितीला सादर करावा असे समितीने निदेश दिले होते. त्यानुसार शाखा अभियंता, जिल्हा परिषद उपविभाग, बांधकाम दक्षिण सोलापूर तसेच कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना यांच्याकडून प्राप्त झालेल्या खुलाशामध्ये शाखा अभियंता यांनी असे नमूद केले आहे की, बांधकामासाठी वापरण्यात आलेले साहित्य चांगल्या दर्जाचे होते. इमारत सध्या तांत्रिकदृष्टया सुस्थितीत असून इमारतीस कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नाही. सध्या इमारत वापरात आहे, इमारत बांधकामाच्या रकमेत रुपये ५,९९,८५०/- इतकी महाराष्ट्र शासनाची आर्थिक बचत केलेली आहे तसेच कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना यांनी बांधकाम साहित्याच्या चाचण्या ठेकेदाराने न घेतल्याबाबत आक्षेप घेतल्याने दंडात्मक कार्यवाही म्हणून न घेतलेल्या चाचण्यांच्या मुल्याच्या तिप्पट दराने ठेकेदाराकडून रक्कम वसूल करुन घेण्याबाबत कार्यवाही केलेली आहे. ठेकेदाराच्या अनामत रकमेमधून सदर रक्कम वसूल करुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केलेली आहे. शासनाचे कोणतेही नुकसान झालेले नाही. इमारतीचे बांधकाम चांगल्या दर्जाचे झालेले आहे. तथापि, प्रस्तुत प्रकरणी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर ताबडतोब कारवाई होणे अभिप्रेत होते. परंतु कंत्राटदाराविरुद्ध कारवाई केली आहे. कंत्राटदाराविरुद्ध कारवाई करावयाची असल्यास साहित्याची तपासणी न करता साहित्याचा वापर करण्यात आला व त्याकरिता परवानगी देण्यात आली. यासंदर्भात संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्याचे दिसून येत नाही.

**साहित्याची तांत्रिक तपासणी न करता त्याचा इमारत बांधकामात वापर करण्यात आल्यामुळे संपूर्ण प्रक्रिया चुकीची व बेकायदेशीर झाली आहे. सदर साहित्य वापरण्याची परवानगी क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी नाकारलेली नसल्यामुळे या प्रकरणी कंत्राटदार दोषी होऊ शकत नाही, काम सुरु असताना चांगले काम न झाल्यामुळे शाखा अभियंत्यांचे काम थांबविण्याचे आदेश दिले असते व कंत्राटदारावर दंड केला असता तर काही हरकत नव्हती. परंतु क्षेत्रिय अधिकाऱ्यांवर कार्यवाही न करता कंत्राटदारावर दंड आकारणी करुन चुकीची दंड वसुली झाली आहे. कंत्राटदाराने साहित्य वापरुन काम पूर्ण केले असल्यामुळे कंत्राटदाराने त्याची जबाबदारी पार पाडली आहे. यासंदर्भात शासन निर्णय व नियमावली आहे परंतु त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी झालेली नाही. भविष्यात पुन्हा असे घडू नये याकरिता संबंधितांविरुद्ध तातडीने कारवाई करावी तसेच याप्रकरणी संबंधित दोषी अधिकारी यांचे विरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित केली असल्याचे समितीच्या साक्षीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले आहे. याप्रकरणी प्रस्तावित असलेली चौकशी तातडीने निकाली काढण्यात यावी व उक्त चौकशीत समितीसमोर आलेल्या सर्व बाबी देखील विचारात घेण्यात याव्यात व त्यानुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुद्ध कारवाई करावी तसेच अशाप्रकरे पुन्हा लेखापरिक्षणामध्ये आक्षेप येऊ नयेत याकरिता ग्रामविकास विभागाने ठोस उपाययोजना केली पाहिजे. सदर प्रकरणी अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई न करता केवळ कंत्राटदारावर करण्यात आलेली कारवाई तांत्रिकदृष्ट्या योग्य नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे, त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व असमाधान व्यक्त करीत आहे. सबब, उपरोक्त प्रकरणी ग्रामविकास विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, सोलापूर

### विक्रीकराची रक्कम देयकातुन कमी कपात केलेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.३१२ (१४) (सन २०१२-१३)**

जिल्हा परिषद, सोलापूर सन २०१२-१३ (परिच्छेद क्र.१४) चे लेखापरिक्षण कालावधीत जिल्हा परिषद, सोलापूर बांधकाम विभाग क्र.१ व २ कडील बांधकामाच्या देयकातून विक्रीकरापोटी रक्कम रुपये ५६,२०,७६६/- एवढी कमी वसूल केलेली आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—

१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक मध्ये उपविभाग विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील दिनांक ४ एप्रिल, २०१२ च्या अधिसुचनेनुसार अधिसूचना क्र. विसआ(मुख्या)१/मुवक/२००५/९७, दिनांक २९ ऑगस्ट, २००५ मध्ये सुधारणा करत असताना ४% विक्रीकर ऐवजी ५% विक्रीकर कपात करण्यात यावा असे नमूद केलेले आहे. सन २०१२-१३ मध्ये अदा केलेल्या बांधकामाच्या देयकातून ५% मुल्यवर्धीत कर वसुल करण्याऐवजी ४% मुल्यवर्धीत कर वसूल केलेला आहे. त्यामुळे प्रत्येक बिलातून १% कमी कपात करण्यात आलेली विक्रीकराची एकूण रक्कम रुपये ५६,२०,७६६/- वसूल करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासन खाती भरणा केल्याची पुर्तता दाखविणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये अदा केलेली कामांची देयके ही सन २०११-१२ व सन २०१२-१३ मध्ये मंजूर झालेली कामे आहेत. सदर कामांची अंदाजपत्रके तयार करताना शासनाचे अधिकृत सन २०११-१२ व सन २०१२-१३ चे जिल्हा मंजूर दरसुचीनुसार (D.S.R.) ४% इतक्या मुल्यवर्धित कराची (विक्रीकर) तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे सन २०१२-१३ मध्ये विविध लेखाशिर्षातंर्गत अदा केलेल्या कामांचे देयकामधून ४% विक्रीकर वसूल करण्यात आलेला आहे व त्यानुसार सदर विक्रीकर रक्कमेचे धनादेश विक्रीकर कार्यालयाकडून स्वीकारलेली आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी माहिती दिली की, सन २०११-१२ व सन २०१२-१३ च्या जिल्हा मंजूर डीएसआरमध्ये ४ टक्के इतकी मुल्यवर्धित कराची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे सन २०१२-१३ मध्ये विविध लेखाशिर्षांतर्गत अदा केलेल्या कामांच्या देयकामधून ४ टक्के विक्रीकर वसूल करण्यात आला आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय यांनी माहिती दिली की, काही कामे सन २०११-१२ व सन २०१२-१३ मधील आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जे डीएसआर आहेत त्यात ४ टक्के मुल्यवर्धित कराचा समावेश आहे. त्यानुसार ४ टक्के वसुली केली आहे.

यावर समितीने निदेश दिले की, कॅगने याबाबत आक्षेप घेतले होते. तुम्हाला स्थानिक स्वराज्य संस्थांकडून विक्रीकर कपात करता येत नाही. तरी आपण अजूनही विक्रीकर वसूल करीत आहोत. ग्रामपंचायत ठेकेदार होऊ शकत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेला कंत्राटदार संबोधले जात नाही. तसे कायद्यात नाही. ही एक अधिकृत संस्था आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून आपण त्यांना काम देतो. कलम ३९ नुसार सरपंच सह्या करण्यास जबाबदार असल्यामुळे तो अपात्र ठरतो. या प्रकरणी सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

स्थानिक स्वराज्य संस्थाकडून विक्रीकर कपात करण्याची तरतूद नसताना देखील विक्रीकर वसुल करण्यात आल्या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधिताची जबाबदारी निश्चित करुन पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

होय, सखोल चौकशी करण्यात आलेली आहे.

विक्रीकर विभागाकडील अधिसूचना दिनांक ४ एप्रिल २०१२ चे कृपया अवलोकन व्हावे समितीने उपस्थितीत केलेल्या सदर मुद्याबाबतची कामे सन २०११-१२ ते २०१२-१३ या कालावधीतील आहेत. उपरोक्त अधिसूचनेनुसार विक्रीकर विभागाच्या २००५ च्या अधिसूचनेमध्ये सुधारणा करून ४ टक्के ऐवजी ५ टक्के विक्रीकर वसूल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ग्रामविकास विभागाकडील मार्गदर्शक सूचना दिनांक १२ मे, २०१६ **(परिशिष्ट ४.१)** व विक्रीकर सह आयुक्त मुंबई यांचे पत्र क्र.विउआ(काबनि) १ करदर/२००९/१४ (२)/प्रशा-८/ब४६, दिनांक २४ मार्च, २०१५ **(परिशिष्ट ४.२)** नुसार जर ग्रामपंचायत कार्यकंत्राट कामाकरिता आवश्यक असलेले साहित्य स्थानिक पुरवठदाराकडून खरेदी करून मजुराकरवी स्वतःच काम पूर्ण करून घेत असेल (डिपार्टमेंटल पद्धत) तर सदर व्यवहारामध्ये विक्रीकर कपात करणे आवश्यक नाही. ग्रामपंचायतीने केलेली कोणत्याही प्रकारची खरेदी ही करबिजक (tax invoice)विक्रीचे देयक (Sale Bill)व रोखीचे ज्ञापन (Cash Memo) इ.आधारे केलेली असल्यास देयकातून विक्रीकर कपात करणे आवश्यक नाही.

सदर बाबत सखोल चौकशी केली असता असे दिसून येते की, ग्रामपंचायतीने कार्यकंत्राट कामाकरिता आवश्यक असलेली कोणत्याही प्रकारची खरेदी ही करबिजक (Tax Invoice), व रोखीचे ज्ञाप (Cash Memo) हजेरी पत्रक इ.बाबी देयकासोबत सादर केले नसल्याची खात्री झाल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या देयकातून विक्रीकर कपात करण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :- (वित्त-९) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने सोलापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २९ व ३० जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा की, स्थानिक स्वराज्य संस्थाकडून विक्रीकर कपात करण्याची तरतूद नसताना देखील विक्रीकर वसूल करण्यात आल्या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, समितीच्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही केलेली आहे. ज्या ठिकाणी ग्रामपंचायत स्वतः काम करते त्या कामाचा विक्रीकर कपात करण्याची आवश्यकता नसून त्यांनी टॅक्स मेमो सादर करणे आवश्यक आहे. सदरहू प्रकरणी ग्रामपंचायतीने कंत्राटदारामार्फत काम केले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेचा करारनामा ग्रामपंचायती सोबत झालेला आहे. कंत्राटदाराची नेमूणक केली असली तरी ग्रामपंचायतीने विक्रीकर कपात केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नावाने बी-१ निविदा सादर करण्यात येत असेल तर सरपंच करारनाम्यावर स्वाक्षरी करतो त्यामुळे तो नियम ३९ नुसार पात्र होतो का, तो काम करू शकतो का, स्थानिक स्वराज्य संस्थेला कामे देण्याचा हेतू आहे की, कामाचा दर्जा वाढला पाहिजे व निधी पूर्णतः कामी आला पाहिजे. जिल्हा परिषदेने बी-१ निविदा रद्द करून प्रशासकीय मान्यता देऊन थेट कार्यारंभ आदेश दिला पाहिजे. उक्त प्रकरणी आयुक्तांकडे नियम ३९ नुसार कोणी दावा दाखल केला तर देयकावर त्याची स्वाक्षरी असल्याने संबंधितास अपात्र करावे लागेल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, काम वाटप करण्यात आले होते निविदेच्या माध्यमातून देण्यात आले नाही.

तद्नंतर समितीने मत व्यक्त केले की, ग्रामपंचायतीकडे रजिस्ट्रेशन, जीएसटी क्रमांक नसतो त्यामुळे ग्रामपंचायतीला काम देता येत नाही. ग्रामपंचायत व्यवसाय करण्यासाठी नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ज्या ठिकाणच्या ग्रामपंचायतीने काम घेतले आहे त्या प्रकरणी विक्रीकर कपात केलेली नाही. ग्रामपंचायतीने कंत्राटदाराकडून काम करून घेतले असेल, करबिजक व रोखीचे ज्ञापन केले नसेल त्याप्रकरणी विक्री कर कपात करण्यात आला आहे. सदरहू प्रकरणीची कार्यवाहीशी संचालक, लेखा व कोषागारे सहमत असतील.

यावर समितीने आपले मत व्यक्त करून असे निदेश दिले की, ग्रामपंचायतीच्या कामाच्या रकमेतून विक्री कराची रक्कम कपात केली जाते. मूळ आक्षेप दोन ते तीन कामांच्या संदर्भात आहे. समितीच्या विभागाच्या सचिवांच्या साक्षीच्या वेळी कामाचे नाव व ते काम कंत्राटदाराला देण्यात आले की ग्रामपंचायतीला दिले याची माहिती उपलब्ध करून दिल्यास सदरहू मुद्दा निकाली काढता येणे शक्य होईल. तसेच सदरहू प्रकरणी जिल्हा परिषदेने केलेल्या कारवाईच्या रकान्यामध्ये नमूद करण्यात आले आहे की, समितीने उपस्थित केलेल्या सदर मुद्याबाबतची कामे सन २०११-१२ ते सन २०१२-१३ या कालावधीतील आहेत. उपरोक्त अधिसूचनेनुसार विक्री कर विभागाच्या २००५ च्या अधिसूचनेमध्ये सुधारणा करून ४ टक्के ऐवजी ५ टक्के विक्री कर वसूल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ग्रामविकास विभागाकडील मार्गदर्शक सूचना दिनांक १२ मे, २०१६ व विक्री कर सह आयुक्त, मुंबई यांचे पत्रानुसार जर ग्रामपंचायत कार्य कंत्राट कामाकरिता आवश्यक असलेले साहित्य स्थानिक पुवठादाराकडून खरेदी करून मजुराकरवी स्वतः काम पूर्ण करून घेत असेल तर सदर व्यवहारामध्ये विक्री कर कपात करणे आवश्यक नाही. तरी देखील विक्रीकर कपात करण्यात आला आहे. त्यापूर्वी ग्रामपंचायतीच्या देयकातून विक्री कर कपात करण्याची तरतूद कायद्यामध्ये नसल्याने कॅगने ॲक्टच्या आधारे आक्षेप घेतला होता. त्यामुळे आयुक्तांना सन २०१६ मध्ये सदरहू पत्र द्यावे लागले होते. ग्रामपंचायत जे काम करीत असले त्याचा बी-१ करारनामा करण्यात येऊ नये, अशी नवीन सुधारणा केली तर गतीने कामे होतील.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, टीडीएस रक्कम ग्रामपंचायतीमधून कपात करू नये असा हा मुद्दा होता. पाच टक्के ऐवजी चार टक्के कपात का केली, असा हा मुद्दा आहे. यासंबंधी दिनांक १२ मे, २०१६ रोजीचा शासन निर्णय आहे. त्यामध्ये शासनाने मार्गदर्शक तत्वे घालून दिलेली आहेत. ग्रामपंचायत स्वतः एजेन्सी म्हणून काम करीत असेल तर त्यावेळेस टीडीएस कपात करू नये, परंतु ग्रामपंचायतीने दुसरीकडे काम दिले असेल किंवा ग्रामपंचायतीने त्या कामामध्ये टॅक्स इन्व्हॉईस किंवा सेलडीड केले नसेल तर अशा परिस्थितीमध्ये टीडीएसची पाच टक्के रक्कम वसूल करावी. याच शासन निर्णयाची अंमलबजावणी केलेली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, आपण ग्रामपंचायतीला एजन्सी म्हणून काम देतो. ते काम दोन लाख रुपयांचे असेल तर त्यातून पाच हजार रुपये, दहा हजार रुपये काढून घेतले तर ९५ टक्क्यांमध्ये त्यांना काम करावे लागेल. ५० हजार रुपये उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायतीला दहा लाख रुपयांची कामे घेता येतात आणि ५० हजार रुपयांच्या वर उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायतीला १५ लाखाची कामे घेता येतात. बी-वन ॲग्रीमेंट जिल्हा परिषदेसोबत ते करतात. २५:१५ ची कामे ग्राम पंचायत मागते त्याना द्यावीच लागतात. ज्या मागत नाहीत ती कामे जिल्हा परिषद करते, असे असताना त्यांच्याकडून पैसे कपात करून घेणे योग्य आहे काय, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, ग्रामपंचायतीला आपण पैसे देत असू आणि ग्रामपंचायतीला हे कर देय नसल्यामुळे ग्रामपंचायतीला काम देताना टीडीएस कपात करू नये. ग्रामपंचायतीला आपण काम देत असाल तर त्यांचेकडून  कपात करणे अपेक्षित नाही. यावर समितीने विचारणा केली की, ग्रामपंचायत जिल्हा परिषदेकडून काम घेताना बी-वन करारनामा करून घेते आणि त्यांनी पुन्हा ते दुसऱ्याला द्यायचे असे कसे शक्य आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, कामाच्या मार्गदर्शक तत्वामध्ये बरीच विस्तृत माहिती दिलेली आहे. एखाद्या रस्त्याचे काम असेल आणि ग्रामपंचायतीकडे मशीन नसेल तर त्यासाठी ग्रामपंचायत खाजगी मशिन भाड्याने घेवून ते काम करून घेते. त्यावेळी त्या ग्रामपंचायतीने टॅक्स इन्व्हॉईस आणि सेल डीड दाखविणे आवश्यक आहे. पाच लाख रुपये, दहा लाख रुपयांचे काम ग्रामपंचायतीने केले तर त्यांनी टॅक्स बील आणि टॅक्स इन्व्हॉईस ज्या ज्या ठिकाणी जनरेट केला त्या त्या ठिकाणी जिल्हा परिषदेने टीडीएस कापलेला नाही. ज्या ठिकाणी त्यांनी प्रोड्यूस केलेले नाही त्या ठिकाणी आपण असे गृहित धरतो की, ही बाब त्यांनी खरेदी केलेली आहे. अशावेळी कपात करणे आवश्यक आहे. आपण शासन निर्णयानुसार ही कार्यवाही केलेली आहे. ग्रामपंचायतीने मजूर लावून ते काम करायला पाहिजे. रस्त्याच्या कामासाठी त्यांचेकडे मशीन नसेल तर त्यांना कोणालातरी ते काम द्यावे लागेल.

यावर समितीने विचारणा केली की, ग्रामपंचायतीला मशीन भाड्याने आणावे लागेल, स्वतः मस्टर भरावे लागेल. ग्रामसेवक स्वतः मस्टर भरतात. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, लेबरचे काम आपल्याकडून करून घेतात. ज्या व्यक्तीने रोलर सप्लॉय केला, त्यांनी जी काही इन्व्हॉईस रेस केलेली आहे त्या व्यक्तीला पैसे देताना टीडीएस कापूनच द्यायला पाहिजे. ते जर टॅक्सेस ब्रॅकेटमध्ये नसेल तर  ते आपला फॉर्म भरून टॅक्सचे रिफंड घेत राहील.  त्या व्यक्तीने टॅक्स इन्व्हाईस घेतला नसेल आणि खात्री नसेल की, त्या व्यक्तीने टॅक्स भरलेला आहे तर आपण कपात करतो. ही रक्कम कपात केल्यानंतर टॅक्स ॲथॉरिटीला आपल्याला भरावे लागते. त्याचे सर्टिफिकेट द्यावे लागते. ती व्यक्ती जाऊन त्याला कर देय नसेल तर ते त्यांचेकडून वसूल करतात. ग्रामपंचायतीला पैसे  देताना टीडीएस कापणे योग्य नाही.

यावर समितीने विचारणा केली की, या प्रकरणात पाच टक्के मूल्यवर्धीत कर वसूल करण्याऐवजी चार टक्के  वसूल केलेला आहे. प्रत्येक बिलातून एक टक्के रक्कम कमी कपात करण्यात आलेली आहे. एकूण रक्कम ५६ लाख २० हजार ७२० रुपये वसूल करून शासन खाती जमा करण्यात यावी, असा हा प्रश्न आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१२ मध्ये ज्या गाईडलाईन्स निघाल्या होत्या त्यावेळी त्या ठराविक तारखेनंतर जे देयक असेल त्याला ५ टक्के टीडीएस लावा अशी विक्रीकर विभागाची मार्गदर्शक तत्वे होती. या अनुषंगाने पाच टक्के मूल्यवर्धित कराची कपात केलेली आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, ५ टक्क्याऐवजी ४ टक्के कपात केलेली आहे. एक टक्का कमी वसूल केलेला आहे. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक १ एप्रिल, २०१२ पासून ५ टक्के दर लावलेला आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय यांनी माहिती दिली की, टीडीएस ज्या दिवशी कापतो त्या दिवशी जो दर अनुज्ञेय आहे त्यानुसार कापतो.  जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक २००८-२००९ चे असेल आणि काम सन २०१२-२०१३ चे असेल आणि मूल्यवर्धित कर दिनांक १ एप्रिल, २०१२ पासून चार टक्क्यावरुन पाच टक्के वाढला. जिल्हा परिषदेचे सर्व देयक दिनांक १ एप्रिल, २०१२ नंतरची आहेत. तेव्हा लेखापरिक्षकांनी असे म्हटले आहे की, ४ टक्केऐवजी ५ टक्के कपात करायला पाहिजे होती.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, २०१२ पूर्वी जेव्हा त्यांनी निविदा दिली त्यावेळी ४ टक्के कपात करावा अशी सूचना होती, परंतु जेव्हा काम सुरू झाले तेव्हा दर वाढले. निविदेच्या अटी व शर्तीमध्ये असे स्पष्ट असायला पाहिजे की, इन्व्हॉईसच्यावेळी जो काही टीडीएस दर असेल त्याप्रमाणे कपात करण्यात येईल. त्यानुसार त्यांनी करायला पाहिजे. यामध्ये वसूल करण्याची गरज नाही कारण टीडीएस नंतर समायोजित होते. १०० रुपयांचे काम असेल तर आम्ही पाच रुपये कपात करायला पाहिजे होते ते आम्ही ४ चार रुपये कपात केलेले आहेत. यामध्ये शासनाचे एक रुपयाचेही नुकसान झालेले नाही. याचे कारण असे आहे की, यामध्ये जेव्हा व्यक्ती आपला कर परतावा भरेल त्यावेळी ४ रुपये कपात झालेली भरणार, यामध्ये शासनाचे नुकसान होत नाही. शेवटी ती रक्कम समायोजित होणारच आहे. एक निश्चित आहे की, असे लहान ठेकेदार कधी कधी टॅक्समध्ये येत नाहीत. आपण कपात करून टाकतो त्यामुळे त्यांचे नुकसान होते. नंतर ते सरकारकडून पैसे परत घेत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये शासनाचे नुकसान झाले असे म्हणता येणार नाही.

यावर समितीने असे निदेश दिले की, बऱ्याच वेळा मुख्य लेखा व वित्त अधिकारी विषय समितीचे ठराव सुद्धा बघत नाहीत. या प्रकरणामध्ये जेवढे बिल दिलेले आहे त्याची तपासणी करावी. पाच टक्के मूल्यवर्धित कर वसूल करण्याऐवजी ४ टक्के वसूल केलेला आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे सर्व बघावे आणि नियमानुसार एक टक्का रक्कम वसूल करून ती सरकारच्या खात्यात जमा करावी. सरकारच्या पैशाचे नुकसान होऊ नये हे त्यांनी बघावे. नियमानुसार सर्व तपासणी करून वसुली करावी आणि समितीला एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय यांनी माहिती दिली की, हे सर्व अनरजिस्टर्ड ठेकेदार आहेत म्हणून ५ टक्के कापलेले आहेत, असे वाटते कोणीही रिटर्न फाईल केलेले नसावे. ज्यांनी रिटर्न फाईल केले असेल आणि त्याचे ॲसेसमेंट झाले असेल तर त्यांच्याकडून वसूल होणार नाही. ज्यांनी रिटर्न फाईल केलेले नाही त्यांच्याकडून वसूल करावी लागेल. यावर समितीने निदेश दिले की, जे होऊ शकेल तसे करावे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी होकारार्थी उत्तर समितीस दिले.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत सन २०१२-२०१३ चे लेखापरिक्षण कालावधीत जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.१ व २ कडील बांधकामाच्या देयकातून विक्रीकरापोटी रक्कम रुपये ५६,२०,७६६/- एवढी रक्कम कमी वसूल केलेली आहे. यासंदर्भात पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

दिनांक ४ एप्रिल, २०१२ रोजीच्या अधिसुचनेनुसार ५% मुल्यवर्धित कर वसुल करण्याऐवजी ४% मुल्यवर्धित कर वसूल केल्यामुळे रक्कम रुपये ५६,२०,७६६/- वसूल करून शासनखाती भरणा केल्याची पूर्तता दाखविणे आवश्यक आहे. उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशाच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०१२-२०१३ मध्ये विविध लेखाशिर्षांतर्गत अदा केलेल्या कामांच्या देयकामधून ४ टक्के विक्रीकर वसूल करण्यात आला आहे. लेखापरिक्षकांनी याबाबत आक्षेप घेतलेले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांकडून विक्रीकर कपात करता येत नाही तरीदेखील विक्रीकर वसूल करण्यात येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेला कंत्राटदार संबोधले जात नाही. कलम ३९ नुसार सरपंच स्वाक्षऱ्या करण्यास जबाबदार असल्यामुळे सरपंच अपात्र ठरविण्यात येतो. ज्या ठिकाणी ग्रामपंचायत स्वतः काम करते त्या कामाचा विक्रीकर कपात करण्याची आवश्यकता नसून कर ज्ञापन (टॅक्स मेमो) सादर करणे आवश्यक आहे.

**सदर प्रकरणी वित्त विभागाने दिनांक १२ मे, २०१६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन झालेले नाही. सन २०१२ पूर्वी जेव्हा निविदा देण्यात आली त्यावेळी ४ टक्के विक्रीकर कपात करण्यात यावा अशी सूचना होती. परंतु जेव्हा काम सुरू झाले तेव्हा दर वाढले निविदेच्या अटी व शर्तीमध्ये असे स्पष्टपणे नमूद असायला पाहिजे होते की, इन्व्हॉईस वेळी जो काही टीडीएस दर असेल त्याप्रमाणे कपात करण्यात येईल. त्यानुसार टीडीएस नंतर समायोजित होतो. कर परतावा भरतेवेळी ४ टक्के कपात झालेली रक्कम भरणा करून शेवटी उर्वरित १ टक्के रक्कम समायोजित होणारच आहे. त्यामुळे शासनाचे नुकसान झालेले नाही. तथापि, समितीच्या मते अनोंदणीकृत ठेकेदारांकडून ५ टक्के विक्रीकर कपात करण्यात आलेली आहे. ज्यांनी परतावा नस्ती सादर केलेली असेल आणि त्यांचे मुल्यांकन झाले असेल तर त्यांच्याकडून विक्रीकर वसूल होणार नाही. त्यामुळे ज्यांनी परताव्याची नस्ती सादर केलेली नाही त्यांच्याकडून विक्रीकर वसुली करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, सोलापूर

## पशुसंवर्धन विभागाकडील अर्धवेळ परिचरांच्या वेतनाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.७३५ (२) (सन २०१२-१३)**

जिल्हा परिषद, सोलापूर सन २०१२-१३ (परिच्छेद क्र.२) पशुसंवर्धन विभागांकडील ३४ अर्धवेळ परिचर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर शासन निधीतून रुपये २८,३१,४२४/- खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम २५२ नुसार बार्शी पंचायत समितीकडील कर्मचाऱ्यांच्या मंजूर पदांची सुची देयकासोबत नाही.

२) कर्मचाऱ्यांची नियुक्ती मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश दिनांक १६ जून, १९९४ नुसार आहे. सदर बाबीवर शासन निधीतून मागील १९ वर्षात रुपये १४,९५,२२४/- इतका खर्च झालेला आहे. संपूर्ण जिल्ह्यात एकूण ३४ पदांचा मंजूर आकृतीबंधात समावेश नसल्याने झालेला एकूण खर्च रुपये २८,३१,४२४/- नियमबाह्यपणे करणेत आला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) शासन निर्णय क्र.व्हीएसी/१०८५/१४८५४/सीआर९९/पदुम-१५ दिनांक ४ ऑक्टोबर, १९८५ अन्वये प्रत्येक पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी एक अंशकालीन सफाईगार (आकस्मिक खर्चातून) भरणेस मंजुरी दिलेली आहे. तसेच, तद्नंतर, जसजसे पशुवैद्यकीय दवाखाना दर्जावाढ देण्यात आला. तसतसे अंशकालीन सफाई कामगार म्हणून पदे भरली आहेत. पशुसंवर्धन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडील दिनांक २० नोव्हेंबर १९९० रोजीच्या पत्रान्वये अंशकालीन सफाई कामगार पदे भरण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी हे सक्षम आहेत. त्यास शासनाच्या मंजुरीची आवश्यकता नाही. तथापि, शासनाने दिनांक ३ ऑगस्ट, १९९५ अन्वये आकस्मिक निधी वेतनावर नियुक्ती करू नये असे प्राप्त झाल्याने त्यापुढे नियुक्त्या केलेल्या नाहीत. (त्यामुळे मंजूर पदे देयकासोबत देण्यात आलेली नाहीत.)

२) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशान्वये एकूण ३४ कर्मचाऱ्यांना मानधनावर तात्पुरती नियुक्ती केलेली आहे. त्यावर झालेला खर्च एकूण रुपये २८,३१,४२४/- हा त्या अर्धवेळ सफाई कामगार यांनी त्या पदावर त्या कालावधीत केलेल्या कामाचा आहे. त्यामुळे त्यांना मानधन स्वरुपात दिलेली रक्कम ही नियमबाह्य नसून योग्य आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, पशुसंवर्धन विभागांकडील ३४ अर्धवेळ परिचर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर शासन निधीतून रुपये उणे २८ लाख ३१ हजार ४२४ रुपये खर्च केलेला असून, याबाबत माहिती देण्यात यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक ४ ऑक्टोबर, १९८५ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. त्यावेळी डिस्पेंसरीमध्ये अर्धवेळ अंशकालीन सफाई कामगार नेमला जात होता. त्यांचा नेमणुकीचा आदेश दिनांक ४ ऑक्टोबर, १९८५ रोजीचा आहे. त्यानंतर निवृत्ती बंद करण्याचा आदेश दिनांक ३ ऑगस्ट, १९९५ मध्ये निर्गमित झालेला होता. त्यांचे मानधन रुपये ७ हजार ६०० इतके आहे. त्यांची कंत्राटी तत्त्वावर नेमणूक झालेली आहे. त्यांची नेमणूक मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केली होती.

यावर समितीने विदित केले की, शासनाने मंजुरी दिलेली आहे. स्पष्टीकरणात असे म्हटले आहे की, " पशुसंवर्धन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडील दिनांक २० नोव्हेंबर, १९९० रोजीच्या पत्रान्वये अंशकालीन सफाई कामगार पदे भरण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी हे सक्षम आहेत. त्यास शासनाच्या मंजुरीची आवश्यकता नाही " एकीकडे शासनाने मंजुरी दिली आहे आणि दुसरीकडे शासनाच्या मंजुरीची आवश्यकता नाही असे विसंगत उत्तर समितीला दिले जात आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक ४ ऑक्टोबर, १९८५ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. त्यामध्ये कोणता स्टाफ घेण्यात यावा हे नमूद केलेले आहे. त्यावेळी पशुसंवर्धन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडील दिनांक २० नोव्हेंबर, १९९० रोजीच्या पत्रान्वये अंशकालीन सफाई कामगार पदे भरण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी हे सक्षम आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, लेखापरिक्षकांनी आकृतीबंध नसताना जिल्हा परिषदेने नेमणूक केलेली आहे, असा आक्षेप काढलेला आहे. जिल्हा परिषदेला आकृतीबंधाची आवश्यकता नव्हती काय, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, कृषि व सहकार विभागाचा दिनांक ४ ऑक्टोबर, १९८५ रोजीचा शासन निर्णय आहे. आदेश क्रमांक पशुसंवर्धन विभागाच्या १५ नंबर सीआरमध्ये कोणकोणती पदे भरावयाची आहेत तो पॅटर्न ठरवून दिलेला आहे. अर्धवेळ सफाईकामगाराच्या पदाचा उल्लेख केलेला आहे. हे मानधनावर आहेत. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावरुन ती पदे भरलेली आहेत. सदरहू पदे भरण्यासाठी राज्य शासनाने मंजुरी दिलेली आहे.

यानंतर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेला ३ वेळा संधी दिल्यानंतर सुद्धा हा परिच्छेद समितीसमोर का आला, सद्यःस्थितीत सफाई कामगार कार्यरत आहेत काय, यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी खुलासा केला की, सन १९९० मध्ये आवश्यकता नाही, असे पत्र आले होते. सद्यःस्थितीत ३४ कर्मचाऱ्यांपैकी २६ कर्मचारी कार्यरत आहेत. २ कर्मचारी मयत झालेले आहेत आणि ४ कर्मचारी गैरहजर आहेत. हे सर्व कंत्राटी तत्त्वावर काम करणारे कर्मचारी आहेत. शासनाच्या कृषी व सहकार विभागाच्या दिनांक ४ ऑक्टोबर, १९८५ रोजीच्या शासन निर्णयानुसार अंशकालीन सफाई कामगारांची पदे भरण्यास मंजुरी दिली त्या अनुषंगाने पदे भरली होती. त्यावेळी ३४ पदे भरली होती, त्यापैकी २६ पदे सध्या कार्यरत आहेत. यावर समितीने निदेश दिले की, सदरहू मुद्याबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पशुसंवर्धन विभागाकडील अर्धवेळ परिचरांची पदे नियमित करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने विभागाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) पशुसंवर्धन उपसंचालक व पदसिद्ध अवर सचिव, कृषि व सहकार विभाग निर्णय क्रं.८५/१४८५४/सीआर-९९/पदुम-१५ मंत्रालय, मुंबई दिनांक ४ ऑक्टोबर, १९८५ अन्वये सध्या अस्तित्वात असलेल्या पशु प्रथमोपचार केंद्राचे पशु वैद्यकीय दवाखान्यामध्ये दर्जावाढ करण्यास मंजूरी दिलेली आहे. पशु वैद्यकीय दवाखान्यासाठी कर्मचारी वृंद नेमण्यास राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये अ.क्रं.५ वर अंशकालीन सफाईगार (आकस्मिक खर्चामधून ) एक या प्रमाणे ३४ पदे मंजूर केलेली आहे. त्याअनुषंगाने पशुसंवर्धन संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे, यांनी दिनांक २० नोव्हेंबर, १९९० च्या पत्रान्वये, अंशकालीन सफाईगार (स्विपरची) पदे भरण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर हे सक्षम आहेत, असे कळविले आहे. त्यानुसार ही पदे भरण्यात आलेली आहेत.

२) पशुसंवर्धन विभागाकडील अर्धवेळ परिचर यांची पदे नियमित करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने विभागाने या कार्यालयाचे पत्र दिनांक १७ जुलै, २००१ व दिनांक १० ऑक्टोबर, २०१३, व दि. १६ जून, २०१४ व दिनांक १४ जुलै, २०१४ व दिनांक ६ ऑगस्ट, २०१८अन्वये पशुसंवर्धन विभागाकडील ३४ अर्धवेळ परिचर यांना जिल्हा परिषद मध्ये रिक्त होणा-या वर्ग ४ मधील परिचर पदावर थेट पद्धतीने सामावून घेणे बाबत, योग्य मार्गदर्शन होणेस्तव मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना मार्गदर्शन मागणी करण्यात आलेले आहे.

३) या कार्यालयीन अशापत्र क्रं.४० सोलापूर दिनांक १७ जून, २०१७ अन्वये मा. आयुक्त, पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या जिल्हा परिषदेकडील ३४ अर्धवेळ परिचर यांना परिचर वर्ग ४ या पदावर सामावून घेणेबाबत आपल्या कार्यालयाकडे शासनाचे निर्णय असल्यास या कार्यालयास देणे बाबत कळविण्यात आलेले आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**कृषि व पदुम (पशुसंवर्धन) विभागाचे अभिप्राय :-** आयुक्त, पशुसवंर्धन यांच्या दिनांक ०२ जानेवारी, २०१९ रोजी प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने या विभागाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-

१) पशुसवंर्धन उपसंचालक व पदसिद्ध अवर सचिव, कृषि व सहकार विभाग निर्णय क्रं.८५/१४८५४/सीआर-९९/पदुम-१५, मंत्रालय , मुंबई, दिनांक ०४ ऑक्टोबर, १९८५ अन्वये सध्या अस्तित्वात असलेल्या पशु प्रथमोपचार केंद्रांचे पशु वैद्यकीय दवाखान्यांमध्ये दर्जा वाढ करण्यास मंजुरी दिलेली आहे. पशु वैद्यकीय दवाखान्यांसाठी कर्मचारी वृंद नेमण्यास राज्य शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये अ.क्रं.५ वर अंशकालीन सफाई कामगार (आकस्मिक खर्चामधून) एक पद मंजूर केलेले आहे.

२) पशुसंवर्धन विभागाचा शासन निर्णय, दिनांक २२ नोव्हेंबर, २००० अन्वये कृषि व पदुम विभागाकडील योजना जिल्हा परिषदेकडे पदांसह हस्तांतरित करण्यात आल्या आहेत.

अंशकालीन अर्धवेळ सफाई कामगार यांना नियमित करणे ही बाब ग्रामविकास विभागाच्या, अखत्यारीत आहे. या बाबत ग्रामविकास विभागाने दिनांक १८ जानेवारी, २००३, दिनांक २७ जून, २००३, दिनांक ०६ जुलै, २००५, दिनांक ०७ ऑगस्ट, २००६, दिनांक २४ ऑगस्ट, २००६, व दिनांक २८ एप्रिल, २०११, रोजी वेळोवेळी पत्रे/परिपत्रके काढलेली आहेत. त्यामध्ये जिल्हा परिषदेने कोणत्या प्रकारे कार्यवाही करावी, याबाबत निर्देश दिलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, सोलापूर व ग्रामविकास विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. पशुसंवर्धन विभागाकडून कोणतीही कार्यवाही करणे अपेक्षित नाही.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (आस्था-१०) याअनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयाकडून दि.६ जून, २०१८ रोजी प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासनामार्फत दि. ९ जानेवारी, २०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

" मा. सर्वोच्च न्यायालयाने ए. उमरानी विरूद्ध रजिस्ट्रार, को.ऑ. सोसायटीज, तामिळनाडू या प्रकरणाच्या अनुषंगाने विहित केले आहे की, विहित नियमानुसार न केलेली भरती ही मागील दरवाजाने भरती ठरते. जिल्हा परिषदेमधील अशा कर्मचा-यांना नियमित करता येणार नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम २५३ अन्वये कंत्राटी नेमणुका करण्याची तरतूद असून सविस्तर नियमही विहित केले आहेत. त्यानुसार अशा कंत्राटी कर्मचा-यांना कायम करता येणार नाही अथवा नियमित पदाचे कोणतेही हक्क सांगता येणार नाहीत."

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सोलापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा की, पशुसंवर्धन विभागाकडील अर्धवेळ परिचरांची पदे नियमित करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने विभागाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, अंशकालीन सफाईगाराची ३४ पदे दिनांक २० नोव्हेंबर, १९९० च्या शासन निर्णयानुसार भरली होती. त्यांना नियमित का करीत नाही तर त्याला सर्वोच्च न्यायालयाचे बंधन आहे. मागील दरवाजाने भरती करू नये अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. आपण यासाठी मार्गदर्शन मागितले, परंतु ग्रामविकास विभागाने यांना कायम करू शकत नाही असे मार्गदर्शन दिलेले आहे. हा फक्त कर्मचाऱ्यांचा विषय आहे. यानंतर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, सन २००४ चा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-२०१३ या वर्षामध्ये जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत पशुसंवर्धन विभागाकडील ३४ अर्धवेळ परिचर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर शासन निधीतून रुपये २८,३१,४२४/- एवढा खर्च करण्यात आलेला असून याबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. बार्शी पंचायत समितीकडील कर्मचाऱ्यांच्या मंजूर पदांची सूची देयकासोबत नाही. सदर बाबींवर शासन निधीतून मागील १९ वर्षात रुपये १४,९५,२२४/- एवढा खर्च झालेला आहे. संपूर्ण जिल्ह्यात एकूण ३४ पदांच्या मंजूर आकृतीबंधाचा समावेश नसल्याने झालेला एकूण खर्च रुपये २८,३१,४२४/- नियमबाह्यपणे करण्यात आला आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशाच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, दिनांक ४ ऑक्टोबर, १९८५ रोजीच्या पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या शासन निर्णयानुसार प्रत्येक पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी एक अंशकालीन सफाई कामगार (आकस्मिक खर्चातून) भरणेस मंजूरी दिलेली आहे. त्यानंतर निवृत्ती बंद करण्याचा आदेश दिनांक ३ ऑगस्ट, १९९५ मध्ये निर्गमित झालेला होता, त्यांचे मानधन रुपये ७ हजार ६०० इतके आहे, त्यांची कंत्राटी तत्वावर नेमणूक झालेली आहे. त्यांची नेमणूक मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केली होती. आकृतीबंध नसताना जिल्हा परिषदेने नेमणूक केलेली आहे असा आक्षेप लेखापरिक्षकांनी घेतलेला आहे. **दिनांक ४ ऑक्टोबर, १९८५ रोजीच्या शासन निर्णयानुसार पशुसंवर्धन विभागाच्या १५ नंबर सीआरमध्ये कोणकोणती पदे भरावयाची आहेत तो आराखडा ठरवून दिलेला आहे. त्यात अर्धवेळ सफाई कामागारांच्या पदांचा उल्लेख केलेला आहे, ही पदे मानधनावर आहेत. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावरुन ही पदे भरलेली आहेत. सदरहू पदे भरण्यासाठी राज्य शासनाने मंजुरी दिलेली आहे. सद्यःस्थितीत ३४ कर्मचाऱ्यांपैकी २६ कर्मचारी कार्यरत आहेत. सदर अंशकालीन सफाईगारांची पदे नियमित करता येत नाहीत. कारण सन २००४ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने अशा सूचना दिल्या आहेत की, मागील दरवाजाने भरती करण्यात येऊ नये (Back Door Entry) तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असला तरी नैसर्गिक न्याय तत्त्वावर आधारित सदर कार्यरत असणाऱ्या २६ अर्धवेळ परिचरांची पदे नियमित करण्याबाबत ग्रामविकास विभागाने नियमानुसार कार्यवाही करावी, अशी समिती शिफारस करीत आहे. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, सोलापूर

## दलित वस्ती सुधार योजना अनुदानाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.८७९ (२८) (सन २०१२-१३)**

सन २०१२-१३ मध्ये समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद, सोलापूर ने ४० कोटी रुपयांचे वित्तप्रेषणान्वये अनुदान वाटप करण्यात आलेले असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.—

१) सदर कार्यालयाने पंचायत समिती निहाय पूर्ण/अपूर्ण कामांचा पूर्ण कामासाठी वितरित केलेला निधी व अपूर्ण कामांचा अवितरित केलेला निधी याचा आढावा घेतलेला नाही. त्यामुळे सन २०१०-२०११ मधील अखर्चित अनुदान रुपये १,४०,२५,०३२/- व सन २०११-२०१२ अखेरचे रुपये ३,६१,९९,५६५/- अखर्चित आहे. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१००२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांक ६ जून, २००८ अन्वये अखर्चित अनुदान पुढील लगतच्या वर्षापर्यंत खर्च करावायाची अनुमती आहे. त्यामुळे रक्कम रुपये १,४०,२५,०६२/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

२) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु-२०११/प्र.क्र.४४२/अजाक दिनांक ५ डिसेंबर, २०११ **(परिशिष्ट ६.१)** परिशिष्ट अ मुद्दा क्रमांक ११ नुसार काम सुरु करण्यापूर्वी व तद्नंतर प्रत्यक्ष पूर्ण झालेल्या कामाचे मुल्यांकन करुन २५ टक्के, ५० टक्के व ७५ टक्के रक्कम अदा करावयाचे असून कामपूर्ण झाल्यानंतर १०० टक्के काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र घेऊन उर्वरित निधी वर्ग करावयाचा असताना सदर विभागाकडून एकाच वेळी संपूर्ण निधी गट विकास अधिकारी यांना वर्ग करण्यात आलेला आहे.

३) गट विकास अधिकारी यांच्याकडून मंजुर कामे व त्यावरील खर्चाचा अहवाल विहित नमुन्यात घेण्यात आलेला नाही. तसेच विभागाकडून पाठपुरावा केलेला नाही. त्यामुळे झालेला खर्च व शिल्लक निधी यांचा मेळ घेता आला नाही.

४) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु-२००८/प्र.क्र.५२४/मुंबई, दिनांक १४ नोव्हेंबर, २००८ **(परिशिष्ट ६.२)** परिशिष्ट अ (६) नुसार समाज कल्याण अधिकारी यांनी योजनेच्या कामावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवून कामाचा प्रगती अहवाल शासनास पाठविणे आवश्यक असताना तसा पाठविण्यात आलेला नाही.

५) तालुक्यातील अखर्चित रकमा शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सन २०१०-११ मधील अखर्चित रक्कम रुपये १,४०,२५,०३२/- शासन सदरी भरणा केलेली आहे.

२) मंजूर कामांचा निधी गटविकास अधिकाऱ्यांकडे वर्ग केला जातो व काम पुर्ण होईल तसे कामांच्या मुल्यांकनानुसार गटविकास अधिकारी व ग्रामसेवक यांच्या संयुक्त खात्यावर वर्ग करून मुल्यांकनानुसार खर्च केला जातो. जिल्हा परिषद, सोलापूर मध्ये Work done Payment कार्यपद्धती राबविण्यात येते. कामांना ॲडव्हान्स दिला जात नाही. त्यामुळे निधीचा अपहार होण्यास पायबंद बसतो.

३) गटविकास अधिकारी, उप अभियंता यांच्या सहविचार सभेत दरमहा आर्थिक व भौतिक आढावा घेण्यात आलेला आहे. खर्चाचा ताळमेळ घेण्यात आलेला आहे.

४) दर महिन्यांच्या ५ तारखेस भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल मा. विभागीय आयुक्त यांना सादर करण्यात आला आहे.

५) तालुक्यातील अखर्चित रकमा शासनाकडे भरणा केलेल्या आहेत. सोबत चलनाची सत्यप्रत सादर केली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, दलित वस्ती सुधार योजना अनुदानामधील सन २०१०-११ मधील अखर्चित रक्कम १ कोटी ४० लाख २५ हजार ३२ रुपये शासनास परत करण्यात आले आहेत. याची कारणे काय होती, यामध्ये कोण दोषी आहेत, तसेच दोर्षीवर कारवाई का करण्यात आली नाही, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांनी खुलासा केला की, दिनांक ३१ मार्च, रोजीपर्यंत कामे पूर्ण न झाल्यामुळे अखर्चित राहिलेला निधी परत गेला, यावर समितीने विचारणा केली की, या कामांच्या वर्क ऑर्डरचा कालावधी किती होता, १५ लाखांचे सिमेंट रस्त्याचे काम असेल तर त्यासाठी किती कालावधी असतो, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांनी खुलासा केला की, वर्क ऑर्डरचा दोन वर्षांचा कालावधी होता व सिमेंट रस्त्यांसाठी ६ महिन्यांचा कालावधी असतो.

यावर समितीने मत व्यक्त केले की, पाणी पुरवठा योजनेसाठी एक वर्षाचा कालावधी असतो. मग या प्रकरणी दोन वर्षांची मुदत असूनही निधी परत का गेला, तसेच याचे काहीही कारण नमूद करण्यात आलेले नाही. हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. मागासवर्गीयांना न्याय देण्यासाठी राज्यामध्ये विविध योजना आखल्या जात आहेत, असे असताना या प्रकरणी १ कोटी ४० लाख २५ हजार ३२ रुपयांचा निधी परत जात असेल तर यामधून प्रशासनाची उदासिनता दिसून येत आहे. गट विकास अधिकारी यांच्या खात्यामध्ये पैसे जमा झाल्यानंतर टेंडर प्रक्रिया करण्यात आली. तसेच गट विकास अधिकारी यांनी करारनामा केला. हा निधी खर्च करण्याची संपूर्ण जबाबदारी गटविकास अधिकारी यांची असताना त्यांनी या कामी विलंब का लावला, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, शासन नियमानुसार निधी खर्च करणे ही जिल्हा परिषदेची जबाबदारी आहे. या प्रकरणी विहित वेळेमध्ये निधी खर्च न करू शकल्याने परत करण्यात आला आहे.

यावर समितीने विचारणा केली की, कामे न केल्यामुळे ग्रामपंचायतीला काही नोटीस देण्यात आली आहे का किंवा ग्रामपंचायतींनी यासाठी वाढीव मुदत मागितली होती का, याचा काही तरी रेकॉर्ड उपलब्ध असेल. जर असे नसेल तर गटविकास अधिकारी यांनी जाणुनबुजून चूक केलेली आहे. या प्रकरणी मागासवर्गीयांवर अन्याय झालेला आहे. दोन वर्षांच्या मुदतीत निधी खर्च होत नाही यापेक्षा दुर्दैव असू शकत नाही. मागासवर्गीयांसाठीच्या योजना उदात्त हेतूने राबविणे अपेक्षित असताना अधिकारी यामध्ये उदासिनता का दाखवित आहेत, यावर तत्कालिन गट विकास अधिकारी यांनी खुलासा केला की, हा निधी जिल्हा स्तरावरच असतो. कामांना मंजुरी दिल्यानंतर जसे काम पूर्ण होईल तसे पैसे दिले जातात. या कामांना ६ महिन्यांचीच मुदत असते.

यावर समितीने विचारणा केली की, असे असताना ६ महिन्यांमध्ये कामे का झाली नाहीत, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१२-१३ या वर्षात पाणी तसेच वाळू टंचाई होती. त्यामुळे त्या कालावधीमध्ये कामे होऊ शकली नाहीत. यावर समितीने नाराजी व्यक्त करत निदेश दिले की, वाळुची टंचाई किंवा पाण्याची टंचाई होती या उत्तरामध्ये काहीही तथ्य नाही. ही सर्व गटविकास अधिकारी यांची जबाबदारी आहे. मागासवर्गीय वस्ती विकसित करण्याकरिता मागासवर्गीयांचा निधी खर्च करण्यासाठी जिल्हा परिषदेने काहीही प्रयत्न केले नाहीत. जिल्हा परिषदेने १ कोटी ४० लाख रुपये परत पाठविले. मागासवर्गीयांच्या वस्तीवर अन्याय करण्याचे काम जिल्हा परिषदेने केले. त्यांच्या विकासाला खीळ बसविणे तसेच त्यांना विकासापासून वंचित ठेवण्याचे काम केलेले आहे. यावर तत्कालिन गटविकास अधिकारी यांनी खुलासा केला की, कामांना मंजुरी मिळाल्यानंतर ग्रामपंचायतीशी करारनामा करून कार्यारंभ आदेश देणे यासाठी कालावधी जातो.

यावर समितीने निदेश दिले की, कल्याणकारी योजना या मागासवर्गीय, आदिवासी, ओबीसी यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी राबविल्या जातात. विकास कामांपासून त्यांना वंचित ठेवणे या सर्व बाबी अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे झालेल्या आहेत असे समितीस सकृतदर्शनी दिसते. या सर्व बाबींची सखोल चौकशी करून तत्कालिन अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी आलेल्या निधीमधून रुपये १,४०,२५,०२३/- एवढी मोठया प्रमाणात रक्कम अखर्चित राहिल्यामुळे कल्याणकारी योजनांपासून मागासवर्गीय, आदिवासी, इतर मागासवर्गीय प्रवर्ग वंचित राहिल्या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन २०१०-२०११ मध्ये एकूण रक्कम रुपये ४,८९,५०,०००/- एवढी रक्कम सदर योजनेकरिता मंजूर होती. मागासवर्गीय कल्याणासाठी उपलब्ध निधीतून रक्कम रुपये १,४०,२५,०२३/- अखर्चित राहिलेबाबत सदर प्रकरणी चौकशी केली आहे. तीव्र पाणीटंचाई, वाळू उपलब्ध न होणे, ग्रा.पं. स्तरावर काही स्थानिक अडचणीमुळे कामे सुरु न होणे इ. बाबींमुळे तसेच अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा प्रत्यक्षात कमी रकमेत कामे पूर्ण झाल्याने त्या कामांची बचत झालेली रक्कम यामुळे एकूण रक्कम रुपये १,४०,२५,०२३/- अखर्चित राहिली आहे. सदर रक्कम शासनसदरी जमा करणेत आली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सोलापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, दलित वस्ती योजनेचे जे निकष आहेत त्यानुसार सन २०१०-२०११ मध्ये २१५ कामे घेतली होती. पैकी १८३ कामे पूर्ण झाली आणि ३२ कामे अपूर्ण राहिली. ५ कोटी १२ लाख रुपयांपैकी निविदेपेक्षा कमी ३८ लाख रुपयांची बचत झाली. या कामामध्ये ग्रामपंचायत स्तरावर काही ठिकाणी जागेची अडचण झाली. यामुळे १ कोटी १ लाख रुपये शिल्लक राहिले, असे १ कोटी १ लाख रुपये आणि सेव्हींगमधील ३८ लाख असे एकूण १ कोटी ३८ लाख रुपये सरकारला भरणा केलेत, हा बचत करण्यात आलेला पैसा आहे. काही काम स्थानिक जागेच्या अडचणीमुळे झालेली नाहीत. सन २०१०-२०११ मध्ये ३२ कामे रद्द झाली. जेव्हा काम मंजूर झाले तेव्हा स्थानिक लोकांनी संस्थेने कामे सुरु करण्यामध्ये विरोध केला होता. सन २०१०-२०११ चा हा प्रश्न आहे त्यामुळे हा मुद्दा वगळावा.

यावर समितीने मत व्यक्त केले की, २०१०-११ मध्ये जिल्ह्यात तीव्र पाणी टंचाई होती, वाळू उपसाचे टेंडर वेळेवर निघाले नाही. राज्याचा एकत्रित आराखडा तयार करावयाचा आहे. ग्रामपंचायत जी कामे घेते त्यांच्यासोबत जिल्हा परिषदेचा करार असतो का, वाळू उपसा निविदा निघाले तरच काम करु, अन्यथा करणार नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, या वर्षी जिल्हा परिषदेकडे ५२ कोटी रुपयांचा निधी दलित वस्तीमध्ये आलेला आहे. जिल्हा परिषदेने असे नियोजन केले आहे की, १ रुपया देखील शासन दरबारी परत जाणार नाही.

तद्नंतर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस दिलेले कारण संयुक्तिक आहे, कामे सुरु होऊ शकली नाहीत त्यामुळे जिल्हा परिषदेने निधी सरकारदरबारी जमा केला आहे. त्यात अफरातफर झालेली नाही.

यावर समितीने निदेश दिले की, मागासवर्गीयांच्या विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. शासनाने दिलेला निधी खर्च न होणे हे कठीण आहे. त्यामुळे सरकारच्या विरोधात ताशेरे ओढले जातात. म्हणूनच निधी खर्च झाला पाहिजे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यापुढे दक्षता घेण्यात येईल असे आश्वासन समितीस दिले.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, सोलापूरअंतर्गत दलित वस्ती सुधार योजना अनुदानाबाबत सन २०१२-२०१३ मध्ये समाजकल्याण विभागाने ४० कोटी रुपयांचे वित्त प्रेषणान्वये अनुदान वाटप करण्यात आलेले असून यासंदर्भात पुढीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

पंचायत समिती निहाय पूर्ण/अपूर्ण कामांचा निधीबाबत आढावा घेतलेला नाही. त्यामुळे सन २०१०-२०११ मधील अखर्चित अनुदान रुपये १,४०,२५,०३२/- व सन २०११-२०१२ अखेरचे रुपये ३,६१,९९,५६५/- अखर्चित आहे. अखर्चित अनुदान पुढील लगतच्या वर्षापर्यंत खर्च करावयाची अनुमती आहे. त्यामुळे रुपये १,४०,२५,०६२/- एवढी रक्कम शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ५ डिसेंबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार काम सुरु करण्यापूर्वी व तद्नंतर प्रत्यक्ष पूर्ण झालेल्या कामाचे मुल्यांकन करुन २५ टक्के, ५० टक्के व ७५ टक्के रक्कम अदा करावयाची असून काम पूर्ण झाल्यानंतर १०० टक्के काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र घेऊन उर्वरित निधी वर्ग करावयाचा असताना सदर विभागाकडून एकाच वेळी संपूर्ण निधी गटविकास अधिकारी यांना वर्ग करण्यात आलेला आहे. गटविकास अधिकारी यांच्याकडून मंजूर कामे व त्यावरील खर्चाचा अहवाल विहित नमुन्यात घेण्यात आलेला नाही. तसेच विभागाकडून पाठपुरावा केलेला नाही त्यामुळे झालेला खर्च व शिल्लक निधी यांचा मेळ घेता आला नाही. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १४ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार समाजकल्याण अधिकारी यांनी योजनेच्या कामावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेऊन कामाचा प्रगती अहवाल शासनास पाठविणे आवश्यक असताना तसा अहवाल शासनास पाठविण्यात आलेला नाही. तालुक्यातील अखर्चित रकमा शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपावर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशाच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, पाणीपुरवठा योजनेसाठी एक वर्षाचा कालावधी असतो. सदर प्रकरणी दोन वर्षांची मुदत असूनही निधी वापराविनाच परत गेला असून उक्त निधीचा वापर का करण्यात आला नाही याचे काहीही कारण नमूद करण्यात आलेले नाही. मागासवर्गीयांच्या वस्त्यांमध्ये विविध सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यामध्ये विविध योजना आखल्या जात आहेत व त्यासाठी शासनाद्वारे निधीची तरतुद देखील करण्यात येत आहे. असे असताना रुपये १ कोटी ४० लाख २५ हजार ३२ रुपयांचा निधी संबंधितांकडून परत जात असेल तर यामधून प्रशासनाची उदासिनता दिसून येत आहे. गटविकास अधिकारी यांच्या खात्यामध्ये पैसे जमा झाल्यानंतर निविदा प्रक्रिया करण्यात आली तसेच गटविकास अधिकारी यांनी करारनामा केला. सदर निधी खर्च करण्याची संपूर्ण जबाबदारी गटविकास अधिकारी यांची असताना त्यांनी या कामी विलंब केला आहे. त्यामुळे प्रकरण अतिशय गंभीर असून समिती याप्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

सन २०१०-२०११ मध्ये समाज कल्याण विभागाने २१५ कामे घेतली होती, पैकी १८३ कामे पूर्ण झाली आणि ३२ कामे अपूर्ण राहिली. रुपये ५ कोटी १२ लाखांपैकी निविदेपेक्षा ३८ लाख रुपयांची बचत झाली. ग्रामपंचायतस्तरावर जागेच्या अडचणीमुळे रुपये १ कोटी १ लाख शिल्लक राहिले असे एकूण १ कोटी ३८ लाख रुपये शासनाकडे भरणा केले आहेत. तथापि, सन २०१२-२०१३ या वर्षात प्रस्तुत प्रकरणी ६ महिन्यांमध्ये कामे पूर्ण न होण्याची कारणे पाणी तसेच वाळू टंचाई असल्यामुळे होऊ शकली नाहीत. या उत्तरामध्ये काहीही तथ्य नसून प्रशासकीय अधिकाऱ्यांत निधी वापरण्याबाबत प्रचंड उदासिनता असल्यामुळे समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. मागासवर्गीय वस्ती विकसित करण्याकरीता मागासवर्गीयांचा निधी खर्च करण्यासाठी जिल्हा परिषदेने काहीही प्रयत्न केले नाहीत. जिल्हा परिषदेने रुपये १ कोटी ४० लाख एवढी रक्कम परत पाठविली. मागासवर्गीयांच्या वस्तींमध्ये विविध योजना राबविण्यामध्ये अन्याय करण्याचे काम जिल्हा परिषदेने केले. परिणामी तेथील विकासाला खीळ बसविणे तसेच मागासवर्गीयांना विकासापासून वंचित ठेवण्याचे काम जिल्हा परिषदेकडून झालेले आहे.

**एकीकडे दलित वस्त्यांना मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता शासनाने दलित वस्ती सुधारणा योजना सन १९७२ पासून सुरु केली असतानाही अद्यापपर्यंत मुख्य वस्तीतील सोयी-सुविधांच्या बरोबरीने मागासवर्गीयांच्या वस्त्यांना या पायाभूत सुविधांपासून निधी उपलब्ध असूनही तो खर्च होत नसल्यामुळे वंचित रहावे लागत आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार दलित वस्तीमध्ये कामे मंजूर करताना प्राधान्याने पाणीपुरवठा, मलनिःस्सारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते, विजपुरवठा व समाजमंदीर अशी कामे घेण्यात यावी असे निर्देश दिले आहेत. या योजनेसाठी दरवर्षी राज्यस्तरावर वितरीत होणाऱ्या निधीचे प्रमाण मोठे असले तरी प्रत्यक्षात हा निधी पूर्णतः खर्च करण्यात येत नाही असे प्रकर्षाने आढळून येते. त्यामुळे शासन राबवित असलेल्या योजनांवर वेळीच निधी खर्च होत नसल्यामुळे त्याचा संबंधित समुह लाभार्थ्यांना लाभ होत नाही व पर्यायाने त्या योजनांची फलश्रृती होत नाही. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे योजना राबविण्यास विलंब झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. या सर्व बाबींची सखोल चौकशी करुन तत्कालिन सर्व संबंधित अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावी तसेच यापुढील काळात या लेखाशिर्षाअंतर्गत केलेल्या निधीच्या तरतुदीचा खर्च काटेकोरपणे करुन योजनांची अंमलबजावणी नियमानुसार पार पाडावी व याबाबत सर्व संबंधितांना कडक सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**प्रकरण सात**

**जिल्हा परिषद, सोलापूर**

**ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना जिल्हा परिषद सेस फंडातून देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाबाबत**

**परिच्छेद क्रमांक ३.९७७ (२) (सन २०१२-१३)**

**ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक (मोबाईल दुरुस्ती) चे प्रशिक्षण देणे :—**

महिला व बालकल्याण विभागाने जिल्हा परिषद सेस फंडातून ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक (मोबाईल दुरुस्ती) चे प्रशिक्षणाकरीता रक्कम रुपये ९,१०,९८०/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) सदर प्रशिक्षणासाठीच्या मंजूर आदेशातील अट क्रमांक १३ अन्वये कमीत कमी ४० लाभार्थी व जास्तीत जास्त लाभार्थी निवड करणे आवश्यक असताना बालविकास प्रकल्प अधिकारी अक्कलकोट यांनी सादर केलेल्या हजेरी पत्रकानुसार ५२ प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणास हजर आहेत व एका प्रशिक्षणार्थीस दुबार लाभ दिला आहे. दुबार लाभाची रक्कम रुपये १,८९०/- वसुल करणे आवश्यक आहे.

(२) मंजूरी आदेशातील अट क्र.२ नुसार अनुदान प्रदान करतांना लाभार्थ्याचे वय १८ ते ४५ वर्षे वयोगटातील असावे असे असताना बार्शी तालुका लाभार्थी यादीतील अ.क्र.२, ४, १०, १२, १६ वरील ५ लाभार्थ्यांचे वय १५ वर्षे आहे. त्यामुळे प्रति लाभार्थी प्रदान अनुदानाची रक्कम १,८९०/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये ९,४५०/- वसुल करणे आवश्यक आहे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचे पत्र क्र. जिपसो/मबाक/ योजना/८७४/१२ दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२ अन्वये प्रशिक्षण १८० तासांचे देणे आवश्यक असताना दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप येथे प्रशिक्षण १८० तासांऐवजी १६८ तास देण्यात आले आहे. त्यामुळे सदरचे प्रशिक्षण दर्जेदार झाले नाही.

(४) मंजूरी आदेशातील अट क्र.१ नुसार ३% लाभार्थ्याची निवड करणेत आली नाही.

(५) मंजूरी आदेशातील अट क्र.५ नुसार लाभार्थी दारिद्रयरेषेखालील असल्याबाबत अथवा उत्पन्न रक्कम रुपये २५,०००/- असलेबाबतचे दाखले घेण्यात आलेले नाहीत.

(६) मंजूर आदेशातील अट क्र.१५ नुसार प्रशिक्षण सुरु झाल्याचा अहवाल संस्थेने जिल्हा परिषदेकडे पाठविलेचे दिसून येत नाही.

(७) मंजूर आदेशातील अट क्र.११ नुसार प्रशिक्षण पूर्ण झालेबाबतचे प्रशस्तीपत्र लाभार्थ्यांना दिलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सदर प्रशिक्षणांच्या मंजूर आदेशातील अट क्र.१३ अन्वये कमीत कमी ४० व जास्तीत जास्त ५० लाभार्थी निवड करणे आवश्यक असतांना बालविकास प्रकल्प अधिकारी, अक्कलकोट यांनी सादर केलेल्या हजेरी पत्रकानुसार लाभार्थी निवड करणे आवश्यक असतांना बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी ५२ प्रशिक्षणार्थी हजर दाखविले आहे. नजरचुकीने एका लाभार्थ्यास दुबार लाभ देण्यात आला आहे त्याची वसुली करीत आहोत.

(२) लाभार्थीचे वय १६ ते ४५ वर्षे वयोगटातील असावे असे असताना बार्शी तालुका लाभार्थी यादीतील ५ लाभार्थीचे वय हे १६ वर्षे असून त्याची रक्कम वसुल करणेची कार्यवाही चालू आहे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचे पत्र क्र. जिपसो/मबाक/ योजना/८७४/१२ दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२ अन्वये सदर संस्थेने मौजे मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर येथे मोबाईल दुरुस्तीचे प्रशिक्षण दररोज ११:०० ते ०६:०० या वेळेत प्रति दिवस ७ तास याप्रमाणे ३० दिवस प्रशिक्षण (२१० तास एकूण) याप्रमाणे प्रशिक्षण दिले आहे. सोबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा आदेश व प्रशिक्षण कालावधी दर्शनिय तक्ता जोडला आहे.

(४) मंजूर आदेशातील अट क्रमांक १ नुसार ३% लाभार्थीची निवड करणेसाठी प्रयत्न करुनही अपंग लाभार्थी मिळाले नाहीत.

(५) मंजूरी आदेशातील अट क्र. ५ नुसार लाभार्थी दारिद्रयरेषेखालील असल्याबाबत अथवा उत्पन्न रक्कम रुपये २५,००० असलेबाबतचे दाखले घेण्यात आलेले असून दप्तरी उपलब्ध आहे.

(६) मंजूर आदेशातील अट क्र.१५ नुसार प्रशिक्षण सुरु झाल्याचा अहवाल संस्थेने जिल्हा परिषदेकडे पाठविणेत आलेला आहे. दप्तरी उपलब्ध आहे.

(७) मंजूर आदेशातील अट क्र.११ नुसार प्रशिक्षण पूर्ण झालेबाबतचे प्रशस्तीपत्रक लाभार्थ्यांना दिलेले आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.९७८ (३) (सन २०१२-१३)**

**ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक (ब्युटीपार्लर) चे प्रशिक्षण देणे :-**

महिला व बालकल्याण विभागाने जिल्हा परिषद सेस फंडातून ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक (ब्युटीपार्लर) चे प्रशिक्षणाकरीता एकूण रक्कम रुपये १९,९९,२००/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :–

(१) प्रशिक्षण संस्थेसोबतच्या करारपत्रावर करार करुन घेणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव स्वाक्षरी नाही.

(२) प्रशिक्षणाचा लाभ ४०० प्रशिक्षणार्थीनी घेतला असताना देयक ४०८ प्रशिक्षणार्थीचे देण्यात आले आहे. तरी ८ प्रशिक्षणार्थीची रक्कम रुपये १९,६००/- वसुल करणे आवश्यक आहे.

(३) मंजूरी आदेशातील अट क्र.१ नुसार ३% अपंग लाभार्थी निवड करणेत आली नाही.

(४) मंजूरी आदेशातील अट क्र.५ नुसार लाभार्थी दारिद्रयरेषेखालील असल्याबाबत अथवा उत्पन्न रक्कम रुपये २५,०००/- असलेबाबतचे दाखले घेण्यात आलेले नाहीत.

(५) मंजूर आदेशातील अट क्र.३ नुसार लाभार्थी किमान ६ वी पास असणे आवश्यक असताना कुर्डूवाडी तालुक्यातील मंजूर यादीतील अ.क्र.१५ वरील एक प्रशिक्षणार्थी ६ वी पास आहे. त्यामुळे सदर अपात्र प्रशिक्षणार्थीकडून रक्कम रुपये २४५० वसुल करणे आवश्यक आहे.

(६) पंढरपूर व उत्तर सोलापूर तालुक्यातील प्रशिक्षणार्थीचे जन्म दिनांक, शिक्षण इत्यादी निवड यादीत नमुद नाही.

(७) मंजूर आदेशातील अट क्र.१५ नुसार प्रशिक्षण सुरु झाल्याचा अहवाल संस्थेने जिल्हा परिषदेकडे सादर केला नाही.

(८) मंजूर आदेशातील अट क्र.१२ नुसार १०% रक्कम इतर बाबीची खात्री करता राखून ठेवावी.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) प्रशिक्षण संस्थेसोबतच्या करारपत्रावर करार करुन घेणाऱ्या अधिकाऱ्यांचे स्वाक्षरी करणेत आली असून दप्तरी उपलब्ध आहे.

(२) आदेश जा.क्र./जिपसो/मबाक/योजना/६९२/२०११ दिनांक ८ डिसेंबर, २०११ अन्वये मंजूर लाभार्थी संख्या ४०८ असून त्याचप्रमाणे देयक अदा करण्यात आले आहे. यादी दप्तरी उपलब्ध आहे.

(३) मंजूरी आदेशातील अट क्र.१ नुसार ३% अपंगासाठी प्रयत्न करुन ही अपंग लाभार्थी मिळाले नाहीत.

(४) मंजूरी आदेशातील अट क्रमांक ५ नुसार लाभार्थी दारिद्रय रेषेखालील असल्याबाबत अथवा उत्पन्न रक्कम रुपये २५,००० असलेबाबतचे दाखले घेण्यात आलेले आहेत. दप्तरी उपलब्ध आहे.

(५) मंजूर आदेशातील अट क्र.३ नुसार लाभार्थी किमान ७ वी पास असणे आवश्यक असतांना कुर्डूवाडी तालुक्यातील मंजूर यादीतील अ.क्र.१५ एक प्रशिक्षणार्थीची रक्कम वसुल करणेची कार्यवाही करीत आहे.

(६) पंढरपूर व उत्तर सोलापूर तालुक्यातील प्रशिक्षणार्थीचे जन्म दिनांक, शिक्षण इत्यादी निवड यादीत नमुद नाही. यापुढे नमूद करण्याची दक्षता घेत आहोत.

(७) मंजूर आदेशातील अट क्र.१५ नुसार प्रशिक्षण सुरु झाल्याचा अहवाल संस्थेने जिल्हा परिषदेकडे सादर केलेला असून दप्तरी उपलब्ध आहे.

(८) मंजूर आदेशातील अट क्र.१२ नुसार १०% रक्कम इतर बाबीची खात्री करुनच अदा करण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.९७९ (४) (सन २०१२-१३)**

**मंजूर साहित्याशिवाय अन्य साहित्ये (कपाटे) खरेदीबाबत :-**

महिला व बालकल्याण विभागाने जिल्हा परिषद सेस फंडातून अंगणवाड्यांना कपाटे पुरविणेकरीता रक्कम रुपये ११,०३,२००/- खर्च केलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१०/अनौसंक्र/३३/प्रक्र १६८/परा-१ दिनांक १० मार्च, २०११ **(परिशिष्ट ७.१)** अन्वये अंगणवाडी/बालवाडी साहित्य पुरविणे यामध्ये वजनकाटे व जलशुद्धीकरण यंत्राचा समावेश आहे. तथापि, जिल्हा परिषदेने स्टील कपाटे खरेदी करण्यात आलेली आहेत. त्यामुळे सदर खरेदीची संपूर्ण रक्कम रुपये ११,०३,२००/- वसुल करणे आवश्यक आहे.

(२) पुरवठा आदेशातील करमाळा, माळशिरस, अक्कलकोट व अकलुज या बीटांना एकाही कपाटाचा पुरवठा करणेत आलेला नाही.

(३) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०००/प्रक्र १४/कोषा-४ दिनांक ११ फेब्रुवारी, २००० **(परिशिष्ट ७.२)** नुसार १५ फेब्रुवारी नंतर खरेदी करण्यात येवू नये असे आदेश असताना पुरवठा आदेश दिनांक १ मार्च, २०१३ रोजी दिलेला आहे.

(४) तालुकास्तरावरुन अंगणवाड्यांची स्टील कपाटे मागणीपत्रक घेण्यात आलेली नाहीत.

(५) सदर साहित्याचा तपासणी अहवाल दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी घेण्यात आला आहे. तथापि, ठेकेदाराने दिनांक १२ मार्च, २०१३ ते दिनांक १५ मार्च, २०१३ या कालावधीत तपासणी अहवाल येण्यापूर्वीच मालाचा पुरवठा केलेला आहे.

(६) महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, सोलापूर यांची रक्कम मिळाल्याची पोहोच पावती घेण्यात आलेली नाही.

(७) प्रशासकीय मान्यतेनुसार कपाटे पुरवठा केलेल्या अंगणवाड्या या स्वतःच्या व बंदिस्त असलेबाबत तालुका बालविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) संदर्भीय शासन निर्णयामध्ये अंगणवाडी साहित्य पुरविणे मध्ये वजनकाटे व जलशुद्धीकरण यंत्राचा समावेश आहे. तथापि, वजनकाटे व जलशुद्धीकरण यंत्रे अंगणवाड्यांना यापूर्वी पुरविणेत आले असून अंगणवाड्यांना रजिस्टर्स व आवश्यक साहित्य ठेवणेसाठी कपाटाची अत्यंत आवश्यकता असेलेने महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ ठराव क्रमांक ३१ अन्वये अंगणवाड्यांना विविध साहित्य पुरवठा करणे अंतर्गत स्टील कपाटे पुरविण्याचा निर्णय घेतला त्यानुसार अंगणवाड्यांना स्टील कपाटांचा पुरवठा करणेत आलेला आहे.

(२) प्रथम पुरवठा आदेशानुसार १२ प्रकल्पातील २८० अंगणवाड्यांना स्टील कपाटांचा पुरवठा करणेत आला असून दुसऱ्या पुरवठा आदेशानुसार एकूण १०० अंगणवाड्यांना स्टील कपाटांचा पुरवठा करणेत आला असून आदेशामध्ये नमुद केलेप्रमाणे करमाळा-२२, माळशिरस-२६, अक्कलकोट-२६ व अकलुज-२६ प्रमाणे पुरवठा करणेत आला आहे.

(३) सदर योजनेकरीता दिनांक १७ नोव्हेंबर, २०१२ रोजी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेवून महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित, सोलापूर यांना दिनांक १७ डिसेंबर, २०१२ रोजी दरकरार सुची मिळणेबाबत कळविणेत आले होते. परंतू महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित, सोलापूर यांच्याकडून दिनांक ५ फेब्रुवारी, २०१३ रोजी दर कराराची सूचि प्राप्त झालेने विभागाने दिनांक २० फेब्रुवारी, २०१३ रोजी पुरवठा देण्याची कार्यवाही केली आहे. सोबत पुरवठा आदेशाची प्रत व तांत्रिक, प्रशासकीय मान्यतेची प्रत जोडली आहे.

(४) ज्या अंगणवाड्यांना कार्यालयीन कामकाजासाठी कपाटे नाहीत अशाच अंगणवाड्यांना स्टील कपाटे पुरविण्यात यावे अशाच सुचना महिला व बालकल्याण समितीने संबंधित बालविकास प्रकल्प अधिकारी यांना देण्यात आल्या होत्या. त्यानुसारच खरेदी करण्यात आलेली आहे.

(५) शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर यांचे पत्र क्र.GPS/MEC/MSSIDC/INCP/८३ व ८४ दिनांक २१ मार्च, २०१३ अन्वये २८० नग स्टील कपाटांचा तपासणी अहवाल दिलेला आहे. ठेकेदाराने दिनांक १२ मार्च, २०१३ ते दिनांक १५ मार्च, २०१३ या कालावधीत डिलीव्हरी चलन क्र.३०१४ ते ३०२४ अन्वये स्टील कपाटांचा पुरवठा त्या त्या तालुक्यांना केला आहे. शासकीय तंत्रनिकेतन उस्मानाबाद Govt.ply/insp/furniture/No/८७८३ दिनांक २० मार्च, २०१७ अन्वये १०० नगाचा पुरवठा केलेला आहे. तथापि, तपासणी अहवाल प्राप्त झालेनंतरच देयक अदा करणेविषयी कार्यवाही करणेत आली आहे.

(६) महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, सोलापूर यांची रक्कम मिळाल्याची पोहोच पावती दप्तरी उपलब्ध आहे.

(७) जिल्ह्यातील एकूण ४,००० अंगणवाड्यांपैकी उत्कृष्ट व स्वतःच्या / बदीस्त असलेल्या ३८० अंगणवाड्यांना स्टील कपाटांचा पुरवठा करणेत आला आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.९८० (५) (सन २०१२-१३)**

**ग्रामीण भागातील महिला इयत्ता ५ वी ते १० वी च्या मुलींना ज्युडो कराटे प्रशिक्षण देणेबाबत :-**

उपरोक्त योजनेवर जिल्हा परिषदेने सेस फंडातून मुलींना ज्युडो कराटे प्रशिक्षण देणेकरीता रक्कम रुपये ९,०९,९००/- खर्च केलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१०/अनौसंक्र/३३/ प्र.क्र.१६८/पंरा-१ दिनांक १० मार्च, २०११ अन्वये प्रशिक्षणाचा कालावधी किमान ३ महिने असणे आवश्यक असताना ३० दिवसात प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशिक्षणाचा कालावधी किमान ३ महिने असणे आवश्यक असताना ३० दिवसात प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे प्रशिक्षण दर्जात्मक स्वरुपाचे झालेले नाही.

(२) २,७९४ लाभार्थी प्रशिक्षणाचा लाभ घेतला असताना ३,०३३ लाभार्थ्यांचे देयक अदा केले आहे. त्यामुळे जादा लाभार्थी रक्कम रुपये ७१,७००/- वसुल करणे आवश्यक आहे.

(३) लाभार्थी निवड प्रशिक्षणाचे ठिकाण महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी ठरविणे आवश्यक असताना समितीकडून लाभार्थी निवड व प्रशिक्षण ठिकाण ठरवून घेण्यात आलेले नाही.

(४) बार्शी तालुक्यातील वैराग केंद्रातील १७३ विद्यार्थ्यांची उपस्थिती पत्रके नाहीत.

(५) करमाळा तालुक्यातील टाकळी (रा.) येथे विद्यार्थ्यांना केवळ २३ दिवस प्रशिक्षण दिले आहे. तसेच करमाळा तालुक्यातील जेऊन येथील प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिल्याची कागदपत्रे नाहीत.

(६) कुर्डूवाडी तालुक्यातील मोडनिंब, मोहोळ तालुक्यातील अनगर व शेटफळ, पंढरपूर तालुक्यातील कासेगांव, करंकंब येथील लाभार्थी यांचे इयत्तेचा उल्लेख केलेला नाही.

(७) सर्व तालुक्यामध्ये प्रशिक्षण किती तास चालले यांचा उल्लेख केलेला नाही.

(८) प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाचे प्रशस्तीपत्रक वाटप करण्यात आलेले नाही.

(९) प्रशिक्षण सुरु झाल्याचा अहवाल संस्थेने देणे आवश्यक असताना प्रशिक्षण सुरु झाल्याचा अहवाल दिलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) जा.क्र./जिपसो/मबाक/योजना/१७८/२०१३ दिनांक १६ फेब्रुवारी, २०१३ अन्वये सुट्टीचे ३० दिवस सोडून दिनांक २५ फेब्रुवारी, २०१३ ते दिनांक २५ मार्च, २०१३ अखेर रोज दोन तासाप्रमाणे प्रशिक्षणाचे आयोजन करून प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. शासन निर्णय दिनांक १० मार्च, २०११ सोबत संलग्न केले आहे.

(२) ग्रामीण भागातील मुलींना ११ तालुक्यामध्ये दिलेल्या आदेशात दिलेल्या आकडेवारीप्रमाणे मंजूर लाभार्थी ३,३३३ पैकी ३,०३३ लाभार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले असल्याने तेवढ्याच लाभार्थ्यांचे देयक अदा करण्यात आले आहे.

(३) ग्रामीण भागातील मुलींना ११ तालुक्यामध्ये दिलेल्या आकडेवारी नुसार प्रत्येक ग्रामीण भागामधील शाळा व हायस्कुल मधील इयत्ता ५ वी ते १० वी च्या मुलींना जावून प्रशिक्षण दिलेले असल्याने ठिकाण व लाभार्थी संख्या ठरवूनच प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

(४) बार्शी तालुक्यातील वैराग केंद्रातील १७३ विद्यार्थ्यांचे उपस्थिती पत्रके दप्तरी उपलब्ध आहे.

(५) करमाळा तालुक्यातील टाकळी (रा) येथील प्रशिक्षण संस्थेने कागदपत्रे न दिलेने त्यांचे देयक अदा करण्यात आले नाही.

(६) कुर्डूवाडी तालुक्यातील मोडनिंब, मोहोळ तालुक्यातील अनगर व शेटफळ पंढरपूर तालुक्यातील कासेगांव, करंकंब येथील लाभार्थी यांचे इयत्तेचा उल्लेख केलेला नाही. यापुढे करणेची दक्षता घेत आहोत.

(७) जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये आदेशात नेमून दिलेल्या रोज दोन तासाप्रमाणे प्रशिक्षण दिलेले आहे.

(८) प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाचे प्रशस्तीपत्रक वाटप करण्यात आलेले आहे.

(९) प्रशिक्षण सुरू झाल्याचा अहवाल संस्थेने दिलेला असून तो दप्तरी उपलब्ध आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.९८१ (६) (सन २०१२-१३)**

**ग्रामीण भागातील मुलींना (ब्युटीपार्लर) प्रशिक्षण देणेबाबत :-**

महिला व बालकल्याण विभागाने जिल्हा परिषद सेस फंडातून ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक (ब्युटीपार्लर) चे प्रशिक्षणाकरीता रक्कम रुपये १३,९८,२५०/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) लाभार्थी निवडीच्या अटी व शर्तीनुसार जन्म तारखेचा दाखला, रहिवाशी दाखला, शैक्षणिक पात्रता, जातीचे दाखले दारिद्रय रेषेखालील पुरावा, अपंग लाभार्थी दाखले व उत्पन्नाचे दाखले घेवून योग्य लाभार्थ्यांस लाभ देणे आवश्यक असताना वरील कागदपत्रे घेण्यात आलेली नाहीत.

(२) मंजूर आदेशातील अट क्रमांक १ नुसार ३% लाभार्थीची निवड करणेत आली नाही.

(३) ब्युटी पार्लर प्रशिक्षण वर्गाचा कालावधी नमुद केलेला नाही.

(४) प्रशिक्षण कालावधीमध्ये जिल्हा परिषद अधिकारी यांनी प्रशिक्षण वर्गास पर्यवेक्षक म्हणून भेट दिलेली नाही.

(५) प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थीचे हजेरीपट महिला व बालकल्याण विभागाकडे जमा केलेले नाही.

६) प्रत्यक्षात ५७२ लाभार्थीनी लाभ घेतला असताना एकूण ५९५ लाभार्थींचे देयक अदा केले आहे. तरी प्रति लाभार्थी २,३५० प्रमाणे एकूण ५४,०५०/- चे जादा प्रदान रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

(७) प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशस्तीपत्र देणे आवश्यक असताना प्रशस्तीपत्र देण्यात आलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) ग्रामीण भागातील महिला/मुलींना तांत्रिक व व्यावसायिक (ब्युटीपार्लर) प्रशिक्षण लाभार्थी निवडीच्या सर्व अटी शर्तीनुसार जन्म तारखेचा दाखला, रहिवाशी दाखला, शैक्षणिक पात्रता, जातीचे दाखले, दारिद्रय रेषेखालील पुरावा, अपंग लाभार्थी दाखले व उत्पन्नाचे दाखले घेवूनच लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे.

(२) मंजूरी आदेशातील अट क्र.१ नुसार ३% अपंगांसाठी प्रयत्न करुनही अपंग लाभार्थी मिळाले नाहीत.

(३) ब्युटी पार्लर प्रशिक्षण वर्गाचा कालावधी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१३ ते दिनांक २८ मार्च, २०१३ अखेर नमुद करुन आयोजन केलेले आहे.

(४) प्रशिक्षण कालावधीमध्ये जिल्हा परिषद अधिकारी यांनी प्रशिक्षण वर्गास भेट देऊन परिक्षण केलेले आहे.

(५) प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थीचे हजेरीपट महिला व बालकल्याण विभागाकडे जमा केलेले असून दप्तरी उपलब्ध आहे.

(६) जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये ५९५ लाभार्थी मंजूर असून त्या प्रमाणे देयक अदा करणेत आलेले आहे. त्यामुळे जादा लाभार्थी जादा वसुली वसुल करणेची आवश्यकता नाही. सोबत आदेशाची व देयकाची प्रत जोडली आहे.

(७) प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाचे प्रशस्तीपत्र वाटप करण्यात आलेले आहे. त्याची पोहोच दप्तरी उपलब्ध आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.९८२ (११) (सन २०१२-१३)**

**महिला लोकप्रतिनिधींचा अभ्यास दौरा :-**

जिल्हा परिषदेने सेस फंडातून महिला लोकप्रतिनिधींचा अभ्यास दौऱ्यासाठी रक्कम रुपये १,४७,६४१/- खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) अभ्यास दौरा प्रसिद्धीकरणामध्ये ठिकाण उस्मानाबाद, परभणी व वर्धा असे नोंद आहे. तथापि, रत्नागिरी, सिंधुदूर्ग व रायगड या ठिकाणी प्रवास दर्शविला आहे.

(२) दौऱ्यासाठी जेवण व नाष्टा पुरवठ्याचे ठिकाण प्रसिद्धीकरणात उस्मानाबाद, परभणी व वर्धा असे नोंद आहे. तथापि, रत्नागिरी, सिंधुदूर्ग व रायगड साठी कोणत्या आधारे जेवण, नाष्टा ठिकाण मान्य केले आहे.

(३) अभ्यास दौऱ्यासाठी निश्चितपणे किती महिला सदस्यांनी प्रवास केला याचा तपशील नाही.

(४) अभ्यास दौरा निवडीचे निकष, अटी व शर्ती समजून येत नाही.

(५) प्रवासासाठी एजन्सी ही मल्लिकार्जून ट्रॅव्हल्स यांचे दरपत्रकावर सही नाही. शासन मान्य वाहतूक परवाना, वाहनाची मालकी याबाबत कागदपत्रे नाहीत.

(६) आकांक्षा टूर्स या एजन्सीचा नोंदणी क्रमांक नाही.

(७) पुरवठ्याचे दर हे दिनांक ६ मार्च, २०१३ रोजी निश्चित झाले असताना राही टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांनी दिनांक ४ मार्च, २०१३ रोजी ई मेल कोणत्या आधारे पाठविला याचा खुलासा झालेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :-**

(१) महिला व बालकल्याण समितीने अभ्यास दौऱ्यासाठी उस्मानाबाद, परभणी व वर्धा ऐवजी रत्नागिरी, सिंधुदूर्ग व रायगड या जिल्ह्याच्या कामाच्या पाहणीसाठी निवड केली असून त्याप्रमाणे नोटीस बोर्डवर जाहीर प्रसिद्धी करुन दौरा आयोजित करणेत आलेला आहे. त्याची प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

(२) प्रत्यक्ष अभ्यास दौरा रत्नागिरी, सिंधुदूर्ग व रायगड या ठिकाणी केला असल्यामुळे तेथील जेवण व नाष्ट्याच्या पावत्या देयकासोबत जोडल्या असून मुळ देयकासोबत उपलब्ध आहे.

(३) अभ्यास दौऱ्यासाठी ४० जिल्हा परिषद महिला सदस्यांनी प्रवास केला असून त्याचा तपशिल दप्तरी उपलब्ध आहे.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील दिनांक १० मार्च, २०११ मध्ये नमूद केलेप्रमाणे महिला व बालविकासाचे उपक्रम, पंचायत राज आदर्श गाव, निर्मलग्राम, महिला बळकटीकरण इत्यादी बाबतच्या अभ्यासासाठी महिला लोकप्रतिनिधी अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत निकष आहे. त्याप्रमाणे सदर अभ्यास दौरा आयोजित केला आहे.

(५) मल्लिकार्जून ट्रॅव्हल्स या प्रवास एजन्सीची दरपत्रकावर स्वाक्षरी असून शासन मान्य वाहतूक परवाना व वाहनाची मालकी याची खात्री करुनच पुरवठा आदेश निर्गमित केला आहे.

(६) सदर एजन्सीचा नोंदणी क्रमांक उपलब्ध आहे.

(७) दरपत्रके दिनांक ६ मार्च, २०१३ अखेर दुपारी ०२-०० वाजेपर्यंत मागविणेत आली होती. त्या अनुषंगाने राही टूर्स ॲड ट्रॅव्हल्स यांनी दिनांक ४ मार्च, २०१३ रोजी ई-मेलद्वारे दरपत्रके सादर केली आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.९८३ (१३) (सन २०१२-१३)**

**किशोरी / महिलांना जेंडर, आरोग्य कुटुंब नियोजन प्रशिक्षणाबाबत :-**

किशोरी / महिलांना जेंडर / आरोग्य कुटुंब नियोजन प्रशिक्षणासाठी खर्च रक्कम रुपये ७,७०,०००/- केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) प्रशिक्षणासाठी फाईल्स पुरवठा प्रसिद्धीकरण सदोष आहे. प्रसिद्धीकरणात फाईल्सचा आकार, प्रकार कव्हर, कागद याचा उल्लेख नाही. प्रसिद्धीकरणात नोंदणीकृत पुरवठादार बाबत अट घातली नाही.

(२) फाईल वाटप केल्याबाबत पोहोच नाहीत.

(३) फाईल वाटप केल्याबाबतचा गोषवाऱ्या वरील स्वाक्षरी मध्ये फरक आहे.

(४) प्रसिद्धीकरण वर्तमानपत्रामध्ये केलेले नाही.

(५) मेळाव्यासाठी किती महिला, किशोरी यांना लाभ द्यावयाचा होता. निकष कोणते याचा उल्लेख नाही.

(६) वरील सर्व त्रुटी योजनेची फलनिष्पत्ती झालेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) दिनांक २६ नोव्हेंबर, २०१२ अन्वये जाहीर प्रसिद्धीकरण करण्यात आलेले आहे. त्यामध्ये फाईल्स कशा प्रकारच्या पुरविण्यात आलेल्या आहेत. याबाबत जाहीर प्रसिद्धीकरणामध्ये नमूद करण्यात आलेले आहेत. सोबत प्रसिद्धीपत्रक जोडले असून त्यानुसार पुरवठा केलेला आहे.

(२) एकूण १६ प्रकल्पांना ४१०० फाईल्स पुरविणेत आलेले असून त्याची पोहोच दप्तरी उपलब्ध आहे.

(३) फाईल्स वाटप गोषवारा नस्तीमध्ये स्वाक्षरी पृष्ठ क्रमांक ३७ व ३८ वर घेणेत आली असून स्वाक्षरीमध्ये कोणताही फरक नाही. सही प्रकल्प अधिकारी त्यांचे प्रतिनिधीची आहे.

(४) रक्कम रुपये ५०,०००/- च्या आतील रकमेचे निविदा असलेने शासनाच्या परिपत्रकानुसार सदरची निविदा जिल्हा परिषदेच्या आवारातील महिला व बालकल्याण विभागाच्या नोटीस बोर्डवर जाहीर प्रसिद्धी देऊन नोंदणीकृत संस्थेकडून निविदा मागविणेत आलेली होती. सदरची संस्था नोंदणीकृत पुरवठादार असल्याची खात्री करुनच निविदा मंजूर करण्यात आलेली आहे.

(५) जास्तीत जास्त महिला व किशोरी यांना लाभ देण्यासाठीची योजना असलेने किती लाभार्थ्यांना त्याचा लाभ द्यावा याबाबत संख्येचे बंधन नाही.

(६) किशोरी / महिलांना जेंडर, आरोग्य व कुटुंबनियोजन प्रशिक्षणातून आरोग्य व कुटुंब नियोजनाचे महत्व, आहाराचे महत्व, कुपोषण निर्मूलन, स्त्री-भ्रूण हत्या व बालविवाह याबाबत जागृती करणेत आलेली आहे. किशोरी मुली व महिलांना त्याचा फायदा झालेला आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.९८४ (१४) (सन २०१२-१३)**

**महिला व बालकल्याण विभाग शिल्लक साहित्यावरील रक्कमा बाबत :-**

पंचायत समिती, कुर्डूवाडी कडे शिल्लक साहित्याअभावी रक्कम रुपये ८,६७,२१०/- गुंतून राहिलेले आहेत. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र.पंरास/१०९६/ प्र.क्र./झेडपीए/२००८ प्रक्र.४४६/वित्त-९, दिनांक २० जून, २००८ अन्वये लाभार्थी निवडीची प्रक्रिया पूर्ण करून ज्या वित्तीय वर्षात साहित्याचे वाटप करणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समिती, कुर्डूवाडी यांचेकडे वित्तीय वर्षे संपूनही प्राप्त झालेल्या ९० लेडीज सायकली पैकी ४२ लेडीज सायकली व पल्व्हरायझर मशिन पैकी ११ पल्व्हरायझर मशिन वाटप करणे बाकी होते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र.पंरास/१०९६/ प्र.क्र.१७८/२००५, दिनांक ९ ऑक्टोबर, १९९७ व महाराष्ट्र शासन व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए/२००८ प्र.क्र.४४६/वित्त-१, दिनांक २० जून, २००८ नुसार लाभार्थी निवडीची प्रक्रिया पूर्ण करून सन २०१२-१३ मध्ये प्राप्त झालेल्या ९० लेडीज सायकलीपैकी ४२ लेडीज सायकली व ३० पल्व्हरायझर मशिनपैकी ११ पल्व्हरायझर मशिनचे लाभार्थ्यांकडून वेळेवर कागदपत्राची पुर्तता न झालेने पुढील आर्थिक वर्षामध्ये सन २०१३-१४ मध्ये शिल्लक साहित्याचे वाटप केलेले आहे. सोबत साठा नोंद वहीची छायांकित प्रत सादर केली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.९८५ (१५) (सन २०१२-१३)**

**जिल्हा परिषद सेस महिला व बालकल्याण योजनेतील साहित्य विनावाटप शिल्लक असलेबाबत :-**

पंचायत समिती, मंगळवेढाकडे शिल्लक साहित्याअभावी रक्कम रुपये १,१३,४४०/- गुंतून राहिलेले आहेत. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र.पंरास/१०९६/ प्र.क्र./ १७८/०५, दिनांक ९ ऑक्टोबर, १९९७ व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक झेडपीए/२००८/प्र.क्र./२००८/प्र.क्र./४४६/वित्त-९, दिनांक २० जून, २००८ अन्वये लाभार्थी निवडीची प्रक्रिया पूर्ण करून ज्या वित्तीय वर्षात खरेदी केली आहे त्याच वित्तीय वर्षात साहित्याचे वाटप होणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समिती, मंगळवेढा यांचेकडे वित्तीय वर्ष संपूनही प्राप्त झालेल्या सायकलीपैकी ०८ लेडीज सायकली व प्राप्त पल्व्हरायजरपैकी ०४ वाटप करणे बाकी होते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सन २०१२-१३ मध्ये जिल्हा परिषद सेस अंतर्गत या गटास महिला व बालकल्याण विभागामार्फत एकूण ५३ सायकली मंजूर झालेल्या आहेत. लेखा आक्षेपात नमुद केलेप्रमाणे लेखापरिक्षण कालावधीपर्यंत ४५ सायकलीचे वाटप झालेले होते व ८ सायकली शिल्लक होत्या. शिल्लक

८ सायकली लाभार्थीकडून वेळेवर कागदपत्रांची पूर्तता न झालेमुळे शिल्लक राहिलेल्या आहेत. त्या सर्व सायकलींचे वाटप झालेले आहे. सोबत साठा नोंदवही छायांकित सत्य प्रत जोडलेली आहे.

सन २०१२-१३ मध्ये जिल्हा परिषद सेस अंतर्गत या गटास महिला व बालकल्याण विभागामार्फत एकूण २० पल्व्हरायजर मंजूर झालेल्या होत्या. लेखा आक्षेपात नमूद केलेप्रमाणे लेखापरिक्षण कालावधीपर्यंत १६ पल्व्हरायजर वाटप केलेले आहे. सोबत साठा नोंदवही छायांकित सत्यप्रत जोडलेली आहे. लेखा आक्षेपात नमूद केलेप्रमाणे शिल्लक असलेल्या साहित्याचे वाटप झालेले आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.९८६ (१८) (सन २०१२-१३)**

**महिला व बालकल्याण विभागाकडून जिल्हा परिषद सेस योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या साहित्याबाबत :-**

पंचायत समिती, उत्तर सोलापूरकडे शिल्लक साहित्याअभावी रक्कम रुपये १,१९,७३०/- गुंतून राहिलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र.पंरास/१०९६/प्र.क्र./१७८/०५, दिनांक ९ ऑक्टोबर, १९९७ व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए /२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९ दिनांक २० जून, २००८ अन्वये लाभार्थी निवडीची प्रक्रिया पूर्ण करुन ज्या वित्तीय वर्षात खरेदी केली आहे. त्याच वित्तीय वर्षात साहित्याचे वाटप होणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समिती, उत्तर सोलापूर यांचेकडे वित्तीय वर्ष संपूनही प्राप्त झालेल्या ६६ लेडीज सायकलीपैकी ०४ लेडीज सायकली व प्राप्त ०९ पल्व्हरायझर पैकी ०५ पल्व्हरायझर वाटप करणे बाकी होते, तसेच प्राप्त झालेल्या १७ लेडीज सायकली (विशेष घटक योजना) पैकी ०१ लेडीज सायकल व प्राप्त झालेल्या ३० लेडीज सायकली (सर्वसाधारण) पैकी ०६ लेडीज सायकल वाटप करणे बाकी होते.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा परिषद सेस अंतर्गत महिला व बालकल्याण विभागामार्फत सायकल व पल्व्हरायझर मशिन मंजूर व वाटप तक्ता खालीलप्रमाणे दर्शविणेत आला आहे व त्या वर्षाचे शिल्लक साहित्य हे लाभार्थ्यांकडून वेळेत कागदपत्रांची पूर्तता न झाल्याने शिल्लक राहिले होते ते साहित्य पुढील आर्थिक वर्षात वाटप करण्यात आले आहे.

| वस्तुचे नाव | मंजूर संख्या | २०१२-१३ चे वाटप | २०१२-१३ चे शिल्लक साहित्य |
|---|---|---|---|
| सायकल (सर्वसाधारण) | ६६ | ६२ | ४ |
| सायकल (विशेष घटक) | ३० | २४ | ६ |
| पल्व्हरायझर | ९ | ४ | ५ |

वरीलप्रमाणे शिल्लक साहित्य सन २०१३-१४ मध्ये मंजूर लाभार्थ्यांची कागदपत्रे पूर्तता करून साहित्य वाटप करण्यात आले आहे व एकही साहित्य शिल्लक नाही.

**परिच्छेद क्रमांक ३.९८७ (१९) (सन २०१२-१३)**

**पल्वरायझर वाटपाबाबत :-**

पंचायत समिती, करमाळाकडे शिल्लक साहित्याअभावी रक्कम रुपये १,५७,५००/- गुंतून राहिलेले आहेत. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए/२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९, दिनांक २० जून, २००८ वित्तीय वर्षात खरेदी केली आहे. त्याच वित्तीय वर्षात साहित्याचे वाटप होणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समिती, करमाळा यांचेकडे वित्तीय वर्ष संपूनही प्राप्त पल्वरायझर पैकी ७ वाटप करणे बाकी होते. तसेच गावनिहाय लाभार्थी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) परिच्छेदामध्ये नमूद केलेप्रमाणे या कार्यालयाकडे महिला व बालकल्याण विभागाकडून दिनांक ११ मार्च, २०१३ रोजी एकूण १६ पल्वरायझर मशिन प्राप्त झालेल्या ७ पल्वरायझर मशिनचे वाटप दिनांक ३० जून, २०१३ रोजी वाटप करण्यात आलेले आहे. लाभार्थ्यांना वेळोवेळी साहित्य घेवून जाणेबाबत सूचित केले असता लाभार्थीकडून विलंब झालेला आहे. लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणेत आलेली आहे.

सोबत :-

(२) सन २०१२-१३ साठा नोंदवही छायांकित प्रत.

(३) गावनिहाय लाभार्थी नोंदवही छायांकित प्रत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, पाच लाभार्थ्यांचे वय १५ वर्षे आहे, परंतु त्यांची रक्कम वसुलीची कारवाई झालेली नाही. लाभार्थी चुकीच्या पद्धतीने निवडलेले आहेत का, जिल्हा परिषदेने चुकीचा ठराव केलेला असेल तर तो ठराव आयुक्तांकडे विखंडित करता येतो. जिल्हा परिषदेचा ठराव चुकीचा नसेल आणि अधिकारी चूक करीत असतील तर ते अधिकारी जबाबदार ठरतात. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, लाभार्थ्यांची निवड चुकीच्या पद्धतीने झालेली आहे. ज्यांनी चुकीची निवड केली आहे त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

यावर समितीने निदेश दिले की, अनुक्रमांक ५३ परि.क्र. व पृष्ठ क्रमांक ३.९७७(२), ४९०-ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक (मोबाईल दुरुस्ती) चे प्रशिक्षण देणे, अनुक्रमांक ५४-परि.क्र. व पृष्ठ क्रमांक ३.९७८(२), ४९०-ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक ब्युटीपार्लरचे प्रशिक्षण देणे, अनुक्रमांक ५५-परि.क्र. व पृष्ठ क्रमांक ३.९७९(४), ४९१-मंजूर साहित्याशिवाय अन्य साहित्ये (कपाटे) खरेदीबाबत, अनुक्रमांक ५६- परि.क्र. व पृष्ठ क्रमांक ३.९८०(५), ४९१ द्व ग्रामीण भागातील इयत्ता पाचवी ते दहावीच्या मुलींना ज्युडो कराटे प्रशिक्षण देणेबाबत, अनुक्रमांक ५७-परि.क्र. व पृष्ठ क्रमांक ३.९८१(६), ४९२-ग्रामीण भागातील मुलींना (ब्युटीपार्लर) प्रशिक्षण देणेबाबत, अनुक्रमांक ५८- परि.क्र. व पृष्ठ क्रमांक ३.९८२(११), ४९२-महिला लोकप्रतिनिधीचा अभ्यास दौरा, अनुक्रमांक ५९- परि.क्र. व पृष्ठ क्रमांक ३.९८३(१३), ४९२-किशोरी/महिलांना जेंडर, आरोग्य कुटुंब नियोजन प्रशिक्षणाबाबत, अनुक्रमांक ६०- परि.क्र. व पृष्ठ क्रमांक ३.९८४(१४), ४९३-महिला व बालकल्याण विभाग शिल्लक साहित्यावरील रक्कमांबाबत जिल्हा परिषद सोलापूर सन २०१२-२०१३, अनुक्रमांक ६१ द्व परि.क्र. व पृष्ठ क्रमांक ३.९८५(१५), ४९३-जिल्हा परिषद सेस महिला व बालकल्याण योजनेतील साहित्य विना वाटप शिल्लक असलेबाबत. जिल्हा परिषद सोलापूर सन २०१२-२०१३, अनुक्रमांक ६२- परि.क्र. व पृष्ठ क्रमांक ३.९८६(१८), ४९३-महिला व बालकल्याण विभागाकडून जिल्हा परिषद सेस योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या साहित्याबाबत, अनुक्रमांक ६३- परि.क्र. व पृष्ठ क्रमांक ३.९८७(१९), ४९३-पल्वरायझर वाटपाबाबत, जिल्हा परिषद, सोलापूर, सन २०१२-२०१३ - या परिच्छेदांमध्ये खूप गंभीर आक्षेप आहेत. यात ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक (मोबाईल दुरुस्ती) चे प्रशिक्षण देण्यासंदर्भातील गंभीर विषय आहे. कुटुंबकल्याण केंद्राच्या संदर्भातील परिस्थिती अशा बऱ्याच मुद्यांवर लेखा आक्षेप निघालेले आहेत. यासंदर्भात जिल्हा परिषद स्तरावर चौकशी करून बऱ्याचशा अनियमितता, लाभार्थ्यांची निवड करण्यामध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत. योग्यप्रकारे काम केलेले दिसत नाही म्हणून यावर लेखा आक्षेप निघालेले आहेत. या सर्व बाबींची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावरील कारवाईसह अहवाल समितीला सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

परिच्छेद क्रमांक ३.९७७ (२) ते ३.९८७ (१९) या परिच्छेदांमध्ये ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायीक प्रशिक्षणासंदर्भात अनियमितता झाल्याबाबत गंभीर आक्षेप घेण्यात आले आहेत, या सर्व बाबींची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधीतांची जबाबदारी निश्चित करून संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. चौकशीमध्ये आढळून आलेल्या बाबी व तद्नुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**(१) परिच्छेद क्रमांक ३.९७७ (२) :-**

(१) मोबाईल दुरुस्ती प्रशिक्षण मंजूर आदेशातील अट क्र.१३ अन्वये कमीत कमी ४० व जास्तीत जास्त ५० लाभार्थी निवड करणे आवश्यक असताना बालविकास प्रकल्प अधिकारी अक्कलकोट यांनी ५२ लाभार्थी निवड केली आहे. त्यामध्ये एका प्रशिक्षणार्थीस दुबार लाभ दिला असल्याने दुबार लाभाची रक्कम रुपये १,८९० वसूल करून चलनाने शासन सदरी भरणा करण्यात आली आहे.

(२) मोबाईल दुरुस्ती मंजूर आदेशातील अट क्र.२ नुसार लाभार्थीचे वय १८ ते ४५ वर्षे वयोगटातील असावे असे असताना बार्शी तालुक्यातील पाच लाभार्थ्याचे वय १५ वर्षे असे आहे. त्यामुळे प्रति लाभार्थी रक्कम रु. १८९०/- प्रमाणे एकूण पाच लाभार्थीचे रुपये ९४५०/- वसूल करून चलनाने शासन सदरी भरणा करण्यात आली आहे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचे पत्र क.जिपसो/मबाक/ योजना/८७४/१२ दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२ अन्वये सदर संस्थेने मौजे मंद्रुप ता.दक्षिण सोलापूर येथे मोबाईल दुरुस्तीचे प्रशिक्षण १८० तास देणे आवश्यक असतांना प्रतिदिन ७ तास याप्रमाणे २४ दिवसात १६८ तास देण्यात आल्याचा लेखा आक्षेप आहे. तथापि, माहे मार्च,२०१२ मध्ये प्रतिदिवस ८ तास या प्रमाणे २४ दिवसाच्या कालावधीत १९२ तास प्रशिक्षण दिलेले आहे.

(४) मंजूर आदेशातील अ.क्र.१ नुसार ३% अपंग लाभार्थी निवड करणे आवश्यक होते, परंतु प्रयत्न करून लाभार्थी मिळालेले नाहीत.

(५) लाभार्थ्यांचे उत्पन्नाचे दाखले घेण्यात आले आहेत. सदर दाखले दप्तरी उपलब्ध आहेत.

(६) प्रशिक्षण संसथेकडून प्रशिक्षण सुरू झालेबाबतचे गटविकास अधिकारी यांचे पत्र उपलब्ध आहेत.

(७) सदर प्रशिक्षण आर्थिक विकास महामंडळ यांचे मार्फत घेण्यात आलेले असून सदर प्रशिक्षणाचे प्रशस्तीपत्रकाचे वाटप करण्यात आलेले आहे.

(८) वर नमूद केल्याप्रमाणे तत्कालिन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क.) यांच्याकडून वसुलीची कार्यवाही करून ताकीद देण्यात आली आहे.

**(२) परिच्छेद क्रमांक ३.९७८ (२) :-**

(१) ब्युटी पार्लर प्रशिक्षण संस्थेच्या करार पत्रावर अधिकारी यांची स्वाक्षरी नव्हती ती घेण्यात आली आहे.

(२) आदेश क्र.जिपसो/मबाक/योजना/६९२/२०११ दिनांक ०८ डिसेंबर, २०११ अन्वये मंजूर लाभार्थी संख्या ४०८ आहे. ४०० लाभार्थीनी प्रशिक्षण घेतले असताना ४०८ चे देयक अदा करण्यात आले आहे. मंजूर आदेशातील ४०८ लाभार्थीनी प्रशिक्षण घेतलेले असून तवढेच देयक अदा करण्यात आले आहे. लाभार्थी यादी दप्तरी उपलब्ध आहे.

(३) मंजूर आदेशातील अ.क्र.१ नुसार ३% अपंग लाभार्थी निवड करणे आवश्यक होते, परंतु प्रयत्न करून लाभार्थी मिळालेले नाहीत.

(४) लाभार्थीचे उत्पन्नाचे दाखले दप्तरी उपलब्ध आहेत.

(५) मंजूर आदेशातील अट क्रमांक ३ नुसार इयत्ता ७ वी पास असणे आवश्यक असताना कुर्डूवाडी तालुक्यातील मंजूर यादीतील अ.क्र.१५ वरील एक लाभार्थी इयत्ता ६ वी पास अपात्र असून सदर प्रशिक्षणार्थीचे रक्कम रुपये २४५०/- वसुल करून चलनाने शासन सदरी भरणा करण्यात आलेली आहे.

(६) पंढरपूर व उत्तर सोलापूर येथील प्रशिक्षणार्थीचे जन्म दिनांकाचे व शिक्षण इत्यादी दाखले दप्तरी उपलब्ध आहेत.

(७) मंजूर आदेशातील अट क्रमांक १५ नुसार प्रशिक्षण सुरू झाल्याचा अहवाल सादर करण्यात आला आहे.

(८) मंजूर आदेशातील अट क्र.१२ नुसार १०% रक्कम न ठेवता अदा करण्यात आली आहे.

९) वर नमूद केल्याप्रमाणे तत्कालिन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क.) यांच्याकडून वसुलीची कार्यवाही करून, ताकीद देण्यात आली आहे.

**(३) परिच्छेद क्रमांक ३.९७९ (४) :-**

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए/ २०१०/अनौसंक/३३/प्र.क्र.१६८/परा-१ दिनांक १० मार्च, २०११ अन्वये अंगणवाड्यांना साहित्य पुरविण्यामध्ये वजनकाटे व जलशुद्धीकरण यंत्रे आहे. तथापि, वजनकाटे व जलशुद्धीकरण यंत्रे अंगणवाड्यांना यापूर्वी पुरविणेत आले असून अंगणवाड्यांना आवश्यक साहित्य ठेवणेसाठी कपाटाची अत्यंत आवश्यक असल्याने महिला व बालकल्याण समितीने सभा दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ ठराव क्रमांक ३१ अन्वये अंगणवाड्यांना विविध साहित्य पुरवठा करणे अंतर्गत स्टील कपाटांचा पुरवठा करणेत आलेला आहे.

(२) प्रथम पुरवठा आदेशानुसार १२ प्रकल्पातील २८० अंगणवाड्यांना स्टील कपाटांचा पुरवठा करणेत आला असून दुसऱ्या पुरवठा आदेशानुसार १०० स्टील कपाटांचा पुरवठा करणेत आला आहे. आदेशामध्ये नमूद करमाळा-२२, माळशिरस-२६, अक्कलकोट-२६, अकलूज - २६ प्रमाणे पुरवठा करणेत आला आहे.

(३) सदर योजनेकरिता १७ नोव्हेंबर, २०१२ रोजी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेऊन महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित, सोलापूर यांना दिनांक १७ डिसेंबर, २०१२ रोजी दरकरार सूची मिळणेबाबत कळविणेत आले होते. परंतु महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ यांच्याकडून दिनांक ५ फेब्रुवारी, २०१३ रोजी दर कराराची सूची प्राप्त झाल्याने विभागाने दिनांक २० फेब्रुवारी, २०१३ रोजी पुरवठा देण्याची कार्यवाही केली आहे. सोबत पुरवठा आदेशाची प्रत व तांत्रिक प्रशासकीय मान्यतेची प्रत जोडली आहे.

(४) महिला व बालकल्याण समिती सभेमध्ये बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी मागणी केल्याने स्टील कपाटे हे घेण्यात आलेले आहेत.

(५) शासकीय तंत्र निकेतन यांचे पत्र क्रमांक GPS/MEC/MSSIDC/INCP/८३ व ८४, दिनांक २१ मार्च, २०१३ अन्वये २८० नग स्टील कपाटांचा तपासणी अहवाल दिला आहे. ठेकेदाराने दिनांक १२ मार्च, २०१३ ते दिनांक १५ मार्च, २०१३ या कालावधीत डिलीव्हीरी चलन क्रमांक ३०१४ ते ३०२४ अन्वये स्टील कपाटांचा पुरवठा त्या त्या तालुक्यात केला आहे. शासकीय तंत्र निकेतन उस्मानाबाद Govtply/insp/ Furmiture/No/८७८३, दिनांक २० मार्च, २०१३ अन्वये १०० नगाचा पुरवठा केला आहे. तथापि, तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयक अदा करण्याविषयी कार्यवाही करण्यात आली आहे.

(६) महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, सोलापूर यांना प्रमाणक क्रमांक ६०, दिनांक १० सप्टेंबर, २०१३ रोजी प्रमाणक क्रमांक १८२ दिनांक २८ मार्च, २०१३ रोजी देयक धनादेशाने अदा करण्यात आले आहे.

(७) याप्रकरणी कोणतीही अनियमितता आढळून आली नसल्याने, संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही केली नाही.

**४. परिच्छेद क्रमांक ३.९८० (५) :-**

(१) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग निर्णय कमांक झेडपीए २०१०/अनौसंक्र/३३/प्र.क १६८/पंरा-१, दिनांक १० मार्च, २०११ अन्वये प्रशिक्षण ३ महिने देणे आवश्यक असताना ३० दिवसात प्रशिक्षण पूर्ण केले. जा.क्र./मबाक/योजना/२१८/२०१३, दिनांक ०५ मार्च, २०१३ अन्वये रोज दोन तास याप्रमाणे ३० दिवसांचे असल्याने सदरचे प्रशिक्षण हे ३० दिवसांमध्ये घेण्यात आले आहे.

(२) ग्रामीण भागातील ११ तालुक्यांमध्ये दिलेल्या प्रशिक्षण आदेशामध्ये आकडेवारी प्रमाणे मंजूर लाभार्थी ३३३३ पैकी ३०३३ लाभार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले असल्याने तेवढयाच लाभार्थ्यांचे देयक अदा करण्यात आली आहेत.

(३) महिला व बालकल्याण समितीने दिलेल्या सुचनेनुसार ११ तालुक्यांमध्ये दिलेल्या आकडेवारी नुसारच ग्रामीण भागातील हायस्कुलमधील इयत्ता ५ वी ते १० वी मुलींना प्रशिक्षण दिलेले असल्यामुळे लाभार्थी संख्या ठरवूनच प्रशिक्षण दिले आहे.

(४) बार्शी तालुक्यातील वैराग केंद्रावर प्रशिक्षण देण्यात आलेले नाही. त्यामुळे बार्शी तालुक्यातील वैराग केंद्रावर १७३ विद्यार्थ्यांचे उपस्थिती पत्रके उपलब्ध नाहीत.

(५) करमाळा तालुक्यातील टाकळी (रा) येथे ३० दिवस प्रशिक्षण दिले आहे. जेऊर केंद्रावर प्रशिक्षण देण्यात आलेले नाही त्यामुळे कागदपत्रे नाहीत.

(६) कुर्डूवाडी गटातील मोडनिब, मोहोळ गटातील अनगर, शेटफळ पंढरपूर गटातील कासेगांव, करकंब येथील लाभार्थ्यांचे दाखले दप्तरी उपलब्ध आहेत.

(७) जिल्ह्यात ११ तालुक्यांमध्ये प्रशिक्षण हे दोन तास चालल्याचे मुख्याध्यापकांचे पत्र दप्तरी उपलब्ध आहे.

(८) प्रशिक्षणार्थीचे प्रशस्तीपत्र वाटप करण्यात आले आहेत.

(९) प्रशिक्षण मुदतीत सुरू केल्याचा अहवाल दप्तरी उपलब्ध आहे.

(१०) याप्रकरणी कोणतीही अनियमितता आढळून आली नसल्याने, संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही केली नाही.

**५. परिच्छेद क्रमांक ३.९८१ (६) :-**

(१) ग्रामीण भागातील मुलींना ब्युटीपार्लर प्रशिक्षण देण्यासाठी अटी व शर्तीनुसारचे जन्म तारखेचा दाखला, रहिवासी दाखला, शैक्षणिक पात्रतेचा दाखला इत्यादी दाखले घेण्यात आले आहेत.

(२) मंजूर आदेशातील अट क्र. १ नुसार ३% अपंगासाठी प्रयत्न करूनही अपंग लाभार्थी मिळाले नाहीत.

(३) ब्युटी पार्लर प्रशिक्षण वर्गाचा कालावधी दिनांक २६ फेब्रुवारी, २०१३ ते दिनांक २८ मार्च, २०१३ असा आदेशात नमूद करण्यात आला आहे.

(४) प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणास प्रकल्प अधिकारी महाराष्ट्र उद्योजगता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र यांनी प्रशिक्षण कालावधीत जिल्हयातील सर्व केंद्रांना भेटी देऊन पत्र दिले आहे.

(५) प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षण हजेरी पत्रक जमा केलेले असून दप्तरी उपलब्ध आहे.

(६) ब्युटी पार्लर प्रशिक्षण प्रत्यक्षात ५७२ लाभार्थीने लाभ घेतला असता एकूण ५९५ लाभार्थ्यांचे देयक अदा केले नसून जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये ५९५ लाभार्थी मंजूर आदेशानुसारच ५९५ लाभार्थ्यांचे देयक अदा केले आहे.

(७) प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण प्रशस्तीपत्रकाचे वाटप करणेत आले आहे.

(८) याप्रकरणी कोणतीही अनियमितता आढळून आली नसल्याने, संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्‍चित करण्याची कार्यवाही केली नाही.

**६. परिच्छेद क्रमांक ३.९८२ (११) :-**

(१) महिला व बालकल्याण समितीने अभ्यास दौऱ्यासाठी उस्मानाबाद, परभणी व वर्धा ऐवजी रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड या जिल्ह्याच्या कामाच्या पहाणीसाठी निवड केली असून त्या प्रमाणे नोटीस बोर्डावर जाहीर प्रसिद्धी करून दौरा आयोजित करण्यात आला आहे. त्याची प्रत दप्तरी उपलब्ध आहे. प्रत्यक्षात दौरा रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड या ठिकाणी केला असल्यामुळे तेथील जेवण व नाष्टयाच्या पावत्या देयकासोबत जोडल्या असून मूळ देयका सोबत उपलब्ध आहेत.

(२) महिला व बालकल्याण समितीने दिलेल्या सूचनेनुसार दौरा उस्मानाबाद, परभणी व वर्धा ऐवजी रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड येथे आयोजित केला होता. तसेच नोटीस बोर्डावर जाहीर प्रसिद्धी करून दौरा आयोजित केला आहे.

(३) अभ्यास दौऱ्यासाठी ४० महिला लोकप्रतिनिधी यांनी प्रवास केला असून त्याचा तपशील दप्तरी उपलब्ध आहे.

(४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील दिनांक १० मार्च, २०११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे महिला व बालविकासाचे उपक्रम, पंचायत राज आदर्श गांव, निर्मल ग्राम, महिला बळकटीकरण, इत्यादी बाबतच्या अभ्यास दौऱ्यासाठी माहिला लोकप्रतिनिधी अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत निकष नमूद आहेत त्याप्रमाणे अभ्यास दौरा आयोजित करण्यात केला आहे.

(५) मल्लिकार्जून ट्रॅव्हल्स एजन्सीचे दर पत्राकावर स्वाक्षरी असून शासन मान्य वाहतूक परवाना वाहनाची मालकी यांचे खात्री करून पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

(६) सदर एजन्सीचा नोंदणी क्रमांक उपलब्ध नाही. दरपत्रके दिनांक ६ मार्च, २०१३ अखेर दुपारी २-०० वाजेपर्यंत मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने राही टुर्स ॲड ट्रॅव्हल्स यांनी दिनांक ४ मार्च, २०१३ रोजी ई-मेल द्वारे दरपत्रके सादर केली आहे.

(७) याप्रकरणी कोणतीही अनियमितता आढळून आली नसल्याने संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्‍चित करण्याची कार्यवाही केली नाही.

**७. परिच्छेद क्रमांक ३.९८३ (१३) :-**

(१) जा.क्र/जिपसो/मबाक/योजना/१३३७/२०१२, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१२ अन्वये जाहीर प्रसिद्धीकर जिल्हा परिषद आवार महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर नोटीस बोर्डावर करण्यात आलेले आहे. सोबत प्रसिद्धीपत्रक जोडल्याप्रमाणे पुरवठा करण्यात आलेला आहे.

(२) एकूण १६ प्रकल्पांना ४१०० फाईल्स पुरविण्यात आलेल्या असून त्याची पोहोच दप्तरी उपलब्ध आहे.

(३) फाईल्स गोषवारा नस्तीमध्ये स्वाक्षरी पृष्ठ क्र.३७ व ३८ वर घेण्यात आलेली असून स्वाक्षरीमध्ये फरक नाही. स्वाक्षरी ही बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या प्रतिनिधीची आहे.

(४) रक्कम रु.५०,००० हजाराच्या आतील रकमेचे दरपत्रक असल्याने शासन परिपत्रकानुसार सदरची दरपत्रके जिल्हा परिषदेच्या आवारातील महिला व बालकल्याण विभागाच्या नोटीस बोर्डावर जाहीर प्रसिद्धी देऊन स्थानिक बाजारातून पुरवठादाराकडून दरपत्रके मागविण्यात आलेली होती. पुरवठादार असल्याचे खात्री करुनच दरपत्रके मंजूर करण्यात आलेली आहेत.

(५) जास्तीत जास्त महिला व किशोरी यांना लाभ देण्यात आला आहे.

(६) किशोरी / महिलांना जेंडर, आरोग्य व कुटुंबनियोजन प्रशिक्षणातून आरोग्य व कुटुंब नियोजनाचे महत्त्व, आहाराचे महत्त्व, कुपोषण निर्मुलन, स्त्री भ्रूण हत्या व बालविवाह याबाबत जागृती करणेत आलेली आहे. किशोर वयीन मुलींना त्यांचा लाभ झाला आहे.

(७) याप्रकरणी कोणतीही अनियमितता आढळून आली नसल्याने संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही केली नाही.

**८. परिच्छेद क्रमांक ३.९८४ (१४) :-**

पंचायत समिती, कुर्डूवाडी यांच्याकडील शिल्लक साहित्य लेडीज सायकल ४२, पल्वरायझर मशिन ११ शिल्लक होते. लाभार्थ्याचे कागदपत्राची पुर्तता वेळेत न झाल्यामुळे आर्थिक वर्ष सन २०१३-१४ मध्ये शिल्लक वरील सर्व साहित्याचे वाटप केलेले आहे. नोंदवहीची छायांकित प्रत सादर केले आहे. याप्रकरणी कोणतीही अनियमितता आढळून आली नसल्याने संबंधितांविरूद्ध जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही केली नाही.

**९. परिच्छेद क्रमांक ३.९८५ (१५) :-**

पंचायत समिती, मंगळवेढा यांच्याकडील शिल्लक साहित्य लेडीज सायकल ०८, पल्वरायझर मशिन ०४ शिल्लक होते. लाभार्थ्यांचे कागदपत्राची पूर्तेता वेळेत न झाल्यामुळे पुढील वर्षात शिल्लक वरील सर्व साहित्याचे वाटप केलेले आहे. नोंदवहीची छायांकित प्रत सादर केले आहे. याप्रकरणी कोणतीही अनियमितता आढळून आली नसल्याने संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही केली नाही.

**१०. परिच्छेद क्रमांक ३.९८६ (१८) :-**

पंचायत समिती, उत्तर सोलापूर यांच्याकडील शिल्लक साहित्य लेडीज सायकल ०४, विशेष घटक योजना सायकल ०६, पल्वरायझर मशिन ०५ शिल्लक होते. लाभार्थ्यांचे कागदपत्राची पूर्तता करून घेऊन पुढील वर्षात शिल्लक वरील सर्व साहित्याचे वाटप केलेले आहे. नोंदवहीची छायांकित प्रत सादर केले आहे. याप्रकरणी कोणतीही अनियमितता आढळून आली नसल्याने संबंधितांविरूद्ध जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही केली नाही.

**११. परिच्छेद क्रमांक ३.९८६ (१८) :-**

पंचायत समिती, करमाळा यांच्याकडील पल्वरायझर मशिन ०७ शिल्लक होते. वेळोवेळी लाभार्थ्यांना साहित्य घेऊन जाणेबाबत सुचित केले असताना देखील लाभार्थ्यांकडून साहित्य घेऊन जाणेस विलंब झालेला होता. तरी शिल्लक राहिलेल्या ०७ पल्वरायझर मशिनचे पुढील वर्षात वाटप केले आहे. सोबत साठा नोंदवहीची छायांकित प्रत जोडली आहे. याप्रकरणी कोणतीही अनियमितता आढळून आली नसल्याने, संबंधितांविरूद्ध जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही केली नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**१. महिला व बालविकास विभागाचे अभिप्राय.–** सदर परिच्छेदातील मुद्यांच्या अनुषंगाने करण्यात आलेला खर्च हा ग्राम विकास विभागाच्या " सेस " (Cess) निधी मधून करण्यात आलेला आहे. सबब महिला व बाल विकास विभागाशी संबंधित नाही.

**२. ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.–** (पंरा-१) जिल्हा परिषद स्तरावरून कार्यवाही करण्यात आली आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने सोलापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, सेसच्या निधीतून प्रशिक्षण देण्याचा विषय आहे. प्रशिक्षणार्थींना दुबार लाभ देण्यात आला, असे अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आलेले होते. महापालिकांमध्ये देखील असे प्रश्न येतात. नागपूर महापालिकेमध्ये अनेक गुन्हे दाखल करण्यात आले होते. आता प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर गेलेला आहे. प्रशिक्षण देत असताना महाराष्ट्र राज्य स्किलिंग डेव्हलपमेंट सोसायटीने लाभार्थ्यांचे क्वालिफिकेशन निश्चित करायचे आहे. किती लोकांना प्रशिक्षण द्यायचे, किती रुपयांमध्ये द्यायचे, क्वालिफिकेशन काय असणार हे त्यांनी ठरवायचे आहे. त्यानंतर पैसे सोसायटीला द्यायचे आहे. यापुढे हा प्रकार बंद होणार आहे. त्या वर्षी जी काही चूक दिसून आली त्या अनुषंगाने प्रत्येक पृष्ठावर केसबाबत अभिप्राय नमूद केले आहेत.

यावर समितीने निर्दशनास आणून दिले की, या ठिकाणी असे म्हटले आहे की, वरीलप्रमाणे वसूल करण्यात आलेली रक्कम शासनाकडे जमा केलेली आहे. वस्तुस्थितीप्रमाणे चौकशी अहवाल असल्याने त्यामध्ये अधिकारी वा कर्मचारी दोषी नाही. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांचा अहवाल आहे. या संदर्भात लेखापरिक्षकांवर खोटे मुद्दे काढले म्हणून कारवाई करण्याची मागणी करण्यात येईल. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी खुलासा केला की, त्यांनी नंतर पूर्तता केली आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, प्रत्येक प्रकरणामध्ये ४,०००, ५,००० किंवा १०,००० रुपये रक्कम वसूल करावयाची होती ती रक्कम वसूल करून घेतली आहे. स्थानिक लेखापरीक्षकांनी किरकोळ आक्षेप घेतले होते. कागदपत्रे उपलब्ध नाहीत, ५० हजार रुपयांची मर्यादा असताना ५२ हजार रुपये मंजूर केले, असे मुद्दे पंचायती राज समितीसमोर यायला नको होते. जी किरकोळ वसुली होती ती सर्व रक्कम वसूल करून शासन दरबारी जमा केली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, वसुली केल्याबाबत ग्रामविकास विभागाचे सचिव समाधानी आहेत काय, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समाधानी असल्याचे समितीस सांगितले.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत सन २०१२-२०१३ मध्ये महिला व बालकल्याण विभागाने जिल्हा परिषद सेस फंडातून ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक (मोबाईल दुरुस्ती) प्रशिक्षणाकरिता रक्कम रुपये ९,१०,९८०/- तांत्रिक व व्यावसायिक (ब्युटी पार्लर) प्रशिक्षणासाठी रक्कम रुपये १९,९९,२००/- तसेच अंगणवाड्यांना कपाटे पुरविण्याकरिता रक्कम रुपये ११,०३,२००/- ग्रामीण भागातील इयत्ता ५ वी ते १० वी च्या मुलींना ज्युडो कराटे प्रशिक्षण देणेकरिता रुपये ९,०९,९००/- ग्रामीण भागातील मुलींना (ब्युटीपार्लर) प्रशिक्षणाकरिता रक्कम रुपये १३,९८,२५०/- महिला लोकप्रतिनिधींच्या अभ्यास दौऱ्यासाठी रक्कम रुपये १,४७,६४१/- किशोरी/महिलांना आरोग्य कुटुंब नियोजन प्रशिक्षणासाठी रक्कम रुपये ७,७०,०००/- एवढ्या रकमा खर्च केलेल्या आहेत. पंचायत समिती, कुर्डूवाडी यांच्याकडे शिल्लक साहित्याअभावी गुंतून राहिलेली रक्कम रुपये ८,६७,२१०/- पंचायत समिती, मंगळवेढा यांच्याकडे शिल्लक साहित्याअभावी गुंतून राहिलेली रक्कम रुपये १,१३,४४०/- पंचायत समिती, उत्तर सोलापूर यांच्याकडे शिल्लक साहित्याअभावी गुंतून राहिलेली रक्कम रुपये १,१९,७३०/- पंचायत समिती, करमाळा यांच्याकडे शिल्लक साहित्याअभावी गुंतून राहिलेली रक्कम रुपये १,५७,५००/- एवढी आहे. अशाप्रकारे महिला व बालकल्याण विभागाने साहित्य पुरवठ्यासाठी तसेच मुलींच्या प्रशिक्षणासाठी एकूण रुपये ७२ लाख ३९ हजार १७१ एवढी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे तसेच शिल्लक साहित्याअभावी गुंतून राहिलेली एकूण रुपये १२ लाख ५७ हजार ८८० एवढी रक्कम आहे, याबाबत पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत :—

सदर प्रशिक्षणासाठी मंजूर आदेशातील अटीनुसार कमीत कमी ४० लाभार्थी व जास्तीत जास्त लाभार्थी निवड करणे आवश्यक असताना प्रशिक्षणार्थीस दुबार लाभ दिलेला असणे, लाभार्थीचे वय १८ ते ४५ वर्षे वयोगटातील असणे आवश्यक असताना लाभार्थ्यांचे वय १५ वर्षे असणे, १८० तासांऐवजी १६८ तास प्रशिक्षण देण्यात आल्यामुळे प्रशिक्षण दर्जेदार झालेले नसणे, ३% अपंग लाभार्थ्यांची निवड करणेत आली नसणे, लाभार्थी दारिद्र्यरेषेखालील असल्याबाबत अथवा उत्पन्न रुपये २५०००/- असल्याबाबत दाखले घेण्यात आलेले नसणे, प्रशिक्षण सुरू झाल्याचा अहवाल संस्थेने जिल्हा परिषदेकडे न पाठविणे, प्रशिक्षण पूर्ण झालेबाबतचे प्रशस्तिपत्र लाभार्थ्यांना दिलेले नसणे, साहित्याचा (कपाटे) पुरवठा करण्यात आलेला नसणे, शिल्लक साहित्या अभावी गुंतून राहिलेली एकूण रक्कम रुपये १२ लाख ५७ हजार ८८० एवढी आहे. वित्तीय वर्ष समाप्त होऊनही प्राप्त लेडीज सायकली व पल्व्हरायझर मशिन वाटप करण्यात आलेल्या नसणे, याबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त करून असमाधान व्यक्त केले.

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, लाभार्थ्यांची निवड चुकीच्या पद्धतीने केल्यामुळे पाच लाभार्थ्यांचे वय १५ वर्षे आहे. ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक (मोबाईल दुरुस्ती) चे प्रशिक्षण देणे, ग्रामीण भागातील महिला व मुलींना तांत्रिक व व्यावसायिक ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण देणे, मंजूर साहित्याशिवाय अन्य साहित्य (कपाटे) खरेदीबाबत, ग्रामीण भागातील इयत्ता ५ वी ते १० वी च्या मुलींना ज्युडो कराटे प्रशिक्षण देणेबाबत, महिला लोकप्रतिनिधी अभ्यास दौरा, किशोरी/महिलांना जेंडर आरोग्य कुटुंब नियोजन प्रशिक्षणाबाबत जिल्हा परिषद सेस महिला व बालकल्याण योजनेतील साहित्य विना वाटप शिल्लक असलेबाबत, लेडीज सायकल व पल्व्हरायझर प्राप्त असूनही वाटपाविना पडून असल्याबाबत गंभीर आक्षेप घेण्यात आलेले आहेत. उपरोक्त प्रकरणी सर्व बाबींची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर केलेल्या कारवाईसह अहवाल समितीला सादर करण्यात यावा असे समितीने निदेश दिले होते. त्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या चौकशी अहवालानुसार आक्षेपामध्ये नमूद करण्यात आलेली रक्कम चलनाने शासनाकडे जिल्हा परिषद स्तरावर भरणा करण्यात आली आहे. सदर प्रशिक्षणामध्ये अनियमितता झालेली नाही. ग्रामीण भागातील महिलांना ब्युटी पार्लर प्रशिक्षण देण्यासाठी जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये आदेशानुसारच ५९५ लाभार्थ्यांचे देयक अदा करण्यात आलेले असल्यामुळे रक्कम रुपये ५४,०५०/- वसूल करण्याची आवश्यकता नाही तसेच लोकप्रतिनिधी अभ्यास दौऱ्यामध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही. महिला व बालकल्याण विभागाने ग्रामीण भागातील मुलींना व महिलांकरिता जिल्हा परिषद सेस फंडाद्वारे राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या साहित्याचे पूर्णतः वाटप करुन त्याची नोंद साठा नोंदवहीमध्ये करण्यात आली आहे. तथापि, समितीचे स्पष्ट मत आहे की, **पंचायत समिती, कुर्डूवाडी, पंचायत समिती, मंगळवेढा, पंचायत समिती, उत्तर सोलापूर, पंचायत समिती, करमाळा याठिकाणी जिल्हा परिषद सेस फंडातून महिला व बालकल्याण योजनेतील साहित्यामध्ये लेडीज सायकली, पल्व्हरायझर मशिन प्राप्त असतानादेखील लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले नसल्याचे लेखा आक्षेपामध्ये नमूद करण्यात आले आहे. वित्तीय वर्ष संपून देखील उक्त साहित्याचे वाटप करण्यात आलेले नाही ही बाब अत्यंत गंभीर असून संबंधितांनी याप्रकरणी अत्यंत निष्काळजीपणा व कर्तव्यात कसून केल्याचे दिसून येत आहे त्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत असून भविष्यात असे प्रकार दिसून आल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुद्ध कठोर कारवाई करण्याची तरतुद जिल्हा परिषदेने करावी व त्याप्रमाणे सर्व पंचायत समित्यांनी योग्य ती खबरदारी घेण्याच्या दृष्टीने ग्रामविकास विभागाने त्याप्रमाणे सूचना निर्गमित कराव्यात अशी समिति शिफारस करीत आहे. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

## प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, सोलापूर

## सन २०१२-२०१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी

**परिच्छेद क्रमांक ३.१०७२ (४) (१७) (सन २०१२-१३)**

रोखवहीतील व तसलमात नोंदवहीतील अनियमितता

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ४ | रोख वहीतील व तसलमात नोंदवहीतील अनियमितता | सोलापूर | बांधकाम -१ | १७ | ५,५४,१०३ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

बांधकाम वि.क्र.१ जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडील सन २०१२-१३ चे लेखा परिक्षण कालावधीत तसलमात नोंदवहीची पडताळणी केलेनुसार रक्कम रुपये ५,५४,१०३ अग्रीमधन प्रलंबित दर्शविण्यात आले होते. सदर अग्रीमापैकी खालीलप्रमाणे समायोजन केले आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये प्रमाणक क्र.२७८, १२८, ५८९, ४ ची एकूण रक्कम रुपये ४९,७०७ वसूल करून समायोजन करणेत आले आहे.

प्रमाणक क्र.४२ रक्कम रुपये ३,१८,८१७ ची वसुली करून समायोजन करण्यात आले आहे. तसेच प्रमाणक क्र.१९३ रक्कम रुपये ३०,७९९ ची रक्कम वसूल करून रक्कम समायोजन केली आहे, असे रुपये ५,५४,१०३ पैकी एकूण रक्कम रुपये ३,९९,३२३ ची वसुली करून अग्रिम समायोजन केलेले आहे.

उर्वरित रक्कम रुपये १,५४,७८० अग्रिमधन समायोजन करणेसाठी संबंधितांना पत्र बजावणेत आलेले असून सदर वसुलीची कारवाई नियोजनबद्ध चालू आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.१०७२ (४) (६) (सन २०१२-१३)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ४ | रोख वहीतील व तसलमात नोंदवहीतील अनियमितता | सोलापूर | वित्त | ६ | ४०,२२,८९४.६६ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

खाते प्रमुखांना दिलेल्या अग्रिमापैकी दिनांक ३१ मार्च २०१३ अखेर एकूण रुपये ४०,२२,८९४.६६ इतकी असमायोजित होती. त्यापैकी सन २०१७-२०१८ मध्ये ५ जानेवारी, २०१८ अखेर रुपये १२,९४,६२५.६६ इतकी वसूल केली आहे. उर्वरित प्रलंबित अग्रिम हे खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे प्रलंबित आहे :–

| वर्ष | रक्कम |
|---|---|
| १९६२-६३ ते १९७२-७३ | ४,४१,५५४.०५ |
| १९७२-७३ ते १९८३-८४ | १,५२,७९६.०५ |
| १९८३-८४ ते १९९३-९४ | ६,८७,७९९.५३ |
| १९९३-९४ ते २००३-०४ | १२,७५,०४८ |
| २००३-०४ ते २०१२-१३ | १,७१,०७२ |
| **एकूण** | **२७,२८,२६९.६६** |

उपरोक्त प्रलंबित अग्रिमांपैकी सन १९६२-६३ ते १९९३-९४ अखेर प्रलंबित असणाऱ्या अग्रिमांचे समायोजन करणेसाठी जुन्या कागदपत्रांचा शोध घेवून समायोजन करणेबाबत अडचणी निर्माण होत आहेत. याबाबत जुन्या अग्रिमांचे समायोजन करणेसाठी कागदपत्रांचा शोध घेऊन समायोजन

करणेबाबत तसेच अग्रिम वसुली होणे शक्य नाही याबाबतीत निर्लेखनाची कार्यवाही करणेबाबत दरमहा सहाय्यक लेखाधिकारी यांचे मासिक सभा व खातेप्रमुख यांच्या आढावा बैठकी घेऊन जास्तीत जास्त अग्रिम समायोजन करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच याबाबत खातेप्रमुख यांना पत्रव्यवहार ही केलेला आहे. सद्यस्थितीमध्ये प्रलंबित असणाऱ्या अग्रिमातील रक्कम रुपये २७,२८,२६९.६६ पैकी रक्कम रुपये ९,७७,९०१ हे आरोग्य विभाग यांची न्यायप्रविष्ठ बाब असल्याने याबाबत मा.न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

तसेच शासन परिपत्रक ग्रामविकास विभाग यांचेकडील दिनांक २३ मार्च, २०१७ मधील मुद्दा क्र.५ अन्वये कार्यालय प्रमुखांना जे अग्रिम दिले आहेत त्यांच्या कागदपत्रांचा शोध घेऊन समायोजनाची कार्यवाही करणेबाबत नमूद केलेले आहे. परंतु जिल्हा परिषद, सोलापूरकडील उपरोक्त प्रलंबित अग्रिम हे सन १९६२-६३ पासूनचे असल्याचे याबाबत जुन्या कागदपत्रांचा शोध घेऊनही कागदपत्रे सापडत नसल्याने याबाबत दिनांक २३ मार्च २०१७ च्या परिपत्रकामधील मुद्दा क्र.१० अन्वये चालू आर्थिक वर्षात तरतूद करून प्रलंबित असलेल्या अग्रिमाची वसुली करुन समायोजन करण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच याच शासन परिपत्रकातील मुद्दा क्र.४ अन्वये प्रलंबित अग्रिमांपैकी जे अग्रिम वसूल होणे शक्य नाही, याबाबत निर्लेखनाची कार्यवाही करणेबाबत विभागांना पत्रव्यवहार केलेला आहे. विभागाकडून प्रस्ताव प्राप्त होताच निर्लेखनाची कार्यवाही करण्यात येईल.

**परिच्छेद क्रमांक ३.१०७२ (१७) (१५) (सन २०१२-१३)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १७ | इतर बाबी | सोलापूर | भविष्य निर्वाह निधी | १५ | - |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-२०१२ चे लेखे दुरुस्त केलेमुळे अखेरच्या व आरंभीच्या शिल्लक रकमेत तफावत दिसून आलेली होती. परंतु सन २०११-१२ च्या अखेरच्या शिलकीनुसार सन २०१२-१३ ची आरंभीची शिल्लक घेऊन सर्व लेखे पूर्ण करणेत आलेले आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.१०७२ (१७) (१६) (सन २०१२-१३)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १७ | इतर बाबी | सोलापूर | भविष्य निर्वाह निधी | १६ | - |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-२०१२ चे लेखे दुरुस्त केलेमुळे अखेरच्या व आरंभीच्या शिल्लक रकमेत तफावत दिसून आलेली होती. परंतु सन २०११-१२ च्या अखेरच्या शिलकीनुसार सन २०१२-१३ ची आरंभीची शिल्लक घेऊन सर्व लेखे पूर्ण करणेत आलेले आहेत. तसेच आक्षेपात नमूद कर्मचाऱ्यांचे सन २०११-१२ मधील अखेरची शिल्लक व सन २०१२-१३ मधील आरंभीची शिल्लक रकमेची तफावत दुरुस्त करून नोंदी बृहतपत्रकात व लेजरमध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.१०७२ (१७) (१९) (सन २०१२-१३)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १७ | इतर बाबी | सोलापूर | भविष्य निर्वाह निधी | १९ | - |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-२०१२ चे लेखे दुरुस्त केलेमुळे अखेरच्या व आरंभीच्या शिल्लक रकमेत तफावत दिसून आलेली होती. परंतु सन २०११-१२ च्या अखेरच्या शिलकीनुसार आरंभीची शिल्लक घेऊन सर्व लेखे पूर्ण करणेत आलेले आहेत. तसेच आक्षेपात नमूद कर्मचाऱ्यांचे सन २०११-१२ मधील

अखेरची शिल्लक व सन २०१२-१३ मधील आरंभीची शिल्लक रकमेची तफावत दुरुस्त करून बृहतपत्रकात व लेजरमध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.१०७२ (१७) (२१) (सन २०१२-१३)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १७ | इतर बाबी | सोलापूर | भविष्य निर्वाह निधी | २१ | |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-२०१२ चे लेखे दुरुस्त केलेमुळे अखेरच्या व आरंभीच्या शिल्लक रकमेत तफावत दिसून आलेली होती. सद्य:स्थितीमध्ये सन २०११-१२ च्या अखेरच्या शिल्लकीनुसार सन २०१२-१३ ची आरंभीची शिल्लक घेऊन सर्व लेखे पूर्ण करण्यात आलेले आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.१०७२ (१७) (२२) (सन २०१२-१३)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १७ | इतर बाबी | सोलापूर | भविष्य निर्वाह निधी | २२ | |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०११-२०१२ चे लेखे दुरुस्त केल्यामुळे अखेरच्या व आरंभीच्या शिल्लक रकमेत तफावत दिसून आलेली होती. परंतु सन २०११-१२ च्या अखेरच्या शिल्लकीनुसार आरंभीची शिल्लक घेऊन सर्व लेखे पूर्ण करणेत आलेले आहेत. तसेच आक्षेपात नमूद कर्मचाऱ्यांचे सन २०११-१२ मधील अखेरची शिल्लक व सन २०१२-१३ मधील आरंभीची शिल्लक यातील तफावती दुरुस्त करून बृहतपत्रकात व लेजरमध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३.१०७२ (१७) (२३) (सन २०१२-१३)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १७ | इतर बाबी | सोलापूर | भविष्य निर्वाह निधी | २३ | |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) श्री. वै. श्री. मानकुसकर खाते १५१९२ यांची आरंभीची (१ एप्रिल २०१२) शिल्लक रुपये २,०९,९५४ असून दिनांक ३१ मार्च, २०१२ ची अखेर शिल्लक २,०९,९५४ आहे. परंतु माहे जानेवारी, २०१२ मधील प्रमाणकावरुन खात्री केली असता माहे जानेवारी, २०१२ मध्ये रुपये १,००,०००/- ना परतावा रक्कम श्री. वै.श्री.मानकुसकर यांना अदा केलेली नाही. तरी दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजीची अखेर शिल्लक रुपये २,८२,८५०/- आहे.

२) श्री.रा.धो. भातांबरे खाते ९८३७ यांची सन २०१२-१३ मधील लेखे तपासून खात्री केली असता आरंभीची शिल्लक ७,८७,४८९/- एवढी असून सन २०१२-१३ मध्ये त्यांची वर्गणी रुपये ६०,०००/- जमा असून ६ वा वेतन आयोग हप्ता रुपये ३२,८१५/- आहे. एकूण रुपये ९२,८१५/- जमा आहे व व्याज रुपये ७४,५६५/- आहे. अशी दिनांक ३१ मार्च, २०१३ ची अखेरची शिल्लक रुपये ९,५४,८६९/- एवढी आहे. वरील प्रमाणे लेखे अद्ययावत असून कोणत्याही प्रकारची तफावत दिसून येत नाही.

**परिच्छेद क्रमांक ३.१०७२ (१७) (२५) (सन २०१२-१३)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १७ | इतर बाबी | सोलापूर | भविष्य निर्वाह निधी | २५ | - |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) श्री. न. आ. जाधवर खाते ५७८३ हे दिनांक ३१ मे २०१२ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचे खातेवर आरंभीची शिल्लक रुपये ३,०८,७८९ होती. माहे एप्रिल, २०१२ मध्ये रुपये १०,००० वर्गणी + रुपये ८२३५ व्याज एकूण रुपये ३,२७,०२४ अंतिम अदाई करण्यात आली आहे. तसेच माहे मे, २०१२ मध्ये वर्गणी रक्कम रुपये १०,००० घेण्यात आलेली नाही.

(२) सन २०१२-१३ मध्ये एप्रिल, २०१२ मध्ये ६ व्या वेतन आयोगाचा ३ हप्ता रक्कम रुपये ३५,५७१ जमा झाल्यामुळे सदर हप्त्यास माहे जुलै, २०१२ अखेर व्याजासह रक्कम रुपये ३८,८९१ संबंधितास दुबार अदा करण्यात आलेली नाही.

(३) संबंधित कर्मचाऱ्याच्या निवृत्ती पूर्वी तीन महिने वर्गणी बंद करणे आवश्यक आहे. परंतु संबंधित कर्मचाऱ्यांची वर्गणी प्राप्त झाल्यामुळे सदर वर्गणी फक्त जमेस घेतलेली आहे. परंतु त्यास व्याज दिलेले नाही.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ फेब्रुवारी २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, अग्रीम रक्कम बांधकाम विभागाला कोणत्या हेडमधून दिली जाते, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सामान्य प्रशासन विभागाकडून दिली जाते. यावर समितीने नाराजी करीत मत व्यक्त केले की, बांधकाम विभागाचे अधिकारी एवढ्या बेजबाबदार पद्धतीने उत्तर देऊ शकतात, यानंतर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, ज्यावेळी अग्रीमसाठी मागणी येते आणि तातडीने अग्रिम द्यायचा असतो त्यावेळी जिल्ह्याच्या बजेटमधून जिल्हा परिषद देते. अग्रिम दिल्यानंतर लगेच परतफेड केली जाते.

यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या खात्यामधून पैसे काढून मंजुरी देण्याचे अधिकार मुख्य लेखा व वित्त अधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत का, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अध्यक्षांच्या नियम ५४(२) चे अधिकाराचा वापर करीत आहेत, फक्त नियम कोट करीत नाही. तीन वरिष्ठ अधिकारी आहेत मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी ही तुमची नियमित (रुटीन) पद्धत आहे.

लेखासंहिता कलम, १८८(४) नुसार इतर सर्व बाबतीत आगाऊ रकमा केवळ परिषदेच्या किंवा समितीच्या मंजुरीनेच देता येतील. परिषदेस किंवा समितीस नुकसानीपासून स्वतःला सुरक्षित ठेवण्याकरिता व ही पद्धत सर्वसामान्य होऊ नये म्हणून किंवा सर्वथा आवश्यक असेल त्याहून अधिक काळ ही पद्धत चालू राहू नये म्हणून आवश्यक असलेली खबरदारी घेऊन, अनिवार्य समजल्या जातील अशा आगाऊ रकमा अपवादात्मक परिस्थितीत प्राधिकृत करता येईल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांना समितीस माहिती देता येत नसल्यामुळे माफी मागितली.

यावर समितीने विदित केले की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या खात्यामध्ये जेवढा पैसा आहे तो खर्च करण्याचे अधिकार त्या त्या समितीला आहे किंवा सर्वसाधारण सभेला (जनरल बॉडीला) आहेत. समिती भेट देण्यास येण्यापूर्वी सर्व प्रकरणांमध्ये वसुली झालेली रकम किती आहे असा समितीने प्रश्न विचारला असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, १५ बाबींमध्ये ५.५४ लाख रुपये अग्रिम (ॲडव्हान्स) दिलेला आहे. त्यांपैकी रु.३.९९ लाख रुपये वसूल झाले आहेत. रु.१,५४,७८० समायोजन करुन समितीला अहवाल सादर करण्यात येईल. एकूण १२४ प्रकरणे होती. त्यांमध्ये १ कोटी ९ लाख ८१ हजार ९८० रुपयेएवढी वसुलीपात्र रकम होती. पंचायती राज समिती दौऱ्याच्या अनुषंगाने तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून रुजू झाल्यापासून पाठपुरावा करुन आजपर्यंत ३५ लाख २१ हजार ७५३ रुपये वसूल करण्यात आले आहेत. उर्वरित रक्कम देखील लवकरच वसूल करण्यात येईल.

यावर समितीने आपले मत व्यक्त करुन निदेश दिले की, वसुली केली ही चांगली गोष्ट आहे, परंतु अग्रीम रकमेबाबत परस्पर होणारे व्यवहार यापुढे होता कामा नये. यासाठी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे याबाबतची कार्यपद्धती अधिकाऱ्यांनाच

माहिती नाही. त्यामुळे याबाबत एक कार्यशाळा आयोजित करण्यात यावी. लेखासंहितेचे दैनंदिन कामकाजामध्ये पालन होणे अत्यंत आवश्यक आहे. अग्रीम रकमेबाबतची या प्रकरणातील कार्यपद्धती चुकीची आहे. त्यामुळे याबाबत चौकशी करुन तसा अहवाल समितीस सादर करावा.

तसेच मुद्दा क्रमांक ७३ ते ७९ सन २०१२-१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी यामध्ये पंचायत समितीतील नियमबाहय बाबी असून अखेरची शिल्लक व आरंभीची शिल्लक यामध्ये तफावत आढळून आलेली आहे. त्यामुळे सदरहू मुद्यांबाबत सखोल चौकशी करावी व याची नेमकी कारणे शोधून काढावीत. व्याजदर आकारणी तसेच समायोजनाबाबतची सखोल चौकशी करुन अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करुन तसा अहवाल समितीस एप्रिल, २०१८ पर्यंत सादर करण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

जिल्हा परिषदेतील एकूण १२४ प्रकरणांमध्ये रुपये १ कोटी ९ लाख ८१ हजार ९८० एवढया वसुलपात्र रकमेपैकी केवळ रुपये ३५ लाख २१ हजार ७५३ एवढी रक्कम वसुल करण्यात आली असून उर्वरीत रक्कम रुपये ७४ लाख ६० हजार २२७ कधीपर्यंत वसूल करण्यात येणार आहे. तसेच अग्रिम रकमेबाबतच्या प्रकरणातील कार्यपद्धती चुकीची असल्यामुळे याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, इतर नियमबाहय बाबी व्याजदर आकारणी व समायोजनाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व याप्रकरणी जबाबदारी निश्चित करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(अ) एकूण १२४ प्रकरणामध्ये गुंतलेल्या रक्कम रू.१,०९,८१,९८० पैकी रक्कम रुपये ३५,७३,१७६ वसुल करण्यात आली आहे. तसेच रक्कम रू. ३०,९२,२८४/-ही वसुलीची आवश्यकता नसलेली रक्कम असल्याचे निष्पन्न झाले आहे. उर्वरीत वसूलपात्र रक्कम रु.४३,१६,५२०/- ची वसुलीची कार्यवाही सुरू आहे. यांपैकी रक्कम रू. २५,६८,९४२/- ही न्यायप्रविष्ट प्रकरणात गुंतलेली आहे.

(ब) अग्रिम रक्कम देण्याच्या पद्धतीबाबत :

सदर प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे. अग्रिमाची कार्यपद्धती नियामानुसार आहे. खाली नमूद केलेल्या पद्धतीनुसार अग्रीम देण्यात येते.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ नियम १८८(४) नुसार (बांधकाम विभागामार्फत) अग्रिम देताना जिल्हा परिषदेच्या सभेची मान्यता घेऊनच अग्रिम अदा केले जाते.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ नियम २१० नुसार गट स्तरावर रु. ५००/- पर्यन्त, विभाग अध्यक्षांना रु. १०००/- पर्यन्त व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना इतर बाबतीत पूर्ण अधिकार आहे. त्यांच्या मंजूरीने उक्त नियामान्वये अग्रिम अदा केले जाते.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ नियम २०८ नुसार नमुना ७९ मध्ये अग्रिम नोंदवही ठेवण्यात येते.

(क) अग्रिम वसुली व समायोजनाबाबत नियमबाह्यता नसून नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. वैद्यकीय अग्रीम सहा महिन्यांच्या मुदतीत समायोजित न झाल्यास, नियमानुसार भ.नि.नि.च्या प्रचलित व्याजदराने व्याजाची वसुली करण्यात येते. या व्यतिरिक्तच्या अग्रिमांवर व्याजाची आकारणी करण्यात येत नाही.

(ड) पंचायत राज समितीने केलेल्या सूचनाप्रमाणे याबाबत एक कार्यशाळा आयोजित करून सर्व संबंधितांना मार्गदर्शन करण्यात आले आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-७) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

सन २०१२-२०१३ या वर्षात सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समितींमध्ये रोखवही व तसलमात नोंदवही, इतर बाबी (भविष्यनिर्वाह निधी) मध्ये अनियमितता व नियमबाहय बाबी लेखापरिक्षणावेळी आढळून आल्या आहेत. जिल्हा परिषद सोलापूर, बांधकाम विभाग यांचेकडील सन २०१२-२०१३ चे लेखापरिक्षण कालावधीत तसलमात नोंदवहीची पडताळणी केल्यानुसार रक्कम रुपये ५,५४,१०३/- अग्रिमधन प्रलंबित दर्शविण्यात आले होते, पैकी रूपये ३,९९,३२३/- एवढया रकमेची वसूली करून अग्रिम समायोजन केलेले असल्यामुळे उर्वरित रक्कम रूपये १,५४,७८०/- अग्रिमधन समायोजन करणेसाठी संबंधितांकडून वसुलीसाठी कारवाई करण्याचे नियोजन आहे. तसेच दिनांक ३१ मार्च, २०१३ अखेर खातेप्रमुखांना दिलेल्या एकूण रूपये ४०,२२,८९४.६६/- या अग्रिम रकमेपैकी दिनांक ५ जानेवारी, २०१८ अखेर रूपये १२,९४,६२५.६६/- एवढी रक्कम वसूल

करण्यात आली आहे. सद्यःस्थितीमध्ये प्रलंबित असणाऱ्या अग्रिमातील रक्कम रूपये २७,२८,२६९/- पैकी आरोग्य विभागाची रक्कम रूपये ९,७७,९०१/- न्याय प्रविष्ठ बाब असल्यास मा.न्यायालयाच्या निर्णयास अधीन राहून वसुलीसंदर्भात पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे व येत आहे. तसेच सोलापूर जिल्हा परिषदेच्या भविष्यनिर्वाह निधी विभागाची रक्कम शिल्लक असल्यास सदर रक्कम संबंधितांना अदा करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे.

उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे समितीने सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, जिल्हा परिषदेकडून देण्यात येणारी अग्रिम रक्कम कोणत्या लेखाशीर्षाखाली दिली जाते यावर जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांना समाधानकारक उत्तर न देता आल्याप्रकरणी समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. सोलापूर जिल्हा परिषदेने १५ बाबींमध्ये रूपये ५.५४ लाख अग्रिम दिलेला होता त्यांपैकी रूपये ३ लाख ९९ हजार रूपये वसूल झाले आहेत. उर्वरित रूपये १,५४,७८०/- एवढया रकमेचे समायोजन करावयाचे बाकी आहे तसेच एकूण १२४ प्रकरणांमध्ये १ कोटी ९ लाख ८१ हजार ९८० रूपये एवढी वसूलपात्र रक्कम होती त्यापैकी दिनांक ७ फेब्रुवारी,२०१८ रोजी पर्यंत रूपये ३५ लाख २१ हजार ७५३ रूपये वसूल करण्यात आले आहेत. उर्वरित रूपये ७४ लाख ६० हजार २२७ एवढी रक्कम वसूल करणे बाकी आहे.

याबाबत समितीचे असे मत आहे की, जिल्हा परिषदेनी रक्कम वसुली केली ही चांगली गोष्ट आहे. परंतु अग्रिम रकमेबाबत परस्पर होणारे व्यवहार यापुढे होता कामा नयेत याकरिता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या खात्यामध्ये जेवढा पैसा आहे तो खर्च करण्याचे अधिकार त्या त्या समितीला किंवा सर्वसाधारण सभेला (जनरल बॉडीला) आहेत यासाठी संबंधित समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे याबाबतची कार्यपद्धती अधिकाऱ्यांना अवगत होण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेने एक कार्यशाळा आयोजित करावी लेखासंहितेचे दैनंदिन कामकाजामध्ये पालन होणे अत्यंत आवश्यक आहे. अग्रिम रकमेबाबतची प्रस्तुत प्रकरणातील कार्यपद्धती चुकीची असल्यामुळे याबाबत सखोल चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

**सन २०१२-२०१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी यामध्ये पंचायत समितीतील नियमबाह्य बाबी असून अखेरची शिल्लक व आरंभीची शिल्लक यामध्ये तफावत आढळून आलेली आहे, त्यामुळे सदरहू मुद्याबाबत सखोल चौकशी करावी व याची नेमकी कारणे शोधून काढावीत तसेच व्याजदर आकारणी व समायोजनाबाबतची सखोल चौकशी करून अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे व चौकशीनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत समितीला सादर करण्यात यावा.**

## प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, सोलापूर

## लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणेबाबत.

**(१) परिच्छेद क्रमांक ३.२९/(७) (सन २०१२-१३)**

**पर्यावरण ग्रामसमृद्धी योजना प्रसिद्धीसाठी होर्डींग तयार करणे :-**

जिल्हा परिषद, सोलापूर सन २०१२-२०१३ २५१५१६७७ या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०१२-२०१३ मध्ये रुपये १,५४,४२४/- खर्च करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :–

(१) पुरवठा आदेशातील अट क्रमांक ५ व ६ नुसार पर्यावरण ग्रामसमृद्धी योजना अंतर्गत प्रथम व द्वितीय वर्षामध्ये पात्र ३९० ग्रामपंचायतींमध्ये पर्यावरण संतुलित ग्रामसमृद्ध योजना व्यापक प्रचार प्रसिद्धीसाठी योजनेची माहिती दर्शविणारे फलक होर्डींग तयार करणेसाठी रुपये ३८८/- प्रतिनग प्रमाणे एकूण रक्कम रुपये १,५४,४२४/- एवढ्या रकमेच्या पोहोच पावत्या गट विकास अधिकारी व पंचायत समिती लिपिक (संग्रारोहयो) यांची पोहोच पावतीशिवाय पुरवठादारास नियमबाह्य देयक अदा केलेले आहे.

(२) पंचायत समितींकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आलेली नाहीत.

(३) पुरवठा आदेशातील अट क्रमांक ३ नुसार अदा केलेल्या देयक रक्कम रुपये १,५४,४२४/- एवढ्या रकमेवर २.३०% आयकर रक्कम ३,५५१/- कपात करून शासनास भरणा केलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :–**

पर्यावरण ग्रामसमृद्धी योजना अंतर्गत प्रचार प्रसिद्धी अंतर्गत योजनेचे अंमलबजावणीबाबत दिलेल्या सुचनेनुसार होर्डींग तयार करण्यासाठी शासन दरकरार अन्वये कार्यवाही केलेली आहे.

(१) पुरवठा आदेशातील अट क्र.५ व ६ नुसार सर्व तालुक्यांकरीता साहित्य पुरवठा पंचायत समितीकडे सुपूर्द करून त्याचे डिलेव्हरी पोहोच सादर केले नंतरच देयके अदा केलेली आहेत.

(२) गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडे साहित्य प्राप्त झालेनंतर साहित्य संबंधित ग्रामपंचायतींना वाटून उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

(३) पुरवठा आदेश क्र.३ नुसार सन २०१२-१३ मध्ये आयकर विभागाकडील परिपत्रक क्र.५/२०१०, दिनांक ३ जून, २०१० नुसार कलम १९४सी अन्वये निश्चित केलेल्या दरानुसार देयकातून २% आयकर रक्कम रुपये ३०८९/- कपात केलेले असून सदर देय रक्कम भरताना ग्रामपंचायत विभागाकडील दुसऱ्या देयकामधील आयकर रक्कम रुपये ३७५ असे एकत्रित एकूण रक्कम रुपये ३४६४ आयकर चलनाने भरलेला आहे.

**(२) परिच्छेद क्रमांक ३.३१/(२४) (सन २०१२-१३)**

**व्यायामशाळा बांधकाम व व्यायामशाळा साहित्य खरेदीबाबत :-**

(१) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय जिवायो. १०००७/प्र.क्र.३९/का-१४४४, दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे सदर काम १ किंवा २ वित्तीय वर्षामध्ये पूर्ण करणे बंधनकारक असताना सन २०१० ते २०११ मधील योजनेचा खर्च सन २०१२-१३ मध्ये करण्यात आला आहे.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय/२०१०/२७५/ प्र.क्र.१७२/पंरा-१९ ऑक्टोबर, २०११ नुसार ज्या वस्तु/साहित्य सेवा पुरवठ्यासाठी शासनदर करार नाहीत अशा रुपये १ लाखापेक्षा जास्त रकमेच्या वस्तुंची खरेदी दिनांक ०१ जानेवारी, २०१२ पासून ई-टेंडरींग द्वारे करणेचे असताना जिल्हा परिषदेने निविदा मागून साहित्य खरेदी केलेले आहे.

(३) व्यायामशाळा पुर्णत्वाचे दाखले सन २०१२-१३ अखेर प्राप्त न झालेमुळे व्यायामशाळा साहित्य कोणत्या ठिकाणी बसविण्यात आले याची ग्रामपंचायतनिहाय माहिती दप्तरी उपलब्ध नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :**

(१) व्यायाम शाळा योजना ही जिल्हा नियोजन मंडळाच्या नाविन्य पूर्ण योजनेंतर्गत घेण्यात आली. सदर कामासाठी सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात दिनांक ३० मार्च, २०११ रोजीच्या आदेशानुसार ४३.१९ लक्ष रुपये निधी प्राप्त झाला. तसेच २०११-१२ या आर्थिक वर्षात दिनांक २५ ऑक्टोबर, २०११ च्या निधी वितरण आदेशाद्वारे रक्कम रुपये ३६.८१ लक्ष रुपये निधी प्राप्त झाला. १४ ग्रामपंचायतींना व्यायामशाळेसाठी सदर निधी

वेळेवर वितरित करण्यात आला होता. परंतु सुगाव (खु.) ता.पंढरपुर व खंडोबाचीवाडी ता. मोहोळ या ठिकाणी वाळूची टंचाई असल्यामुळे व्यायामशाळेचे बांधकाम वेळेत होऊ शकले नाही. सदरचा निधी हा सन २०१२-१३ मध्ये खर्च झाल्याने त्यानुसार व्यायामशाळा बांधकामाचे पुर्णत्वाचे दाखले घेण्यात आलेले आहे.

(२) व्यायाम शाळा बांधकामाचे क्रीडा विभागाने ई निविदा करून तयार केलेल्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी केलेल्या ई निविदेच्या शासन दरकरार नुसार क्रीडा साहित्याचे खरेदी करण्यात आलेली आहे. त्यानुसार व्यायामशाळेमध्ये साहित्य बसविण्यात आल्याचे छायाचित्रे जोडण्यात आले आहे.

(३) व्यायामशाळा बांधकामाचे पूर्णत्वाचे दाखले घेण्यात आलेले आहेत. सोबत फोटो व पूर्णत्वाचे दाखले आहेत. सदर माहिती ग्रामपंचायतीच्या दफ्तरी उपलब्ध आहेत.

**(३) परिच्छेद क्रमांक ३.३२/(२५) (सन २०१२-१३)**

**पर्यावरण ग्रामसमृद्धी योजना ग्रामपंचायतीस अनुदान अदाईबाबत :-**

जिल्हा परिषद, सोलापूर सन २०१२-१३ मध्ये २५१५-१६७७ या लेखाशिर्ष शासन निर्णय पर्यावरण ग्रामसमृद्धी योजना दिनांक १८ सप्टेंबर, २०१० नुसार पहिल्या व दुसऱ्या वर्षाच्या निकषाप्रमाणे पात्र ठरलेल्या ग्रामपंचायतींना एकूण रक्कम रुपये ६,२३,२०,६२०/- अनुदान मंजूर करून आरटीजीएसद्वारे ग्रामपंचायतींना वितरीत करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) अक्कलकोट तालुक्यातील - मंगरुळ, चुंगी, कर्जाळ, दक्षित सोलापूर - औज, आचेगाव, टाकाळी उत्तर सोलापूर तालुक्यातील - कडलास, व पंढरपूर तालुक्यातील - पुळूज या ग्रामपंचायतींची सन २०१०-११ व सन २०११-१२ मधील करमागणी वसुली व थकबाकी, ग्रामपंचायतीची करवसुली टक्केवारी, वृक्षलागवडीसंदर्भात केलेली कार्यवाही संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान व यशवंत पंचायत राज अभियानमध्ये प्राप्त गुण केले नाहीत.

२) सन २०११-१२ मध्ये रुपये ४५,८२,५००/- व सन २०१२-१३ मध्ये रुपये ६,२३,२०,६२०/- एवढे अनुदान ग्रामपंचायतींना वितरीत करण्यात आलेले आहे. सदर अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र व विनियोग दाखले प्राप्त नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजने अंतर्गत शासन निर्णय दिनांक १८ ऑगस्ट, २०१० मधील मुद्दा क्र.११ नुसार तालुकास्तरावरील तपासणी व संनियंत्रण समितीने शिफारस केलेल्या व तदनंतर जिल्हास्तरीय समितीने तपासणी केलेल्या वरील शासन निर्णयानुसार निकष पुर्ण केलेल्या ग्रामपंचातीची शिफारस केलेल्या वरील शासन निर्णयानुसार निकष पूर्ण केलेल्या ग्रामपंचयतीची शिफारस जिल्हा परिषदेने केलेली आहे. सदर ग्रामपंयतीमध्ये परिच्छेदात नमूद १० ग्रामपंचायतींचा समावेश आहे. सदर ग्रामपंचायतीने शासन निर्णयामधील निकषाची पूर्तता केलेली आहे.

(२) शासन निर्णयात दिलेल्या दिलेल्या सुचनेनुसार ग्रामपंचायतीनी प्राप्त रकमेमध्ये सुचविलेली रोपवाटीका, वृक्षलागवड, अपर्यावरण स्वच्छता, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन व अपारंपारिक ऊर्जा विकास इ.कामे हाती घेतली आहे. सदर ग्रामपंचायतीकडून दिलेल्या रकमेचे बाबनिहाय खर्चाचे अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र पंचायत समितीस्तरावर उपलब्ध आहेत व गटविकास अधिकारी यांचेकडून पर्यावरण संतुलितविषयक कार्यक्रम राबविलेबाबत अहवाल व विनियोग दाखले घेण्यात आलेली आहेत.

**(४) परिच्छेद क्रमांक ३.१७१/(२५) (सन २०१२-१३)**

**जवाहरलाल नेहरु वसतीगृह दुरुस्तीबाबत :-**

" २२०२ जवाहरलाल नेहरु वसतीगृह दुरुस्ती " या लेखाशीर्ष अंतर्गत सन २०१२-१३ मध्ये रुपये ५०,००,०००/- खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :–

(१) सदर कामाची मोजमाप नोंदवही, मुल्यांकन दाखले काम पुर्णत्वाचे दाखले, बांधकाम साहित्याची साठा नोंदवही दप्तरी उपलब्ध नाही.

(२) सदर साहित्याचे गुणवत्ता चाचणी अहवाल उपलब्ध नाहीत.

(३) शासकीय कराच्या कपाती केलेल्या नाहीत.

(४) सदर काम अपूर्ण किंवा पूर्ण आहे समजून येत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जिल्हा परिषद सेस अंतर्गत जवाहरलाल नेहरु वसतीगृह दुरुस्ती खर्चासाठी तरतूद करण्यात आलेली होती. त्यानुसार दुरुस्तीसाठी एकूण रक्कम रुपये ५०,००,००० तरतूद करण्यात आलेली आहे.

(१) जवाहरलाल नेहरु वसतीगृह दुरुस्ती बाबतचे मोजमाप नोंदवही, मुल्यांकन दाखले, काम पूर्णत्वाचे दाखले, बांधकाम साहित्याची साठा नोंदवही बांधकाम विभागाकडे दफ्तरी उपलब्ध आहे.

(२) सदरहू साहित्याचे गुणवत्ता चाचणी अहवाल उप अभियंता, जिल्हा तपासणी (PMGSY) MRRDA सोलापूर यांचेकडून उपलब्ध करून घेण्यात आलेल्या आहेत.

(३) सदरहू देयकातून शासकीय नियमानुसार कराच्या कपाती केलेल्या आहेत.

(४) काम पूर्ण झाले असल्याचे काम पूर्णत्वाचे दाखले बांधकाम विभागाकडून घेण्यात आलेले आहेत.

**(५) परिच्छेद क्रमांक ३.५३५/(२) (सन २०१२-१३)**

**विक्रीकर रक्कम देयकातून कमी वजा केलेबाबत :-**

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे सन २०१२-१३ कामाचे देयके पारित करताना विक्रीकर कमी दराने कपात केल्याने एकूण रक्कम रूपये २६,३७,५५३/- इतका विक्रीकर कमी कपात केले आहे. **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग एक- मध्ये उप विभाग विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील दिनांक ४ एप्रिल २०१२ च्या अधिसुचनेनुसार अधिसूचना क्रविसआ (मुख्य) १/मुवक/२००५/९७, दिनांक २९ ऑगस्ट २००५ मध्ये सुधारणा करत असताना चार टक्के विक्रीकर ऐवजी पाच टक्के विक्रीकर कपात करण्यात यावा असे नमूद केलेले आहे. तरी आता कमी कपात विक्रीकराची रक्कम रूपये २६,३७,५५३/- त्वरित बसून करून शासन खाती भरणा करणे आवयक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये अदा केलेली कामांची देयके ही सन २०११-१२ व २०१२-१३ मध्ये मंजूर झालेली कामे आहे. सदर कामांची अंदाजपत्रके तयार करतांना शासनाचे अधिकृत सन २०११-१२ व २०१२-१३ चे जिल्हा मंजूर दर सूची नुसार (DSR) ४% इतक्या मुल्यवर्धीत कराची (विक्रीकर) तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे सन २०१२-१३ मध्ये विविध लेखाशिर्षक अदा केलेल्या कामांचे देयकामधून ४ऽ विक्रीकर वसूल करण्यात आलेली आहे व त्यानुसार सदर विक्रीकर रक्कमांचे धनादेश मा.विक्रीकर कार्यालयाकडून स्वीकारलेली आहेत. त्यामुळे सन २०१२-१३ मध्ये अदा केलेल्या देयकामधून परिच्छेदामध्ये नमूद कमी वसूल केलेली १% विक्रीकराची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

**(६) परिच्छेद क्रमांक ३.५३६/(३) (सन २०१२-१३)**

**उपकराची रक्कम देयकातून कमी वजा केलेबाबत :-**

जिल्हा परिषद सोलापूर सन २०१२-१३ ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे सन २०१२-१३ मध्ये विविध लेखा शिर्षा अंतर्गत खालील अदा करण्यात आलेल्या देयकातून उपकर कमी कपात केला आहे.

शासन परिपत्रक क्र.बीसीए/प्र.क्र.७८८/कामगार ७अ/दिनांक २१ ऑक्टोबर २००९ व CONSTRUCTION WORKS WELEFARE CESS ACT, १९९९ अन्वये १ टक्के उपकर देयकातून कपात करणे आवश्यक आहे. तरी कमी कपात करण्यात आलेल्या उपकराची रक्कम रू.३,०८,००४/- वसुल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

या कार्यालयाचे पत्रक्र/ग्रापापु/लेखस-१/६९/३३३, दिनांक ३१ जानेवारी, २०१५ क्र.८२७/ ३६१३ दिनांक २३ ऑक्टोबर २०१५ क्र.९९६/ ४१५५ दिनांक २९ डिसेंबर, २०१५ क्र.१६/५६ दिनांक ५ जानेवारी २०१६ क्र.३९/१९३ दिनांक १९ जानेवारी, २०१६ क्र.२१४ दिनांक ६ डिसेंबर २०१७ वरीलप्रमाणे उपकर वसुल करणेकरिता संबधितांना कळविलेले आहे. पत्राची छायांकित प्रत सोबत जोडण्यात आलेला आहे.

उपकराची रकम सोबत दिलेल्या तालुका निहाय तक्ता सोबत जोडण्यात आलेला आहे. त्यानुसार ३,०८,००४/- इतकी रक्क्म वसुल करण्याची कार्यवाही चालु आहे.

**(७) परिच्छेद क्रमांक ३.५३७/(९) (सन २०१२-१३)**

**कडलास ता.सांगोला येथे तात्पुरती नळ पाणीपुरवठा योजना करणेबाबत :—**

जिल्हा परिषद, सोलापूर सन २०१२-१३ परिच्छेद क्र.०९ टंचाई निवारणा शिर्षा अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेकरिता रुपये ९,९९,१३४/- खर्च करण्यात आले आहेत याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) प्रशासकीय मंजूरी आदेशानुसार दिनांक १६ एप्रिल, २०१२ मधील अटीप्रमाणे सदरचे काम हे १० दिवसांत पूर्ण करण्यात आले नाही.

(२) मख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्र. जिपसो/साप्रवि/कार्या-२/८७५/१२, दिनांक ३ नोव्हेंबर, २०११ अन्वये काम मुळ मुदतीत न झाल्याने २००% पेक्षा मुदतीसाठी निविदा रक्कमेवर २५% दंड रुपये २,४,९७८/- आकारणी करण्यात आली नाही. तरी रुपये २,४,९७८/- अंतिम अमान्य करणे आवश्यक आहे.

(३) मोजमाप नोंदवही क्र.५५३३ लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) मौजे कडलास ता.सांगोला येथील तात्पुरती नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामास जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडून प्रशासकीय मंजूरी क्र.३२५, दिनांक १६ एप्रिल २०१२ अन्वये मिळालेली होती सदर कामास तांत्रिक मान्यता रुपये १३९/- सन २०११-१२ अन्वये देण्यात आलेली होती. सदर कामाची निविदा प्रक्रिया करणे कामी संबधित ग्रामपंचायत स्तरावरून निविदेसाठी कागदपत्राची पूर्तता वेळेत केलेली नसल्याने सदर कामास कार्यारंभ आदेश देण्यात विलंब झालेला आहे.

(२) कामास कार्यारंभ आदेश क्र.२, दिनांक १९ मे, २०१२ रोजी नुसार पारित केलेले असून काम अंतिम करणेसाठी दिनांक ३० जून, २०१२ म्हणजेच १ महिना १० दिवस इतका अवधी दिलेला होता. तथापि, सदर मुदतीच्या आत दिनांक ८ जून, २०१२ रोजी केवळ १९ दिवसांमध्येच काम पूर्ण केलेले आहे.

(३) सदर कामाच्या मुल्यांकनासाठी वापरण्यात आलेली मोजमाप पुस्तिका क्र.५५३३ मधील पृष्ठ क्र.८ ते ८८ छायांकित प्रति सोबत जोडण्यात आलेल्या आहेत. तसेच काम पूर्णत्वाचा दाखला जोडला आहे.

**(८) परिच्छेद क्रमांक ३.५३८/(११) (सन २०१२-१३)**

**घाटणे ता.माढा तिर्थक्षेत्र विकास योजना या लेखाशिर्षा अंतर्गत घाटणे ता.माढा तिर्थक्षेत्र विकास योजना :—**

पाईप लाईन या योजनेकरिता रुपये ४,७३,०००/- इतकी रक्कम तरतूद केलेली असतांना रुपये ४,६१,९६१/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १४८ अन्वये मक्तेदाराने कामाची मुळ मुदत संपणेपुर्वी किमान १५ दिवस अगोदर मुदतवाढ मागणी अर्ज सादर करणे आवश्यक असतांना विना दिनांकित पत्राद्वारे मुदत वाढीसाठी सादर केला आहे. तर नियमबाह्यपणे मुदतवाढ देण्यात आली आहे.

(२) सदर कामाचे देयकातून विमा १ टक्के रुपये ४६४९/- कपात केलेले नाही. तरी रुपये ४६४९/- वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

(३) शासन आदेश क्र.स्थाविका/२००३/प्र.क्र.३६९/- १२२५, दिनांक २८ नोव्हेंबर, २००३ अन्वये कामाच्या ठिकाणी कामाच्या नावाचा फलक दर्शनी भागात लावून त्याचे फोटो बांधकाम कागदपत्र संचिके सोबत जोडण्यात आले नाही.

(४) पाईपचे चाचणी तपासणी अहवाल प्राप्त न करता कामावर वापरण्यात आले आहेत.

(५) पाईप लाईन करणे व जमिनीवरील टाकी बांधकामामध्ये कॉक्रीट करणे या कामात वापरणेत आलेल्या गौण खनिजाचे वसुली करणेत आलेली नाही. याबाबत गौण खनिजाचे परिणाम गणती करून रुपये ७०.६८ प्रमाणे गौण खनिज वसूल होणे आवश्यक आहे.

(६) सदर कामाचे अंदाजपत्रकातील संकल्पीत रेखाचित्रावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शकात नमूद केलेप्रमाणे ठेकेदार संस्थेकडून मुदतवाढीच्या मागणीनुसार ठेकेदार यांना दंडाची रक्कम देयकातून वसूल करण्यात आलेली आहे. वेळेत मुदतवाढीचा अर्ज घेणेबाबत दक्षता घेत आहोत.

(२) कामाच्या विम्याची रक्कम संबंधिताकडून वसूल करून शासन विमा कंपनीस जमा केलेली छायांकित प्रत सादर केली आहे.

(३) कामाचे फलक लावण्याची यापुढे दक्षता घेत आहोत.

(४) सदर पाईप लाईन वापरण्यापूर्वी कार्यकारी अभियंता यांनी पाईप तपासणी केल्या नंतरच वापरण्यात आलेले आहे. सदरची योजना सध्या कार्यान्वीत असून कोणतीही दुरुस्ती सदर कामावर झालेली नाही. त्यामुळे वापरणेत आलेले साहित्य हे ISI जैन कंपनीचे असून त्याची नोंद मोजमाप नोंदवहीमध्ये घेणेत आली आहे. सोबत मोजमाप नोंदवही छायांकित प्रत सादर केली आहे.

(५) पाईप लाईन करणेच्या कामामध्ये गौणखनिज वापरणेत येत नाही. टाकीचे कामामध्ये वापरणेत आलेल्या गौणखनिजाचे परिमाणची गणती करून आवश्यक रक्कम रुपये १०६०/- वसुल करून चलनाची छायांकित प्रत सोबत सादर केली आहे.

(६) सदर कामाचे संकल्पीत रेखाचित्रावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी घेणेत अनवधानाने राहिले आहे.

**(९) परिच्छेद क्रमांक ३.५३९/(१२) (सन २०१२-१३)**

**मौजे रोपळे (बु.) ता.माढा येथे तात्पुरती नळ पाणीपुरवठा योजना करणेबाबत :—**

जिल्हा परिषद, सोलापूर सन २०१२-१३ (परिच्छेद क्र.१२) टंचाई निवारण या लेखाशिर्षा अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेकरिता रु.३,८८,९३९ इतकी रक्कम तरतूद केलेली असताना रु.२,७३,९४८/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

(१) जिल्हाधिकारी यांचे प्रशासकिय आदेश दिनांक २१ मे, २०१२ मधील अटीप्रमाणे सदरचे काम हे १ महिन्याचे आत पूर्ण करण्यात आलेले नाही.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प.क्र. जिपसो/साप्रवि-१/कार्या-२/८७५/११, दिनांक ३ नोव्हेंबर, २०११ अन्वये काम मुळ पद्धतीत न झाल्याने १०० ते १२५ टक्केपर्यंतच्या मुदतवाढीसाठी निविदा रकमेवर १.२५ टक्के दंड रुपये ८६२/- आकारणी करण्यात आला नाही.

(३) मोजमाप नोंदवही क्रमांक १६७० लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

(४) सदर कामाचे अंदाजपत्रक रूपये ३,८८,९३९/- चे असताना खर्च रूपये २,७३,९४८ म्हणजेच १० टक्के पेक्षा कमी खर्च करण्यात आला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडून प्रशासकिय मंजूरी मिळाले नंतर ग्रामपंचायती कडून निविदेस आवश्यक असणारे कागदपत्रे या कार्यालयास सादर करणेस विलंब झाल्याने सदर कामास दिनांक २७ जुलै, २०१२ रोजी कार्यारंभ आदेश दिलेला आहे.

(२) दिनांक दिनांक २७ जुलै, २०१२ रोजी कार्यरंभ आदेश दिलेला आहे. सदर कामास दिनांक ३१ जुलै, २०१२ पर्यंत काम पूर्ण करणेचे मुदत दिलेला आहे त्यानुसार सदरचे काम दिनांक ३० जुलै, २०१२ रोजी पूर्ण झालेले आहे. त्यामुळे सदरचे काम दिलेल्या मुदतीतच पूर्ण झाल्याने दंड वसूल केले नाही.

(३) लेखा परिक्षणाचे वेळी मोजमाप नोंदवही ही दुसऱ्या कामाचे देयकासाठी विभागीय कार्यालयास सादर करणेत आली होती. त्यामुळे सदरची मोजमाप नोंदवही लेखा परिक्षणास सादर करता आली नाही. मोजमाप पुस्तिकेची छायांकित प्रत जोडली आहे.

(४) सदरचे काम टंचाईचे असलेने सदर कामाचे अंदाजपत्रकानुसार व प्रत्यक्ष होणाऱ्या कामानुसारच कामाचे मुल्याकंन करणेत आलेले आहे. आवश्यक बाबीनुसार खर्च करण्यात आलेला आहे.

**(१०) परिच्छेद क्रमांक ३.५४०/(१३) (सन २०१२-१३)**

**उपळई (खु.) ता.माढा येथे अंतर्गत पाणीपुरवठा पाईप लाईन बाबत :-**

खासदार निधी या लेखाशिर्षा अंतर्गत पाणीपुरवठा पाईपलाईन योजने करीता रुपये ९,९९,६२०/- इतकी रक्कम तरतूद केली असताना रुपये ९,६१,३७२ खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) सदर कामाचे अंतिम देयक रुपये ९,६१,३७२ असून त्यामधून विमा १% म्हणजे रुपये ९,६१४/- कपात करणे आवश्यक आहे. परंतू देयकातून ६,०३० कपात करण्यात आलेले आहे. तरी उर्वरित रक्कम रुपये ३,५८४/- कपात करणे आवश्यक आहे.

(२) शासन आदेश क्र.स्थाविका २००३/प्र.क्र.३६९/का-१२२५, दिनांक २८ नोव्हेंबर, २००३ अन्वये कामाच्या ठिकाणी कामाच्या नावाचा फलकदर्शनी भागात लाऊन त्याचे फोटो बांधकाम कागदपत्र संचिके सोबत जोडण्यात आलेले नाही.

(३) पाईपलाईन व स्लूस व्हॉल्व बसविणे या वाढीव कामाचे परिणामाबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ११८(३) अन्वये संक्षम प्रधिकाराची मंजूर न घेता वाढीव काम करण्यात आलेले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) ठेकेदार संस्थेकडून विमा १ टक्के यामधील उर्वरित रक्कम रुपये ३५८४/- रक्कम विमा कंपनीस दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी डीमांड ड्राफ्टने भरणा केलेले आहे. शासन सदरी जमा करून छायांकित प्रत सोबत सादर केली आहे.

(२) कामाची माहिती दर्शविणारे फलक लावणेची यापुढे सदरची दक्षता घेत आहोत.

(३) सदर कामामध्ये पाईपलाईनचे काम वाढले असलेने स्लुस व्हॉल्वची संख्या वाढलेली आहे. वाढीव कामासाठी सक्षम अधिकाऱ्यांची मंजूरी घेऊनच काम करणेत आलेले आहे. सोबत निरीक्षण टिपणी सादर केले आहे.

**(११) परिच्छेद क्रमांक ३.५४१/(१४) (सन २०१२-१३)**

**मौजे जैनवाडी ता. पंढरपूर नळ पाणीपुरवठा योजना पाईपलाईन करणेबाबत :—**

जिल्हा परिषद, सोलापूर सन २०१२-१३ (परिच्छेद क्र.१४) टंचाई निवारण पाणीपुरवठा पाईपलाईन योजनेकरिता रु. ९,८९,१७१ इतके रक्कम तरतूद केली असताना रुपये ९,५३,३०६ खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) मोजमाप नोंदवही क्र.१६७७ लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाही.

(२) प्रशासकिय मान्यता अट क्र. ४ नुसार नळ पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र.टंचाई प्र.क्र.३४/पापु १४ दिनांक १३ सप्टेंबर, २००६ अन्वये ५% लोकवर्गणी रुपये ४७,६६५ भरणा करणे आवश्यक आहे.

(३) प्रशासकिय मान्यतेतील अट क्र.२ नुसार सदरचे काम १ महिन्याचे आत पूर्ण करण्यात आलेले नाही. काम २७ दिवस उशीराने पूर्ण करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्रक जिपसो/साप्रवि/कार्या-२/८७५/२०११ दिनांक ३ नोव्हेंबर, २०११ अन्वये काम उशीरा पूर्ण ७५% ते १००% पर्यंत मुदतवाढीसाठी निविदा रक्कमेवर १% दंडाची रक्कम रुपये ९,८९२/- आकारणी करण्यात आली नाही.

(४) स्लूस व्हॉल्वह बसविणे या वाढीव कामाचे परिणामाबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ११८(३) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी न घेता वाढीव काम करण्यात आले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आलाः—**

(१) मोजमाप नोंदवही क्र. १६७७ ची मूळ मोजमाप नोंदवही वरिष्ठ कार्यालयास बीलासाठी सादर करणेत आली होती म्हणून मूळ मोजमाप नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करून देता आलेली नव्हती सदर मूळ मोजमाप नोंदवहीची झेरॉक्स प्रत साक्षांकित करून सोबत जोडून सादर करीत आहे.

(२) सदर योजनेची निविदा रक्कम रुपये ९,८९,१७१ इतकी असून झालेल्या कामाचे अंतिम मुल्यांकन रुपये ९,५३,३०६ इतकी झाली आहे. सदर मुल्यांकन मधून ५% लोकवर्गणी रुपये ४७,६६५ इतका वजा करून रुपये ९,०५,६४१ इतकी रक्कम योजनेवर खर्च झालेला आहे. योजनेचे काम स्वतः ग्रामपंचायतीने बी-१ निविदा द्वारे असल्याने ५% लोकवर्गणीची रक्कम ठेकेदारास अदा करण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही. ग्रामपंचायत स्वतः हे काम करत असल्याने लोकवर्गणीच्या रक्कमे इतके श्रमदान करण्यात आले असून तसा दाखला सोबत जोडला आहे.

(३) सदर कामास दिनांक ४ मे, २०१२ रोजी प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाल्यानंतर ग्रामपंचायतीच्या नावे बी-१ निविदा तयार करून त्यास दिनांक १२, जून २०१२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. त्यानंतर सदर काम दिनांक ३० जून, २०१२ रोजी पूर्ण करण्यात आले. कार्यारंभ आदेश दिल्यानंतर  सदरचे काम एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात आलेले आहे. सोबत पूर्णत्वाचा दाखला सोबत जोडला आहे.

(४) कामाच्या मुळ अंदाजपत्रका मध्ये १ स्लुस व्हॉल्व्ह बसविण्याची तरतूद होती परंतू प्रत्यक्ष आवश्यकता नसल्याने बसविण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर बाबीमध्ये वाढ झालेली नाही.

**(१२) परिच्छेद क्रमांक ३.५४२/(१६) (सन २०१२-१३)**

**मौजे माळखांबी पाण्याची उंच टाकी करणेबाबत :—**

जिल्हा परिषद, सोलापूर सन २०१२-१३ (परिच्छेद क्र.१६) आमदार निधी या लेखाशिर्षा अंतर्गत माळखांबी पाण्याची द.उंच टाकी करणे योजनेकरिता रक्कम रुपये १०,००,०००/- इतकी रक्कम तरतूद केली असून रुपये ९,४१,६५३/- खर्च करण्यात आले आहे.

(१) शासन आदेश क्र.स्था.वि.का.२००३/प्र.क्र.३६९/का-१२२५, दिनांक २८ नोव्हेंबर, २००३ अन्वये कामाच्या ठिकाणी कामाचा नावाचा फलक दर्शनी भागात लावून त्याचे फोटो बांधकाम कागदपत्र संचिके सोबत जोडण्यात आलेले नाही.

(२) सिमेंट, सळई व खडी या साहित्याची तपासणी अहवाल नाही.

(३) गौण खनिज वापराचे विवरणपत्रनुसार ४३ घनमीटर गौण खनिज वापरण्यात आले असून त्याचे रुपये ७०.६८ प्रती घनमीटर रुपये ३१२६/- वसूल करणे आवश्यक असताना ३६३५/- प्रती घनमीटर प्रमाणे रुपये १५६३/- वसूल करण्यात आले आहेत तरी उर्वरित रुपये १५६३/- वसूल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :–**

(१) ग्रामपंचायत माळखांबी यांनी बोर्ड बसविलेला आहे. त्याचे छायाचित्र सोबत जोडले आहे.

(२) सिमेंट, सळई व खडी या साहित्याचे तपासणी करून तपासणी अहवाल सोबत जोडलेला आहे.

(३) गौण खनिज कमी वसूल झालेली रक्कम १५६३/-भरणा करून भरणा केलेल्या चलनाची प्रत सोबत जोडलेली आहे.

**१३) परिच्छेद क्रमांक ३.५४३/(१८) (सन २०१२-१३)**

**बोरामणी महादेव मंदिर येथे पाणीपुरवठा करणेबाबत :-**

जिल्हा परिषद, सोलापूर सन २०१२-१३ (परिच्छेद क्र.१८) तीर्थक्षेत्र विकास योजना या लेखाशिर्षा अंतर्गत बोरामणी महादेव मंदिर येथे पाणी पुरवठा करणे रुपये २,५०,०००/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) सदर कामात ६० मीटर बोअर घेण्यात आलेले असताना १६२ मी लोखंडी पाईप वापरण्यात आले आहेत. तरी १०२ मी जादा वापरण्यात आलेल्या पाईपचे दर ३५९/- प्रती मीटर प्रमाणे रुपये ३६,६१८/- वसूल होणे आवश्यक आहे.

(२) बोअर पंपासाठी २२० मी केबल वापरण्यात आलेले आहेत बोअर ची खाली ६० मी असून पंप पूर्ण खोलीवर सोडले असे गृहित धरून ६० मी. केबल व बोअरच्या वरती वीज कनेक्शन स्थानापर्यंतचे अंतर जास्तीत जास्त १० मीटर असे एकूण ७० मीटर केबल वापरणे आवश्यक असताना २२० मीटर वापरण्यात आले आहे त्यामुळे १५० मीटर(२२०-७०) जादा केबल चा वापर झालेले आहे. जादा वापर केबलचा दर रुपये १३६ प्रती मी प्रमाणे होणारी रक्कम रुपये २०,४००/-लेखा परिक्षणांत अमान्य करण्यात येत आहे.

(३) ग्रामपंचायतीकडून बोअर मारणेपूर्वी भूजल सर्वेक्षण विभागाकडे रुपये १,०००/- भरणा करून भूजल सर्वेक्षण करून घेतलेबाबत रक्कम पोचपावती नाही. त्यामुळे रुपये १०००/- वसूलात आणणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) सदर कामात ६० मीटर खालीचे बोअर घेण्यात आलेले आहे. सदर खोली प्रमाणेच ६० मी. लांबीचे पाईप वापरण्यात आलेले आहे. बोअर ते महादेव मंदिर अंतर १०२ मीटर वापरण्यात आलेली असल्याने एकूण पाईपची लांबी १६२ मीटर इतकी झालेली आहे. त्यामुळे पाईपची लांबी व बोअरची खोली यामध्ये एकूण १०२ मीटर पाईप वापरण्यात आलेले असल्याने यामध्ये कोणतीही वाढ झालेली नाही.

(२) बोअर जवळील थ्रीफेज कनेक्शन पासूनचे अंतर १६० मीटर आहे तसेच बोअरची खोली ६० मीटर असल्याने एकूण २२० मीटर लांबी वापरण्यात आलेली आहे.

(३) भुजल सर्वेक्षण आर रक्कम रुपये १०००/- संबंधित ग्रामपंचायती मार्फत भुजल सर्व्हेक्षण विकास यंत्रणा, सोलापूर येथे चलनाने भरलेली आहे. दिनांक ८ जानेवारी, २०१५ अन्वये भारतीय स्टेट बँक मध्ये भरलेले आहे.

**(१४) परिच्छेद क्रमांक ३.५४४/(२३) (सन २०१२-१३)**

**२२४५ नैसर्गिक आपत्ती निधी देयकामधून आयकर वजावट न केलेबाबत व इतर अनियमिततेबाबत :-**

जिल्हा परिषद, सोलापूर सन २०१२-१३ (परिच्छेद क्र.२३) २२४५ नैसर्गिक आपत्ती या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात आलेल्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) देयक पारीत करत असताना आयकर कायदा कलम १९४ सी (१) मधील तरतूदी अन्वये आयकराची रक्कम रुपये ७,८३,२९५/- कपात करून शासन सदरी भरणा केली नाही.

(२) सदर करारातील अट क्र.१ अन्वये १२ हजार लीटर पेक्षा कमी अथवा जास्त क्षमतेच्या टँकरने पुरवठा केलेल्या प्रतिदिनी कमीत कमी रुपये ५०००/- दंड आकारण्याची तरतूदत केली असताना तशी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही सदर करारातील अट क्र.६ अन्वये टँकरमध्ये इंधन भरण्याची जबाबदारी ही सदर ठेकेदाराची असताना सन २०१२-१३ या वर्षा मध्ये रुपये २२,११,०३५/- इतकी रक्कम इंधनापोटी आगाऊ देण्यात आलेली आहे तसेच सदर रक्कमेपैकी रुपये १९,५२,४२३/- चालू वर्षामध्ये वसूल करण्यात आलेली असून उर्वरित रुपये २,५८,६१२/- वसूल करण्यात आलेली नाही.

(३) रक्कम रुपये २,५८,६१२/- आगावू रक्कमेची नोंद तसलमात नोंदवहीत घेण्यात आलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

२२४५ नैसर्गिक आपत्ती निधी देयकातून आयकर वजावट न केलेबाबत व इतर अनियमिततेबाबत खालील प्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

(१) आयकराची रक्कम नजर चूकीने कपात करावयाची राहून गेली होती ती रक्कम पुढील देयकातून कपात करून शासन सदरी भरणा केली आहे. सोबत अवलोकनार्थ चलन व तालुकानिहाय वसुलपात्र रक्कम भरलेचा तक्ता सोबत सादर करण्यात आलेला आहे.

(२) जिल्हाधिकारी यांनी टँकर क्षमतेचे दर हे प्रति हजारी लि क्षमतेचे मंजूर केले आहे त्यामुळे त्या क्षमतेप्रमाणेच देयके अदा केली आहेत. त्यामुळे दंड आकारलेला नाही. सदर करारामधील अट क्र.६ अन्वये ठेकेदाराने इंधन भरण्याची जबाबदारी असल्याचे नमूद केले आहे. परंतु सदर कालावधी मध्ये टँकरची संख्या जास्त असल्याने मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचे आदेश क्र.राहियो/कार्या-१३/आर आर २-ब/३७३/१२ नुसार ठेकेदारास किमान डिझेल व चालकाचे वेतन यासारख्या आवर्ती खर्चासाठी टँकर पुरवठा धारकास अग्रीम देणे बाबतचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार त्यांना सदरच्या खर्चा पोटी सदर रक्कम अग्रीम म्हणून देण्यात आले आहे व त्याचे पुढील देयकातून सदर अग्रीमची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. त्याबाबत सन २०१२-१३ मध्येच तसा लेखा शक क्र.३८ देण्यात आलेला असून अग्रीम समायोजन केले याबाबतची कागदपत्रे वगळणेत आलेला आहे. सोबत अवलोकनार्थ लेखाशक वगळलेचे पत्र.

३) आगाऊ रक्कमेची नोंद तसलमात नोंदवहीला घेण्यात आली नाही. ती यापुढे तसलमात नोंदवही ठेवण्याची दक्षता घेत आहे.

**१५) परिच्छेद क्रमांक ३.१०६९ (४८) (सन २०१२-१३)**

**जिल्हा परिषदेचे लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :–**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविणेत येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समित्या यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवूनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायती समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखाबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविणेत आले आहेत.

| **जिल्हा परिषदेचे नाव** | **जिल्हा परिषदेचा विभाग** | **लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक** | **गुंतलेली रक्कम** |
|---|---|---|---|
| सोलापूर | आरोग्य | १५ | ४४ लाख |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०१२-१३ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी वाहन पुरवठाकरीता निविदा प्रक्रिया झाली नसलेने लेखापरिक्षणवेळी त्याबाबतचे अभिलेखे सादर केले नव्हते. सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात निविदा प्रक्रिया न करता सन २०११-१२ मध्ये निविदा प्रक्रिया राबविल्यानुसार त्याच मुख्य

कार्यकारी अधिकारी यांच्या मान्य टिपणीनुसार त्याच पुरवठा धारकास दिनांक २ मार्च, २०१२ च्या आदेशान्वये मुदतवाढ देणेत आली होती. सोबत आदेशाची प्रत जोडणे आली आहे. तसेच दिनांक २ मार्च, २०१२ ची मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मुदतवाढसाठीची मान्य टिपणीची प्रतही जोडण्यात आली आहे. सन २०११-१२ मधील निविदामधील मान्य दरानुसारच लेखाशिर्ष २२१०५०४१ खाली प्राप्त तरतुदीतून पुरवठा धारकास देयके अदा करणेत आलेली आहेत. त्यामध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही. दिनांक २७ नोव्हेंबर, २०१२ व दिनांक ११ डिसेंबर, २०१२ च्या उपसंचालक, पुणे यांचेकडील आदेशान्वये वाहने उपलब्ध झालेने निविदा प्रक्रिया झालेली नाही.

**१६) परिच्छेद क्रमांक ३.१०६९ (४७) (सन २०१२-१३)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविणेत येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समित्या यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवूनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायती समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखाबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविणेत आले आहेत.

| **जिल्हा परिषदेचे नाव** | **जिल्हा परिषदेचा विभाग** | **लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक** | **गुंतलेली रक्कम** |
|---|---|---|---|
| सोलापूर | सामान्य प्रशासन | ३० | – |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सामान्य प्रशासनन विभागाकडील सन २०१२-१३ चे लेखापरिक्षणावेळी जिल्ह्यातील एकूण ११ तालुक्यांमध्ये सन २००७-०८ ते सन २००९-१० अखेर १२८ घटक व आदेश ९० खालील ३४९३ घटकांचे लेखापरीक्षण झालेले नाही.

(१) ग्रामपंचायत लेखापरिक्षणाकरीता ग्रामपंचायत स्तरावर दप्तर उपलब्ध असून थकीत घटक (ग्रामपंचायत लेखापरिक्षण) निकाली काढणेबाबत संबंधित गटविकास अधिकारी/विस्तार अधिकारी (पं)/ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक यांना याबाबत मासिक सभेच्या वेळी विहीत कार्यक्रम राबवून, शिबीरे घेऊन प्रलंबित ग्रामपंचायत लेखापरिक्षण करून घेणेबाबत लेखी व तोंडी सुचना दिलेल्या आहेत. याबाबत गट विकास अधिकारी स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) या कार्यालयाकडून गटविकास अधिकारी कार्यालयास ९० खालील घटकांचे लेखापरिक्षण करणेबाबत पत्रव्यवहार करण्यात येवून सद्यःस्थितीत लेखापरिक्षण पूर्ण करणेबाबत उपाययोजना करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रलंबित घटकांचे दप्तर लेखापरिक्षणाकरिता उपलब्ध करून घेणेबाबत गटविकास अधिकारी कार्यालयाकडून संबंधित ग्रामसेवकांना पत्रव्यवहार करून लेखापरिक्षण करीता दप्तर उपलब्ध करून लेखापरिक्षण करणेबाबत सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

**(१७) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (३३) (सन २०१२-१३)**

**आदेश क्र.९० नुसार थकित घटकांच्या लेखा परिक्षणाबाबत :-**

पंचायत समिती, उत्तर सोलापूर कडील सन २०१२-१३ चे लेखापरीक्षणावेळी तालुक्यातील एकूण ३६ ग्रामपंचायतीकडील ३४ ग्रामपंचायतींचे सन २००७-०८ ते सन २००९-१० मधील लेखा परिक्षण पूर्ण झाले असून सन २००७-०८ ते सन २००९-१० मधील ६ घटकांचे लेखापरीक्षण प्रलंबित आहे. तसेच आदेश ९० खालील एकूण २३० घटकांचे लेखापरीक्षण प्रलंबित असून ही अत्यंत गंभीर बाब असून या बाबत संबंधित जबाबदाराकडून सदर खुलासा लेखापरीक्षणांस सादर करावा. सदर प्रलंबित २३० घटकांचे लेखापरीक्षणाबाबत संबंधित ग्रामपंचात विस्तार अधिकारी यांनी काय

विशेष प्रयत्न केले याबाबत सदर खुलासा लेखापरिक्षणास सादर करावा व जास्तीत जास्त घटक त्वरीत निकाली काढणेबद्दलचा कार्यक्रम आखूनन वारंवार पाठपुरावा करून सर्व घटक निकाली काढलेबाबत पुर्तता व अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती, उत्तर सोलापूर कार्यक्षेत्रातील एकूण ३६ ग्रामपंचायती आहेत. त्यापैकी ३४ ग्रामपंचायतींचे सन २०११-१२ पर्यंत लेखा परिक्षण पूर्ण झालेले आहे. उर्वरित २ ग्रामपंचायतींचे दप्तर लेखापरिक्षणासाठी देण्यात आलेले आहे. सन २००७-०८ ते सन २००९-१० मध्ये ५ ग्रामपंचायतींचे लेखा परिक्षण प्रलंबित होते. त्यापैकी मौजे राळेरास, कैठाळी व नान्नज या तीन ग्रामपंचातींचे लेखापरिक्षण पूर्ण झालेले आहे. तसेच उर्वरित दोन ग्रामपंचायतींपैकी मौजे होनसळ येथील तत्कालिन ग्रामसेवकावर प्रशासकीय कारवाई करण्यात आलेली आहे व हगलूर येथील सदर कालावधीतील ग्रामसेवकास सदरचे कालावधीमध्ये लेखा परिक्षण करून घेणेत बाबत वेळोवेळी नोटीस देण्यात आलेली आहे.

तसेच आदेश ९० खालील प्रलंबित २३० घटकांपैकी खालीलप्रमाणे तपशील देत आहे.

| अ.क्र. | बाब | ग्रामपंचायत/ग्रामसेवक | एकूण घटक |
|---|---|---|---|
| १) | महानगर पालिकेकडे वर्ग झालेले | १० | ४० |
| २) | सेवानिवृत्त ग्रामसेवक | १७ | ४० |
| ३) | मयत | २ | २ |
| ४) | दप्तर उपलब्ध आहे | - | २० |
| ५) | दप्तर उपलब्ध नाही | - | १३९ |

**१८) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (३४) (सन २०१२-१३)**

**पंचायत समितीने लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :-**

| जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| सोलापूर | मोहोळ | ११ | - |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०१२-१३ लेखा परिक्षणावेळी ६१ ग्रामपंचातींचे ६६४ घटकांपैकी १९९ घटकांचे लेखापरिक्षण झालेले असून ४६५ घटक शिल्लक आहेत.

| अ.क्र. | बाब | ग्रामपंचायत संख्या | घटक |
|---|---|---|---|
| १) | दप्तर उपलब्ध असलेले | २३ | ६३ |
| २) | दप्तर उपलब्ध नसलेले ह्यात ग्रामसेवक | २२ | २९४ |
| ३) | दप्तर उपलब्ध नसलेले पैकी संबंधित ग्रामसेवक मयत | ११ | ९१ |
| ४) | लेखा परिक्षण झालेले घटक | ५ | १७ |
| | एकूण | ६१ | ४६५ |

तरी उर्वरित घटकांचे लेखा परिक्षण करून घेणेची कार्यवाही सुरू आहे. दप्तर उपलब्ध असलेली घटकाचे लेखा परिक्षण करण्यासाठी स्थानिक निधी लेखा परिक्षण यांना पत्र देण्यात आले आहे.

**१९) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (३५) (सन २०१२-१३)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद /पंचायत समित्या यांना अर्धमास पत्राने अभिलेख्याचे मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ठ केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी

प्रस्तावीत केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळुन येते. वर नमुद केलेप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवून सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरण दाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखापरिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| **अ. क्र.** | **जिल्ह्याचे नाव** | **पंचायत समितीचे नाव** | **लेखा परिक्षण अहवाल परिच्छेद क्रमांक** | **रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ३३/३५ | सोलापूर | मंगळवेढा | १२ | — |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

उक्त शकात नमुद केलेल्या मुद्यांचे अनुपालन खालील प्रमाणे सादर करणेत येत आहे.

१) पंचायत समिती मंगळवेढा या गटाकडील ग्रामपंचायतीचे सन २००७-०८ ते २००९-१० अखेरचे १२ घटक व सन २०१०-११ ते २०११-१२ चे ४८ घटक असे एकूण ६० घटकाचे दप्तर लेखापरीक्षणांस उपलब्ध न केलेने प्रलंबित होते. सन २०१३-१४ मध्ये ६० घटकापैकी ३४ घटकांचे लेखापरीक्षण झालेले आहे.

२) सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षण, सोलापूर यांचेकडील पत्र क/स्था-१८ ब/ग्राप/प्रलंबित घटक/सोलापूर ७११ दिनांक ९ सप्टेंबर, २०१४ ने वरील पैकी २६ घटक प्रलंबित असलेचे कळविणेत आलेले आहे. सोबत सदर पत्राची छायांकीत प्रत अवलोकनार्थ सादर केलेली आहे. वरील प्रमाणे उर्वरित २६ घटकांचे लेखापरीक्षण सन २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये झालेले आहे. सोबत लेखापरीक्षण अहवालाच्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत अवलोकनार्थ सादर केलेली आहे.

३) गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी वेळोवेळी तपासणी केलेली आहे.

**२०) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (३६) (सन २०१२-१३)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद /पंचायत समित्या यांना अर्धमास पत्राने अभिलेख्याचे मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ठ केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावीत केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळुन येते. वर नमुद केलेप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवून सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरण दाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्या बाबत लेखापरिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत :–

| अ.क्र. | नियमबाह्य बाबींचे स्वरुप | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षण अहवाल परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ३६ | पंचायत समित्यांनी लेखा परिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे | सोलापूर | पंढरपूर | २२ | – |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) लेखापरिक्षणाच्या वेळीस या कार्यालयाकडील सन २००६-२००७ ते २०११-१२ अखेर एकूण ४२ घटक प्रलंबित होते त्यापैकी ३२ घटकांचे लेखापरिक्षण झालेले आहे. उर्वरित १० घटक प्रलंबित आहेत. याबाबत लेखापरिक्षणास दप्तर उपलब्ध करून घेणेबाबतची कार्यवाही चालू आहे.

(२) लेखापरिक्षणाच्या वेळेस आदेश क्र.९० अन्व्ये सन २००६-०७ पुर्वीचे थकीत असलेले एकूण ४५७ घटकांपैकी ११९ घटकांचे लेखापरिक्षण झालेले असून ३३८ लेखापरिक्षण घटक प्रलंबित आहेत. सन २००६-०७ पुर्वीचे आदेश क्र.९० उर्वरित ३३८ प्रलंबित घटकांबाबत या कार्यालयाकडून पाठपुरावा करून व नियोजन बद्ध कार्यक्रम आखून प्रलंबित घटकांचे लेखापरिक्षण करून घेणेची कार्यवाही पुढील प्रमाणे केलेली आहे :-

(अ) ०५ ग्रामपंचायतीमधील एकूण २० प्रलंबित घटकाचे ऑडीट पूर्ण झालेले असून लेखापरिक्षण अहवाल प्राप्त होणे बाकी आहे.

(ब) ०५ग्रामपंचायतीमधील एकूण ३१ प्रलंबित घटक लेखापरिक्षणासाठी उपलब्ध असून त्याबाबत स्थानिक निधी लेखा सोलापूर यांचेशी पत्रव्यवहार केलेला आहे.

(क) ११ ग्रामपंचायतीमधील एकूण ११४ प्रलंबित घटकाबाबत संबंधित असलेले ग्रामसेवक हे मयत असल्याने दप्तर उपलब्ध होणेस अडचणी येत आहेत.

(ड) २३ ग्रामपंचायतीमधील एकूण १७३ प्रलंबित घटकांबाबत ग्रामसेवक सेवानिवृत्त/बदली झालेली असल्याने लेखा परिक्षण उपलब्ध करून घेणेची कार्यवाही चालू आहे. सोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

(३) विस्तार अधिकारी (पं) गटविकास अधिकारी यांनी सदर ग्रामपंचायतची तपासणी करताना, लेखापरिक्षणासाठी उपरोक्त लिखीत दप्तरे उपलब्ध नसलेचे दिसून आल्यानंतर संबंधित ग्रामपंचायती, ग्रामसेवक यांना वेळोवेळी तोंडी सूचना लेखी नोटीस देऊन लेखा परिक्षणासाठी दप्तर उपलब्ध करून देणेबाबत कळविलेले आहे.

**(२१) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (३७) (सन २०१२-१३)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद /पंचायत समितया यांना अर्धमास पत्राने अभिलेख्याचे मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ठ केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावीत केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळुन येते. वर नमुद केलेप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवून सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरण दाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखापरिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवाल परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३७ | सोलापूर | सांगोला | १३ | – |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

शकात नमुद केलेप्रमाणे सन १९८९-९० ते जुलै, २०१३ अखेर एकूण २९ ग्रामपंचातीचे १८६ घटक थकीत होते या सद्यःस्थितीनुसार पंचायत समिती, सांगोला कडील एकूण २९ ग्रामपंचायतीचे सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा विभाग, सोलापूर यांचेकडील माहे जून, २०१७ च्या मासिक अहवालानुसार सांगोला गटातील २६ ग्रामपंचायती कडील १२१ लेखा घटकांचे लेखापरीक्षण प्रलंबित असल्याचे नमूद आहे. सदर लेखा घटकांचे अभिलेख तपासणी विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, सांगोला यांनी केली असता ३९ इतक्या लेखा घटकाचे लेखापरीक्षण झाल्याचे निदर्शनास येते. सोबत लेखा परीक्षणाचे पहिले पान व रोजकिर्द (लेखा परीक्षक स्वाक्षरीचे) पान अवलोकनार्थ सादर केलेली आहे.

ग्रामपंचायत गळवेवाडी जरोयो सन १९८९-९० ते १९९४-९५ घटक-६ व ग्रामपंचायत बागलवाडी १९८९-९० ते १९९०-९१ घटक-२ या कालावधीत या दोन्हीही ग्रामपंचायत अस्तित्वात नसल्याने उर्वरित ७४ घटकापैकी लेखा परीक्षण करावयाच्या लेखा घटकांचे अभिलेख त्या त्या ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध आहेत.

**२२) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (३८) (सन २०१२-१३)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद /पंचायत समितया यांना अर्धमास पत्राने अभिलेख्याचे मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ठ केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावीत केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळुन येते. वर नमुद केलेप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवून सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरण दाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्या बाबत लेखापरिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवाल परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३८ | सोलापूर | माळशिरस | १२ | – |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती माळशिरस सन २०१२-१३ चे लेखापरिक्षणात आदेश क्र.९० अन्वये माहे जून, २०१३ अखेरचा यादीनुसार एकूण २७ ग्रामपंचायतीचे १७५ घटकांचे लेखापरिक्षण थकीत असलेचे लेखापरिक्षण झालेले आहे. १० ग्रामपंचायतीचे ५८ घटकांचे दप्तर उपलब्ध असून लेखापरिक्षण होणे बाबत दिनांक ३० जानेवारी, २०१६ अन्वये स्थानिक निधी लेखा परिक्षण सोलापूर यांना कळविलेले आहे. उर्वरित १०७ घटकांपैकी ५७ घटकांचे दप्तर उपलब्ध न करून देणाऱ्या १२ ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांवर १७९ खाली कारवाई प्रस्थापित करण्याबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) जि.सोलापूर यांना दिनांक ८ मार्च, २०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. उर्वरित ७ ग्रामपंचायतीचे ४६ घटकांचे संबंधित ग्रामसेवक मयत आहेत. त्यांचे दप्तर उपलब्ध नाही.

**२३) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (३९) (सन २०१२-१३)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद /पंचायत समित्या यांना अर्धमास पत्राने अभिलेख्याचे मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ठ केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावीत केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळुन येते. वर नमुद केलेप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवून सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य

तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरण दाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्या बाबत लेखापरिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| **अ. क्र.** | **जिल्ह्याचे नाव** | **पंचायत समितीचे नाव** | **लेखा परिक्षण अहवाल परिच्छेद क्रमांक** | **रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ३८ | सोलापूर | करमाळा | ८ | – |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) पंचायत समिती, करमाळा कडील ग्रामपंचायतीचे सन २०११-२०१२ अखेर एकूण ८१ घटकांचे लेखापरिक्षण संबंधित ग्रामपंचायतींनी लेखापरिक्षण पथकास अभिलेख उपलब्ध न केल्यामुळे प्रलंबित होते. सदर प्रलंबित ८१ घटकांपैकी संद्य:स्थितीत १२ ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षणास दप्तर उपलब्ध करून देऊन ५७ घटकांचे लेखापरिक्षण करून घेण्यात आले आहे. उर्वरित २४ घटकांचे संबंधित ग्रामपंचायतीचे दप्तर उपलब्ध करून लेखापरिक्षण करून घेणेची दक्षता घेतली आहे. दप्तर उपलब्ध न केलेल्या ग्रामपंचायतीचे संबंधित सरपंच व ग्रामसेवक यांन कलम १७९ अन्वये अलहिदा नोटीस देण्यात आल्या आहेत.

(२) सन २०१२-१३ चे लेखापरिक्षण अहवालातील उपमुद्या क्र.२ मध्ये एकूण २४६ घटकांचे अभिलेखे संबंधित ग्रामपंचायतींनी उपलब्ध न केलेचे नमुद केले आहे. तथापि सन २०१२-१३ अखेर प्रत्यक्षात १०६ घटकांचे अभिलेखे संबंधित ग्रामपंचायतींनी उपलब्ध न केलेमुळे लेखापरिक्षण प्रलंबित होते. सदरचे एकूण १०६ घटकांपैकी सद्य:स्थितीत ५७ घटकांचे लेखापरिक्षण करून घेण्यात आले आहे. उर्वरित ४९ घटकांचे लेखापरिक्षण करून न घेतलेले संबंधित ग्रामसेवक यांचेवर कलम १७९ अन्वये कारवाई करण्याची कार्यवाही चालू आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील ज्या परिच्छेदांमध्ये "अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत" या संदर्भात आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत अशा प्रकरणात महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार दंडाची कार्यवाही तसेच दोषींवर एक वेतनवाढ रोखून त्याबाबतची नोंद त्यांचे सेवापुस्तकात घेण्याचे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सन २०१२-१३ या अहवाल वर्षात लेखा परिक्षणास कागदपत्र उपलब्ध करून दिले नसल्याप्रकरणी संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांचेवर समितीच्या निदेशानुसार महाराष्ट्र स्थानिक लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार दंडाची व एक वेतनवाढ रोखून तशी नोंद संबंधितांचे सेवापुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई केली आहे काय, त्यानुसार प्रकरण व परिच्छेदनिहाय अहवाल वर्षाची माहिती समितीस सादर करण्यात यावी.

(२) भविष्यात लेखा परिक्षणास अभिलेख उपलब्ध न करून देणे असे आक्षेप वारंवार उपस्थित होऊ नयेत याबाबत काटेकोर अंमलबजावणी करण्यासंदर्भात मंत्रालयीन विभागाकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

(३) संबंधित अधिनियमात दुरुस्ती करून रुपये ५०,०००/- दंड अथवा परिच्छेदातील एकूण रक्कमेच्या १०% इतकी रक्कम दंड म्हणून आकाराण्याची तरतुद करण्याची वित्त विभाग कारवाई करेल काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषदस्तरावरून दप्तर उपलब्ध न करणाऱ्या ग्रामसेवक व विलंबाने दप्तर उपलब्ध करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा व जिल्हा सेवा (शिस्त व अपील नियम, १९६४) नुसार नोटीसा देण्यात आल्या असून त्यांचेकडून खुलासा प्राप्त होताच त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.

स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० कलम ७ (१) (व सुधारीत अधिनियम, २०११ कलम ८) अन्वये स्थानिक निधी लेखा परीक्षा यांचेकडून अभिलेखे उपलब्ध न करणाऱ्या व्यक्तीवर कार्यवाहीचा प्रस्ताव मा. आयुक्त यांच्या लेखी परवानगीसाठी सादर करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-२०१७/प्र.क्र.३७/ कोषा-प्रशा-४ दिनांक १५ सप्टेंबर च्या परिपत्रकानुसार मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० मधील कलम ७ (सुधारीत अधिनियम २०११ मधील कलम ८) नुसार लेखापरिक्षणासाठी विहीत मुदतीत अभिलेखे उपलब्ध न झाल्यास दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव विभागीय संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा यांनी

विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करावा असे निर्देश आहेत. तद्‌नंतर आयुक्त यांच्या लेखी परवानगीनुसार मा.दिवाणी न्यायालयाच्या निकालान्वये दंडात्मक कार्यवाही करावयाची आहे. याबाबत स्थानिक निधी लेखा विभागाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-**

१) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

२) महालेखापाल व स्थानिक निधी लेखा परिक्षण सुरू असताना त्यांना लेखा परिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध न करून देण्यासाठी नोडल ऑफिसरची नियुक्ती करण्याबाबतच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना या विभागाच्या परिपत्रक क्र.लेखाप २०१३/(७/९३), वित्त-८ दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३ व परिपत्रक क्र. पंरास-२०१५/प्र.क्र.२८/वित्त-७ दिनांक ३० मार्च, २०१६ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

**अभिप्राय व शिफारशी**

सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत झालेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०१२-२०१३ च्या स्थानिक निधी लेखा परिक्षणाच्या वेळी लेखा परिक्षकांस ते तपासणी करीत असताना त्यांनी मागितलेली कागदपत्रे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी दाखविली नाहीत. अशा एकूण २३ परिच्छेदांमध्ये नोंदविलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रुपये २५०००/- इतकी दंडाची शास्ती तसेच एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांचे सेवापुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्याची शिफारस करून देखील काही अधिकारी या नियमास न जुमानता लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत.

समिती राज्यात अनेक ठिकाणी भेट देत असताना लेखा परिक्षकांना अभिलेखे संबंधित अधिकाऱ्यांकडून वेळीच उपलब्ध करून दिली जात नाही. त्यामुळे लेखापरिक्षण करता येत नाही. या बाबींचा फायदा संबंधितांकडून घेतला जातो हे टाळण्यासाठी सध्या अस्तित्त्वात असलेल्या दंडात्मक तरतुदीत बदल करणे आवश्यक आहे. सदर बाब विचारात घेता आता समिती अशी शिफारस करीत आहे की, **“जी कोणतीही व्यक्ती कलम ६ पोट-कलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये कायदेशिररित्या तिला केलेल्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणूनबुजून दुर्लक्ष करेल किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारेल ती विभागीय आयुक्तांपुढे सदर बाब सिद्ध झाल्यानंतर लेखा परिक्षणास उपलब्ध न झालेले दस्तऐवज/अभिलेख यामध्ये गुंतलेल्या एकूण रक्कमेच्या ५% किंवा रुपये ५०,०००/- यापैकी जास्त असणाऱ्या रक्कमे इतक्या दंडात्मक रकमेस पात्र ठरविण्यात यावी. तसेच त्यांची एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांच्या सेवा- पुस्तकामध्ये घेण्याची कारवाई करण्यात यावी”** अशी सुधारणा संबंधित अधिनियमात करण्यात यावी व करण्यात आलेल्या रकमेबाबतची माहिती समितीला कळविण्यात यावी.

ज्या प्रकरणांमध्ये अभिलेखे उपलब्ध करून न देणे याबाबत दंडात्मक कारवाई केलेली नाही, त्या प्रकरणांमध्ये दंड आकारणी करण्यात यावी. समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी केलेल्या अनुपालन अहवालामध्ये सदर अभिलेखे उपलब्ध असल्याचे स्पष्टीकरण केले आहे. मात्र सदर अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देणे आवश्यक होते. **सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये सन २०१२-२०१३ या वर्षामध्ये एकूण २३ परिच्छेदांसंदर्भात अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी सादर करण्यात आलेले नाहीत अशा सन २०१२-२०१३ मधील परिच्छेदासंदर्भात कलम ६ मधील पोट-कलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) नुसार कायदेशीर कारवाई करून वसुल केलेली रक्कम व गुंतलेली एकूण रक्कम याबाबतचा सविस्तर अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, सोलापूर

## सर्वसाधारण शिफारशी

### १. गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रक्कमा जमा करण्याबाबत :-

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषत: सोलापूर जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या मोठ मोठ्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी अनेक प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असता समितीने या प्रकरणात सदरच्या रकमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्देशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची/अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यावधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रकमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करून वसुल केल्या असत्या तर या रकमा केंव्हाच शासनखाती जमा झाल्या असत्या. शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरीत परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **यासंदर्भात समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोपपत्र दाखल करून असे प्रकरण सहा महिन्यांत निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी त्याचप्रमाणे अशी कार्यवाही मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविण्यात यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासनखाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुद्ध जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रुपयांचा निधीची तरतूद करून मिळविला जातो मात्र असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासनखाती देखीलजमा केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिकाऱ्यांकडून रक्कम वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिकाऱ्यांद्वारा होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुसऱ्या महत्त्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करून राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत नैराश्य व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमेवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने यासंदर्भात कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे अशीही समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करून सोलापूर जिल्हा परिषदेमधील रक्कमा शासनखाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासनखाती वसुली केली या बाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

### २. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे :-

समितीने सोलापूर जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखा परिक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करून दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखा परिक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखा परीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही**

**ते लेखा परिक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखा परीक्षक सुरुवातीला कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असूनदेखील संबंधित अधिकारी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणाऱ्या अधिकाऱ्यास केवळ १०० रुपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,००० रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखा परीक्षणाचे वेळी लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत अशा जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांना अधिनियमातील तदतुदीनुसार रु.२५,०००/- इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**३. नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्त्वाला अनुसरुन दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :-**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरुन समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरुद्ध जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केलेली नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण दिल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करून नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निष्पक्षपणे चौकशी करून चौकशी अहवालामध्ये दोषीविरुद्ध कार्यवाही करून त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कारवाई केल्यास त्यात समितीच्या सूचनेनुसार कारवाई केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्त्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवता व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तींवर कार्यवाही करून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच निःपक्षपातीपणे कार्यवाही करून दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्त्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# परिशिष्ट (अ)
# शासनाचे आदेश, शासन निर्णय व परिपत्रके

({EE®E¶E¹] 1.1)

**जलस्वराज्य प्रकल्पातील राज्यस्तर व जिल्हास्तरावरील पदांना मुदतवाढ.**

**महाराष्ट्र शासन**

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्र.जस्वप्र-२०१०/प्र.क्र.९०/लेशा-०४/पापु-११,

मंत्रालय, मुंबई - ४०००३२, दिनांक ३०/०३/२०११.

**वाचा :-**

१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्र.पीपीएमयू-२००३/सीआर-३१५५(ए)/पापु-११, दिनांक ३०/०६/२००३.

२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्र.डब्ल्युबीपी-२००३/प्र.क्र.३३९१/पापु-११, दिनांक १०/१०/२००३.

३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्र.पी.पी.एम.यु-२००३/सीआर-३१५५/ पापु-११, दिनांक १३/१०/२००३.

४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्र.२००३/आर-३५५३/पापु-११, दिनांक ०६/१२/२००३.

५) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग जस्वप्र-२००५/प्र.क्र ५५/पापु-११ दिनांक ३० एप्रिल २००५

६) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्र.जस्वप्र-२००६/प्र.क्र.२५०/पापु-११, दिनांक ०९/१०/२००६.

७) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन आदेश क्र.जस्वप्र-९०९/प्र.शा./प्र.क्र.२४१/पापु-११, दिनांक ०७/१०/२००९.

८) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन आदेश क्र.जस्वप्र-९०९/प्र.शा./प्र.क्र.२४१/पापु-११, दिनांक १७/११/२००९.

९) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन आदेश क्र.जस्वप्र-२००९/प्र.शा./प्र.क्र.२८८/ पापु-११, दिनांक १७/११/२००९.

१०) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्र.जस्वप्र-०६०९/प्र.शा./प्र.क्र.१३७/ पापु-११, दिनांक ३१/१२/२००९.

११) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्र.जस्वप्र-९०९/प्र.शा./प्र.क्र.२४१/पापु-११, दिनांक १५/०४/२०१०.

१२) सुवर्ण जयंती जलस्वराज्य प्रोत्साहन अनुदान कार्यक्रम शासन निर्णय क्र. जस्वप्र २००९/प्र.क्रं. ३१९/पापु-११ दिनांक ३०/०४/२०१०.

१३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्र.जस्वप्र-०९१०/प्र.शा./प्र.क्र.१४१/ पापु-११, दिनांक ३०/०९/२०१०.

१४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्र.जस्वप्र ०५१०/प्र.क्र.८२/पापु-११, दिनांक ०४/१०/२०१०.

१५) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्र.जस्वप्र-२०१०/प्र.क्र.९०/लेशा-०४/ पापु- ११, दिनांक ३१/१२/२०१०.

**प्रस्तावना:-**

जागतिक बँक अर्थसहाय्यीत जलस्वराज्य प्रकल्प, राज्यातील २६ जिल्हयांमध्ये माहे सप्टेबर २००३ पासून मागणी व लोकसहभागाच्या तत्वावर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधा उपलब्ध

करुन देण्याच्या हेतूने राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्प विहीत मुदतीत सप्टेबर २००९ मध्ये पुर्ण करावयाचा होता. तथापि लोकसभा/विधानसभा/ग्रामपंचायतींच्या निवडणुका इत्यादी कारणांमुळे प्रकल्प विहीत मुदतीत पुर्ण करण्यास मर्यादा आल्या. त्यामुळे प्रकल्पास वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली होती. संदर्भिय शासन निर्णय क्र.१५अन्वये, प्रकल्पामधील आवश्यक त्या पदांस दिनांक ३१/०३/२०११ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

माहे फेब्रुवारी २०११ मध्ये घेतलेल्या आढाव्यानुसार जलस्वराज्य प्रकल्पात ३००७ ग्रामपंचायती समाविष्ट असून त्यापैकी ६२२ ग्रामपंचायती आदीवासी आहेत. यापैकी प्रकल्पामधून २५६८ ग्रामपंचायतींचे बर्हिगमन झाले असून २३६ ग्रामपंचायतीमध्ये भौतिक कामे प्रगतीपथावर आहेत व देखभाल टप्प्यामधील ग्रामपंचायतींची संख्या २०३ आहे. २८९३ ग्रामपंचायतीध्ये (९६ टक्के) पाणीपुरवठा सुरु झाला आहे.

जलस्वराज्य प्रकल्पातील अकोला, गडचिरोली, वर्धा, भंडारा, नाशिक, वाशिम, गोंदिया, कोल्हापूर, नंदुरबार, नागपूर या दहा जिल्हयामध्ये प्रकल्पाचे काम अंशतः अपुर्ण असून यवतमाळ, सिंधुदूर्ग, सोलापुर, सातारा, जालना, जळगाव, सांगली, रत्नागिरी, चंद्रपूर, बुलडाणा, लातूर, परभणी, ठाणे, बीड, हिंगोली व उस्मानाबाद अशा एकूण १६ जिल्हयांमध्ये भौतिक कामे अपूर्ण असल्याने जलस्वराज्य प्रकल्पातील जिल्हा व राज्यस्तरावरील पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णयः-</u>**

**१)** जलस्वराज्य प्रकल्पामधील प्रलंबित कामांचा तसेच राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय पदांचा आढावा घेण्यात आलेला असून उर्वरित कामे पुर्ण करण्यासाठी राज्य व जिल्हा स्तरावरील अस्तित्वातील पदांना (परिशिष्ट-१, १-अ, २, २-अ व ३) दिनांक ०१/०४/२०११ ते ३०/०६/२०११ या कालावधीसाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.

i) प्रकल्पातील ज्या योजना प्रत्यक्ष खर्च व मोजमाप पुस्तकातील खर्च यामध्ये तफावत असल्याने अथवा गुन्हा दाखल केलेल्या ग्रामपंचायती असल्याने अथवा काही अन्य अपरिहार्य कारणांमुळे दिनांक ३१/०३/२०११ पर्यंत पूर्ण होऊ शकत नसतील, त्या योजनांचे लेखे अंतिम करुन दिनांक ३०/०४/२०११ पुर्वी प्रकल्पातून बहिर्गमन करावे. अशा ग्रामपंचायतीच्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्याबाबतची कारणमिमांसा जाणून घ्यावी व या ग्रामपंचायतींचे प्रकल्पातुन बहिर्गमन करावे.

ii) जलस्वराज्य प्रकल्पातील दि. ३१/०३/२०११ पर्यत ज्या ग्रामपंचायतीचे प्रकल्प प्रक्रियेप्रमाणे बहिर्गमन होणार नाही व ज्या ग्रामपंचायतींमध्ये मुळ/सुधारीत गावकृती आराखडयाप्रमाणे निश्चित

केलेली सर्व भौतिक कामे पुर्ण झाली आहेत, तेथे ग्रामस्तरावरील मोजमाप पुस्तक, ग्रामस्तरावरील जमा व खर्चाच्या नोंदी , हिशोबाच्या नोंदवहया व दस्त अंतिम करावे व ग्रामस्तरावरील प्रकल्पातील शासन हिश्याची शिल्लक रक्कम जिल्हास्तरावर वर्ग करुन लेख्यांचे अंतिम लेखापरीक्षण करावे. प्रकल्पामध्ये निश्चित केलेली बहिर्गमन प्रक्रिया दिनांक ३०/०४/२०११ पुर्वी पुर्ण करावी.

iii) ज्या ग्रामपंचायतींमध्ये भौतिक कामे दिनांक ३१/०३/२०११ रोजी अपुर्ण राहतील, अशा ग्रामपंचायतींची उर्वरीत अपुर्ण भौतिक कामे दिनांक ३१/०५/२०११ पुर्वी पुर्ण करुन ग्रामपंचायतीचे प्रकल्पातून बहिर्गमन करावे.

iv) जलस्वराज्य प्रकल्पामधील ग्रामपंचायतीना दिलेला निधी व झालेला खर्च याचा हिशेब पुर्ण करुन ऑन लाईन मॉनेटरींग मधील फायनान्स मॉडयुलमधील तसेच तांत्रिक माहिती पुर्ण करावी. जिल्हास्तरावरील अग्रीम, अनामत रक्कम परत करण्याची कार्यवाही दिनांक ३०/०४/२०११ अथवा तत्पुर्वी पुर्ण करावी. जिल्हास्तरावर राज्यस्तरावरुन प्राप्त निधी व झालेला खर्च याचा ताळमेळ राज्यस्तरावरील लेख्यांबरोबर पुर्ण करुन अंतिम शिल्लक रक्कम राज्यस्तरावर वर्ग करावी.

v) जिल्हास्तरावर प्रकल्पाच्या जडसंग्रह नोंदवहीतील असलेली मत्ता ही जिल्हा ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हापरीषद यांचेकडे हस्तांतरीत होईल. प्रकल्पाशी संबंधीत जिल्हास्तरावरील सर्व दस्ताऐवज (महत्वाच्या धारीका, योजनेचे आराखडे, प्रकल्पाशी निगडीत ग्रामपंचायतनिहाय सर्व धारीका इ.) ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे वर्ग करण्यात यावे. हस्तांतरीत मत्तेचे जतन करण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांची राहील. हस्तांतरणाची सर्व कार्यवाही दिनांक ३० जुन २०११ अथवा तत्पुर्वी पुर्ण करावी.

vi) भाडे तत्वावर घेण्यात आलेली कार्यालये तसेच भाडयाची वाहने संबंधीत मालकाकडे दिनांक ३० जुन २०११ अथवा तत्पुर्वी हस्तांतरीत करावी. कार्यालयातील सर्व मत्ता व तसेच सर्व दस्तऐवज जिल्हा परिषदेच्या जागेत हस्तांतरीत होतील.

vii) जिल्हयातील राज्य शासनातील/ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील अधिकारी/ कर्मचारी यांना ३० जुन २०११ अथवा तत्पुर्वी कार्यमुक्त करावे व त्याबाबत जिल्हास्तरावरुन अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय विभागास अवगत करावे. दिनांक ३० जुन २०११ अथवा तत्पुर्वी कंत्राटी तत्वावरील कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करावे.

viii) जिल्हयांनी दिनांक ०१/०४/२०११ ते ३०/०६/२०११ या कालावधीचे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास राज्यस्तरावरुन मंजूरी प्राप्त करुन घ्यावी. मंजूरी घेण्यापूर्वी खर्च करण्यात येऊ नये.

ix) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.जस्वप्र-२०१०/प्र.क्र.९०/लेशा-०४/पापु-११, दिनांक ३१/१२/२०१० मधील इतर सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

x) सर्व जिल्हयामधील जलस्वराज्य प्रकल्प दिनांक ३० जुन २०११ रोजी बंद करावयाचे आहे. जे जिल्हे दिनांक ३०/०४/२०११ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मंजुरीने जलस्वराज्य प्रकल्प भौतिक व आर्थिकदृष्टया पुर्णपणे बंद करतील अशा जिल्हयांना अ.क्र.२ व १४ अन्वये दिनांक ०१/१०/२०१० ते ३१/०३/२०११ या कालावधीसाठी प्रकल्प भत्ता देण्यात येईल. जे जिल्हे दिनांक ३१/०५/२०११ रोजी जलस्वराज्य प्रकल्प भौतिक व आर्थिकदृष्टया बंद करतील अशा जिल्हयांना दिनांक ०१/१०/२०१० ते ३१/०३/२०११ या कालावधीसाठी १५% दराने प्रकल्प भत्ता देण्यात येईल. उर्वरीत जिल्हयांना प्रकल्प भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. या बाबतच्या सविस्तर अटी व शर्तीचा शासन निर्णय यापुढे निर्गमित करण्यात येईल.

**३) सुवर्णजयंती कार्यक्रम बंद करणेबाबत:-**

सुवर्ण जयंती जलस्वराज्य प्रोत्साहन अनुदान कार्यक्रम शासन निर्णय क्र. जस्वप्र २००९/ प्र.क्रं. ३१९/पापु-११, दिनांक ३०/०४/२०१० अन्वये जलस्वराज्य प्रकल्पातील सर्व २६ जिल्हयामधील ४६४ ग्रामपंचायतींमध्ये राबविण्यात आला आहे. या कार्यक्रमास ग्रामपंचायतीकडून प्रतिसाद कमी प्रमाणात मिळाला आहे. हा कार्यक्रम दिनांक ३१/०८/२०१० पुर्वी पुर्ण करावयाचा होता. या कार्यक्रमास वेळोवेळी मुदतवाढ देवुनही या योजनेमधील कामे अद्याप ग्रामपंचायतीमार्फत अंतिम केलेली दिसून येत नाही. त्यामुळे या कार्यक्रमासाठी दिनांक ३१/०३/२०११ नंतर कोणताही अतिरिक्त निधी न देता, दिलेल्या निधीचा विनियोग करुन प्रत्यक्ष झालेला खर्च व मोजमाप पुस्तकातील मुल्यांकन यामध्ये ताळमेळ घालून मोजमाप पुस्तक, ग्रामस्तरावरील जमा व खर्चाच्या नोंदी , हिशोबाच्या नोंदवहया व दस्त अंतिम करावे व ग्रामस्तरावरील प्रकल्पातील शासन हिश्याची शिल्लक रक्कम जिल्हास्तरावर वर्ग करुन प्रकल्पामध्ये निश्चित केलेली बहिर्गमन प्रक्रिया दिनांक ३०/०४/२०११ पुर्वी पुर्ण करावी. ऑनलाईन मॉनेटरींग सिस्टीमध्ये सर्व माहिती अद्ययावत करुन दिंनाक ३० एप्रिल २०११ पुर्वी हा कार्यक्रम बंद करावा.

**४) स्वच्छता व आरोग्य प्रचालन केंद्र कार्यक्रम :-**

जलस्वराज्य प्रकल्पाअंतर्गत शासकीय आदिवासी आश्रमशाळांना स्वच्छता व आरोग्य प्रचालन केंद्र म्हणून विकसित करण्याचा कार्यक्रम शासन निर्णय क्र.जस्वप्र./ २००६/प्र.क्र.२५०/पापु-११ , दिनांक ९/१०/२००६ अन्वये हाती घेण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी प्रकल्प जिल्हयातील ४१४ शासकीय आदिवासी शाळांची निवड करण्यात आली होती. या कार्यक्रमाअंतर्गत शासन निर्णयामध्ये विहीत केलेली स्वच्छतादूत प्रशिक्षणे तसेच आश्रम शाळांना पिण्याच्या पाण्याची सुविधा व स्वच्छता यासाठी नवीन सुविधा किंवा जुन्या स्वच्छतागृहामधील दुरुस्ती हे कार्यक्रम हाती घेण्यात आले होते. हा कार्यक्रम

जिल्हा गडचिरोली वगळता अन्य २५ जिल्हयामध्ये पुर्ण करण्यात आलेला असल्याने या जिल्हयातील हा कार्यक्रम दिनांक ३१/०३/२०११ रोजी बंद करण्यात येत आहे. गडचिरोली जिल्हयातील राहिलेली कामे दि. ३० एप्रिल २०११ पर्यंत पुर्ण करुन हा कार्यक्रम दिनांक ३०/०४/२०११ रोजी बंद करावा.

**५) ग्रामपंचायत प्रोत्साहन अनुदान निधी पथदर्शी प्रकल्पः-**

जलस्वराज्य प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत प्रोत्साहन अनुदान निधी पथदर्शी कार्यक्रमांतर्गत "आमच्या गावात आम्ही सरकार" हे अभियान सहा प्रकल्प जिल्हयामधील ३२ ग्रामपंचायतींमध्ये शासन निर्णय क्र. जस्वप्र-२००५/प्र.क्र ५५/पापु-११, दिनांक ३० एप्रिल २००५ अन्वये सुरु करण्यात आले होते. या कार्यक्रमाअंतर्गत ग्रामपंचायतींचे गाव विकास आराखडा व पंचायत विकास आराखडा यातील निवडलेले सर्व उपक्रम पुर्ण करण्यात आले असल्याने हा प्रकल्प दिनांक ३१ मार्च २०११ रोजी बंद करावा. या कार्यक्रमाअंतर्गत असलेले जिल्हास्तरावरील दस्त , नस्ती व इतर अनुषंगिक पत्रव्यवहार कार्यकारी अभियंता, जिल्हा ग्रामीण पाणी पुरवठा यांना हस्तांतरीत करण्यात यावा.

**६) जलधर पाणी व्यवस्थापन पथदर्शी प्रकल्प :-**

जलस्वराज्य प्रकल्पाअंतर्गत जलधर पाणी व्यवस्थापन पथदर्शी प्रकल्प हा कार्यक्रम तीन जिल्हयांमध्ये राबविण्यात आला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत भूगर्भातील पाणी साठा वाढविण्यासाठी तसेच भूगर्भातील पाण्याच्या व्यवस्थापनासाठी तीन जलधर (Aquifer) औरंगाबाद, पुणे, बुलढाणा या जिल्हयांमध्ये प्रत्येकी एक असे निवडण्यात आले आहेत. या प्रकल्पासाठी यापुढे ग्रामस्तरावर निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. जिल्हास्तरावरील खात्यातुन प्रकल्प व्यवस्थापनासाठी होणारा खर्च दिनांक ०१/०४/२०११ पासुन बंद करण्यात येत असून भाडेतत्वावरील वाहन इ. दिनांक ३१ मार्च २०११ रोजी बंद करावे. जिल्हास्तरावरील लेखे अंतिम करुन दि. ३१/०३/२०११ रोजी असलेली शिल्लक रक्कम राज्यस्तरावर वर्ग करावी.

i) या प्रकल्पामध्ये ग्रामपंचायत स्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन करण्यात आली असून जलधर स्तरावर जलधर पाणी व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आली आहे. जलधर पाणी व्यवस्थापन समिती ही नोंदणीकृत संस्था असल्याने जलधर स्तरावरील सर्व नोंदी, दस्त इतर महत्वाचे कागदपत्रे पुर्ण करुन जलधर पाणी व्यवस्थापन समितीने जतन करावीत व सदर लेखे अंतिम करुन लेखापरीक्षणाची कार्यवाही दि. ३०/०४/२०११ पुर्वी वरिष्ठ भुवैज्ञानिक, यांनी पुर्ण करावी. शिखर समिती स्तरावरील जलधर प्रकल्पातील महत्वाचे दस्त/नोंदी/अहवाल इत्यादींच्या छायांकीत प्रती वरिष्ठ भूवैज्ञानिक यांनी जतन कराव्यात.

ii) उपरोक्त ३ जिल्हयांमध्ये ग्रामस्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता समिती /जलधर पाणी व्यवस्थापन समिती मार्फत जलधर पाणी व्यवस्थापन प्रकल्पातील कामे हाती घेण्यात आली आहेत , अश्या जलधर प्रकल्पातील भौतिक कामे पुर्ण करुन प्रत्यक्ष झालेला खर्च व मोजमाप पुस्तकातील मुल्यांकन यामध्ये ताळमेळ घालून मोजमाप पुस्तक, ग्रामस्तरावरील जमा व खर्चाच्या नोंदी , हिशोबाच्या नोंदवहया व दस्त अंतिम करावे व ग्रामस्तरावरील प्रकल्पातील शासन हिश्याची शिल्लक रक्कम जिल्हास्तरावर वर्ग करुन, अंतिम लेखापरीक्षण करुन व प्रकल्पामध्ये निश्चित केलेली बहिर्गमन प्रक्रिया वरिष्ठ भुवैज्ञानिक, यांनी दिनांक ३०/०४/२०११ पुर्वी पुर्ण करावी. याबाबतचे आवश्यक दस्त,पुस्तके,लेखे,लेखापरीक्षण अहवाल व इतर सर्व कागदपत्रे पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने जतन करावीत.

iii) जिल्हास्तरावरील लेख्यांचे ताळमेळ घालून शिल्लक रक्कम राज्यस्तरावर वर्ग करण्यात यावी व जिल्हास्तरावरील वरिष्ठ भूवैज्ञानिक यांनी सर्व नस्ती अद्ययावत करणे व या नस्ती, दस्त व इतर महत्वाचे कागदपत्रे यांचे जतन करणे.

**७) राज्यस्तरावरील पदे**

जिल्हास्तरावरील जलस्वराज्य प्रकल्प संपूर्णपणे बंद होत नसल्याने राज्यस्तरावरअस्तित्वातील परिशिष्ट-१ व १-अ मधील पदांना दिनांक ३० जुन २०११ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. प्रकल्पामध्ये टंकलेखन आवक-जावक नोंदणे, नस्ती तयार करणे, या कामासाठी २० प्रशिक्षणार्थी मंजूर आहेत. त्यापैकी १० प्रशिक्षणार्थींना जुन २०११ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. उदीष्टनिहाय अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रकल्प संचालक यांच्या मंजूरीने राज्यस्तरावरील पदांना दिनांक ०१/१०/२०१० ते ३१/०३/२०११ या कालावधीसाठी प्रकल्प भत्ता अनुज्ञेय राहील. या बाबतच्या अटी व शर्तीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५८५/व्यय-३, दिनांक ३१/१२/२०१० अन्वये दिलेल्या मंजुरीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११०३३०१६२८३५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**सही /-**
(सु.प्र.चानकर)
शासनाचे अवर सचिव

**प्रत माहितीस्तव:-**

- मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

- मा.मंत्री, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
- मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

**प्रति,**

- प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
- प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
- प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
- सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
- सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
- उप सचिव व प्रकल्प संचालक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
- प्रकल्प व्यवस्थापक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
- संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
- उपसचिव (आस्थापना) , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
- मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प संचालक, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद (सर्व).
- मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प संचालक, जिल्हा परिषद, पुणे, औरंगाबाद.
- अधिक्षक अभियंता, भारत निर्माण कक्ष, नाशिक, पुणे, ठाणे, अमरावती, औरंगाबाद व नागपूर विभाग.
- अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प समन्वयक, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद (सर्व).
- मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
- वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे, औरंगाबाद, बुलढाणा.
- कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, २६ जिल्हे.
- महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिरक्षा), महाराष्ट्-१, मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
- संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
- अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
- रोखशाखा (आरएसपीएमयू), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
- निवडनस्ती, कार्यासन क.पापु-११.

***

## {EE®E¶E1]-1

### राज्यस्तरावरील पदे

| अ.क्र. | पदनाम | पदांची संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | आदिवासी विकास तज्ञ | १ | १५६००-३९१०० (रु.३००००/- एकत्रित) |
| २ | स्त्री-पुरुष समानता तज्ञ | १ | ९३००-३४८०० (रु.३००००/- एकत्रित) |
| ३ | माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ | १ | रु.३००००/- (एकत्रित) |
| ४ | माहिती तंत्रज्ञान व माहिती व्यवस्थापन तज्ञ | १ | रु.३००००/- (एकत्रित) |
| ५ | कार्यकारी अभियंता | १ | १५६००-३९१०० |
| ६ | शाखा अभियंता | २ | ९३००-३४८०० |
| ७ | सहाय्यक माहिती तंत्रज्ञान तज्ञ | १ | रु.१५०००/- (एकत्रित) |
| ८ | तांत्रिक अधिकारी (अभियांत्रिकी) | १ | १५६००-३९१०० |
| ९ | वरिष्ठ लेखा अधिकारी | १ | १५६००-३९१०० |
| १० | सहाय्यक लेखा अधिकारी | २ | ९३००-३४८०० |
| ११ | लेखा सहाय्यक | २ | रुपये १५०००/- (एकत्रित) |
| | **प्रशासन शाखा** | | |
| १२ | अवर सचिव | १ | १५६००-३९१०० |
| १३ | सहाय्यक | १ | ९३००-३४८०० |
| १४ | रोखपाल | १ | ५२००-२०२०० |
| १५ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | १ | ९३००-३४८०० |
| | **एकूण :-** | **१८** | |

### परिशिष्ट - १ -अ

### पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग (खुद्द) यांच्या मुळ मंजूर आस्थापनेवरील प्रकल्प नियोजन व संनियंत्रण कक्ष, यामधील जलस्वराज्य प्रकल्पासाठी वळविलेली पदे

| अ.क्र. | पदनाम | पदांची संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| | **संचालकांचे कार्यालय** | | |
| १ | उप सचिव व प्रकल्प संचालक | १ | १५६००-३९१०० |
| २ | स्वीय सहाय्यक | १ | ९३००-३४८०० |
| ३ | शिपाई | १ | ४४४०-७४४० |
| ४ | वाहनचालक | १ | ५२००-२०२०० |
| | **अंमलबजावणी व संनियंत्रण गट** | | |
| ५ | प्रकल्प व्यवस्थापक | १ | १५६००-३९१०० |
| ६ | क्षमता निर्मिती तज्ञ | १ | १५६००-३९१०० (रु.३००००/- एकत्रित) |
| ७ | तांत्रिक अधिकारी (अभियांत्रिकी) | १ | १५६००-३९१०० |
| | **प्रशासन शाखा** | | |
| ८ | वाहनचालक व सर्वसाधारण सहाय्यक | २ | ५२००-२०२०० |
| ९ | उपलेखापाल | १ | ९३००-३४८०० |
| १० | लिपीक | २ | ५२००-२०२०० |
| ११ | शिपाई | १ | ४४४०-७४४० |
| | **एकूण :-** | **१३** | |

{EE®E¶E¹]-2

## जिल्हास्तरावरील पदे (पूर्ण वेळ)

### जिल्हा बहिर्गमन सुलभीकरण गट

| अ.क्र. | पदनाम | पदांची संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | गट प्रमुख (उप मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा तत्सम) | १ | १५६००-३९१०० |
| २ | अभियांत्रिकी तज्ञ | १ | १५६००-३९१०० |
| ३ | संनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ | १ | रु.१५०००/- (एकत्रित) |
| ४ | ग्रामलेखा समन्वयक सल्लागार | २ | रु.१५०००/- (एकत्रित) |
| ५ | माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ | १ | रु.१५०००/- (एकत्रित) |
| | **एकूण :-** | **०६** | |

## परिशिष्ट -२- अ

**(जिल्हास्तर-जिल्हा परिषदेकडून पूल करावयाची पदे)**

### जिल्हा भौतिक व आर्थिक व्यवस्थापन गट

| अ.क्र. | पदनाम | पदांची संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | गट प्रमुख (कार्यकारी अभियंता) | १ | १५६००-३९१०० |
| २ | सहाय्यक अभियंता | १ | ९३००-३४८०० |
| ३ | सहाय्यक लेखा अधिकारी | १ | ९३००-३४८०० |
| ४ | वरिष्ठ लिपिक (लेखा) | १ | ५२००-२०२०० |
| ५ | रोखपाल | १ | ५२००-२०२०० |
| ६ | वरिष्ठ लिपिक | १ | ५२००-२०२०० |
| | **एकूण :-** | **०६** | |
| | प्रत्येक जिल्हयासाठी एकूण पदे (परिशिष्ट-२ + परिशिष्ट-२-अ) | १२ | |
| | क्षेत्रीय पातळीवरील एकूण पदे १२ x २६ | ३१२ | |

## परिशिष्ट - ३

### राज्यस्तरावरील प्रशिक्षणार्थी

| अ.क्र. | पदनाम | पदांची संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | **प्रशिक्षणार्थी** | १० | **रु.८००० (एकत्रित)** |

({EE®E¶E¹] 1.2)

**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी ग्रामस्तरावर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे बैंक खाते चालविण्याबाबत मार्गदर्शक सूचना..**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक, क्रमांक ग्रापाधो-१११९/प्र.क्र.०७१/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : ०२ डिसेंबर, २०११**

**वाचा:-** १)शासन निर्णय, पापुवस्वावि क्र.ग्रापाधो-१२०८/प्र.क्र.१०८/ पापु-०७, दि.२३ सप्टेंबर,२००८
२) शासन निर्णय पापुवस्वावि क्र.ग्रापाधो-११०९/प्र.क्र.०८२/ पापु-०७, दि.१२ ऑगस्ट,२००९
३) शासन निर्णय पापुवस्वावि क्र.ग्रापाधो-११०९/प्र.क्र.०८२/ पापु-०७, दि.१८ नोव्हेंबर,२००९
४)शासन निर्णय पापुवस्वावि क्र.ग्रापाधो-१११०/प्र.क्र.१९९/ पापु-०७, दि.१५ ऑक्टोबर,२०१०

**प्रस्तावना :**

संदर्भ क्र.१ अन्वये, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, जिल्हा परिषदांकडून योजनांसाठी निधी वितरीत करण्याच्या कार्यपद्धतीमध्ये बदल करण्यात आलेले आहेत, त्या नुसार हा निधी, जिल्हा परिषदांकडून, ग्रामपंचायतीमार्फत ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना उपलब्ध करून देण्यात येतो.

२. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी ही ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करण्यात येते. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची कामे पार पाडण्यासाठी निधी जिल्हा परिषदांकडून ग्रामपंचायतीमार्फत समितीच्या बैंक खात्यावर उपलब्ध करुन दिला जातो. अनेक समित्यांकडून या निधीचा गैरवापर होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे.

३. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांच्या अध्यक्ष व सचिव यांचेकडून होणा-या गैरव्यवहारास आळा घालण्यासाठी शासनाने संदर्भ क्र.२ व ३ येथील अनुक्रमे दि. १२ ऑगस्ट,२००९ व दि.१८ नोव्हेंबर,२००९ च्या शासन निर्णयान्वये, समितीच्या पदसिद्ध अध्यक्ष व सचिवपदी अनुक्रमे सरपंच व ग्रामसेवक यांना आणण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या शासन निर्णयास उच्च न्यायालयाच्या नागपूर, औरंगाबाद खंडपीठातून दाखल झालेल्या याचिकांद्वारे मोठ्या प्रमाणावर आव्हान देण्यात आले. ही तरतूद मुंबई ग्रामपंचायत अधिनियमातील तरतूदींशी विसंगत असल्याने, ती न्यायालयाने रद्दबादल ठरविली आहे. त्यामुळे संदर्भ क्र.४ येथील दि.१५ ऑक्टोबर,२०१० च्या शासन निर्णयानुसार सद्यस्थितीत, समितीची पुर्वीचीच रचना अस्तित्वात आहे.

६. ग्राम पाणी पुरवठ व स्वच्छता समिती मुंबई ग्राम पंचायत अधिनियम,१९५८ च्या कलम ४९ अनुसार स्थापन करण्यात येताता.या समित्या ग्राम पंचयातींचा अविभाज्य घटक आहेत. त्यामळे ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या व्यवहारांवर ग्राम पंचायतींचे नियंत्रण आणण्यासाठी तसेच निधीचा अपहार रोखण्यासाठी, समितीच्या

निधीच्या व्यवहारांसदर्भात जबाबदारी वाढविण्यासाठी तसेच समितीच्या खात्यातून निधी काढण्यासंदर्भात सुधारीत सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :**

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी, जिल्हा परिषदांमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणारा निधी, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या खात्यावर जमा झाल्यावर, या निधीतून नळ पाणी पुरवठा पुरवठा योजनांच्या कोणत्याही प्रकारच्या प्रदानासाठी निधीचे आहरण करताना, खालील कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा-

१) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांमार्फत बैंकेतून रक्कम काढताना,ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस बैंकेतून रक्कम काढण्यास प्राधिकृत केल्याबाबतची सरपंच व ग्रामसेवकांनी साक्षांकित केलेला ग्राम पंचायतीचा ठराव धनादेशासोबत बैंकेस सादर करणे आवश्यक राहील.ग्राम पंचायतीने असा ठराव मंजूर करतांना त्यामध्ये बैंकेतून रक्कम काढण्याचाउद्देश स्पष्टपणे नमूद करावा.

२) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने सादर केलेल्या धनादेशासोबत ग्राम पंचायतीचा ठराव असल्याशिवाय बैंकेने धनादेश स्विकारु नये अशा सुचना ग्राम पंचायतीने बैंकेस स्वतंत्रपणे द्याव्यात.

३) मुंबई ग्राम पंचायत अधिनियम,१९५८ च्या कलम ४९(६) मधील तरतूदीनुसार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने यापुर्वी बैंकेतून काढलेल्या रकमेचा तपशिल ग्राम पंचायतीस सादर केल्याशिवाय ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस पुढील आर्थिक व्यवहार करण्यास /बैंकेतून रक्कम काढण्यास ग्राम पंचायतीने परवानगी देऊ नये.

४) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने बैंकेतून काढलेली रक्कम,खर्च व शिल्लक रक्कम याबाबतची माहिती आवश्यक त्या कागदपत्रांसह ग्राम पंचायतीमार्फत ग्रामसभेस वेळोवेळी सादर करावी.

५) मुंबई ग्राम पंचायत अधिनियम,१९५८ च्या कलम ४९ मधील तरतूदीनुसार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती ही ग्राम पंचायतीचा अविभाज्य घटक असल्यामुळे पाणी पुरवठा योजनांचा निधी हाताळणे ही ग्राम पंचायत आणि ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांची संयुक्त जबाबदारी राहील.

६) अखर्चित निधी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष / सचिव यांनी स्वत:कडे न ठेवता तो ग्राम पंचायच्या खात्यात वर्ग करावा व त्याची नोंद ग्राम पंचायतीच्या रोख वहीत घेण्यात यावी. रु.१०००/- पेक्षा जास्त रकमेचे सर्व व्यवहार केवळ धनादेशाद्वारेच करण्यात यावे.

२. बैंकेतून रक्कम काढण्यासाठी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने सादर केलेल्या धनादेशासोबत ग्राम पंचायतीचा ठराव असल्याशिवाय ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचा धनादेश बैंकेन स्वीकारु नये, अशा सूचना कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी यांनी जिल्ह्यातील / तालुक्यातील सर्व राष्ट्रीयकृत बैंक / शेड्युल बैंक / जिल्हा शिखर बैंक यांना निर्गमित कराव्यात.

३. हे शासन परिपत्रक प्रगतीपथावरील योजना तसेच नव्याने घ्यावयाच्या योजनांसाठी लागू राहील.

४. सदर शासन परिपत्रक ग्राम विकास व पंचायतराज विभागाच्या सहमतीने, त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५८४६/secy/RD,दि.६/८/२०११ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक **२०१११२०२०८०६०२००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
**(र.अं.खडसे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

*प्रत,*

*मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,*
*मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव*
*सर्व विधान परिषद/विधान सभा सदस्य*
*विभागीय आयुक्त (सर्व)*
*आयुक्त, महानगरपालिका (सर्व)*
*सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई*
*संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे*
*सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद*
*मुख्याधिकारी (सर्व नगर पालिका) (अ, ब व क वर्ग)*
*सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,*
*सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण*
*सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद*
*सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग*
*महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)*
*महालेखापाल, महाराष्ट्र - २, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)*
*मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई*
*उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर*
*सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा*
*सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण*
*सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा*
*सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती*
*नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई*
*वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,*
*ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई*
*मंत्रालयातील इतर सर्व विभाग,*
*पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने*
*निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७*

({EE®E¶E¹] 2.1)

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना निधी अर्थसंकल्पीत करणे,वितरीत करणे व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबतची सुधारीत कार्यपध्दती

महाराष्ट्र शसन
नियोजन विभाग
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक: जिवायो १००७/प्र.क्र.३९/का-१४४
दिनांक : १६ फेब्रुवारी, २००८

**प्रस्तावना**:- जिल्हा हा नियोजनाचा आधारभूत घटक मानून विकेंद्रीत नियोजनाची प्रक्रिया १९७४-७५ पासून सुरु करण्यात आली. जिल्हा नियोजनासाठी प्रत्येक जिल्हयात "जिल्हा नियोजन समिती " कार्यरत आहे. राज्याच्या योजनांच्या आकारमानाच्या अनुषंगाने जिल्हा योजनेसाठी द्यावयाची रक्कम ठरल्यावर त्या रकमेचे जिल्हानिहाय वाटप संबंधित जिल्ह्यांना करण्यांत येते. त्याप्रमाणे जिल्ह्याचे पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली असलेली जिल्हा नियोजन समिती जिल्हा योजनेची आखणी करते व सदरची योजना मा.मंत्री (नियोजन) यांचेबरोबर चर्चा करून अंतिम केली जाते.

**२. <u>जिल्हा योजनेची सध्याची कार्यप्रणाली</u>:-** जिल्हा योजनेमधून प्रस्तावित योजनेवर निधीचे वाटप प्रशासकीय विभागनिहाय करून सदरची रक्कम संबंधित प्रशासकीय विभागांना कळविण्यांत येते व सदर निधी अर्थसंकल्पीत करून घेणे, निधीचे वाटप जिल्हा स्तरापर्यंत करणे, योजनांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणे व त्याचे समन्वयन, संनियंत्रीत करणे इत्यादी बाबी संबंधित प्रशासकीय विभागामार्फत केल्या जातात.

**३. सध्याच्या कार्यप्रणाली बाबतचा अनुभव :-**

अ) सर्व जिल्ह्यांच्या नियोजन समितीने मान्य केलेला योजनावार निधी प्रशासकीय विभागांना कळविल्यानंतर सदरचा निधी अर्थसंकल्पित करण्यास कालावधी लागतो. काही निधी अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थसंकल्पीत होतो. परंतु काही निधी नंतरच्या अधिवेशनातअर्थसंकल्पित केला जातो.

ब) अर्थसंकल्पित झालेला निधी मंत्रालयीन प्रशासकीय विभाग त्यांच्या राज्यस्तरीय आयुक्तालय/संचालनालय, विभागीय कार्यालये यांचेमार्फत जिल्हा यंत्रणेला वितरीत करतात. या प्रक्रियेस कांही कालावधी लागतो आणि त्यामुळे जिल्हा योजनेची रक्कम जिल्ह्याला मिळण्यास विलंब होतो.

क) जिल्हा योजनेला प्रशासकीय मान्यता देण्याबाबत प्रस्ताव जिल्हा यंत्रणेकडून विभागीय यंत्रणेला, राज्यस्तरीय आयुक्तालय/संचालनालय यांना व त्यानंतर मंत्रालयीन प्रशासकीय विभागाला सादर केला जातो व प्रशासकीय मंत्रालयीन विभागाची मान्यताही त्या

पद्धतीने जिल्हा यंत्रणेपर्यंत पोहोचते. या प्रक्रियेसही कांही कालावधी लागतो.

ड) प्रशासकीय विभागांनी अर्थसंकल्पित तरतूद केल्यानंतर त्यापैकी कोणत्या जिल्ह्यासाठी किती तरतूद आहे याबद्दलची माहिती अर्थसंकल्पात उपलब्ध नसते.

वरील कारणांमुळे जिल्हा योजना राबविण्यामध्ये कांही कालावधी लागतो आणि कांही वेळेस रक्कम पूर्णपणे खर्च होत नाही व एका जिल्ह्याने केलेली तरतूद दुसऱ्या जिल्ह्यात वापरली जाण्याची शक्यता असते किंवा एखादी जिल्हास्तरीय योजनेची रक्कम राज्यस्तरीय योजनेवरसुद्धा खर्ची पडू शकते.

वरील कारणांमुळे सध्याच्या पद्धतीत बदल करून मंजुर निधी लवकरात लवकर जिल्हा योजनेला उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यावर शासनाचा निर्णय होवून तो खालीलप्रमाणे आहे.

**शासन निर्णय:-** सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेचा निधी अर्थसंकल्पीत करुन वितरीत करणे व त्यामधील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतच्या प्रचलित कार्यपध्दतीमध्ये बदल करुन यापुढे जिल्हा वार्षिक योजनेचा निधी अर्थसंकल्पीत करणे, तरतुदीचे वितरण व प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, तसेच पुनर्विनियोजन करणे इ. बाबत खालील नमूद केल्याप्रमाणे सुधारीत कार्यपध्दती अवलंबण्यात येईल

**१. जिल्हा योजनेचा आराखडा तयार करणे -**

१.१ नियोजन विभागाच्या आदेशानुसार निर्गमीत केलेल्या जिल्हा वार्षिक योजनेच्या तयार करावयाच्या आराखड्या संदर्भातील वेळापत्रकानुसार कार्यवाहीस सुरवात करावी.

१.२ जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा तयार करतांना मानव विकास निर्देशांक उंचावणे, जिल्ह्याच्या मुलभुत गरजा, सामाजिक व भौगोलिक व्याप्ती यांचा विचार करण्यात यावा.

१.३ योजना प्रधान लेखाशिर्षवार दाखविण्यात याव्या.

१.४ चालु योजनांच्या उर्वरीत खर्चावर प्राथम्याने विचार करण्यात यावा.

१.५ आराखड्यात कामे प्रस्तावित करतांना अपूर्ण कामांना लागणा-या निधीची पूर्ण तरतुद केल्यानंतरच नवीन बाबी/कामे प्रस्तावित करावीत.

१.६ जिल्हा आराखड्यात प्रस्तावित केलेल्या नियतव्यय मर्यादेतून अपूर्ण कामांना लागणारा निधी वजा करुन उर्वरीत रकमेच्या दीड पट रकमेच्या मर्यादेतीलच नवीन कामे प्रस्तावित करता येतील.

१.७ जिल्हा वार्षिक योजनेतून घेण्यात येणारी कामे २ वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.

१.८ "नवीन योजनांच्या" बाबतीत (New Schemes/ New Items) संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता दिली असेल व त्या योजनांना शासनाची मान्यता मिळालेली आहे असे कळविल्यानंतरच या नवीन योजनांसाठी जिल्हा योजनेमध्ये तरतुद प्रस्तावित करावी. सदर नवीन योजनांसाठी विधीमंडळाची मान्यता मिळविण्याची जबाबदारी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांची राहील.

१.९ नवीन योजनांच्या बाबतीत जर पद निर्मितीचा समावेश असेल तर विहित पद्धतीचा अवलंब करुन पदांना शासनाची मान्यता मिळाल्यानंतरच अशा योजनांचा समावेश जिल्हा योजना आराखड्यात करावा.

१.१० आराखड्यात प्रस्तावित प्रत्येक योजनेच्या खर्चाची बाबवार माहिती देणे आवश्यक राहील.

१.११ आराखड्यात मान्य केलेल्या नियतव्ययात जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेशिवाय बदल करता येणार नाही.

१.१२ राज्यस्तरीय बैठकीत जिल्हा वार्षिक योजनेचा अंतिम आराखडा निश्चित करण्यात येईल.

## २. वार्षिक योजनेचा निधी अर्थसंकल्पित करणे-

२.१ सध्या जिल्हा नियोजन समितीने प्रस्तावित केलेल्या तरतुदी एकत्रित करुन तसेच राज्य स्तरावर काही तरतुदी करावयाच्या असल्यास त्यांचा समावेश करुन संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत एकत्रित तरतुदी विधीमंडळासमोर अर्थसंकल्पात सादर केल्या जातात व विधीमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर सदर निधीचे वाटप मंत्रालयीन प्रशासकीय विभागांमार्फत जिल्हयांना केले जाते. या प्रक्रियेत काही कालावधी लागतो व जिल्हा स्तरावर योजना कार्यान्वयीन करण्यासाठी तितका वेळ कमी उपलब्ध होतो.

२.२ नवीन पध्दतीमध्ये जिल्हा नियोजन समितीने मान्य केलेल्या जिल्हा योजनेसाठीची अर्थसंकल्पीय तरतुद नियोजन विभागाच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनात जिल्हानिहाय स्वतंत्र मागणीखाली विधी मंडळाला सादर केली जाईल. त्या मागणी क्रमांकामध्ये त्या जिल्ह्याच्या विभिन्न प्रधान शिर्ष, उप शिर्ष निहाय तपशिलवार तरतुद दर्शविली जाईल.

२.३ जिल्हावार मागणी क्रमांक खालीलप्रमाणे राहतील :-

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | मागणी क्रमांक | अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | मागणी क्रमांक | अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | मागणी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर | ओ-१० | १३ | सातारा | ओ-२२ | २५ | गोंदिया | ओ-३४ |
| २ | मुंबईउपनगर | ओ-११ | १४ | सांगली | ओ-२३ | २६ | चंद्रपूर | ओ-३५ |
| ३ | ठाणे | ओ-१२ | १५ | सोलापूर | ओ-२४ | २७ | गडचिरोली | ओ-३६ |
| ४ | रायगड | ओ-१३ | १६ | कोल्हापूर | ओ-२५ | २८ | औरंगाबाद | ओ-३७ |
| ५ | रत्नागिरी | ओ-१४ | १७ | बुलढाणा | ओ-२६ | २९ | जालना | ओ-३८ |
| ६ | सिंधुदूर्ग | ओ-१५ | १८ | अकोला | ओ-२७ | ३० | बीड | ओ-३९ |
| ७ | नाशिक | ओ-१६ | १९ | वाशिम | ओ-२८ | ३१ | परभणी | ओ-४० |
| ८ | धुळे | ओ-१७ | २० | अमरावती | ओ-२९ | ३२ | हिंगोली | ओ-४१ |
| ९ | नंदूरबार | ओ-१८ | २१ | यवतमाळ | ओ-३० | ३३ | नांदेड | ओ-४२ |
| १० | जळगाव | ओ-१९ | २२ | नागपूर | ओ-३१ | ३४ | उस्मानाबाद | ओ-४३ |
| ११ | अहमदनगर | ओ-२० | २३ | वर्धा | ओ-३२ | ३५ | लातूर | ओ-४४ |
| १२ | पुणे | ओ-२१ | २४ | भंडारा | ओ-३३ | | | |

२.४ सर्व जिल्ह्यांची जिल्हावार मागणी नियोजन विभागाच्या एकाच पुस्तकामध्ये विधी मंडळासमोर मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. त्यामध्ये प्रधान शिर्षनिहाय महसुली खर्च, भांडवली खर्च व कर्ज यांची विगतवारीसुध्दा दाखविण्यात येईल.

२.५ प्रत्येक प्रशासकीय विभागाच्या राज्यस्तरीय योजना तसेच विशेष घटक योजना व आदिवासी विकास योजना यांच्या तरतुदी दर्शविणारी मागणी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून सादर केली जाईल. मात्र प्रत्येक विभागाला त्यांनी विधी मंडळाला सादर केलेल्या मागणीशिवाय सर्वसाधारण जिल्हा योजनांपैकी किती तरतुद प्राप्त होत आहे ही माहिती दर्शविणारा मतदानास आवश्यक नसणारा तक्ता (Statement not requiring voting) विधीमंडळाला माहितीसाठी स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल.

२.६ जिल्हा योजनांचे रुपांतर जिल्हाधिकारी कार्यालयांनी अर्थसंकल्पीय विवरणपत्रात करावे. तसेच संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांच्या सल्ल्याने प्रतिमाह खर्चाचा तपशील प्राप्त करुन रोख प्रवाह (cash flow) तयार करावा. अर्थसंकल्पीय प्रकाशनाच्या भाग-तीन परिशिष्टात समाविष्ट करण्यासाठी विहीत नमुन्यात रस्ते, साकव, इमारती व तत्सम बांधकामाची यादी आणि रोखप्रवाहाचे विवरण जिल्हाधिकारी यांनी वार्षिक योजनेच्या अर्थसंकल्पीय विवरणपत्राबरोबर सादर करावे. मंजुर नियतव्ययाच्या मर्यादेत जी बांधकमे त्यावर्षी अथवा अधिकाधिक पुढील वर्षी पूर्ण होणार असतील अशीच बाधकामे यादीत समाविष्ट करावीत.

२.७ जिल्हा योजनेतील केंद्र पुरस्कृत योजनेतील राज्य हिश्श्याची तरतुद जिल्हा योजनेमध्ये करून अर्थसंकल्पीय तरतुदीचे वाटप जिल्हाधिकारी कार्यान्वयीन यंत्रणेला करतील. मात्र ज्या योजनांबाबत केंद्र शासनाच्या हिश्श्याची तरतुद राज्य शासनाच्या खाती जमा (एकत्रीत निधीमध्ये) होते, त्या रकमेची अर्थसंकल्पात तरतुद करून संबंधित प्रशासकीय विभागाकडून प्रचलीत पध्दतीने कार्यान्वयीन यंत्रणेला वाटप केले जाईल. केंद्र पुरस्कृत योजनांच्या बाबतीत ज्या प्रमाणात केंद्र शासनाचा हिस्सा मंत्रालयीन प्रशासकीय विभागांमार्फत प्राप्त होईल त्या प्रमाणात आणि योजनांच्या वित्तीय हिश्श्याच्या प्रमाणात (financing pattern) जिल्हा योजनांचा निधी खर्च करावा. उदा. एका जिल्ह्यासाठी १०० रुपयांची तरतुद करावयाची असेल आणि त्यामध्ये केंद्राचा हिस्सा ७५% व राज्याचा हिस्सा २५% असे असल्यास जिल्ह्याच्या योजनेमध्ये २५ रुपयांची तरतुद करावी. संबंधित प्रशासकीय विभागाने केंद्र शासनाचा हिस्सा म्हणून ६० रूपये वितरीत केल्यास राज्य शासनाचा हिस्सा म्हणून २० रुपये जिल्हाधिकारी यांनी विभागाच्या जिल्हास्तरीय कार्यान्वयीन यंत्रणेस खर्च करण्यास प्राधिकृत करावे.

२.८ जिल्हा योजनांच्या बाबतीत नियोजन विभागाच्या अर्थसंकल्पिय प्रकाशनात जिल्हावार योजना व मागण्या विधीमंडळासमोर मा. मंत्री (नियोजन) यांचेकडून सादर केल्या जातील. जिल्हा योजनांमध्ये समाविष्ट रकमेच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये सहभागी होणे व उत्तरे देणे व तत्सम विधीमंडळ कार्यनियमावली अंतर्गत इतर कार्यवाही, संबंधित विषयांचे मा. मंत्री महोदय यांचेकडून करण्यात येईल.

२.९ विधी मंडळाने अर्थसंकल्पिय मान्यता दिल्यानंतर संबंधित जिल्ह्यांसाठी असलेल्या एकूण तरतुदीचे वितरण नियोजन विभागाकडून संबंधित जिल्हाधिकारी यांना विहित कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल.

२.१० जिल्हाधिकारी हे त्या जिल्ह्याच्या जिल्हा योजनेसाठी निधी वाटपासंबंधात नियंत्रक

अधिकारी राहतील. संबंधित जिल्हाधिकारी हे त्याना प्राप्त झालेल्या निधीचे कार्यान्वयीन यंत्रणेला पुनर्वाटप करण्यास सक्षम राहतील.

२.११ जिल्हाधिकारी यांनी नियोजन विभागाकडून निधी प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त एक महिन्याचे आत कार्यान्वयीन यंत्रणांना तात्काळ वाटप करणे आवश्यक राहील. एखाद्या जिल्हाधिका-याने सदरची जबाबदारी वेळीच पार पाडली नाही तर संबंधित विभागीय आयुक्त यांनी संबंधित जिल्हाधिका-याकडून निधी वाटपाचे काम पूर्ण करुन घेणे अनिवार्य राहील.

**३. <u>प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही</u> -**

३.१ परिच्छेद ३.२ मधील प्रकरणे सोडून जिल्हा वार्षिक योजनेतील इतर कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे प्रशासकीय विभागांचे व त्यांच्या क्षेत्रिय यंत्रणांचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील.

३.२ स्थानिक स्वराज्य संस्थांकडील (जिल्हा परिषद, नगर पालिका, महानगरपालिका,नगरपंचायत) योजनांसाठी त्यांना असलेले प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रचलित पद्धतीप्रमाणे कायम राहतील.

३.३ प्रशासकिय मान्यता देण्यासंबंधी संबंधित मंत्रालयीन विभागांकडून जिल्हाधिकारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांना मार्गदर्शक सूचना, निकष व तपासणी याद्या निर्गमीत करण्यात येतील. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी व स्थानिक स्वराज्य संस्था यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही करावी.

३.४ जिल्हा वार्षिक योजनेतील कामे दोन वर्षात पूर्ण होणे अपेक्षित असून त्यामध्ये सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता वाटल्यास मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा ३० टक्के पर्यंतच्या जास्त रकमेच्या प्रस्तावाला सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील व त्यापेक्षा जास्त रकमेची सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची आवश्यकता वाटल्यास मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सध्याच्या प्रणालीनुसार कार्यवाही करावी.

**४. तांत्रीक मान्यतेचे व तत्संबधीचे अधिकार:-**

४.१ जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गतच्या कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या कार्यान्वयीन यंत्रणेच्या अधिका-यांना सध्या प्रमाणेच असतील.

४.२ तांत्रिक मान्यता देण्यासंदर्भात संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडुन जिल्हास्तरीय अधिका-यांना तांत्रिक मान्यतेच्या दृष्टीने मार्गदर्शक सूचना व तपासणी यादी निर्गमित करण्यात येईल.

**५. <u>निविदा व खरेदी प्रक्रिया</u> -** निविदा मागविणे, स्वीकृत करणे व खरेदी बाबतचे सर्व अधिकार प्रचलित प्रध्दतीनुसार राहतील.

## ६. योजनेची अंमलबजावणी, सनियंत्रण, लेखापरिक्षण व विधिमंडळ कामकाज विषयक बाबी हाताळणे

६.१ कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

६.२ संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून तांत्रिक गुणवत्तेबाबत संनियंत्रण केले जाईल.

६.३ जिल्हा योजनेच्या अंमलबजावणीवर, खर्चावर व तांत्रिक बाबींवर संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे नियंत्रण असेल.

६.४ जिल्हा वार्षिक योजनांच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र, पूर्णत्वाचे दाखले, खर्चाचा ताळमेळ व विनियोजन लेखे इत्यादीबाबतची सर्व कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाची राहील.

६.५ जिल्हा योजनेतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा समिती, विधिमंडळ कामकाज इत्यादी बाबीसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकीय विभाग जबाबदार राहील.

६.६ जिल्हास्तरीय कार्यकारी यंत्रणा, संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना प्रशासकीय मान्यता, प्रत्यक्ष खर्च, भौतिक साध्य याबाबतची माहिती देतील. जिल्हा योजना संबंधी विधानमंडळाला माहिती सादर करणे तसेच विधानमंडळाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे, अर्थसंकल्पीय नियमावलीच्या तरतुदीनुसार विविध बाबीसंबंधी कार्यवाही करण्याची जबाबदारी प्रशासकीय विभागांची राहील.

६.७ जिल्हास्तरीय योजनांचे मासिक खर्चाचे अहवाल दरमहा ५ तारखेपर्यंत जिल्हाधिकारी यांना संबंधित कार्यन्वयीन यंत्रणा सादर करतील.

६.८ जिल्हाधिकारी हे प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी वार्षिक योजनेच्या खर्चाचे अहवाल विभागीय आयुक्त व नियोजन विभागास सादर करतील.

## ७. जिल्हा योजनेचे पुनर्विनियोजन व सुधारीत अंदाज -

७.१ जिल्हा योजनेतील मंजूर अर्थसंकल्पित तरतुदीमधील योजना / कार्यक्रमांतर्गत पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार जिल्हा नियोजन समितीच्या पूर्व मंजुरीने जिल्हाधिकारी यांना असतील.

७.२ पुनर्विनियोजन करतांना जिल्हाधिकारी शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करतील.

७.३ जेव्हा आचारसंहिता किंवा अन्य संविधानिक अडचणींमुळे जिल्हा नियोजन समितीची बैठक आयोजित करणे शक्य नसेल अशावेळी महसूल विभागीय आयुक्तांच्या मान्यतेने पुनर्विनियोजन करण्यात येईल परंतू अशा पुनर्विनियोजनाची माहिती जिल्हा नियोजन समितीच्या पुढील बैठकीत सादर करण्यात येईल.

७.४ अर्थसंकल्पीय कार्यप्रणालीप्रमाणे सुधारित अंदाजांचे प्रस्ताव नियोजन विभागाला पाठविल्यानंतर जिल्हाधिकारी यांना पुनर्विनियोजन करता येणार नाही व तसा प्रस्तावही नियोजन विभागाला पाठविता येणार नाही.

७.५ जिल्हा वार्षिक योजनेसाठी निश्चित केलेला नियतव्यय पूर्णपणे अर्थसंकल्पीत करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी व नियोजन विभाग यांची राहील. योजनानिहाय तपशील विहित वेळेत शासनास सादर करण्यास व शासनाकडून वितरीत झालेला निधी संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणांना वितरीत करण्यास जिल्हाधिकारी जबाबदार राहतील. प्राप्त तपशिलाप्रमाणे निधी अर्थसंकल्पीत करण्याची जबाबदारी नियोजन विभागाची राहील.

७.६ प्राप्त झालेल्या तरतुदीपैकी खर्च पूर्णपणे होईल किंवा कसे याचा अंदाज प्रत्येक कार्यान्वयीन यंत्रणेने घ्यावा आणि त्यांना असे वाटले की निधी पूर्णपणे खर्च होणार नाही व काही रक्कम शिल्लक राहणार आहे तर त्यांनी तसा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना ५ मार्चपर्यंत मिळेल या बेताने पाठवावा. जिल्हा कार्यान्वयीन यंत्रणेने ५ मार्चपर्यंत संभावित बचत समर्पित केली नाही व खर्च पूर्णपणे पडला नाही तर त्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

७.७ जिल्हाधिकारी यांनी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेकडून प्राप्त झालेली बचत/समर्पित निधी लक्षात घेऊन जिल्हा योजना निधीमधून काही रक्कम समर्पित करावयाची असल्यात सदर आदेश १० मार्चपूर्वी काढणे आवश्यक राहील.जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या निधी समर्पणाची प्रत नियोजन विभागास १५ मार्च पर्यंत मिळेल याबाबतची खबरदारी जिल्हाधिकरी यांनी घ्यावी. कार्यान्वयीन यंत्रणेकडून निधी ५ मार्चपर्यंत समर्पित झाला असल्यास व जिल्हाधिका-यांनी निधी समर्पणाचे आदेश विहित मुदतीत काढले नाहीत तर जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

७.८ जिल्हा योजनेसाठी योजनानिहाय तपशील व रकमेची फोड (breakup) नियोजन विभागाला सादर करणे ही जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. जिल्हाधिकारी यांनी अशी तपशीलवार माहिती सादर केली नाही तर त्याबाबत जिल्हाधिकारी जबाबदार राहतील. जिल्ह्यांमधून योजनानिहाय तपशील प्राप्त झाल्यावर एकत्रित मागणी विधी मंडळाला सादर करणे व विधी मंडळाने मान्य केलेल्या तरतुदीचे जिल्हानिहाय वाटप करणे नियोजन विभागाची जबाबदारी राहील. यासाठी नियोजन विभागातील संबंधित अधिकारी जबाबदार राहतील.

७.९ जिल्हाधिकारी यांना सदरचे काम करणे शक्य व्हावे म्हणून एक लेखाधिकारी वर्ग-२ व एक किंवा दोन संशोधन सहायक यांची पदे मंजूर करण्याचे प्रस्तावित आहे.

८. वरील सुधारीत कार्यपध्दतीचा अवलंब २००८-०९ या आर्थिक वर्षापासून लागू होणार असल्याने सर्व जिल्हाधिकारी यांनी याबाबीची त्वरीत कार्यवाही करावी.

९. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर-६१/०८/व्यय-८, दि. १६.२.२००८ अन्वये प्राप्त सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहेत.

१०. हा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २००८०२१६१७०४२९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( प्र.अ.महेंद्रकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

१. मा. राज्यपालांचे सचिव,

२. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४. सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा.कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ, नवीन प्रशासकीय भवन, १८ व मजला, मंत्रालयासमोर, मुंबई,
६. महालेखापाल-१(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
७. महालेखापाल-१(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
८. महालेखापाल-१(लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
९. महालेखापाल-१(लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
१०. शासनाचे मुख्य सचिव,
११. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१२. सदस्य सचिव, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत,१८वा मजला,मुंबई,
१३. सदस्य सचिव, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ,नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय कम्पाऊंड, तळमजला, औरंगाबाद,
१४. सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ,बी-२३/१,साऊथ अंबाझरी मार्ग, अंध विद्यालयाजवळ, नागपूर,
१५. संचालक,लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई,
१६. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र शासन, मंबई,
१७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८. सर्व विभागीय आयुक्त,
१९. मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२०. सर्व मुख्य अभियंते, जलसंपदा प्रादेशिक विभाग,
२१. सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
२२. सर्व जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती,
२३. सर्व अधीक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम मंडळे,
२४. सर्व अधीक्षक अभियंते, जलसंपदा मंडळे,
२५. नियोजन विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव.
२६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
२७. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२९. सर्व विशेष कार्य अधिकारी (नियोजन), विभागीय आयुक्तांची कार्यालये,
३०. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये,
३१. नियोजन विभागातील सर्व जिल्हा प्रभारी अधिकारी व इतर अधिकारी.
३२. निवड नस्ती का. १४४४.

--------

({EE®E¶E¹] 2.2)

**ई-निविदा कार्य प्रणाली अवलंबविण्याबाबत**
**जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील बांधकामे व साहित्य पुरवठ्याची कामे e-Tendering प्रक्रीयेतून करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**
शासन निर्णय क्र: संकीर्ण-२०१०/२७५/प्र.क्र.१७२/पंरा-७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १९ ऑक्टोबर,२०११.

संदर्भ :-

१) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.ग्रासयो-२००७/प्र.क्र.१/यो.९,दिनांक २०.४.२००७.
२) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.ग्रासयो-२००७/प्र.क्र.१/यो.९, दि. ८.५.२००७
३) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.ग्रासयो-२०११/प्र.क्र.२६/यो-९, दि.११.४.२०११
४) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.झेडपीए-२००८/प्र.क्र.४७२/ वित्त९, दि.९.२.२००९
५) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र:संकीर्ण-२०१०/प्र.क्र.१७२/पंरा-७, दि.११.११.२०१०

**प्रस्तावना :-**

शासनामार्फत विविध विकासात्मक कामे, सेवा, वस्तुंची खरेदी यासाठी निधी खर्च करताना निविदा प्रक्रियेचा **अवलंब करण्यात येतो. प्रचलित निविदा प्रक्रिया ही क्लिष्ट स्वरुपाची, अधिक वेळ घेणारी व खर्चिक अशी आहे.** निविदा प्रक्रीयेचे महत्व लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ई-गर्व्हनेस कामाअंतर्गत केंद्र शासनाने ई- टेंडरिंग हा मिशन मोड प्रकल्प म्हणुन घोषित केला आहे. देशातील काही राज्यांमध्ये ई-निविदा कार्यप्रणालीची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध विकास योजनांसाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान / निधी प्राप्त होतो. तसेच त्यांचे स्वउत्पन्नातूनही या संस्था विविध योजना राबवितात. या विकास योजनांमध्ये **बांधकामे**, **साहित्य** व **सेवा** पुरवठा अशा विविध बाबींसाठी तरतूद असते. ही कामे वाटप करतांना तसेच वस्तूंचा व सेवांचा पुरवठा करुन घेताना अवलंबवयाच्या प्रक्रियेत सुटसुटीतपणा व जास्तीत जास्त **पारदर्शीपणा** असावा, वेळेची बचत व्हावी यादृष्टीने या तीनही स्तरावरील विविध बांधकामे, साहित्य व सेवांचा पुरवठा e-Tendering च्या माध्यमातून करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती मधील विविध साहित्य आणि सेवा पुरवठ्याची कामे तसेच कंत्राटदारांना वाटप करण्यात येणारी विविध प्रकारची बांधकामे, दिनांक १ जानेवारी,२०१२ पासून e-Tendering द्वारे करणे अनिवार्य करण्यात येत आहे. या साठी ग्राम विकास विभागाच्या अधिनस्थ जिल्हा परिषद, पंचायत समिती ग्राम पंचायती सह जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (DRDA) इ.सर्व कार्यालयात खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

०१. (अ) साहित्य खरेदी / सेवा पुरवठा -

(१) राज्य शासनाने वा केंद्र शासनाने ज्या ज्या वस्तु व सेवांसाठी दरकरार केलेले आहेत, त्या वस्तु दरकरारात नमूद यंत्रणेकडूनच खरेदी करण्यात याव्यात. मात्र, शासन दरकरारानुसार वस्तु/साहित्य खरेदी करतानाही संबंधित वस्तुंचा दर्जा व प्रत दर्जेदार आहे, याची खातरजमा करुन घेण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था /यंत्रणांची आहे.

वस्तु/साहित्य शासन दरकरारावर आहे म्हणून निकृष्ट दर्जाचे साहित्य खरेदी करण्याचे बंधन असू शकत नाही. यासाठी शासन दरकरारावरील वस्तु/साहित्य खरेदी करताना त्याचा दर्जा व प्रत याची शासनाच्या सक्षम यंत्रणेकडून विहीत कार्यपध्दती अनुसरुन तांत्रिक तपासणी करून घेण्यात यावी. बांधकामाच्या पत व दर्जाबाबत ग्राम विकास विभागाने विहित केलेल्या निकषानुसार व तपासणी यंत्रणेकडून विहित पध्दतीने कार्यवाही करावी. शासन दरकरारावरील वस्तु/साहित्य दरकरारात नमूद विहीत दर्जाचे व प्रतीचे आढळून आले नाही तर याबाबत संबंधित दरकरार निश्चित केलेल्या शासन यंत्रणेकडे लागलीच तक्रार करण्यात यावी व पर्यायी व्यवस्था करण्यासाठी त्यांचेकडे परवानगी मागण्यात यावी.

(२) ज्या वस्तु /साहित्य व सेवा पुरवठयासाठी शासन दरकरार निश्चित नाहीत, त्या प्रत्येक वस्तुंची खरेदी करताना **रुपये- १००,०००/- (रुपये एक लक्ष) पेक्षा जास्त अशी कोणतीही खरेदी यापुढे केवळ e-Tendering** माध्यमातून करण्यात यावी.

**(ब) विविध बांधकामाचे वाटप :-**

(१) स्थानिक स्वराज संस्थांमार्फत इमारत, रस्ते, पाणी पुरवठा योजना, नाली/गटारे, समाजमंदिर, सभागृह अशा विविध विकासात्मक स्वरुपाच्या हाती घेण्यात येणाऱ्या बांधकामांसाठी यापुढे **जिल्हा परिषद, पंचायत समिती** व **ग्रामपंचायत स्तरावर रुपये पाच लाख व त्यापेक्षा अधिक मुल्यांची सर्व कामे पहिल्या टप्प्यात e-Tendering च्या माध्यमातून करण्यात यावीत.**

यामध्ये शासन निर्णय, क्र.ग्रासयो-२००७/प्र.क्र.१/योजना-९, दिनांक ८ मे,२००७ नुसार मजूर सहकारी संस्थांना व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना जी कामे दयावयाची आहेत त्याचे शासन धोरणाप्रमाणे **३३ %** प्रमाण कायम ठेवण्यात येवून, संबंधित मजूर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना काम वाटप करताना त्या-त्या गटाअंतर्गत निकोप स्पर्धा निर्माण होईल, अशा पध्दतीने e-Tendering प्रक्रियेतूनच ही कामे वाटप करण्यात यावीत.

**(२)** ग्रामपंचायतींच्या स्तरावरील कामांबाबतसुध्दा ग्रामपंचायतीने **रुपये ५ लाख व त्यापेक्षा अधिक** मुल्य किंमतीची कामे **e-Tendering** प्रक्रियेतूनच वाटप करावीत. जर ही कामे ग्रामपंचायत स्वतः मजूर लावून व साहित्य खरेदी करुन(डिपार्टमेंटल पध्दतीने) काम करणार असल्यास **e-Tendering** माध्यमातून काम देण्याचा प्रश्न उद्भवणार नाही. परंतु यासाठी जे साहित्य खरेदी करावयाचे आहे ते मात्र, **रुपये-१००,०००/- (रुपये एक लक्ष) पेक्षा जास्त किंमत असल्यास प्रत्येक बाब e-Tendering च्या माध्यमातून निविदा मागवून खरेदी करण्यात यावी. अशा तऱ्हेने साहित्य खरेदी करताना केवळ १ लाखापेक्षा कमी किंमत व्हावी व केवळ e-Tendering च्या प्रक्रियेतून सूट मिळवण्यासाठी त्यांचे तुकडे करुन खरेदी करु नये. रु.५ लाखापेक्षा कमी किंमतीची कामे ग्रामपंचायतीने प्रचलित शासन नियम व निर्णयानुसार करावीत.**

०२. **ई-निविदा प्रक्रियेसाठी खालील प्रमाणे प्राधिकृत अधिकारी घोषित करण्यात येत आहेत :-**

**(अ) जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तर :-**

| | | |
|---|---|---|
| (१) | मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प. | अध्यक्ष |
| (२) | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प. | सदस्य |
| (३) | मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जि.प. | सदस्य |
| (४) | संबंधित विभागाचा जि.प.स्तरावरील विभाग प्रमुख | सदस्य- सचिव |
| (५) | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांध.) / पाणी पुरवठा व स्व.वि यापैकी एक. | सदस्य |

**(ब)** **<u>पंचायत समिती :</u>**

| | | |
|---|---|---|
| (१) | पंचायत समितीचे सभापती | अध्यक्ष |
| (२) | पंचायत समितीचे उपसभापती | सदस्य |
| (३) | गट विकास अधिकारी | सदस्य |
| (४) | पंचायत स्तरावरील उप अभियंता (मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प. नियुक्त करतील असा) | सदस्य सचिव |

त्यापैकी (अ) साठी मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यापैकी एक व अ.क्र.३,४ व ५ पैकी एक अशा दोघांची उपस्थिती अनिवार्य असून, त्यांच्याकडील ई-स्वाक्षरीने या निविदा उघडण्यात येतील. तर (ब) साठी अ.क्र.१ ते ३ यापैकी एक व क्र.४ या दोघांची उपस्थिती अनिवार्य असून, त्यांच्याकडील ई-स्वाक्षरीने या निविदा उघडण्यात येतील.

**(क)** **<u>ग्रामपंचायत स्तर :-</u>**

| | | |
|---|---|---|
| (१) | सरपंच | अध्यक्ष |
| (२) | उप सरपंच | सदस्य |
| (३) | संबंधीत ग्राम पंचायतीचे ग्राम सेवक/ग्रामविकास अधिकारी | सदस्य सचिव |
| (४) | संगणक प्रणालीसाठी नियुक्त केलेला कर्मचारी. | |

या साठी क्र.१,२ ,४ पैकी एक व सदस्य सचिव यांची उपस्थिती अनिवार्य असून, त्यांच्याकडील ई-स्वाक्षरीने या निविदा उघडण्यात येतील.

शासन निर्णय ग्राम विकास विभाग क्र.झेडपीए २००८/प्र.क्र.४७२/वित्त-९(३३), दिनांक ९ फेब्रुवारी,२००९ मधील तरतूदीनुसार ग्राम पंचायतीने कामे करण्यास असमर्थता दर्शविल्यास सदरची कामे ३३:३३:३४ या प्रमाणात मजूर सहकारी संस्था, सुशिक्षीत बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यामध्ये वाटप करावयाची कामेसुध्दा त्या-त्या गटाअंतर्गत **e-Tendering** च्या प्रक्रियेतून वाटप करण्यात यावीत. या संदर्भातील शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.ग्रासयो-२००७/प्र.क्र.१/यो-९ दिनांक ८ मे,२००७ चे अधिक्रमण करण्यात येत असून ही कामे **e-Tendering** प्रक्रियेने करताना ती खालील अधिकाऱ्यांच्या समक्ष त्यातील प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या ई-स्वाक्षरीने उघडण्यात येतील.

| | | |
|---|---|---|
| १) | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २) | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) | सदस्य सचिव |
| ३) | संबंधित विभागाचा कार्यकारी अभियंता | सदस्य. |
| ४) | जिल्हा उपनिबंधक | सदस्य. |

यामध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांची व अन्य तिघांपैकी एकाची अशी दोघांची उपस्थिती व ई-स्वाक्षरी अनिवार्य असेल.

**०३.** तसेच या संदर्भात ग्राम विकास व जलसंधारण विभागामार्फत त्रिस्तरीय पंचायती राज संस्थांच्या अखत्यारितील विकास कामे पार पाडण्यासाठी सहकारी मजूर संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना ग्राम विकास व जलसंधारण विभागामार्फत पंजीकरण करणे अनिवार्य करण्यात येत आहे.

**०३. ०१. <u>मजूर सहकारी संस्था :</u>**

**(१)** यांना कामे देण्याकरीता त्यांची वर्गवारी खालीलप्रमाणे राहील :-

1. "अ" वर्ग मान्यता प्राप्त सहकारी मजूर संस्था उच्चतम पात्रता रु. १५.०० लक्ष
2. ब" वर्ग मान्यता प्राप्त सहकारी मजूर संस्था उच्चतम पात्रता रु. ७.५० लक्ष

(२) वरील १ व २ येथील मान्यता प्राप्त मजूर सहकारी संस्थांनी ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडे शासन निर्णय क्र.१ सोबतच्या परिशिष्ट १ नुसार विहीत नमुन्यात नाव नोंदणी केल्यानंतर जिल्हा परिषदांमार्फत कार्यान्वित केली जाणारी इमारती व दळणवळण व त्याच बरोबर पाणी पुरवठा, लघु पाटबंधारे इ. संबंधातील सर्व योजनांतर्गत कार्यान्वित केली जाणारी विकास कामे त्यांच्या वर्गीकरणाप्रमाणे देण्यात यावीत.

(३) वरील "अ" व "ब" वर्ग मान्यता प्राप्त सहकारी मजूर संस्थांना प्रथमतः संदर्भाधीन शासन निर्णयातील अनुक्रमे वर्ग ६ व ७ मध्ये नोंदणीकृत असल्याचे समजण्यात येईल. तसेच मजूर सहकारी संस्थांचे वर्गीकरणाचे नुतनीकरण दर ५ वर्षांनी करणे बंधनकारक राहील.

(४) मजूर सहकारी संस्थांनी ग्राम विकास व जलसंधारण विभागातील कामे करण्यास पात्र होण्याकरीता आवश्यक त्या नोंदणीकरणाबरोबरच खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे-

अ) मजूरीचे काम न करणाऱ्या सर्व सभासदांना संस्थेतून काढून टाकण्यात यावे,

ब) मजूर सभासदांना छायाचित्रासहीत ओळखपत्रे देण्यात यावीत. मजूरांची छायाचित्रे बेबवर टाकावीत.

क) मजूर सभासदांना मजूरी देण्याची कार्यपध्दती शासन निर्णय, कृषि, सहकार विभागाच्या दि. २३.९.१९८८ प्रमाणे असावी.

ड) सभासदासाठी अपघाती विमा योजना सुरु करावी.

इ) मजूर सहकारी संस्थेतील सर्व सभासद साक्षर असणे बंधनकारक राहील.

(५)वरील उदृत केलेल्या अटी अत्यंत महत्वाच्या असून त्यांची परिपूर्तता मजूर सहकारी संस्थेने केली नाही तर त्यांना शासनाने उपरोक्त सवलती देण्याचा उद्देश सफल होत नाही. याबाबत कार्यवाही करण्याची जबाबदारी जिल्हा उप निबंधक व त्यांचे हाताखालील संबधीत अधिकाऱ्यांवर कृषि सहकार खात्याच्या शासन निर्णय दि. १३.३.१९८७ अन्वये निश्चित केलेली आहे. सदर बाबीची अंमलबजावणी काटेकोरपणे होण्यासाठी ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी कामाच्या निरिक्षणाच्यावेळी संबंधीत मजूर सहकारी संस्थेमार्फत वरील अटींचे पालन होते किंवा कसे याची पडताळणी करावी व त्यामध्ये त्रुटी आढळून आल्यास जिल्हा उप निबंधक यांना तात्काळ कळविण्यात यावे. ज्या मजूर सहकारी संस्था अटींची पूर्तता करणार नाहीत त्यांना या विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेतील कामे देता येणार नाहीत याची दक्षता संबंधीत कार्यकारी अभियंता/उप अभियंता यांनी घ्यावी. मुख्य अभियंता / अधिक्षक अभियंता यांनी सुध्दा त्यांच्या निरिक्षण दौऱ्याचे वेळी वेळोवळी आढावा घ्यावा.नोंदणीबुकातील नोंदी तपासणे आवश्यक राहील. याप्रकरणी दुर्लक्ष केल्याचे आढळल्यास व ज्या मजूर सहकारी संस्थांना या अटींची पूर्तता न करता कामे दिल्याचे आढळल्यास संबंधीत मजूर सहकारी संस्था व कार्यकारी अभियंता / उप कार्यकारी अभियंता हे कारवाईस पात्र ठरतील.

(६) विकास कामांच्या निविदांमध्ये सहकारी मजूर संस्थांना अधिमान देण्याची तरतूद असणार नाही.

(७) <u>विद्युत यांत्रिकी कामे</u>

विद्युत व यांत्रिकी मजूर संस्थांना रु. ५००००/- पर्यंतची कामे देण्यात यावीत.

(८) <u>इसारा / बयाणा रक्कम</u>

रु. १५.०० लक्ष पर्यंतची कामांसाठी मजूर सहकारी संस्थांना बयाणा रकमेचा भरणा करण्यापासून सूट देण्यात यावी. रु. १५.०० लक्ष किमतीपेक्षा जास्त रकमांच्या कामाच्या निविदा मागविण्यात आलेल्या असतील तेव्हा इतर ठेकेदाराप्रमाणे इसारा / बयाणा रक्कम रितसर घेण्यात यावी.

(९) <u>सुरक्षा अनामत रक्कम</u>

अ) ज्या मान्यता प्राप्त मजूर सहकारी संस्थांना रु. १५.०० लक्ष किंमतीपर्यंतची कामे द्यावयाची आहेत. त्यांना जर जिल्हा परिषदेमार्फत सिमेंट, इमारती लाकूड, पोलाद, सिमेंट / लोखंडी पत्रे इ. सामान दिले नसेल तर

त्यांच्याकडून सुरक्षा अनामतीची रक्कम वसूल करण्याची आवश्यकता नाही. मात्र बांधकामाला लागणारे वरील वा इतर अन्य साहित्य जर मजूर सहकारी संस्थांना जिल्हा परिषदेमार्फत देण्यात आले असेल तर नियमानुसार वसूल करावयाच्या सुरक्षा अनामत रक्कमेच्या ५० टक्के इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून अशा मजूर सहकारी संस्थेकडून घेण्यात यावी. एकूण कामाच्या १ टक्के इतकी रक्कम (कमीत कमी रु. १००/-) कंत्राटदाराच्या कागदपत्रावर सहया करण्याच्या वेळी वसूल करावी व बाकीची रक्कम टप्प्याटप्प्याने मजूर सहकारी संस्थेला द्यावयाच्या बिलातून वसूल करण्यात यावी.

ब) रु. १५.०० लक्ष पेक्षा जास्त रकमेच्या निविदा मागविण्यात येतील व मजूर सहकारी संस्थांनी स्वतंत्र ठेकेदाराप्रमाणे निविदा भरलेली असेल तेव्हा तारण ठेव भरण्यासाठी मजूर सहकारी संस्था इतर ठेकेदाराप्रमाणे मानण्यात येतील.

**(१०) पतदारी प्रमाणपत्र**

मान्यता प्राप्त नोंदणीकृत मजूर सहकारी संस्थांना पतदारी प्रमाणपत्र देण्याच्या अटीतून सूट देण्यात यावी. मात्र संबंधीत जिल्हा उप निबंधक (सहकार) किंवा जिल्हा सहकारी संस्थाकडून त्यांना देण्यात आलेले काम करण्याची आर्थिक पात्रता आहे असा दाखला मजूर सहकारी संस्थांनी सादर करणे आवश्यक आहे.

**(११)** एक किंवा दोन अथवा मोजक्याच निवडक विविक्षित मजूर सहकारी संस्थांना काम देण्याचे टाळावे. तसेच सर्वसाधारणतः एका मजूर सहकारी संस्थेला त्या संस्थेच्या आर्थिक व इतर मर्यादेपेक्षा अधिक काम देण्यात येऊ नये.

**(१२)** नवीन मजूर सहकारी संस्थेस प्रथमतः रु. ५.०० लक्ष पर्यंतचे कामे यशस्वीरित्या पूर्ण केल्यावरच रु. १५.०० लक्ष पर्यंतची ३ वा अधिक कामे मिळून एकूण रु. ५०.०० लक्ष ची कामे प्रतिवर्षी देण्यात येतील. तत्पूर्वी संबंधीत खात्याचे कार्यकारी अभियंता यांनी विहित पासबुकात नोंद घेणे अत्यावश्यक राहील. आणि त्या संस्थेच्या पासबुकातील नोंदी तपासून एका वर्षात एकूण रु. ५०.०० लक्ष पेक्षा जास्त रकमेची कामे मजूर सहकारी संस्थांना दिली जाणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

**(१३) तंटयाचे वेळी लवाद**

जर काम देणारे संबंधीत खाते व मजूर सहकारी संस्था यांचेमध्ये तंटा निर्माण झाला तर त्या विभागातील अधीक्षक अभियंता यांचा निर्णय अंतिम असेल. हा निर्णय लवादाचा निर्णय म्हणून न रहाता प्रशासकिय निर्णय म्हणून मानला जाईल.

**(१४)** मान्यता प्राप्त व नोदंणीकृत मजूर सहकारी संस्था यांच्या कामाबाबतचा गोपनीय अहवाल अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठेवतील. त्यांना दिलेल्या कामाची अद्ययावत नोंद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ च्या नियम १४७ प्रमाणे नमुना क्र. ४८ मध्ये ठेवण्यात यावा. अशा मजूर सहकारी संस्थेच्या काम करण्याच्या पात्रतेबाबतचा गोपनीय अहवाल ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे संबंधित मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता यांना सादर करतील व त्याची एक प्रत संबंधित विभागीय आयुक्त यांना पाठवतील.

**०३.०२ सुशिक्षित बेरोजगार अभियंता**

**(१)** जे स्थापत्य / विद्युत अभियंते महाराष्ट्रात मूळ रहिवासी असतील व त्यांनी महाराष्ट्रातील किंवा राज्याबाहेरील अभियांत्रिकी महाविद्यालयातून वा महाराष्ट्र राज्याच्या किंवा इतर राज्याच्या तांत्रिक शिक्षण संचालकांनी मान्यता दिलेल्या तांत्रिक संस्थामधून पदवी / पदविका प्राप्त केली असेल व त्यांना नोंदणीकृत कंत्राटदार व्हावयाचे असेल अशा सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना त्यांनी अर्हता प्राप्त केल्यापासून १० वर्षाच्या आंत विहित नमुन्यात अर्ज

करणे आवश्यक आहे. नोंदणीपात्र अभियंत्यांना नोंदणीचे वेळी ते बेरोजगार असल्याबाबत व त्यांनी अन्यत्र कोठेही नोंदणी केलेली नाही, तसेच कोठेही नोकरीत नाहीत, अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील. सदर अभियंत्यांनी सेवायोजन कार्यालयात नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध करणे आवश्यक राहील.

(२) संदर्भिय शासन निर्णय दि. २०.४.२००७ नुसार वर्ग १ ते ९ या संवर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांसाठी कामाच्या रकमेची मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामधील वर्ग ५ नंतर वर्ग ५अ हा संवर्ग नव्याने निर्माण करुन त्या अंतर्गत काम करण्याची आर्थिक क्षमता रु. ३०.०० लक्ष निश्चित करण्यात येऊन या संवर्गात सुशिक्षित स्थापत्य बेरोजगार अभियंत्यांना प्रथम कंत्राटदार म्हणून नोंदणी करण्यात येईल. सदर नोंदणीचे नुतनीकरण दर ५ वर्षांनी करणे बंधनकारक राहील.

(३) वरील परिच्छेदास अनुसरुन या विभागांतर्गत कंत्राटदारांची नव्याने करण्यात आलेली वर्गवारी खालीलप्रमाणे राहील-

| अ.क्र. | कंत्राटदाराची वर्गवारी | काम करण्याची आर्थिक क्षमता | नोंदणी प्राधिकारी - स्तर |
|---|---|---|---|
| १ | वर्ग १ (अ/ ब/ क) | रु. १५ कोटी व त्यापेक्षा जास्त | शासन स्तर |
| २ | वर्ग २ | रु. ७.५ कोटी | शासन स्तर |
| ३ | वर्ग ३ | रु. ३.०० कोटी | शासन स्तर |
| ४ | वर्ग ४ | रु. १.५० कोटी | शासन स्तर. |
| ५ | वर्ग ४ अ | रु. ९९ लक्ष | मु.का.अ.जि.प. |
| ६ | वर्ग ५ | रु. ५० लक्ष | मु.का.अ.जि.प. |
| ७ | वर्ग ५अ | रु. ३० लक्ष | मु.का.अ.जि.प. |
| ८ | वर्ग ६ | रु. १५ लक्ष | का.अ.(बां.)जि.प. |
| ९ | वर्ग ७ | रु. ७.५ लक्ष | का.अ.(बां.)जि.प. |
| १० | वर्ग ८ | रु. ३.०० लक्ष | का.अ.(बां.)जि.प. |
| ११ | वर्ग ९ | रु. २.०० लक्ष | का.अ.(बां.)जि.प. |

## विद्युत कंत्राटदार

| अ.क्र. | कंत्राटदाराची वर्गवारी | काम करण्याची आर्थिक क्षमता | नोंदणी प्राधिकारी - स्तर |
|---|---|---|---|
| १ | वर्ग अ | अमर्याद | मु.का.अ.जि.प. |
| २ | वर्ग ब | रु. २५ लक्ष | मु.का.अ.जि.प. |
| ३ | वर्ग क | रु.१० लक्ष | का.अ.(बां.)जि.प. |
| ४ | वर्ग ड | रु. ७.५ लक्ष | का.अ.(बां.)जि.प. |
| ५ | वर्ग इ | रु. २.०० लक्ष | का.अ.(बां.)जि.प. |

**(४)** नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी वर्ग पात्रतेपर्यंतचे कामांच्या उपलब्धतेनुसार रु. ५.०० लक्ष पर्यंतचे एक काम किंवा तेवढयाच किंमतीची दिलेली कामे यशस्वीपणे पूर्ण करणे आवश्यक राहील.

**(५) (अ)** ज्या नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी रु. ५ लक्ष पर्यंतचे पहिले काम यशस्वीरित्या पूर्ण केलेले आहे अशाच सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना रु. १५ लक्ष पर्यंतची कामे देण्यासाठी पात्र राहतील. अशा कामांची एकत्रित रक्कम रु. ६० लक्ष प्रति वर्ष पाच वर्षापर्यंत इतकी राहील व तद्नंतर सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी नियमित कंत्राटदार म्हणून कार्यरत राहतील. अशा कामांची नोंद संबंधीत खात्याच्या कार्यकारी अभियंता यांनी विहित पासबुकात नोंद घेणे आवश्यक राहील आणि संबंधीत सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांच्या पासबुकातील नोंदी तपासून एका वर्षात रु. ६० लक्ष पेक्षा जास्त रकमेची कामे दिली जाणार नाहीत याची दक्षता कार्यकारी अभियत्यांनी कटाक्षाने घ्यावी.

**(५)** (ब) ज्या विद्युत बेरोजगार अभियंत्यांनी रु.२.०० लक्ष एक किंवा तेवढयाच किंमतीची दिलेली कामे यशस्वीपणे पूर्ण केलेली आहेत अशाच बेरोजगार विद्युत अभियंत्यांना रु. ५.५० लक्ष ची कामे देण्यात यावी.

**(६)** पतदारी प्रमाणपत्र विहित नमुन्यात सादर करणे बंधनकारक राहील.

**(७)** तारण ठेव भरण्यासाठी सुशिक्षित बेराजगार अभियंत्यांना इतर ठेकेदाराप्रमाणेच मानण्यात येईल.

**(८)** नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता या संवर्गातील पदवी / पदविकाधारक स्थापत्य अभियंता कंत्राटदारासाठी विहित नमुन्यामधील रु. ५ लक्ष अंदाजित किंमतीपर्यंतची कामे आरक्षित करण्यात यावीत व ही कामे अशा अभियंता कंत्राटदारांना निविदा बोलावून शासनाच्या विहित नियमानुसार स्पर्धात्मक पध्दतीने देण्यात यावीत. अशा कामांच्या निविदा बोलावितांना या कामाकरीता सुशिक्षित बेरोजगार अभियंता या संवर्गातर्गत नोंदणीकृत पदवी / पदविकाधारक (स्थापत्य) अभियंता कंत्राटदार निविदा भरण्यास पात्र राहतील. याचा स्पष्ट उल्लेख निविदा सुचनेमध्ये करण्यात यावा.

**(९)** एक किंवा दोन अथवा मोजक्याच निवडक विविक्षित सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना काम देण्याचे टाळावे. तसेच सर्वसाधारणतः एका सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याला त्या संस्थेच्या आर्थिक व इतर मर्यादेपेक्षा अधिक काम देण्यात येऊ नये.

**(१०)** **<u>तंटयाचे वेळी लवाद</u>**

जर काम देणारे संबंधीत खाते व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना यांचेमध्ये तंटा निर्माण झाला तर त्या विभागातील अधिक्षक अभियंता यांचा निर्णय अंतिम असेल. हा निर्णय लवादाचा निर्णय म्हणून न रहाता प्रशासकिय निर्णय म्हणून मानला जाईल.

**(११)** मान्यता प्राप्त व नोदंणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना यांच्या कामाबाबतचा गोपनीयअहवाल अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठेवतील. त्यांना दिलेल्या कामाची अद्ययावत नोंद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ च्या नियम १४७ प्रमाणे नमुना क्र. ४८ मध्ये ठेवण्यात यावी.

अशा मजूर सहकारी संस्थेच्या काम करण्याच्या पात्रतेबाबतचा गोपनीय अहवाल ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे संबंधीत मुख्य अभियंता / अधिक्षक अभियंता यांना सादर करतील व त्याची एक प्रत संबंधीत विभागीय आयुक्त यांना पाठवतील.

०४. **काम वाटप सनियंत्रण समिती**

सहकारी मजूर संस्था व सुशिक्षित बेराजगार अभियंता यांचेमार्फत कार्यान्वित होणाऱ्या **e-Tendering** कामांचे सनियंत्रण करण्यासाठी जिल्हानिहाय समिती स्थापन करण्यात यावी. सदर समितीची रचना व कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील :-

| | |
|---|---|
| १. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २. कार्यकारी अभियंता (बां.) जिल्हा मुख्यालयात कार्यरत | सदस्य सचिव |
| ३. कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद (बां.) | सदस्य |
| ४. कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद. | सदस्य |
| ५. कार्यकारी अभियंता (लघु पाटबंधारे) | सदस्य |
| ६. जिल्हा उप निबंधक | सदस्य |

सदस्य सचिव यांचे अखत्यारितील लेखापाल / कार्यालयीन अधिक्षक हा त्यांना मदतनीस राहील.

**समितीची कार्यपध्दती**

(१) संबंधित ग्रामपंचायतीने काम करण्यास नकार दिल्यास, रु. ५ ते १५ लक्ष किंमतीपर्यंतच्या कामाचे वाटपासाठी मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांच्यामध्ये ३३:३३:३४ या प्रमाणात कामे निश्चित करावीत.

(२) समितीची बैठक प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला (सुट्टी असल्यास पुढील कामाच्या दिवशी) दुपारी होईल. तसेच कामाची उपलब्धता, निकड यानुसार जादा बैठका होतील.

(३) मजूर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांची ठेकेदार म्हणून नोंदणी करणाऱ्या कार्यकारी अभियंता यांचेकडून समिती नोंदणीची यादी मागविल. तसेच सदर कार्यकारी अभियंता यांची सदर यादी पुरविण्याची जबाबदारी राहील.

(४) योग्य अशा मंजूर कामाची यादी, समिती बांधकाम, पाटबंधारे, पाणी पुरवठा विभागातून मागवून घेईल. सदर कार्यकारी अभियंता यांची सदर यादी पुरविण्याची जबाबदारी राहील.

(५) ग्रामपंचायती / मजूर सहकारी संस्था / सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याकडून कामे मिळविण्यासाठी जेवढे अर्ज समितीकडे प्राप्त होतील त्याची यादी, तसेच कोणत्या कामासाठी किती जण इच्छुक आहेत याबाबतची सर्व माहिती सुचना फलकावर जाहीर करण्यात येईल. सदर बाबतीत निस्पृहता व पारदर्शकता कटाक्षाने पाळण्यात यावी.

(६) जे सुशिक्षित बेरोजगार अभियंता / मजुर सहकारी संस्था कामासाठी इच्छापत्र देतील तेव्हा त्या सोबत त्यांना देण्यात आलेले कामाचे पासबुक सादर करणे आवश्यक आहे. जर पासबुक सादर केले नाही तर त्याने एकदा काम नाकारले असे गृहीत धरण्यात येईल व अशा स्थितीत इच्छापत्र असले तरी सुशिक्षित बेरोजगार अभियंता / मजुर सहकारी संस्था यांचे नांव विचारार्थ घेतले जाणार नाही.

(७) मजूर सहकारी संस्था तसेच बेरोजबार सुशिक्षित अभियंता यांना समितीमार्फत कामाचे वाटप करताना त्यांनी स्वतंत्र कंत्राटदार म्हणून घेतलेली एकूण कामे व अशा संस्थांना समितीमार्फत देण्यात यावयाची कामे

अशा सर्व कामांची संख्या एका वेळी तीन पेक्षा जास्त होणार नाहीत व त्यांना विहीत केलेल्या पतमर्यादेच्या बाहेर कामे दिली जाणार नाहीत याबाबतची दक्षता समितीने घ्यावी.

(८) ई-निविदेनुसार पात्र ठरणा-या घटकांना कामे देण्याबद्दल योग्य ते निर्णय घेण्याचे अधिकार समितीस राहतील. वरील आदेश तातडीने अंमलात येतील.

## ०५. e -tendering ची अंमलबजावणी :-

**(१) नोंदणीकरण :-**

ई- निविदा (**e-Tendering**) चा अवलंब करण्यासाठी इच्छुक कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंते, मजूर सहकारी संस्था व पुरवठादार यांचे पंजीकरण (e-Registration) व सहीची e-Signature नोंदणी दिनांक ३१ डिसेंबर,२०११ पूर्वी करून घेणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया मुदतीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने सर्व जिल्हा परिषदांनी विविध माध्यमातून या कार्यक्रमास व्यापक प्रसिध्दी देवून जिल्हयातील जास्तीत जास्त कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंते, मजूर सहकारी संस्था व पुरवठादार e -tendering च्या प्रक्रियेमध्ये सामील होतील यादृष्टीने कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे असे **e-Tendering** उघडण्यासाठी स्थानिक स्वराज संस्थेतील विशिष्ट अधिकाऱ्याची e - सही सुध्दा नोंदवून घ्यावी लागणार असल्याने, त्याबाबतही जिल्हा परिषदांनी उचित कार्यवाही करावी.

**(२) प्रशिक्षण :-**

**e-Tendering** ची अंमलबजावणी करण्यासाठी व e - Tendering प्रक्रिया सर्व संबंधितांना समजावून सांगण्यासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींचे समूह तयार करुन त्या त्या स्तरावर e - Tendering चे प्रशिक्षण संबंधित कर्मचाऱ्यांना देण्याची व्यवस्था मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तातडीने सुरु करावी.

**e-Tendering** प्रणाली प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सुरळीतपणे राबविली जात असल्याने, e - Tendering च्या अनुषंगाने नोंदणीकरण, प्रशिक्षण, सादरीकरण यासाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतील कार्यकारी अभियंते व एनआयसीचे योजनेअंतर्गत प्रतिनिधी यांचे सहाय्य घेण्यात येवून, **इच्छुक कंत्राटदारांचे नोंदणीकरण व प्रशिक्षणाची कार्यवाही सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी दिनांक ३१.१२.२०११ अखेर पूर्ण करावी.**

**(३) प्रसिध्दी :-**

जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर सर्व निविदा व वस्तुंची खरेदी दिनांक १ जानेवारी,२०१२ पासून ई-निविदा कार्यपध्दतीने करावयाची असल्याने, योग्य त्या श्रेणीमधील इच्छुक कंत्राटदारांसाठी प्रपत्र-अ नुसार सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हास्तरावर व्यापक प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करावी.

**(४) अंमलबजावणी :-**

जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर ई-निविदा कार्यपध्दतीचा अवलंब करताना संदर्भीय दिनांक ९.२.२००९ मधील ज्या कामांचे वाटप संबधित मजूर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांच्यामध्ये करावयाचे आहे, त्या कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या अंगभूत महाऑनलाईन कंपनीने ई-निविदा प्रणालीसाठी तयार केलेल्या आज्ञावलीचा वापर करण्यात यावा व अन्य सर्व बाबींसाठी एनआयसी ने (National Informatics Center) ने उपलब्ध करुन दिलेल्या आज्ञावलीचा (प्रायोगिक तत्वावरील http://demoeproc.nic.in या संकेतस्थळाचा) वापर करण्यात यावा.

**०६.	वरील कार्यपध्दती अनुसरुन, सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींमध्ये सर्व विकासात्मक योजना/ कामांच्या (बांधकाम, सेवा, खरेदी इ.) निविदांसाठी दिनांक १ जानेवारी, २०१२ पासून ई-निविदा कार्यपध्दती लागू करण्यात येत** आहे.

०७.	प्रस्तुतचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र २०१११०१९१४३३३९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने ,

**( दि. ग. मोरे )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
प्रधान सचिव (सहकार)
सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
सचिव (बांधकाम)
विभागीय आयुक्त (सर्व)
मुख्य अभियंता प्रधानमंत्री ग्रामसडक योजना,मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (ग्रामविकास विभाग) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (ग्रामविकास विभाग) यांचे खाजगी सचिव,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
सर्व प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद,
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
ग्रामविकास व जलसंधारण विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन पंरा ७.

प्रपत्र -अ

जिल्हा परिषद

कंत्राटदारांना आवाहन

ग्रामीण विकास विभागाअंतर्गत जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्राम पंचायत स्तरावर सर्व निविदा व खरेदी दिनांक १ जानेवारी,२०१२ पासून ई-निविदा पध्दतीने मागविण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

२. ई-निविदेसाठी इच्छूक कंत्राटदारांनी डिजिटल सिग्नेचर सर्टीफिकेट (डी.एस.सी.) व ई-टोकन मिळविणे आवश्यक आहे. कंत्राटदारांनी डी.एस.सी. च्या सहाय्याने संकेतस्थळावर त्यांच्या नावांची नोंदणी करणे आवश्यक आहे. कंत्राटदारांना ई-टोकन SIFY/ TCS/ GNFC/ e-Mudhra/ SafeScrypt इ. मान्यताप्राप्त प्रमाणित संस्थांकडून अथवा मान्यता प्राप्त डी.एस.सी. पुरवठादार संस्थेकडून प्राप्त करता येईल.

३. योग्य त्या श्रेणीमध्ये नोंदणीकृत असलेले इच्छुक कंत्राटदारांना सुचित करण्यात येते की, त्यांनी http;//demoeproc.nic.in या संकेत स्थळावर सध्या प्रायोगिक तत्वावर याची माहिती उपलब्ध असून प्रायोगिक तत्वावर नोंदणी सुद्धा करता येवू शकते. इच्छुक कंत्राटदारांसाठी स्वतंत्रपणे प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे. ई-निविदा प्रक्रियेसंदर्भात अधिक माहितीसाठी श्री.सय्यद शफी उप अभियंता, पुणे (भ्रमणध्वनी ९४२३४७१३८०) यांच्याशी संपर्क साधावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>
जिल्हा परिषद

({EE®E¶E¹] 2.3)

**अखर्चित निधी खर्च करण्याबाबतची कार्यप्रणाली**

**महाराष्ट्र शासन,**
**वित्त विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक:- ६ जून, २००८**

**वाचा:- शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांक: २६ सप्टेंबर २००५.**

**प्रस्तावना:-**

उपरोक्त संदर्भांधिन शासन निर्णयाद्वारे वित्त विभागाने विभागांतर्गत वर्ष अखेर अखर्चित राहिलेल्या रकमा खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केली आहे. शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला निधी पूर्णपणे खर्च करतांना येणा-या अडचणी लक्षात घेऊन उपरोक्त शासन निर्णयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला व अखर्चित राहीलेला निधी खर्च करण्यासाठी दिनांक ३० जून पूर्वी अनुमती घेण्याची अट शिथिल करण्यात येत आहे. आता सदर अखर्चित निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षअखेर पर्यंत खर्च करण्याची अनुमती देण्यात येत आहे. सदर अनुमती सन २००७-०८ व त्यापुढील अखर्चित रकमांसाठी राहील. मात्र सन २००७-०८ या आर्थिक वर्षाच्या आधी मुक्त केलेल्या व पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहीलेला निधी स्वायत्त संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०६०६१४२१५७००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**( सु.प्र.कानडे )**
**शासनाचे उप सचिव, वित्त विभाग**

**(कृ.मा.प.)**

**प्रति:**

१. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)

२. सर्व उप सचिव, अवर सचिव, वित्त विभाग,/ सर्व व्यय कार्यासने, वित्त विभाग.

३. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.

४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परीक्षा), मुंबई.

५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,

६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परीक्षा), नागपूर.

७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ वांद्रे

८. निवासी लेखा अधिकारी, मुंबई

९. निवड नस्ती, अर्थोपाय

({EE®E¶E¹] 3.1)

**पथकिनारवर्ती नियमात एकसूत्रता आणण्यासाठी 'इमारत रेषा' व 'नियंत्रणरेषा' याकरिता घ्यावयाची अंतरे.**

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन निर्णय क्रमांक - आरबीडी - १०८१/८७१/रस्ते - ७.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - ९ मार्च, २००१.

**प्रस्तावना -**

रस्त्याच्या बाजूने होणा-या वसाहतीमुळे रस्त्यावरील वाहनांच्या वाहतुकीस अडथळे निर्माण होतात. त्याच प्रमाणे अशा वसाहतींमध्ये येणारी वाहने थांबल्यामुळे वाहतुकीस अडथळा येतो. वसाहतींची ही अनिर्बंध वाढ रोखण्यासाठी पथकिनारवर्ती नियम तयार करण्यात आलेले आहेत. या पथकिनारवर्ती नियमात "इमारत रेषा" व "नियंत्रण रेषा" किती अंतरावर असाव्यात हे मुंबई महामार्ग अधिनियम १९५५, महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६९, केंद्र शासनाच्या भूपृष्ठ मंत्रालयाचे दि. १३/१/१९७७ च्या मार्गदर्शक सुचना व स्टँडर्ड बिल्डिंग अँड डेव्हलपमेंट कंट्रोल रूल फॉर म्युनिसिपल कौन्सिल ए. बी. सी. मध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

वरील अधिनियम / नियम यामधील तरतुदीमध्ये एकसुत्रता नसल्यामुळे "इमारत रेषा" व "नियंत्रण रेषा" यासाठी कोणते अंतर घ्यावे याबाबत संभ्रम निर्माण होतो. तसेच या वेगवेगळ्या अधिनियमांचा / नियमांचा अवलंब केल्यामुळे असमानता निर्माण होते. म्हणून हा संभ्रम दूर करण्यासाठी व या अधिनियम / नियमांत समानता आणण्याकरिता एकच सर्वकष धोरण असावे यासाठी शासनाने प्रधान सचिव, (महसूल), महसूल व वन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती नेमली होती. त्या समितीने सर्वकष अभ्यास करून काही शिफारशी केल्या. त्या शिफारशी विचारात घेऊन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय -**

मुंबई महामार्ग अधिनियम १९५५, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६९, त्याच प्रमाणे नगरपालिकेसाठी असणा-या बिल्डिंग बायलॉज अँड डेव्हल्पमेंट कंट्रोल रूल या सर्वांसाठी खाली दर्शविल्याप्रमाणे "इमारत रेषा" व "नियंत्रण रेषा" यांची अंतरे विहित करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | रस्त्याचा दर्जा | इमारत रेषा | | नियंत्रण रेषा (फॅक्टरी, सिनेमा हॉल, व्यापारी गोडाऊन, मार्केट इ. गर्दी होईल अशी ठिकाणे) | |
|---|---|---|---|---|---|
| | | नागरी व औद्योगिक भाग | अनागरी भाग | नागरी व औद्योगिक भाग | अनागरी भाग |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | द्रूतमार्ग | रस्त्याच्या मध्यापासुन ६० मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासुन १५ मीटर यापैकी जास्त असेल ते. | रस्त्याच्या मध्यापासुन ६० मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासुन १५ मीटर यापैकी जास्त असेल ते. | रस्त्याच्या मध्यापासुन ६० मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासुन १५ मीटर यापैकी जास्त असेल ते. | रस्त्याच्या मध्यापासुन ६० मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासुन १५ मीटर यापैकी जास्त असेल ते. |
| २ | राष्ट्रीय मार्ग | रस्त्याच्या हद्दीपासुन ३ ते ६ मीटर. | रस्त्याच्या मध्यापासुन ४० मीटर. | रस्त्याच्या मध्यापासुन ३७ मीटर. | रस्त्याच्या मध्यापासुन ७५ मीटर. |
| ३ | राज्य महामार्ग व प्रमुख राज्य महामार्ग | रस्त्याच्या मध्यापासुन २० मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासुन ४.५ मीटर यापैकी जास्त असेल ते. | रस्त्याच्या मध्यापासुन ४० मीटर. | रस्त्याच्या मध्यापासुन ३७ मीटर. | रस्त्याच्या मध्यापासुन ५० मीटर. |
| ४ | प्रमुख जिल्हा मार्ग | रस्त्याच्या मध्यापासुन १५ मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासुन ४.५ मीटर यापैकी जास्त असेल ते. | रस्त्याच्या मध्यापासुन ३० मीटर. | रस्त्याच्या मध्यापासुन ३७ मीटर. | रस्त्याच्या मध्यापासुन ४७ मीटर. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ५ | इतर जिल्हा मार्ग | रस्त्याच्या मध्यापासुन १२ मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासुन ४.५ मीटर यापैकी जास्त असेल ते. | रस्त्याच्या मध्यापासुन १५ मीटर. | रस्त्याच्या मध्यापासुन १८ मीटर. | रस्त्याच्या मध्यापासुन ३० मीटर. |
| ६ | ग्रामीण मार्ग | रस्त्याच्या मध्यापासुन १० मीटर अथवा रस्त्याच्या हद्दीपासुन ३.०० मीटर यापैकी जास्त असेल ते. | रस्त्याच्या मध्यापासुन १२ मीटर. | रस्त्याच्या मध्यापासुन १४ मीटर. | रस्त्याच्या मध्यापासुन २५ मीटर. |

टिप -

१) डोंगराळ भागात, द्रुतमार्ग वगळता इतर सर्व प्रकारच्या रस्त्यासाठी इमारत रेषा व नियंत्रण रेषा या एकच असुन त्या रस्ता हद्दीपासुन ५ मीटर अंतरावर असाव्या.

२) ज्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळातर्फे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात येवून रस्त्याच्या बाजूस सेवा रस्ता विकसित करण्यात आलेला आहे. त्या भागात वरील नियम लागू होणार नाहीत. त्या भागात सेवा रस्त्याच्या पलिकडे होणारी बांधकामे ही महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या नियमानुसार होतील.

३) नगरपालिका क्षेत्रात शासनाच्या रस्त्याच्या हद्दीपलिकडे स्थानिक संस्थेने सेवा रस्त्याची आखणी करून ते बांधावेत. जर नगरपालिका हद्दीतील जुन्या गावठाण भागात किंवा अगोदरच विकसित झालेल्या भागामध्ये राज्यमार्गाच्या हद्दीत स्थानिक नगरपालिका/नगरपरिषद यांच्यांकडून सेवा रस्ता बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे परवानगी बाबत विनंती आल्यास, राज्य शासनाच्या रस्त्याच्या हद्दीत ३० मीटर जागा उपलब्ध असल्यास कडेपासुन ७.५ मीटर रूंदीचा सेवा रस्ता बांधण्यास परवानगी बाबत विचार करण्यात येईल. मात्र स्थानिक संस्थांच्या नवीन वाढीव हद्दीत सेवा रस्त्याची तरतुद विकास आराखड्यात करून ते बांधण्याबाबत आग्रह धरण्यात यावा.

४) सेवा रस्ते बांधण्यास आवश्यक असलेला निधी उभा करण्याकरिता स्थानिक संस्थांतर्फे प्लॉट धारकांकडून विकास कर वसुल करण्यात यावा. व हा निधी सेवा रस्ता बांधण्यासाठीच वापरण्यात यावा. तसेच राज्यमार्गाला जागोजागी छेद देणे योग्य होणार नाही. तेव्हा संचालक

नगररचना व मुल्य निर्धारण विभाग यांनी आराखडा मंजूर करतांना ही बाब लक्षात ठेवून अटी विहित कराव्यात.

५) वेगवेगळ्या शहराच्या बाबतीत ज्यावेळी वर्गीकृत रस्त्यासाठी वळण रस्त्याची बांधकामे पूर्ण होतील, त्या त्या वेळी शहरातून जाणारे वर्गीकृत रस्ते अवर्गीकृत (डि - क्लासिफाय) करणारी अधिसुचना सा. बां. विभागामार्फत प्रसिध्द करण्यात यावी. अशा प्रकारे वर्गीकृत रस्ते अवर्गीकृत होताच सदर रस्त्याचा ताबा संबंधित महानगरपालिका / नगरपरिषदेला द्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सं श्री. काळे)
अवर सचिव

प्रत -

मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मंत्री (सा. बां.), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सा. बां.) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव (महसुल), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
सार्वजनिक बांधकाम विभागातील रस्ते व इमारती कार्यासनातील सर्व अधिकारी व कार्यासने
सहव्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नेपियन सी रोड, मुंबई
सर्व मुख्य अभियंते (विद्युत वगळून)
सर्व महसूल आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, सेंट्रल बिल्डिंग, पूणे.
सर्व अधिक्षक अभियंते (विद्युत वगळून)
सर्व कार्यकारी अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत वगळून)/सर्व जिल्हापरिषद
सर्व महानगरपालिका/नगरपालिका
निवड नस्ती, कार्यासन रस्ते - ७.

---

१०३

({EE®E¶E¹] 4.1)

महाराष्ट्र शासन

तात्काळ
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९३६१७
Email : shantaram.manbhav@nic.in

क्र.झेडपीए-२०१३/प्र.क्र.२७/वित्त ९
ग्राम विकास व पंचायतराज विभाग
२५ मर्झबान पथ, बांधकाम भवन,
फोर्ट, मुंबई-४००००१.
दिनांक: १३ मे, २०१६

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद (सर्व)

विषय :- जिल्हा परिषदेमार्फत ग्रामपंचायतींना दिलेले विकास कामाचे देयकातून (बांधकामाचे देयक) विक्रीकराची रक्कम (व्हॅट) कपातीसंदर्भात मार्गदर्शन मिळणेबाबत..

संदर्भ:- १) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए-२०१५/प्र.क्र.१०/वित्त-९, दिनांक २५ मार्च, २०१५.

महोदय,

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदींनुसार ग्रामपंचायत ही स्वायत्त पंचायत राज संस्था असून ती शासनाने विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार कामकाज करते. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता, १९६८ मधील परिशिष्ट ८ च्या तरतुदीनुसार ग्रामपंचायतीच्या हद्दीतील विकास कामे व परियोजना पूर्ण करण्याकरिता ग्रामपंचायतींना कामे दिली जातात.

ही कामे ग्रामपंचायतीने स्वत: मजूर लावून व कामाकरिता लागणारे साहित्य स्वत: खरेदी करुन पूर्ण करीत असेल तर अशा प्रकारच्या विकास कामाच्या देयकामधून ( बांधकामाचे देयक ) विक्रिकराची रक्कम ( व्हॅट ) कपातीसंदर्भात विक्रिकर आयुक्त ( व्हॅट ), मुंबई यांचेकडून तसेच विकास कामाच्या देयकामधून ( बांधकामाचे देयक ) आयकराची रक्कम ( टीडीएस ) कपातीसंदर्भात आयकर आयुक्त ( टीडीएस ), मुंबई यांचेकडून मार्गदर्शन मागविण्यात आले असता त्यांचेकडून अभिप्राय प्राप्त झाले आहेत.

त्या अनुषंगाने ग्राम पंचायतीने विकास कामे स्वत: मजूर लावून व कामाकरिता साहित्य स्वत: खरेदी करुन पूर्ण करीत असेल तर अशा प्रकारच्या बांधकामाच्या किंवा विकास कामाच्या देयकामधून कपातीच्या रक्कमाबाबत खालीप्रमाणे संबंधित विभागांनी अभिप्राय दिले आहेत त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी

(१) आयकर विभागाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत:- "In this regard it is hereby clarified that the TDS provisions as per Chapter XVII of the IT Act 1961 from section

True Copy
Deputy Engineer
Z P (B&C) Sub Dn Malshiras

190 to section 206CA are self explanatory and only because the Gram Panchayat itself carries out the work allotted by the Centre / State Government by purchasing material and employing local labour does not make it exempt from these aforesaid sections of the I.T.Act. 1961. In cases where the material is purchased by Gram Panchayats and work is carried out after employing local labour by them, then the TDS provisions may not be applicable provided such local labour does not involve professional services.

It is further clarified that the applicability of specific sections / provisions of TDS as per the I.T. Act. 1961 depends on the nature of work carried out, the procedure adopted / employed to execute such work. To elaborate further, there is certain work that requires professional or technical expertise ( like maintenance of computers in Gram Panchayats. Services of Architects for construction activity etc.) which attract TDS as per section 194J of the I.T.Act. 1961 @ 10% whereas there are services such as employment of labour, contractor etc. which attract TDS as per section 194C of the I.T.Act. 1961 @2%."

(२) विक्रिकर विभागाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत:- " राज्य शासनाच्या धोरणानुसार ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कामे जिल्हा परिषद व पंचायत समितीमार्फत ग्रामपंचायतींना देण्यात येतात. सदर बांधकामे पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायती अन्वये दोन पध्दतीचा वापर केला जातो.

१) ग्रामपंचायत जाहिर निविदा काढून व्यावसायिक कंत्राटदाराकडून काम पूर्ण करुन घेते.

२) डिपार्टमेंटल पध्दतीने जसे स्थानिक पुरवठादाराकडून साहित्य खरेदी करुन गावातील मजूर लावून काम करुन घेते.

उपरोक्त नमूद पहिल्या पध्दतीमध्ये बांधकामाचे काम संपूर्णपणे कंत्राटदाराला देण्यात आल्यामुळे नियमानुसार त्याला देय रकमेतून मूळ स्त्रोतातून कराची ( TDS ) कपात करणे आवश्यक आहे.

जर कंत्राटदार मूल्यवर्धीत कर अधिनियमाखाली नोंदीत असेल तर टी.डी.एस. चा दर २% आहे. परंतु कंत्राटदार जर अनोंदीत असेल तर टी.डी.एस.चा दर ५% आहे. जर कंत्राटदाराचे मूल्य रुपये ५ लाखापेक्षा अधिक असेल तर टी.डी.एस. ची कपात करणे अनिवार्य आहे.

जर ग्रामपंचायत कार्यकंत्राट कामाकरिता आवश्यक असलेले साहित्य स्थानिक पुरवठादारांकडून खरेदी करुन गावातील मजूरांकरवी स्वतः पूर्ण करुन घेत असेल ( डिपार्टमेंटल पध्दत ) तर सदर व्यवहारामध्ये टी.डी.एस. ची तरतूद लागू होत नाही. मात्र ग्रामपंचायतीने केलेली कोणत्याही प्रकारची खरेदी ही कर बिजक ( Tax Invoice ), विक्रीचे देयक ( Sales Bill ), रोखीचे ज्ञाप ( Cash Memo ) इत्यादींच्या आधारे केलेली आहे, याची खात्री करावी."

वरीलप्रमाणे कपातीबाबतची कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी.

आपला,

१- आयकर विभाग व विक्रिकर विभागाची
सहपत्रे माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.

True Copy

Deputy Engineer
Z.P.(B & C) Sub Dn Malshiras

(वैभव राजेघाटगे)

({EE®E¶E¹] 4.2)

विक्रीकर सहआयुक्त (मुख्या.)१
यांचे कार्यालय,
डी-२, ९ वा मजला, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

प्रति,

श्री. चं. भांगडिया,
उप सचिव, वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

क्रमांक : विउआ (का.व नि.)१/करदर/२००९/१४(२)/प्रशा-८/ब- ८६  मुंबई, दिनांक : २९-०३-२०१५

विषय : जिल्हा परिषदेमार्फत ग्रामपंचायतींना दिलेले विकास कामाचे देयकातून (बांधकाम देयक) विक्रीकराची रक्कम (व्हॅट) कपाती संदर्भात मार्गदर्शन मिळणेबाबत.

संदर्भ : लेखा तथा कक्ष अधिकारी यांचे क्र. झेडपीए-२०१३/ प्र.क्र.२७/वित्त-९, दि. २० मार्च, २०१४ चे पत्र.

लेखा तथा कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, यांनी त्यांच्या दि. २०.३.२०१४ च्या पत्राच्या अनुषंगाने विभागाचे मार्गदर्शन मागविले आहे.

उपरोक्त पत्रामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, राज्य शासनाच्या धोरणानुसार ग्राम पंचायतीच्या हद्दीतील कामे जिल्हा परिषद व पंचायत समिती मार्फत ग्रामपंचायतींना देण्यात येतात. सदर बांधकामे पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायती अन्वये दोन पध्दतींचा वापर केला जातो :

१) ग्रामपंचायत जाहीर निविदा काढून व्यावसायिक कंत्राटदाराकडून काम पूर्ण करुन घेते, किंवा

२) डिपार्टमेंटल पध्दतीने, जसे स्थानिक पुरवठादाराकडून साहित्य खरेदी करुन गावांतील मजूर लावून काम करुन घेते

उपरोक्त नमूद पहिल्या पध्दतीत बांधकामाचे काम संपूर्णपणे कंत्राटदाराला देण्यात आल्यामुळे नियमानुसार त्याला देय रक्कमेतून मूळ स्त्रोतातून कराची (TDS) कपात करणे आवश्यक आहे.

जर कंत्राटदार मूल्यवर्धित कर अधिनियमाखाली नोंदित असेल तर टी.डी.एस. चा दर २ टक्के आहे. परंतु जर कंत्राटदार अनोंदित असेल तर टी.डी.एस. चा दर ५ टक्के आहे. जर कंत्राटाचे मूल्य रुपये ५ लाखापेक्षा अधिक असेल तरच टी.डी.एस. ची कपात करणे अनिवार्य आहे.

जर ग्रामपंचायत कार्यकंत्राट कामाकरिता आवश्यक असलेले साहित्य स्थानिक व्यापाऱ्यांकडून खरेदी करुन गावातील मजूरांकरवी स्वतःच पूर्ण करत असेल (डिपार्टमेंटल [illegible]) तर सदर व्यवहारामध्ये टी.डी.एस. ची तरतूद लागू होत नाही. मात्र ग्रामपंचायतीने केलेली कोणत्याही प्रकारची खरेदी ही कर बिजक (Tax Invoice), विक्रीचे देयक (Sales Bill), रोखीचे ज्ञापन (Cash Memo) इत्यादींच्या आधारे केलेली आहे, याची खात्री करावी.

(सदर प्रश्नास विक्रीकर आयुक्तांची मान्यता घेण्यात आलेली आहे.)

(आर. [illegible])
विक्रीकर सहआयुक्त(मुख्यालय)१,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**दलित वस्ती सुधारणा योजना**
**अनुदानाच्या रकमेत वाढ करणेबाबत**

({EE®E¶E¹] 6.1)

# महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय,क्रमांक:-दवसु-२०११/प्र.क्र. ४४२/अजाक**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- ५ डिसेंबर, २०११**

वाचा:- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक:-दवसु-२००८/प्र.क्र.५२४/विघयो-१,दिनांक १४/११/२००८
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
क्रमांक:-दवसु-२००८/प्र.क्र.५२९/विघयो-१,दिनांक १९/१२/२००८

प्रस्तावना:- दलित वस्ती सुधार योजनेचा एक भाग म्हणून ग्रामीण व शहरी भागामधील दलित वस्त्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी प्रत्येक दलित वस्तीला सन १९९९ पासून रु.५,००,०००/- (रुपये पाच लाख फक्त) इतके अनुदान मंजूर करण्यात येत होते. शासन निर्णय, दिनांक १४.११.२००८ अन्वये दलित वस्तीच्या लोकसंख्येच्या निकषानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदानाच्या रकमेत वाढ करण्यात आली होती. या योजनेंतर्गत घेण्यात येणारे बांधकाम उदा. जोडरस्ते, गटारे बांधकाम, पाणी पुरवठा,दलित वस्ती अंतर्गत रस्ते, दलित वस्तींना पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरींची दुरुस्ती, वीज पुरवठा व समाज मंदिर बांधकामांच्या खर्चाची किंमत दिवसेंदिवस वाढत असल्याने तसेच योजनेची उपयोगिता लक्षात घेता, या योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या अनुदानामध्ये वाढ तसेच अन्य सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:- दलित वस्ती सुधारणा योजनेच्या सर्व बाबींचा विचार करुन दलित वस्ती सुधारण्यासाठी लोकसंख्येच्या निकषानुसार जास्तीत जास्त रु. २०,००,०००/- (रुपये वीस लाख फक्त) अनुदान देण्याबाबत सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यास अनुसरुन प्रत्येक दलित वस्तीला लोकसंख्येच्या प्रमाणात पुढीलप्रमाणे अनुदानाच्या रकमेत वाढ करण्यास शासन मंजूरी देत आहे:-

| अ.क्र. | लोकसंख्या | अनुदान रक्कम (रुपये लाखात) |
|---|---|---|
| १ | १० ते २५ | २.०० लाख |
| २ | २६ ते ५० | ५.०० लाख |
| ३ | ५१ ते १०० | ८.०० लाख |
| ४ | १०१ ते १५० | १२.०० लाख |
| ५ | १५१ ते ३०० | १५.०० लाख |
| ६ | ३०१ च्या पुढे | २०.०० लाख |

२. ही योजना दिनांक १.१२.२०११ पासून अंमलात येईल.

३. दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत करण्यात येणारे बांधकाम ग्रामपंचायत व पंचायत समितीच्या मदतीने करण्यात यावे. आयुक्त, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. दलित वस्ती सुधारणा योजनेसाठी होणारा खर्च पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व हा खर्च प्रतिवर्षी करण्यात येणाऱ्या तरतूदीमधून भागविण्यात यावा:-

२२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण,
०१- अनुसूचित जातीचे कल्याण,
८००- इतर खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना
(०६)(०२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १८७ अन्वये जिल्हा परिषदांना अनुदाने-दलित वस्त्यांची सुधारणा
(२२२५ ३०५ ५)
३१- सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)

५. सदर शासन निर्णय हा ग्रामीण दलित वस्त्यांसाठी असून नागरी दलित वस्त्यांसाठी नगर विकास विभागामार्फत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सुनंदा मो. घड्याळे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति:-
आयुक्त, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय आयुक्त
महालेखापाल ,(लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षण) महाराष्ट्र-१/२ ,मुंबई/नागपूर
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सहसचिव, मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
सह आयुक्त, समाजकल्याण (अनुसूचित जाती उपयोजना),महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग/ नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण
सर्व सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
मा. मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई
ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
उपसचिव/ कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती (अजाक)

प्रधान सचिव,नगर विकास विभाग यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त अनुदानाच्या रकमेतील वाढ लक्षात घेऊन नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करावा.

{EE®E¶E¹]-+

शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
क्रमांकः-दवसु-२०११/प्र.क्र.४४२/अजाक, दिनांक ५/१२/२०११

## दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत अनुदानाच्या रक्कमेत वाढ करणेबाबत

| अ.क्र. | मुद्दा | बदल |
|---|---|---|
| १ | योजनेच्या नावात बदल | योजनेचे नांव *दलित वस्ती सुधार योजना* ऐवजी *अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे.*असे असावे. |
| २ | दलित वस्तीची लोकसंख्या | सदरहू वस्ती घोषित करण्याचे निकष अधिक स्पष्ट असावेत. लोकसंख्येमध्ये दरवर्षी बदल होणार हे लक्षात घेता अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीतील लोकसंख्येची मोजणी करताना जनगणनेच्या निकषाबरोबर या वस्तीमध्ये असलेली प्रत्यक्ष लोकसंख्या लक्षात घेऊन, त्याप्रमाणे ग्राम सभेने ठराव पारित करावा व तो ग्राम पंचायतीकडे पाठविण्याची कार्यवाही करावी. त्यानंतर अशा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीची तपासणी करुन,आवश्यक दुरुस्तीनंतर पंचायत समितीचा संकलित प्रस्ताव जिल्हा समितीकडे पाठविण्याचे अधिकार गट विकास अधिका-यांना असावेत. |
| ३ | योजनेअंतर्गत घ्यावयाची कामे | पाणी पुरवठयाची कामे,मलनिस्सारण, वीज, गटर बांधणे, अंतर्गत रस्ते, पोचरस्ते, पर्जन्य पाण्याचा निचरा (Rain Water Harvesting), इ. कामे प्राधान्याने घ्यावीत व गावातील सर्व वस्त्यांमधील मुलभूत सुविधांची कामे झाल्यानंतर समाजमंदिराचे बांधकाम करावे. जातीय ऐक्यता दृष्टीने संपूर्ण गावांसाठी एकच समाजमंदिर असावे व ते सर्व अनुसूचित जाती व नवबौध्द जातीच्या सर्व वस्त्यांना लाभ घेता येईल अशा मोक्याच्या ठिकाणी असावे. |
| ४ | पोहोच रस्ते | या योजनेअंतर्गत घेण्यात येणारे पोहोच रस्ते गावातील मुख्य रस्त्यापासून जिथपर्यंत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्या आहेत तिथपर्यंत घेण्यात यावेत. |
| ५ | समाजमंदिराबाबत | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे या योजनेअंतर्गत घ्यावयाच्या समाज मंदिराच्या बांधकामासाठी Type Plan निश्चित करुन त्याची बांधकाम मर्यादा रु.७.०० लाख करावी. समाज मंदिराचे बांधकाम झाल्यानंतर ते सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी ग्राम पंचायतीवर राहील. समाजमंदिराची दैनंदिन देखभाल व स्वच्छता रहावी यासाठी हे समाजमंदिर खाजगी कार्यक्रमासाठी नाममात्र भाडयाने देता येईल. हे भाडे किती असावे याबाबत ग्रामपंचायतीने निर्णय घेऊन ते वसुल करावे. त्यांचे स्वतंत्र खाते ठेवुन, त्यातुन दैनंदिन देखभाल व स्वच्छतेचा खर्च भागविण्यात यावा. परंतु ५ वर्षांनी रु. १.०० लाख पर्यंत दुरुस्ती करता येईल.हा दुरुस्ती खर्च अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे या योजनेसाठी दिलेल्या निधीतून भागविण्यात यावा. |

| अ.क्र. | मुद्दा | बदल |
|---|---|---|
| ६ | सामाजिक न्याय विभागाच्या नामफलकाबाबत | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे या योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या कामांचा सविस्तर तपशील व झालेला खर्च याची माहिती देण्यासाठी कोनशिला /नामफलक बसविण्यात यावा. |
| ७ | कामाच्या निवडीचे अधिकार | या योजनेंतर्गत करावयाच्या कामांचा ग्रामपंचायतीकडून प्राप्त झालेला प्राधान्यक्रम व निकड लक्षात घेऊन कामांची निवड करण्याचे पुर्ण अधिकार मुख्य/अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीला असावेत.त्यामध्ये कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद , मुख्य लेखा व वित्त अधिकारी व संबधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सदस्य राहतील, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी हे सदस्य सचिव राहतील. |
| ८ | प्रशासकीय मंजूरी | कामांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अधिनियमानुसार असतील. |
| ९ | दलित वस्तीच्या कामाचे नियंत्रण | कामावर प्राथमिक नियंत्रण पंचायत समितीचे गट विकास अधिकारी ,संबधित उप अभियंता व जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता यांचेकडे राहील. कामाची निवड प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही व निधी वितरण प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सप्टेंबर महिना अखेर पुर्ण व्हावी व शक्यतो कामे त्याच आर्थिक वर्षात पूर्ण व्हावीत. कोणत्याही परिस्थितीत कामे मंजुर केल्यापासून एक वर्षाच्या आंत संबंधित ग्रामसेवकाच्या साहाय्याने ग्रामपंचायतीमार्फत पुर्ण करण्याची जबाबदारी त्या त्या तालुक्याच्या गट विकास अधिकाऱ्याची राहील. गावातील काम अपूर्ण राहिल्यास, त्या ग्राम पंचायतीला पुढील २ वर्षाकरिता निधी देण्यात येऊ नये. |
| १० | दलित वस्ती निधी वाटप करतानाचा प्राधान्यक्रम | या योजने अंतर्गत कामे घेताना खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम द्यावा:-<br>- गावांतील ज्या वस्त्यांना अद्यापी काहीच लाभ दिला नाही अशा वस्त्या<br>- जादा अनुदानाचा लाभ देणे बाकी आहे अशा वस्त्या<br>- एकदा लाभ दिलेल्या वस्त्या व<br>- दोनदा लाभ दिलेल्या वस्त्या<br>बऱ्याच वेळा लोकप्रतिनिधी एकाच गावांला किंवा वस्तीला सलग वर्षात लाभ मिळावा यासाठी आग्रही असतात. त्यामुळे प्राधान्य क्रमाने गावांना/वस्त्यांना लाभ देता येत नाही. याकरिता वरील प्रमाणे प्राधान्य क्रमानेच कामे करावीत. |
| | | प्राधान्य क्रम देणेसाठी गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या तालुक्यातील सर्व गावांची प्राधान्य क्रमाने यादी तयार करुन जिल्हा कार्यालयास सादर करावी व त्यानुसारच परिपुर्ण प्रस्ताव कार्यालयास सादर करावेत. |

| अ.क्र. | मुद्दा | बदल |
|---|---|---|
| | | **या योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या कामांसाठी निधीचे वाटप करताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या साहाय्याने तालुकानिहाय अनुसूचीत जाती /नवबौध्द घटकांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात करावे.** |
| ११ | **दलित वस्ती निधी** वितरित करावयाची कार्यपद्धती | **ज्या कामांना मंजुरी दिली आहे त्या कामांचा ९० टक्के निधी गट** विकास अधिका-यांना वितरित करावा. ग्रामपंचायतीला उपलब्ध करुन दिलेली रक्कम ग्राम सेवक व गट विकास अधिकारी यांच्या संयुक्त खात्यामध्ये ठेवावी. काम सुरु करण्यापूर्वी २५% रक्कम प्रथम अदा करावी व तद्नंतर प्रत्यक्षात पुर्ण झालेल्या कामाचे मूल्यांकन करुन त्या त्या प्रमाणात रक्कम अदा करावी. उदा. २५%,५०% व ७५%. ९०% रक्कम अदा केल्यानंतर जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कामाची पाहणी करुन १००% काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर उर्वरित १०% रक्कम ग्रामपंचायतीस अदा करावी. |
| १२ | कामे देण्याबाबतच्या सूचना | दलित वस्तीतील कामे करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून अनुसुचीत जाती /नवबौध्द घटकांतील सुशिक्षित बेरोजगार अभियंते तसेच अनुसुचीत जाती /नवबौध्द घटकांचे लोक सदस्य असलेल्या मजूर सोसायटयांची निवड करण्यात यावी. |

*****

## दलित वस्ती सुधारणा योजना

**अनुदानाच्या रकमेमध्ये वाढ करण्याबाबत...**

({EE®E¶E1] 6.2)

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक :दवसू-२००८/प्र.क्र.५२४/विघयो-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १४ नोव्हेंबर, २००८.

संदर्भ :- १) शासन निर्णय, सा.न्या.सां.का. क्री.व प.क्र.दवसु-१०९८/ प्र.क्र.३५३/मावक-२, दि.४.३.१९९९.
२) शासन पत्र, सा.न्या.सां.का. क्री.व प.क्र.दवसु-२०००/ प्र.क्र.१०७/मावक-२, दि.२२.१.२०००.

... :- संदर्भाधिन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये दलित वस्ती सुधारणा या योजनेचा एक भाग म्हणून ग्रामीण व शहरी भागांमधील दलित वस्त्यांमधील अनुसूचित जातीच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी प्रत्येक दलित वस्तीला सन १९९९ पासून रु.५,००,०००/- इतके अनुदान मंजूर करण्यात येत होते. या योजनेंतर्गत घेण्यात येणारे बांधकाम उदा.जोडरस्ते, गटारे बांधकाम, पाणी पुरवठा, विहीरींची दुरुस्ती, वीज पुरवठा व समाज मंदीर इ.बांधकामांच्या खर्चाची किंमत दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळे तसेच या योजनेची लोकप्रियता लक्षात घेता, या योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या अनुदानामध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. **शासन आता यापुर्वीचे सर्व शासन निर्णय, परिपत्रके अधिक्रमीत करुन खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-**

**शासन निर्णय :-** शासनाने या योजनेच्या सर्व बाबींचा सखोल विचार करुन दलित वस्ती सुधारण्यासाठी लोकसंख्येच्या निकषानुसार जास्तीत जास्त रु.१०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त) अनुदान देण्याबाबत परिशिष्ट-"अ" मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार प्रत्येक दलित वस्तीला लोकसंख्येच्या प्रमाणात पुढीलप्रमाणे अनुदानाच्या रकमेत वाढ करण्यास शासन मंजूरी देत आहे :-

| अ.क्र. | लोकसंख्या | अनुदान रक्कम (रुपये लाखात) |
|---|---|---|
| १ | ५० ते १०० पर्यंत | ४.०० |
| २ | १०१ ते १५० पर्यंत | ६.०० |
| ३ | १५१ ते पुढे | १०.०० |

२. ही योजना दि.१४.११.२००८ पासून अंमलात येईल.

३. दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत करण्यात येणारे बांधकाम, ग्रामपंचायत व पंचायत समितीच्या मदतीने करण्यात यावे. संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

